म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ३०४.

# दानंदांचे विचार

आणि

# आधुनिक सुशिक्षिताचा वेदान्त

निबंध ८३.

म. म. जोशी

REFBK-0005435

प्रकाशकः—प्रो. अवधूत महादेव जोशी,
१३४-ए हिंदु कॉलनी, दादर, मुंबई.

# स्वामी सच्चिदानंदांचे विचार

आणि

# आधुनिक सुशिक्षिताचा वेदांत

निबंध ६३०

REFBK-0005435

लेखक

कै. प्रो. महादेव मल्हार जोशी, एम्. ए.

क्र. ५०३५

१९३६ ] किंमत १। रुपया [ आवृत्ति पहिली

# प्रो. वा. म. जोशी यांचीं पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| १ | रागिणी ... ... ... ... | २-८-० |
| २ | आश्रमहरिणी ... ... ... ... | ०-६-० |
| ३ | नलिनी ... ... ... ... | २-४-० |
| ४ | सुशिलेचा देव ... ... ... ... | २-०-० |
| ५ | इंदु काळे आणिं सरला भोळे. ... ... | १-०-० |
| ६ | नवपुष्पकरंडक ( कथासंग्रह ) ... ... | ०-८-० |
| ७ | विचार-विलास ... ... ... | ३-०-० |
| ८ | नीतिशास्त्र प्रवेश ... ... ... | ४-०-० |
| ९ | वाङ्मयमाला भाग १ ... ... ... | १-८-० |
| १० | वाङ्मयमाला भाग २ ... — ... | १-४-० |

हीं पुस्तकें बॉंबे बुक डेपो यांजकडे मिळतील.



Printed by S. V. Parulekar, at the Bombay Vaibhav Press,
Servants of India Society's Home, Sandhurst Road,
Girgaon, Bombay.

Published by Prof. A M. Joshi
190 Hindu Colony. Dadar, Bombay.

निबंध

# निवेदन ६३०

माझे परमपूज्य तीर्थरूप कै. प्रो. महादेव मल्हार जोशी यांनीं नवयुग, मनोरंजन, धर्मजागृति वगैरे मासिकांतून 'स्वामी सच्चिदानंदांचे विचार' या मथळ्याखालीं लिहिलेले वाङ्मयविषयक व धर्मविषयक लेख या पुस्तकांत ग्रथित केले आहेत. त्याचप्रमाणें सुमारें वीस वर्षांपूर्वी त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या 'आधुनिक सुशिक्षिताचा वेदान्त' या निबंधाचें पुनर्मुद्रण करून त्याचा याच पुस्तकांत समावेश केला आहे.

'स्वामी सच्चिदानंदांचे विचार' ही लेखमाला निरनिराळ्या मासिकांतून १९१५-१९२७ च्या दरम्यान म्हणजे सुमारें बारा वर्षांच्या कालावधींत प्रसिद्ध झाली आहे. कै. प्रो. जोशी हे १९२८ सालच्या एप्रिल महिन्यांत कालवश झाले. त्यानंतर लागलीच त्यांच्या स्मृत्यर्थ सदर लेखमाला पुस्तकरूपानें छापण्याचा विचार होता. ग्रंथलेखकाच्या अनेक मित्रांकडून तशा सूचनाही येत होत्या. परंतु आर्थिक परिस्थितीपुढें कित्येक वेळां भावना बाजूला साराव्या लागतात. आजकालच्या सार्वत्रिक मंदीच्या कालांत वाङ्मयाच्या बाजारांत नाटककादंबऱ्यांनाही तेजी नाहीं तेथें निबंध कोण हातांत धरतो? परंतु पुस्तकाच्या खपाकडे दुर्लक्ष करून केवळ पितृस्मृति म्हणून पुस्तक प्रसिद्ध करण्याचें ठरविलें तरी पुस्तकप्रकाशनाच्या खर्चाकडे दुर्लक्ष करणें शक्य नव्हतें. अशा परिस्थितींत गेलीं कांहीं वर्षें गेलीं. एकाएकीं मोठें थोरलें घबाड हातीं लागून अनुकूल परिस्थिती प्राप्त होईल अशी आशा महाराष्ट्रीय मनुष्यानें-विशेषतः मजसारख्या शिक्षकाच्या पेशांतील मनुष्यानें-करणें फोल आहे असा विचार करून अखेरीस पुस्तक छापण्याचें 'धाडस' करावें असें ठरविलें. माझे चुलते प्रो. वामन मल्हार जोशी व श्री. नारायण मल्हार जोशी व माझे बंधु यांनीं सर्वांनीं या कामीं साहाय्य करण्याचें आश्वासन दिल्यामुळें मला जास्त उत्साह आला व छापण्याच्या कामास सुरवात केली. बॉम्बे बुक डेपोच्या चालकांनीं पुस्तकाचें प्रकाशन करण्याचें तावडतोब कबूल केलें. आज पुस्तक वाचकांचे हातीं देतांना महाराष्ट्र-सारस्वताची सेवा करण्याचें व पितृऋण फेडल्याचें समाधान एकदम मिळत आहे.

पुस्तक छापण्याचें ठरविल्याबरोबर लेख गोळा करण्यासाठीं जुन्या मासिकांचीं बाडें चाळणें आवश्यक झालें. बहुतेक सर्व लेखांच्या नकला लिहून काढाव्या लागल्या. या कामीं ठाणें येथील ग्रंथसंग्रहालयाचे चिटणीस श्री. गायतोंडे व श्री. सी. म. अभ्यंकर

यांनीं व त्याचप्रमाणें मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या चालकांनीं मला बऱ्याच सवलती दिल्या याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. माझ्या वडिलांचे परमस्नेही व सुप्रसिद्ध विद्वान् प्रो. वसंत नारायण नाईक यांस प्रस्तावना लिहिण्याची विनंति केल्याबरोबर आपलीं महत्वाचीं कामें बाजूला सारून त्यांनीं तें कबूल केलें हें माझ्या वडिलांबद्दलच्या त्यांच्या प्रेमाचें द्योतक होय. त्यांचे आणि वेळोवेळीं उपयुक्त सूचना करून व इतर अनेक प्रकारें साहाय्य केल्याबद्दल मला गुरुस्थानीं असलेले प्रो. नरहरपंत फाटक यांचे आभार मानणें औपचारिक दिसलें तरी मला तसें केल्यावांचून राहवत नाहीं. कामाच्या गर्दीत अडचण सोसून छपाईचें काम वेळेवर आणि उत्तमप्रकारें करून दिल्याबद्दल मुंबई वैभव प्रेसच्या चालकांचे आभार मानणें आवश्यक आहे.

शेवटीं, माझ्या वडिलांच्या अत्यंत आवडत्या 'शिवमहिम्नस्तोत्रां'तील शब्दांत इतकेंच सांगावयाचें—

**इत्येषा वाङ्मयी पूजा श्रीमच्छंकरपादयोः ।**
**अर्पिता तेन मे देवः प्रीयतां मे सदाशिवः ॥**

दादर—मुंबई
ता. १७—५—१९३६

सर्वांचा नम्र,
**अवधूत महादेव जोशी.**

# प्रस्तावना

"स्वामी सच्चिदानंदाचे विचार आणि आधुनिक सुशिक्षिताचा वेदांत" या दोन लेखमालांचे कर्ते कै. महादेव मल्हार जोशी यांची व माझी ओळख प्रथमतः १९०९साली झाली. मुंबई विश्वविद्यालयाची एम. ए. ची परीक्षा उत्तीर्ण होऊन त्याच साली माझी नेमणूक जुनागड येथें बहाउद्दीन 'कॉलेजांत इंग्रजी भाषेचा हंगामी प्रोफेसर म्हणून करण्यांत आली होती. त्याच कॉलेजांतील फ्रेंच भाषेचे अध्यापक प्रो. चार्लस सालढाना यांची व माझे मामा प. वा. गोविंद मल्लिनाथ ठेंगे यांची दाट ओळख होती. अर्थात जुनागडास मी नवखा म्हणून जात असल्यामुळें रा. ठेंगे यांनीं मला प्रो. सालढाना यांच्याकडे चिठी देऊन त्यांचा परिचय करून दिला. प्रो. सालढाना यांच्या शेजारीं स्वतंत्र बंगल्यांत प्रो. जोशी हे रहात असत. तेथेंच माझी व प्रो. पेंडसे यांची ओळख झाली. मी वयानें लहान, प्रवासाला अपरिचित, स्वकुटुंबांतून कधींच बाहेर न राहिलेला आणि नुकताच भयंकर तापातून बरा झालेला, ही स्थिती ओळखून प्रो. सालढाना यांनीं माझी व्यवस्था प्रो. पेंडसे यांच्या घरीं केली. जुनागडास मी सहा महिनेच होतों व या अवधींत प्रो. पेंडसे यांच्याच घरीं राहिलों. पहिल्याच दिवशीं कॉलेजचे तास संपल्यानंतर आम्हीं सर्वजण प्रो. जोशी यांच्या घरीं आलों. कॉलेजचे हंगामी प्रिन्सिपॉल प्रो. होडीवाला यांच्याशिवाय बाकीच्या सर्व प्रोफेसरांत एकमेकांबद्दल आपलेपणा असल्याचें मला त्यावेळीं कळून आलें. कॉमनरूम मीटिंगमध्यें प्रो. होडीवाला आणि इतर प्रोफेसर यांच्या मध्यें हरएक बाबतींत मतभिन्नता असे. प्रो. जोशी यांचा स्वभाव बाणेदार तसाच विनोदी व रसिक असल्यामुळें त्यांनां बाबगें बिलकूल खपत नसे. त्याबरोबरच इतरांशीं त्यांचे सख्य त्वरित होत असे. प्रोफेसरांच्या कंपूंत मी वयानें सर्वांहून लहान व अजाणता असल्यामुळें प्रो. जोशी यांनीं मजकडे विशेष लक्ष पुरविलें. आणि लौकरच आमच्या ओळखीचें रूपांतर दाट स्नेहांत झालें. प्रत्येक दिवशीं संध्याकाळीं आमची बैठक प्रो. जोशी यांच्याच घरीं असे म्हणून वर सांगितलें. या बैठकींत हास्य विनोदाला पूर येत असे. त्याचप्रमाणें नाना पुस्तकांची व विषयांचीही चर्चा होत असे. उत्साही, आशावादी, विनोदी आणि आदरातिथ्यनिपुण असे सद्गृहस्थ प्रो. जोशी हे असल्यामुळें कोणताही दिवस कंटाळवाणा गेला असें मला आठवत नाहीं. जुनागडांत दाक्षिणी कुटुंबें अवघीं चार किंवा पांच. परंतु त्यांच्यांत पूर्ण एकोपा

व मैत्री असल्याचें मला त्यावेळीं दिसून आलें. आणि हा स्नेहभाव जोडून कायम टिकविण्यांत पुढाकार घेतलेल्या व्यक्तींचा नामनिर्देश करावयाचा झाल्यास प्रो. जोशी—ह्मणजे अण्णासाहेब, आणि प्रो. पेंडसे म्हणजे नानासाहेब, याच त्या व्यक्ति होत्या, असें म्हटल्यास चूक होणार नाहीं.

संस्कृत भाषा व वाङ्मय आणि त्याबरोबरच तत्वज्ञानविषयक ग्रंथ यांत प्रो. जोशी यांची गती विशेष होती. त्यापैकीं पहिला विषय तर त्यांच्या अत्यंत आवडीचा होता. आपला विषय विद्यार्थ्यांना समजावून देण्यांत त्यांचा हातखंडा होता. केवळ परीक्षेपुरतें शिकवायाचें, नोटांचीं पुडकीं विद्यार्थ्यांच्या अंगावर फेंकावयाची, आजुबाजूला बिल्कूल पहावयाचें नाहीं, ही पद्धति त्यांनां आवडत नसे. कालिदासाचें शांकुतल नाटक शिकवितानां त्याच्याशीं समरस होऊन ते शिकवीत असत. कालिदासाच्या सबंध काव्याचा विद्यार्थ्यांना परिचय करून देत असत. आणि तुलनात्मक पद्धतीनें व उदाहरणें आणि अवतरणें देऊन इतर नाटककार व कालिदास यांच्यांत फरक काय, व कालिदासाचें रहस्य काय, हेंही विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यास ते चुकत नसत. त्यांचा वर्ग म्हणजे वाङ्मयाची जिवंत ओळख करून घेण्याची एक बिनमोल संधी असें विद्यार्थ्यांना वाटत असे. व यामुळें कॉले-जांतील सर्व विद्यार्थ्यांचें त्यांच्यावर अकृत्रिम प्रेम असे. त्यांच्या अध्यापक पद्धतीचा विचार करतां त्यांची तुलना मुंबईतील प्रो. स्कॉट यांच्याशींच करतां येईल, असें वाटतें. प्रो. स्कॉट हे विक्षिप्त असत, तसा विक्षिप्तपणा प्रो. जोशांत नव्हता. पण रसिकता, तन्मयता, विषयाचें पूर्णज्ञान आणि तो विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवून त्यांच्यांत वाङ्मयाची गोडी उत्पन्न करण्याची विलक्षण हातोटी, याबाबतींत ते प्रो. स्कॉट यांच्यापेक्षां रतिभरही कमी ठरणार नाहींत, असें मी प्रत्यक्ष अनुभवानें सांगू शकतों. जुनागडास मी असतांना प्रो. जोशी हे बंकिमचंद्राचा अभ्यास बंगाली मधून करण्याच्या प्रयोगांत मग्न होते. आणि त्याच्या गोष्टी व कादंबऱ्या आह्माला मोठ्यानें वाचून दाखविण्यांत व त्यांवर जातांजातां टीका करण्यांत त्यांचे तासाचे तास गेल्याचें मला माहीत आहे. अशा टीकेंत व पर्यालोचनांत महाराष्ट्रांतील हरिभाऊ आपट्यांसारख्या कादंबरीकारांचीही सहजीच हजेरी होत असे. आणि स्कॉट, थॅकरे व डिकिन्स यांच्या ग्रंथांचेंहीं समालोचन येत असे. संस्कृत व इंग्रजी, पाश्चात्य व पौरस्त्य तत्वज्ञान, इतिहास आणि आधुनिक राजकारण, यांचाही योग्य समाचार या बैठकींत घेतला जात असे. अर्थात यावेळीं मी सर्वांत लहान

(junior) असल्यामुळें शांतपणें ऐकण्यापलीकडे कांहींही करीत नसे. पण या सहा महिन्यांत माझा जो फायदा झाला व प्रो. जोशी यांच्या स्वभावाची मला जी ओळख पटली तो फायदा व ती ओळख मी कधींही विसरणार नाहीं. तत्वज्ञानाचे अध्यापक प्रो. भट, गणित विषयाचे अध्यापक प्रो. पेंडसे, फ्रेंचभाषेचे अध्यापक प्रो. सालढाना आणि संस्कृतचे अध्यापक प्रो. जोशी यांचा एक गट असे. आणि त्यांत माझा समावेश होऊन मला या सर्वांबद्दल आदर व प्रेम वाटूं लागलें, हें येथें प्रथमतः नमूद केलें पाहिजे. आमच्या कॉलेजाला शुक्रवारची सुट्टी असे. शनिवार व रविवारचे तास थोडेच असत. म्हणून आजूबाजूचीं सर्व स्थळें या 'वीकएन्ड' मध्यें पाहावयाचीं असा कार्यक्रम ठरविण्यांत येत असे. दातार, गिरनार, वेरावळ यांसारखीं स्थळें, त्याचप्रमाणें आजुबाजूचीं संस्थानें पाहण्यास हें सोयीचें झालें. हा प्रोग्राम निश्चित करण्यांत व त्याची व्यवस्था अमलांत आणण्यांत पुढारीपण प्रो. जोशी व प्रो. भट यांच्याचकडे येत असे. आणि सर्व काम बिनधोक पार पडून आनंद, विश्रांति व तरतरीत वृत्ति यांचा लाभ सर्वांनांच मिळत असे.

प्रो. जोशी यांच्या स्वभावांत आंत एक व बाहेर दुसरें असा प्रपंच नव्हता. मतानें व आचरणानें ते स्वतः जुन्या वळणाचे होते. पूजा-अर्चा यांच्यावर त्यांचा विशेष भर होता. ते भावनाप्रधान व श्रद्धावान होते, तरी कर्मठपणानें ग्रासलेले नव्हते. त्यांची मतें स्पष्ट, निश्चित, सडेतोड व विधायक अशीं होतीं. संशयात्मा असें त्यांचें वर्णन खचित करतां येणार नाहीं. तरीही त्यांचा धार्मिकपणा एककल्ली होता असें म्हणतां येणार नाहीं. तत्वज्ञान, वाङ्मय आणि व्यवहार यांचा त्यांच्या मतांत, आचरणांत व उच्चारांत कसा मिलाफ झाला होता हें एकाच शब्दांत सांगावयाचें झाल्यास त्यांच्या वृत्तीचें वर्णन practical idealism असें करतां येईल. अमेरिकन ग्रंथकार इमर्सन हा त्यांना अत्यंत आवडत असे. त्याचप्रमाणें सर आर्थर हेल्प्स यांचा Friends in Council हा ग्रंथ त्यांच्या नेहमींच्या वाचनांतला असे. संध्याकाळची त्यांच्या घरची आमची बैठक Friends in Council च्याच स्वरूपाची होती. विषयाची त्रोटक सुरुवात प्रो. जोश्यांनीं पूर्वपक्ष म्हणून करावयाची. तदनंतर त्यावर एकमेकांत प्रश्नोत्तरद्वारा चर्चा व्हावयाची आणि सरतेशेवटीं कोणीतरी समारोप करून निष्कर्ष काढावयाचा असा या बैठकींतील रिवाज असे. वर्तमानपत्रांतील एखादी महत्वाची बातमी, वाचण्यांत आलेलें नवीन पुस्तक, त्यावरून सुचलेले जुन्यापुस्तकांतील विचार, त्यांची परस्पर तुलना आणि यासर्वांचा

प्रत्यक्ष व्यवहार आणि घडामोडीशीं संबंध कसा येतो याचा विचार, अशी चर्चेची पद्धती होती. प्रो. जोशी यांचा आवडता खेळ टेनिस हा असे. आणि याखेळांत ज्याप्रमाणें बॅटीनें चेंडू टेनीस कोर्टीत येथून तेथें फेंकतात, त्याचप्रमाणें प्रतिपादित विषयाचें ताडन व मंथन होत असे.

प्रो. जोशी हे धार्मिक आचरणांत जवळजवळ सनातनी होते असें म्हटलें तरी चालेल. मी जुनागडास असतांना श्रावणीचा प्रसंग आला. त्यांनीं सर्व हिंदू प्रोफेसरांस श्रावणीनिमित्त आपल्या घरीं आमंत्रण दिलें. श्रावणीचा एकंदर विधि स्वतः सांगितला व स्वतःसकट सर्वांकडून करून घेतला. नवीन यज्ञोपवीत धारण केल्यानंतर यथास्थित भोजनही त्यांच्याच घरीं उरकलें. या सर्व प्रकारांत दिवसाचे जवळजवळ चार तास गेले; परंतु प्रो. जोशी यांनीं यथासांग कृत्य उरकण्यांत कुचराई केली नाहीं. सकाळसंध्याकाळ स्नानोत्तर संध्या व पूजा उरकणें हा त्यांचा नित्य व अवाधित क्रम असे. इतकें असूनही त्यांच्या वृत्तींत संकुचितपणाला थारा नसे. याचें एक उदाहरण नमूद करण्यासारखें आहे. मी जुनागडास असतांना सालाबादप्रमाणें तेथील कॉलेजांत युनिव्हर्सिटी इन्स्पेक्शन कमिटीचें आगमन झालें. त्या कमिटीचे एक सभासद रँगलर परांजप्ये हे होते. परांजप्ये व जोशी यांचा परमस्नेह होता. अर्थात् कमिटी येणार ही बातमी कळतांच जोशांनीं परांजप्यांना पत्र लिहून आपण आपल्याच येथें उतरलें पाहिजे अशी आग्रहाची विनंति केली. त्यावर परांजप्यांनीं उत्तर लिहिलें कीं मी सुधारक आहे, माझ्या गळ्यांत जानवेंही नाहीं, विलायतेला जाऊन आलों तरी प्रायश्चित्त घेतलेलें नाहीं, व माझी धार्मिक मतें जवळजवळ नास्तिक स्वरूपाचीं आहेत, मग हें कसें जुळणार? आपण कांहींही असा, जुनागडांत येऊन माझ्या घरीं न उतरल्यास मला खपावयाचें नाहीं, आपण माझ्याच घरीं उतरलें पाहिजे, कमिटीचे इतर सभासद गेस्टहाऊसमध्यें किंवा इतर ठिकाणीं उतरोत, आपण माझेच पाहुणे म्हणून येथें आलें पाहिजे, असें रोखठोक परंतु जिव्हाळ्याचें उत्तर प्रो. जोशी यांनीं पाठविलें. कमिटीच्या जुनागडांतील वास्तव्यांत रँ. परांजप्ये यांचा मुक्काम जोशांच्याच घरीं झाला, हें निराळें सांगावयास नको. आणि आम्ही सर्व प्रोफेसर या मुक्कामांत निदान एक वेळ तरी जोशांच्याच घरीं जेवत असूं हेंही येथें सांगितलें पाहिजे. जोशांनीं रँ. परांजप्यांचें पान वेगळें मांडलें, असेंहीं नाहीं. सर्व पंगत एकाच रांगेंत बसत असे. काटकोनाचा प्रकार किंवा दुसरा कोणताही प्रपंच चुकून सुद्धां त्यांनीं करविला नाहीं. हे तीन.

चार दिवस अगदीं आनंदांत गेले. यावरून त्यांची दृष्टी संकुचित नसून परमतस-सहिष्णु कशी होती हें चांगलेंच लक्षांत येईल. रॅ. परांजप्यांची व माझी प्रत्यक्ष ओळख याच प्रसंगानें झाली आणि ती अद्यापीही कायम आहे. जुनागडाहून परत येण्याच्या सुमारास विद्यार्थ्यांनीं मला मानपत्र व रौप्य करंडक देऊन माझा गौरव केला, त्यावेळीं आमचे प्रिन्सिपाल प्रो. होडीवाला यांना विद्यार्थ्यांची ही योजना फारशी पटली नाहीं. परंतु प्रो. जोशांनींच या बाबतींत विद्यार्थ्यांना विशेष प्रोत्साहन दिलें असल्यामुळें व विद्यार्थ्यांचाही कल याला सर्वथैव अनुकूल असल्यामुळें प्रिन्सिपाल साहेबांचा नाइलाज झाला. समारंभास अध्यक्षाच्या नात्यानें प्रिन्सिपाल होडीवाला यांनीं लांबलचक व गौरवयुक्त भाषण केलें हें निराळें. परंतु प्रो. जोशी यांनीं थोडक्यांत व अत्यंत मार्मिक शब्दांत मला जो प्रेमाचा अहेर केला तो मी कधींही विसरणार नाहीं.

जुनागडास मी फक्त सहा महिनेच होतों. पण या अवधींत प्रो. जोशी, प्रो. पेंडसे, प्रो. भट आणि प्रो. सालढाना यांचा व माझा जो निकट संबंध जुळला तो उत्तरोत्तर वृद्धिंगत होऊन अखेरपर्यंत अखंड टिकला. प्रतिवर्षी मार्च ते जून पर्यंतच्या सुटींत प्रो. अण्णासाहेब जोशी हे वसंत व्याख्यानमालेच्या निमित्तानें पुण्यास रहात असत. आणि या काळांत मुंबईस त्यांचे बंधु श्री. नारायण मल्हार जोशी यांच्याकडे सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटींत निदान एकदोन दिवसापुरते रहाण्यास येत असत. अशा प्रत्येक वेळीं माझ्या घरीं यावयास ते कधींहीं चुकले नाहींत. आणि आल्यावेळेस माझें कसें काय चाललें आहे, वाचनव्यवसाय कायम आहे किंवा नाहीं, आवडीचीं पुस्तकें कोणतीं, लेखन वाचनाचें धोरण काय वगैरे गोष्टींची चौकशी करण्यासही ते चुकत नसत. निदान एक दिवस तीन-चार तास अशा गप्पा झाल्या नाहींत असें क्वचितच घडत असे. अशी शेवटची बैठक ते आपल्या जागेचा राजीनामा देऊन आपले दांत काढण्याकरितां मुंबईस आले असतांना झाली. त्यावेळीं ते अत्यंत निराश असे दिसले. आणि तदनंतर लवकरच त्यांचा अंत झाल्याची बातमी कानावर येऊन आपला एक उत्तम मित्र गमावला असें वाटून मन खिन्न व दुःखित झालें.

नवयुग मासिकाकरितां त्यांनीं जी लेखमाला गुंफिली त्याबद्दलचें विनंतिपत्र नवयुगाचे संपादक माझे मित्र प. वा. विठ्ठल जिवाजी नाडकर्णी यांच्याच मार्फत लिहिण्यांत आलें होतें. तरी त्याची सूचना नवयुगाच्या मालकांना मीच केली, आणि

मुंबईच्या एका भेटींत अण्णासाहेबांना प्रत्यक्ष आग्रह करण्याची जबाबदारी मी पतकरली. ही लेखमाला नव्युगाच्या वाचकांना फारच आवडली, हें मला माहीत होतें. म्हणून कांहीं काळपर्यंत मनोरंजनाचें संपादकत्व मजवर सोंपविण्यांत आलें असतां, तशीच लेखमाला मनोरंजनाकरितां ल्याहावी असें मी त्यांना पत्र लिहीलें. आणि तदनंतर लवकरच मुंबईस आले असतांना मेटरलिंकचें Wisdom and destiny हें पुस्तक, अनाटोल फ्रान्सच्या "थेस व पेंगीन आयलंड" या दोन कादंबऱ्या आणि शोपेनहोर यांचे वाङ्मयावरील निबंध वगैरे ग्रंथ मी त्यांच्या स्वाधीन केले. त्यांचा योग्य उपयोग करून मनोरंजनाचा व माझा संबंध असे तोंपर्यंत त्यांनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें लेखमाला लिहीण्याचें कार्य सुरू ठेविलें होतें. आणि पहिल्या मालेप्रमाणेंच दुसरीचाही वाचकांना चांगलाच फायदा झाला, हें त्यावरील मजकडे आलेला पत्रव्यवहार पाहून मी सांगू शकतों.

शोपेनहोरचे वाङ्मयविवेचनात्मक लेख हा त्यांच्या अत्यंत आवडीचा ग्रंथ होता. स्वामी सच्चिदानंदांच्या एकंदर लेखमालेंतील वाङ्मयविषयक विवेचन शोपेनहॉर यांनीं सरस व निरस वाङ्मयाची व त्याचा प्रत्यक्ष जीवनावर कसा परिणाम होतो, याची जी कसोटी सांगितली आहे, त्या कसोटीला धरूनच केलेलें आढळेल. उपनिषदें आणि वेदांत यांचा मानवी जीवनाला समाधान व शांति प्राप्त करून घेण्याच्या कामीं जो उपयोग होतो त्याचे आविष्करण शोपेनहोरच्या ग्रंथांत आढळतें. त्यांतील विचारसरणी आणि तदनंतर लिहीण्यांत आलेला पॉल ड्युशेनचा याचविषयावरील मार्मिक ग्रंथ, यांचा उल्लेख प्रो. जोशी यांच्या प्रतिपादनांत नेहमीं येत असे. "आधुनिक सुशिक्षितांचा वेदान्त" ही लेखमाला प्लेटोच्या संवादाप्रमाणें लिहिली आहे. त्यांत ही दृष्टी स्पष्ट दिसून येते. वेदांतमीमांसा करतांना शंकराचार्यांनां त्यांनीं सर्वांहून अधिक महत्व दिलें आहे, यांत संशय नाहीं. परंतु त्या बरोबरच प्लेटो, कांट आणि हेगेल यांच्या ग्रंथांची छायाही त्या विवेचनावर स्पष्ट पडली आहे, हेंही विसरून चालणार नाहीं. जगांत माणसाला आपलें जीवित अंतर्दृष्ट्या परिपूर्ण, आनंदी, समाधानयुक्त व कर्तव्यपूर्ण करून सार्थकी लावावयाचें झाल्यास त्याला धर्म आणि तत्वज्ञान यांचा आश्रय अवश्य आहे. प्रत्येक व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या प्रकारचें तत्वज्ञान असलेंच पाहिजे. केवळ तटस्थ वृत्तीनें राहून त्याचें चालणार नाहीं. शंका किंवा संशय ही मानवी विकासांतील व व्यक्तीच्या जीवनांतील एक पायरी आहे. आणि स्वतः विचार करून मतें बनविण्याची जबाब-

दारी सुशिक्षित या नात्यानें ज्यानें पत्करली त्याला ती पायरी ओलांडल्याशिवाय गत्यंतर नाहीं. परंतु आयुष्याच्या सुरुवातपासून अंतापर्यंत व्यक्ति जर अखंड संशयग्रस्तच राहिली तर या जीवनांत तिच्या हातून कोणतेंच कार्य होणार नाहीं. विचारांचा व कृतीचा निश्चितपणा म्हणजेच जीवनाचा जोमदारपणा. आणि त्याकरितां सुशिक्षिताला वेदान्त, किंवा ज्ञानाचें अंतिम साध्य किंवा ध्येय आणि फलश्रुति काय, हें कळलेंच पाहिजे. आपल्या संस्कृतींत ज्या विचारसरणीला वेदान्त म्हणतात ती दृष्टी क्रियाहीनपणाची किंवा कर्तव्यशून्यतेची नाहीं. तींत स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणें जीवित जोमदार व सर्वांगपूर्ण करण्याचें सामर्थ्य आहे, आणि हें सामर्थ्य जी व्यक्ति याचा योग्य अभ्यास करील आणि केवळ सांप्रदायिक पद्धतीचा दासानुदास बनण्यांत समाधान मानणार नाहीं त्यालाच कर्मयोगाच्या रूपानें प्राप्त होईल, हें आधुनिक सुशिक्षिताच्या मनावर ठसविणें हेंच या लेख-मालेचें मुख्य कार्य होतें. असें मी समजतों.

प्रो. महादेव मल्हार जोशी हे जुनागडासारख्या कॉलेजांत अध्यापक असल्या-मुळें कोपऱ्यांत पडल्यासारखे झाले होते. मुंबई विश्वविद्यालयाच्या कोणत्याही परीक्षेला परीक्षक नेमल्याचा मान यामुळेंच त्यांच्या वांट्याला आला नाहीं. परीक्षक नेमण्यांकरितां अर्ज गुदरणें, आर्जव करणें याविरुद्ध त्यांचा कटाक्ष असे. मुंबई विश्व-विद्यालयाच्या नेतृत्वाखालीं जीं कॉलेजें आहेत त्यांतील प्रत्येक अध्यापक कोणत्या दर्जाचा आहे हें त्याच्या सिंडिकेटला कळलें पाहिजे आणि हें नीट ओळखून योग्य माणसाला परीक्षक होण्याचें निमंत्रण करणें हें त्यानें स्वयंस्फूर्तीनें केलें पाहिजे असें ते नेहमीं म्हणत असत. असें पाचारण जोंपर्यंत येणार नाहीं तोंपर्यंत अर्ज पाठवून 'मुझको बी गीनो'चा प्रकार करण्याची आपली इच्छा नाहीं व त्याची आपणास पर्वाही वाटत नाहीं, असेंही ते सांगत असत. मुंबई विश्वविद्यालय अथवा जुनागड कॉलेजचे त्यांच्या वेळचे प्रिन्सिपाल यांनीं अशाप्रकारची गुणग्राहकता दाखविली नाहीं, ही गोष्ट अत्यंत खेदजनक म्हटली पाहिजे. वास्तविकपणें संस्कृतांतच नव्हे पण मराठींत सुद्धां बी. ए. आणि आणि एम. ए. च्या परीक्षेला परीक्षक नेमण्या इतकी विद्वत्ता त्यांच्या अंगीं खास होती. जगाला त्यांतील खऱ्या विद्वानाची दादही नसते, ही म्हण त्यांची या बाबतींत जी उपेक्षा झाली त्यावरून सार्थ ठरते यांत संशय नाहीं.

प्रो. जोशी हे भारवाही विद्वान नव्हते. त्यांच्या बुद्धीची प्रगल्भता असामान्य होती. ती ओजस्वी होती. आणि लेखनापेक्षांही वादविवाद आणि संभाषणांत तिचें

तेज, तिची व्यापकता व थोरवी अधिक प्रत्ययास येत असे. कांहींतरी सतत लिहून वर्तमानपत्री लिखाणानें प्रसिद्धीस येण्याची हांव त्यांनीं कधींच धरली नाहीं. "Don't write until you feel that you burst;write when your mind is at white heat, and have the nerve to reject." अशीच त्याविरुद्ध त्यांच्या स्वभावाची व मनाची ठेवण असे. म्हणून थोडेंजरी लिहिलें तरी तें वेंचक, स्फूर्तिदायक, विचारप्रवर्तक असेंच ते नेहमीं लिहीत असत. प्रस्तुत पुस्तक या पद्धतीचा एक उत्तम मासला आहे. प्रत्यक्ष नमूद केलेल्या विचारापेक्षांही त्यांतून सुचणाऱ्या होणाऱ्या नवीन विचारांची मनांत गर्दी उसळावी, असें याचें स्वरूप आहे. इंग्रजी वाङ्मयांत याचा आधुनिक नमुना सांगावयाचा झाल्यास जार्ज लोज डिकिनसन् यांचें संवादात्मक लिखाण, किंवा जॉर्ज सांटायना यांचें निबंध, उदाहरणादाखल देतां येतील. या दोन लेखकांची ग्रंथनिष्पत्ति जितकी मोठी आहे तितकी अर्थातच प्रो. जोशी यांची नाहीं. अर्थात हा दोष त्यांचा नसून मराठी भाषा आणि तिच्यांतील लोकप्रिय वाङ्मयाचा आहे. "मागणी तसा पुरवठा" या दृष्टीनें मराठी वाचकांना अशा लिखाणाची किंमत वाटत नाहीं, म्हणूनच असलें लिखाण मोठ्या प्रमाणांत तयार होत नाहीं. शिवाय खपेल तें लिहावें हें झटपट रंगाऱ्याचें काम प्रो. जोशी यांना मुळांत पसंत नसून तें त्यांच्या हातून कधींच पार पडलें नसतें. खपेल तें लिहावें या तत्वाच्या विरुद्ध टोंकाला जाऊन मनपसंत तेंच लिहावें हा त्यांचा दंडक होता. त्यामुळें स्वतः वहुश्रुत, विद्वान, गाढ-विद्याव्यासंगी आणि लेखणीवहाद्दर असूनही या ग्रंथापलीकडे त्यांचें लिखाण उपलब्ध नाहीं. आणि हेंही वर्तमानपत्रें आणि मासिकें यांच्या रकान्यांतच कायम राहिलें असतें, तर लुप्तप्रायच ठरलें असतें.

त्यांच्या चिरंजीवांनीं तें पुस्तकरूपानें जगाच्या निदर्शनास आणण्याचें ठरवून पितृऋण फेडलें आहे इतकेंच नसून महाराष्ट्रभाषेलाही उपकृत केलें आहे. या ग्रंथावर प्रस्तावनारूपी टीका लिहून स्वतःची प्रसिद्धी करणें असा माझा हेतु नाहीं. म्हणूनच प्रत्यक्ष विषयाचें विवेचन या उपोद्घातांत बुद्धयाच टाळलें आहे. हें पुस्तक वस्तुतः मार्मिक आणि स्वतंत्र विचारांनीं ओतप्रोत भरलेलें आहे. आणि वाङ्मयप्रेमी व विचारवंत सुशिक्षितांकरितां तें लिहिलें असल्यामुळें अशा टीकेची त्याला पुस्ती जोडणें अप्रस्तुतच नव्हे, पण वावदूकपणाचें होईल, असें मी समजतों. प्रो.जोशी यांचा व माझा जो स्नेहसंवध जुळला व त्यामुळें मला त्यांच्या प्रांजल स्वभावाची जी

ओळख झाली आणि त्यावरून अप्रत्यक्षपणें त्यांची विद्वत्ता, धारणाशक्ति, ज्ञानलालसा आणि चिकित्सक व खोल बुद्धि यांचा जो लाभ झाला, त्याचें दिग्दर्शन करून ऋणमुक्त व्हावें इतकाच हेतु मनांत धरून प्रस्तावनेदाखल हे दोन शब्द त्यांच्या चिरंजीवांच्या आग्रहावरून मी लिहीले आहेत.

प्रो. अण्णासाहेब जोशी यांच्या सारख्या विद्वानांचें पीक महाराष्ट्रांत आजच्या घटकेस दुर्मिळ झालें आहे. असे विद्वान आहेत किंवा नाहींत याची जाणीवही त्याला नाहीं. आगरकर, टिळक, प्रो. केळकर, आपटे आणि गोळे यांच्या हाताखालीं शिकून तयार झालेल्या सुशिक्षितांपैकीं ते एक होते. आपल्या ज्ञानाला उजळा घालून विचारांचा प्रवाह जिवंत व निर्मळ ठेवणें आणि इतरांनां त्याचा शक्य तितका लाभ देऊन मार्गदर्शक होणें हें अध्ययन आणि अध्यापनाचें ध्येय त्यांनीं आपल्या दृष्टीआड कधींच होऊं दिलें नाहीं. म्हणून त्यांच्याबद्दल असें म्हणावयास हरकत नाहीं कीं त्यांच्या प्रत्यक्ष लिखाणापेक्षांही त्यांची योग्यता फारच मोठी होती. आजच्या वाङ्मयपसाऱ्यांत त्यांच्यासारख्या विद्वानांची किंमत नाहीं. लघुकथा, कादंबऱ्या, स्फुट काव्यें, नाटिका व नाटकें आणि चुरचुरीत निबंध यांनीं गच्च भरलेल्या उथळ वाङ्मयप्रवाहांत त्यांच्या सारख्या खोल व व्यापक दृष्टीनें विचार करणाऱ्या लोकांना थारा कोण देणार ? तरीही प्रस्तुत पुस्तक वाचकवर्ग आस्थेनें वाचील, तर खरें नाणें कोणतें व खोटें नाणें कोणतें हें पारखून घेण्याला अशा वाचनाचा चांगलाच उपयोग होईल अशी खात्री वाटते.

मुंबई
१७ मे १९३६

**वसंत नारायण नाईक.**

निवां ५
६७३०



कै. प्रो. म. म. जोशी एम्. ए.

जन्मः–इ. स. १८७२ ]　　　　　　[ मृत्युः–इ. स. १९२८

निबंध
६३०

# स्वामी सच्चिदानंदांचे विचार

## ( वाङ्मयविषयक )

# प्रास्ताविक

स्वामी सच्चिदानन्दसरस्वती हे पूर्वाश्रमीं माझे विद्यालयीन बंधु होते. त्यांचें पूर्वीचें नांवगांव देण्यांत हंशीलहि नाहीं; व तसें करण्याविषयीं त्यांची परवानगीहि नाहीं. त्यांच्या लेखांवरून वाचकांस बराच अजमास होईल. त्यांचा माझा पत्रव्यवहार आज दोन तीन वर्षें होत आहे. त्यांनीं पूर्वाश्रमीं सर्व अभ्यास मजबरोबरच पुरा केला; पण मजप्रमाणें सेवाधर्मरूपी श्ववृत्तींत न राहतां राष्ट्रांतील सर्व चळवळींत जवळजवळ वीस वर्षें स्वतः पडून देशहिताच्या पवित्र यज्ञांत आपल्या सर्वस्वाची आहुति दिली. शेवटीं एकाएकीं प्लेगनें त्यांच्या सर्व कुटुंबाचीहि आहुति घेतली; जणूं कांहीं देशहिताला वाहिलेल्या माणसाची परीक्षाच ईश्वर प्लेगरूपानें घेत आहे, असे प्लेगला बळी पडलेल्या कित्येक देशभक्तांच्या कुटुंबांची वाताहत झालेली पाहून मनांत येतें. किंवा आमच्या पूर्व-कर्मांचीं फळें अजून आम्हांला बरेच दिवस—दिवस कसले, युगें—भोगावयाचीं आहेत कीं काय असा प्रश्न मनांत उभा राहतो. अस्तु. या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला कीं माझे पूर्वाश्रमींचे मित्र आजपर्यंतचा स्नेह विसरून एकाएकीं मला दुःखांत टाकून नाहींसे झाले. नंतर तीन वर्षांपूर्वीं त्यांचें मला हिमालयांतून पत्र आलें. त्यांत त्यांनीं आपण संन्यास घेतल्याचें वर्तमान लिहिलें व त्याबरोबर कारणेंहि लिहिलीं. तेव्हांपासून त्यांच्या स्वतःच्या अनुभवाविषयीं व एकंदर देश-हिताच्या विषयासंबंधानें मी त्यांना बरेच प्रश्न केले व त्यांनींहि आनंदानें त्यांचीं उत्तरें पाठविलीं. त्यांच्या पत्रव्यवहारांतील कांहीं भाग महत्वाचा वाटल्यावरून स्वामींच्या मर्जीविरुद्ध वाचकांच्यासमोर मांडीत आहें याबद्दल स्वामीजी मला क्षमा करितील यांत संशय नाहीं.

---

ग्रंथ संग्रहालय
५-८५...

१

# ‘ माझ्या वैराग्याचीं कारणें ’

“......मित्रा, मला एकाएकीं वैराग्य उत्पन्न होण्यास काय कारण झालें, असें तूं विचारतोस; तुझ्याशिवाय इतर कोणी जर हा प्रश्न केला असता तर कामक्रोधादि सर्व षड्रिपूंस झुगारून देऊन मिळविलेल्या परमशान्तीच्या या अवस्थेंतदेखील त्याला गालिप्रदानाचें वक्षीस मिळाल्याशिवाय राहिलें नसतें. परंतु काय करूं ? ‘ तत्तस्य किमपि द्रव्यं यो हि यस्य प्रियो जनः ’ या श्लोकाचें स्मरण या निरुपाधिक निरंजन अवस्थेंतदेखील जाऊं शकत नाहीं; व त्याचें मला एवढें वाईटहि वाटत नाहीं. कारण माझें वैराग्य सात्विक प्रेमाच्या झऱ्याला आटविण्याइतकें सुतकी नाहीं. इतकेंच नव्हे तर ‘ मित्रं प्रीतिरसायनं नयनयोरानंदनं चेतसः ’ हा चरण या माझ्या ब्रह्मी अवस्थेंतदेखील अमृतासारखा गोड लागतो व त्यामुळें माझ्या समाधीचा कधींहि भंग होत नाहीं. या प्रेमामुळेंच मला आज माझें सर्व हृदय तुझ्यापुढें ओतावेंसें वाटत आहे. मला पूर्वी होऊन गेलेल्या किंवा हल्लीं जिवंत असलेल्या कांहीं व्यक्तींविषयीं साधारण रीतीनें बोलावें लागेल. परंतु निदान आतांच्या या अवस्थेंत तरी त्यांत मत्सराचा किंवा उगाच कुचेष्टा करून प्रतिष्ठा मिळविण्याचा आरोप तूं माझ्यावर करण्यास धजणार नाहींस अशी आशा आहे. मी कोणाचेंही नांव घेणार नाहीं किंवा गांव सांगणार नाहीं. निवळ त्यांच्या चळवळीचे गुणदोष मधूनमधून पुसटपुसट बाहेर पडतील, व तें पडणें देशहिताच्या दृष्टीनें अवश्य आहे. या वाक्यांतूनच तुला सहज ध्वनि काढतां येईल कीं माझी देशहित करण्याची इच्छा या कडकडीत वैराग्यांत देखील कमी न होतां वाढली आहे, व देशहिताकरितांच मी संन्यास घेतला आहे. आज पंधरावीस वर्षें सामाजिक, राजकीय, धार्मिक व कौटुंबिक सुधारणेंत सारखा रावत असलेला मनुष्य एकाएकीं संन्यास घेतो व तो देशहिताकरितां ! हें कोडें उलगडावें कसें ? हा प्रश्न तुझ्या अगदीं ओठाशीं आला असेल. पण मी तावडतोब उत्तर देऊन त्याचें समाधान करितों. असें पहा, आपण अरण्यांत जोंपर्यंत

रस्ता आहे तोंपर्यंत विचार न करितां सरळ जात असतों. जातां जातां एक असा खड्डा येतो, कीं आपण तो पाहिला म्हणजे अगदीं कांहीं सुचेनासें होऊन मटकन् खालीं बसतों. आपला कांहीं वेळ अशा संमूढ अवस्थेंतच जातो. पण मनुष्य अशा अर्धवट अवस्थेंत किती दिवस काढणार? त्याला या संकटावस्थेंतून बाहेर पडण्यास मार्ग शोधून काढावाच लागतो. तशीच अवस्था माझी झाली. आज पंधरावीस वर्षें उत्साहानें कर्मयोगांत घालविलीं; इतक्यांत कर्मयोगाच्या पहिल्या धड्यास जेथें आरंभ होतो. जो कर्मयोगाचा पायाच–अशा माझ्या कुटुंबाचाच नाश झाला. तेव्हां एकंदर इमारतीचाच चुराडा होण्याची वेळ आली असें मला वाटलें, मी कांहीं दिवस मनाच्या निश्चेष्ट अवस्थेंतच घालविलीं. पण सर्व जखमा काळ जशा उत्पन्न करितो तशा त्या भरून येण्यासहि तोच मायबाप मदत करितो. मनुष्य रडेलरडेल तरी किती दिवस? एका अर्थी कालिदासानें म्हटल्याप्रमाणें 'उपकृतं दुःखैः' असेंच म्हणावें लागतें. कारण सर्व परोपकाराच्या मुळाशीं थोडासा स्वार्थ असतोच हें तत्त्व मला आतां जसें कळलें तसें केव्हांहि कळलें नसतें. माझें कौटुंबिक सुख होतें तोंपर्यंत मी देशहित करण्यास तयार होतों. त्यांत वाईट स्वार्थाची कांहीं कल्पना होती असें मुळींच नाहीं. पण आपल्या कार्यांतील यशापयशाला संविभागी कोणी असला पाहिजे. आपलें हृदय शुद्ध आहे, आपण मनापासून झटत आहों हें ओळखणारा तरी कोणी जवळ असला पाहिजे, इतकी स्वार्थमयता माझ्या ठिकाणीं होती हें आतां कळलें. ईश्वरी कार्याकरितां प्रेमाची देखील आहुति देण्यास मी तयार नव्हतों हें आज मला चांगलेंच पटलें. तेव्हां हें बळ आणावें कोठून? या प्रश्नानें किती वेळ तरी पछाडलें! याला खरें उत्तर झटकन यावयास पाहिजे होतें. कारण लढाईंत भीति वाटली तर ती भीति नाहींशी करण्यास लढाईंत पुन्हां पुन्हां जाणें याशिवाय दुसरा उपाय नाहीं हें उघड असतांहि मला तें सुचलें नाहीं; आणि सुचलें असतें तरी पटलें असतें कीं नाहीं याची शंका आहे. कारण मनोदौर्बल्याच्या अवस्थेंत शूरपणाची कृति होत नाहीं; इतकेंच नव्हे तर शूरपणाचे विचारहि येणें जवळजवळ अशक्य असतें. कारण कृतीची अगदीं पहिली जननी विचारच होय हें विसरतां कामा नये. मला असें वाटूं लागलें कीं आपलें हें मनोदौर्बल्य आपणास जन्मतःच मिळालें आहे; आपलें रक्तच शुद्ध नाहीं; आपला देहच विटाळलेला अशा; स्वतःविषयींच्या तिरस्कार बुद्धीनें ग्रासून गेल्यावर, तापलेला मनुष्य जसा पाण्याकडे धांव घेतो तसा सर्व दीनात्म्यांची माउली जी भगवद्गीता

तिच्याकडे धांवलों. पहिल्याच अध्यायांत अर्जुनाच्या दौर्बल्यावस्थेचें वर्णन वाचलें तें हुबेहूब माझ्या अवस्थेशीं जुळत आहे असें मला वाटलें. माझ्या मनांत असा विचार आला कीं मी एक मूळचाच भ्याड असेन; परंतु अर्जुनाविषयीं कोणीहि ही भ्याडपणाची शंका घेणार नाहीं. त्याचें शौर्य लोकीं सारखें गाजलेलें होतें. मग त्याची ' गांडीवं स्रंसते हस्तात् ' अशी अवस्था कां झाली ? अष्ट रसापैकीं अर्जुनाच्या या दौर्बल्यावस्थेच्या वर्णनांत कोणता रस आहे ? हा प्रश्न भाष्यकारांनीं व टीकाकारांनीं निवळ सोडून दिला आहे. पण तो मला बोचूं लागला. त्या रसाचें नवेंच नांव मला सुचलें. हा रस ' तत्त्वसंशय ' हाच होय. Philosophy begins in doubt ( सर्व तत्त्वज्ञान संशयावस्थेंतच उत्पन्न होतें. ) या इंग्रजी वाक्याचा अर्थहि मला आतां स्पष्ट समजला. अर्जुनाला यावेळीं जें दौर्बल्य आलें तें भीतिजन्य नसून तत्त्वनिश्चयाच्या अभावामुळेंच उत्पन्न झालें होतें. आजपर्यंत त्यानें जें शौर्य गाजविलें तें निव्वळ प्रकृतीच्या-स्वभावाच्या-सरळ रस्त्यावर चालूनच गाजविलें; पण जेव्हां भीष्म हा प्रत्यक्ष आपला आजा असतां व द्रोण हा प्रत्यक्ष परात्पर गुरु असतां त्यांच्यावर शस्त्र उगारण्याची वेळ आली तेव्हां प्रकृतीच्या सरळ रस्त्यांत नवीन खड्डा उत्पन्न झालेला त्याला दिसला. मग तो थबकला. यालाच इंग्रजींत Reflective stage ( विचारदशा ) असें म्हणतात. ही दशा न येतांना जन्मभर बालदशेंतील श्रद्धामय जीवित घालविणारे भाग्यवान् लोक या जगांत थोडे आढळतात. पण ती दशा तत्त्वसंशयानंतर मिळालेल्या तत्त्वनिश्चयात्मक मंगल दशेपेक्षां खात्रीनेंच कमी दर्जाची असें मला वाटतें. बृहदारण्यकोपनिषदांत ' पांडित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत् ' असें जें वाक्य आहे त्याचा अर्थ वरील माझ्या म्हणण्याला पोषकच आहे. अज्ञानजन्य सुखावस्थेपेक्षां सर्व पांडित्य मिळून त्या पांडित्याचा निःशेष रस पिऊन ढेंकर येऊन तें नकोसें झाल्यावर जें बाल्य येतें त्याची गोडी खास निराळी ! अर्जुनाला या अवस्थेमध्यें पांडित्याचा निर्वेद उत्पन्न झाला तेव्हांच त्याला तत्त्वनिश्चय झाला व ' करिष्ये वचनं तव ' अशा तऱ्हेचा नवीन बाल्य दाखविणारा श्रद्धामय आज्ञाधारकपणा प्राप्त झाला. पण अर्जुनाचें भाग्य आपणा गरीबांस कसें प्राप्त होणार ? त्याला खड्डा दिसल्याबरोबर त्या खड्ड्याला दूर टाकून नवा राजरस्ता दाखविणारा त्याचा सखा त्याच्या जवळच होता. मला असा सखा मिळाला असता तर मीहि खऱ्या कर्मयोगाची कांस कशाला सोडिली असती ? माझा अंतस्थ भगवान् माझी चांगलीच परीक्षा घेण्यास

सज्ज झाला. मला असें वाटलें कीं जर आपण मूळचेच भ्याड, आपलें नाणें मूळचेंच जर कथलाचें, तर मग तें बाजारांत नेण्यांत अर्थ काय ? याच वेळेस मला देशभक्तीचें खडतर व्रत घेतलेलें परंतु ' तेथें जातीचें ' सत्व नसल्यामुळें जगत्स्वामी नारायणाचें व लोकसमूहरूपी नारायणाचे परीक्षेंत नापास होऊन पांच दहा वर्षें महाराष्ट्राच्या रंगभूमीवर रावणासारखें नाचून जवनिकेंत आपल्या खऱ्या स्वरूपांत लीन झालेले कित्येक लोक दृष्टीस पडले. मग तर माझ्या मनाची खात्रीच झाली कीं कांहींतरी खडतर तपाची किमया केल्याशिवाय आपल्याला हें जातीचें सत्त्व मिळणें नाहीं. देशाची काय किंवा देवाची काय सेवा करण्यास आपणाजवळ कांहींतरी शक्ती पाहिजे. एकादशीनें शिवरात्रीची सेवा काय करावी ? ज्याला इंग्रजींत Self-sacrifice म्हणतात तो आपल्या गीतेंतील ' आत्मयज्ञ ' सिद्ध होण्याला आपला आत्मा तर हातीं आला पाहिजे—तो आपला झाला पाहिजे—मग त्याचें ' नारायणेति समर्पयामि ' या वाक्यानें समर्पण करावयाचें. सारांश, चित्तशुद्धि, शरीरशुद्धि व सत्त्वसंपन्नता हीं मिळाल्याशिवाय देशाची किंवा कोणत्याहि पूज्य वस्तूची सेवा होणेंच नाहीं असें माझ्या मनानें घेतलें. मला खास वाटूं लागलें कीं देशसेवा शंकराचार्यांनींच करावी, बुद्धानेंच करावी, शिवाजीनेंच करावी, वॉशिंग्टननेंच करावी; ' येरा गबाळाचें नाहीं काम. ' घराला आग लागली असतां आपल्याजवळ जें पंचपात्रीभर पाणी आहे तेंच अग्निनारायणावर ओतावें हाच सेवाधर्म नाहीं कां ? असा प्रश्न माझ्या मनांत त्यावेळेस आला नाहीं असें नाहीं. पण माझ्या त्या दुःखजन्य असंतोषाच्या व तत्त्वसंशयाच्या भोंवऱ्यांत मला माझेंच नव्हे तर सर्व देशभक्त व देवभक्त यांचे प्रयत्न पोकळ वाटूं लागले माझ्या मनांत असें येई कीं जो तो देशभक्तीकरितां आपली कुटुंबभरणाची योग्यता व जबाबदारी न ओळखतां आकाशालाच गवसणी घालूं पहात आहे. देशभक्तीचें जूं खांद्यावर घेऊन तें एकसारखें आमरणांत चालविण्याला ' किंत्वंगीकृतमुत्सृजन् कृपणवत् श्लाघ्यो जनो लज्जते । निर्वोहः प्रतिपन्नवस्तुषु सतामेतद्धि गोत्रव्रतम् ॥ ' या श्लोकांत भर्तृहरीनें वर्णन केलेल्या सत्त्वाचें, शीलाचें किंवा चिकाटीचें पाठबळ अवश्य आहे. तें मिळविल्याशिवाय कोणत्याहि यज्ञाची दीक्षा घेणें म्हणजे निवळ जलताडन आहे, इतकेंच नव्हे तर आश्रमसंकर होऊन फजीति होण्याला कारण आहे, असा माझ्या मनाचा निश्चय झाला. देशभक्तीचें वेड लागलें कीं काढ खाजगी शाळा किंवा काढ वर्तमानपत्र किंवा मासिक पुस्तक ! पुरा विचार कोणत्याच

विषयावर केलेला नाहीं—अशा स्थितींत एकदम उभारलेल्या संस्था भराभर मोडल्या यांत नवल काय? त्या मोडण्यांत कांहीं व्यक्तींचे दोष तर कांहीं बाह्य आपत्तींचे दोष. हें मला त्यावेळीं देखील पुरें भासत होतें, पण माझा त्या वेळेस असा निश्चय झाला होता कीं 'यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोऽत्र दोषः' हें वाक्यच कापुरुषांचें आहे. खऱ्या यत्नाला बाह्य आपत्ति कांहींच करूं शकत नाहींत व जेथें जेथें फलोत्पत्ति नाहीं तेथें तेथें खरा सत्त्वपूर्ण प्रयत्नच नाहीं असा सिद्धांत माझ्या डोक्यानें स्वीकारला. आज मला या सिद्धांतांचें बरेंच हंसें येतें. कारण माझें डोकें जरा शांत झालें आहे व संशयजन्य ओढ्याला दोषैक-दृष्टीचा नाला मिळाल्यामुळें त्यावेळेस 'जिकडे तिकडे पंकमय दिसे' असें जें झालें होतें तें आतां सर्व पाणी निवळून चित्तप्रसाद झाल्यामुळें हे सर्व विचार थोडे बद-लावयास लागले आहेत. पण त्यावेळेस माझ्या मनाला सत्त्वसंशुद्धीचें वेड लागून मी शेवटीं निश्चय केला कीं एवीं तेवी देवानें कुटुंब पोषणाच्या जबाबदारींतून मला सोडविलें आहे, तेव्हां आपण 'शान्तोदान्त उपरतस्तितिक्षुः' या मंत्राचा जप करून साधनसंपन्न झाल्याशिवाय कोणतेंहि काम हातीं घेणार नाहीं. म्हणून तुला न कळवितां एकदम हिमालयांत आलों व हिमालयावरील सर्व पवित्र स्थानें धुंडाळून कोणी योगी किंवा सिद्ध पुरुष न भेटल्यामुळें कंटाळलों. शिवाय कितीहि वैराग्य व तितिक्षा प्राप्त झालीं तरी पोट व थंडीवाऱ्यापासून संरक्षण हीं माणसाला सोडीत नाहींत हेंहि लक्षांत आलें व शेवटीं......या गांवाच्या बाहेर गंगातीरावर एका धर्मशाळेंत आलों. येथें गांव बराच मोठा असल्यामुळें पोष्ट ऑफिस आहे व एक दोन गृहस्थ दक्षिणी साधारण बऱ्या स्थितींत असल्यामुळें दक्षिणेंतील—नव्हें सर्व हिंदुस्थानांतील—मुख्य मुख्य पत्रें व मासिकें मला मिळण्याचा सुयोग प्राप्त होण्या-सारखा वाटला व त्याप्रमाणें मी येथें कायमचा तळ दिला. इतकी मानसिक मीमांसा तुझें समाधान करील असें वाटतें. समाधान झालें नाहीं तर त्याला मी काय करूं? शेवटीं एवढेंच सांगणें आहे कीं माझें हें बरळणें दुसऱ्या कोणालाहि ऐकवूं नकोस. आपली फजीति व अपमान आपल्या मनांतच ठेवावा हें बरें. इतिशम्."

---

## २

# ‘ उच्च वाङ्मयाची परीक्षा ’

“ मित्रा, माझ्या विनंतीस मान देऊन साहित्यपरिषदेचे रिपोर्ट तूं पाठविलेस ते मला पोंचले. तूं मला विचारतोस कीं, हें वाड वाचण्यांत तुला आतां आनंद कसा वाटणार ? पण तुझा हा प्रश्न सूक्ष्म विचारांतीं केलेला दिसत नाहीं. ‘ ऋषे, प्रबुद्धोऽसि वागात्मनि ब्रह्मणि ब्रूहि रामचरितम् ’ या भवभूतीच्या वाक्यांत वाङ्मयाला वागात्मक ब्रह्म ही पदवी देऊन त्याची सेवा करण्यास वाल्मीकीसारख्या ऋषीसच अधिकार पोंचतो असें ध्वनित केलें नाहीं काय ? ‘ वन्देम देवतां वाचं अमृतां आत्मनः कलां ’ असें तोच कवि म्हणतो. या चरणांत वाङ्मयास परमात्म्याचा अजरामर अंश अशी आदरपूर्वक संज्ञा देणारा भवभूति तुझ्या प्रश्नाचें उत्तर बिनचूक देत आहे. पण तुम्हांसारख्या गतानुगतिक–न्यायाच्या शृंखलेनें बद्ध झालेल्या सांसारिकांस हरदासी मोक्षाच्या कल्पनेशिवाय दुसरी कल्पना कोठून येणार ? अरे, वाङ्मयाची सेवा करणारे ऋषी झाले पाहिजेत, किंवा ऋषींना ती सेवा करण्याकरितां वेळ पडल्यास मारूनमुटकून देखील आणलें पाहिजे ही प्लेटोच्या§ अनुकरणानें मिळालेली सूत्रमय उक्ति आतां तूं हृदयाशीं अगदीं जपून ठेव. भाडोत्री वाङ्मयाचा सुळसुळाट पुष्कळच झाला आहे, व त्याचें अभिनंदन करणें निरस्तपादप देशांतील एरंडाप्रमाणें साहित्यपरिषदा व इतर देशभक्तमंडळीस भाग पडत आहे, हें माझ्या अंतश्चक्षूंस अगदीं स्पष्ट दिसत आहे. पण हें आज स्पष्ट बोलणें म्हणजे चाललेल्या प्रयत्नान्तर्गत उत्साहाग्नीवर निवळ पाणी ओतल्याप्रमाणें होईल हेंही मी जाणत आहे. पण तूंच होऊन खाजवून खरूज काढलीस म्हणून बोलणें भाग पडलें.

माझ्या या तपस्येच्या प्रवाहास वाङ्मयात्मक उच्च विचार विघ्न करीत नाहींत इतकेंच नव्हे तर, क्रियाप्रतिक्रिया न्यायानें माझ्या ध्यानयोगानें वाङ्मयविषयक

---

§Kings should be philosophers or philosophers kings.

मनन जास्त जोरानें व सूक्ष्म होत आहे, व या वाङ्मयमननगंगेंत रोज दोन तीन वेळां स्नान झाल्यामुळें ध्यानयोगाची कलाहि स्वच्छ व वृद्धिंगत होऊन ईश्वर-भक्तिसागरास रोज जास्तजास्त भरती येत आहे, हें मी खात्रीनें सांगूं शकतों. अशाच मननगंगेंत पोहत असतां तुझें ते दिवशीं हें वाड व पत्र आलें; व आज आठ दिवस या विचारलहरींत आलोडन करून जे गोटे मिळाले ( कारण रत्नें मिळणें आम्हां गरीब भारतीयांचे नशीबीं नाहीं ) ते तुजकडे पाठवीत आहे. त्यांचें कौतुक तूंच एकटा कर, एवढीच विनंति आहे.

'अंतःकरणतत्त्वस्य दंपत्योः स्नेहसंश्रयात् । आनंदग्रंथिरेकोयमपत्यमिति बध्यते ' हा भवभूतीचा श्लोक मी आज वाङ्मयरूपी महाराष्ट्राच्या आख्यानाला मूलभूत म्हणून घेणार. दांपत्याच्या अंतःकरणभूमींत अगदीं खोल रुजलेलीं जीं स्नेहतत्त्वें त्यांचा एकजीव होऊन त्या उभयतांच्या अंतःकरणास कायमची गांठ देणारा आनंद अपत्यरूपानें मूर्तिमंत बाहेर येतो. हीच कल्पना राष्ट्रीय वाङ्मयरूपी अपत्यास लागू पडते. राष्ट्रभूमींत अनेक ध्येयांचीं बीजें अगदीं खोल जाऊन, त्यांचीं पाळेंमुळें सर्वभर पसरून कर्ते, राष्ट्रपुरुष व विचारी ऋषि यांच्या अंतःकरणांना एकजीव करणारा हा उच्च ध्येयानंद या वाङ्मयरूपी अपत्यांचें स्वरूप घेऊन बाहेर पडतो. अर्थात् वाङ्मय हें या सर्व ध्येयांच्या मंथनापासून उत्पन्न झालेलें अमृत आहे. अपत्याची कल्पना करुणरसाला आपल्या घरीं पाणी भरण्यास लावणाऱ्या भवभूतीच्या कोमल हृदयांत उत्पन्न झाली हें साहजिकच आहे. पण हालाहलापासून तों अमृता-पर्यंत चौदा निरनिराळ्या प्रकारचीं रत्नें सागरमंथनापासून निघालीं ही कल्पना दिल्याबद्दल पौराणिकांचे भवभूतीपेक्षांहि मी जास्त आभार मानतों. या महाराष्ट्र-मानससागराचें मंथन दर पंचवीस वर्षांनीं नवें होत आहे, व दर वेळेस चौदा नाहीं चोवीस तऱ्हेचीं वाङ्मयरत्नें त्यांतून निघत आहेत. त्यांत हालाहल विष षड्रिपूंच्या मसाल्यांत खलून खलून निघाल्यामुळें त्यानें भरलेलें वाङ्मयरत्न महाराष्ट्रास आज कित्येक दिवस वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, परिषदा, सभा, मंडळें, अशा सात आठ जिव्हांनीं बाहेर पडून जाळीत आहे. अशा वेळीं एखाद्या शिवशंकर भोलानाथाची या विषास कंठीं घालून बाकीच्या रत्नांस बाहेर येण्यास सवड देण्याविषयीं सर्व वाङ्मयदेवतांनीं प्रार्थना करण्यास आरंभ केला आहे. त्या प्रार्थनांचा आवाज माझ्या दिव्यकर्णांस चांगलाच ऐकूं येत आहे. पण भवभूतीची अपत्यकल्पना अजून माझ्या डोक्यांतून गेली नाहीं. उच्च ध्येयें हीं राष्ट्रांतील स्त्रीपुरुषांच्या अंतः-

करणाचीं खोल तत्त्वें बनलीं पाहिजेत. त्यांच्यावर स्नेहरसाचें सिंचन होऊन वाङ्मयरूपी जें अपत्य होईल तें खरें आनंदमय होईल, व तीच राष्ट्रास एक करणारी ग्रंथि. माझ्या उपमांची व रूपकांची गुंतागुंत पाहून तुझ्या मनांत मोठाच घोटाळा उडाला असेल. पण सांसारिकाला जितकी सूक्ष्म ध्यानदृष्टि असेल तितकी सर्व या विषयाकडे खेंचून घे, म्हणजे मी काय म्हणतों हें तुझ्या लक्षांत येईल.

आतां असा प्रश्न विचारूंया कीं, महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणांत उच्च ध्येयांच्या लाटा उसळताहेत कां ? जीं गाडेच्या गाडे छोटेखानी पुस्तकें बाहेर पडत आहेत, तीं या ध्येयलहरींची द्योतक आहेत काय ? कीं पोटांत कांटे भरण्याच्या लालसेचे हे भिकारडे विलास आहेत ? कीं शुष्ककीर्तीच्या मृगजळावर तरंगत राहून खुशालचेंदी खेळाची मांडलेलीं प्रदर्शनें आहेत ? कित्येक वेळां मला असें वाटतें कीं बुद्धि किंवा प्रतिभा यांच्या दुष्काळांत वाचकांस हें खंडोगणती भूस खाऊनच वरेच दिवस कंठावे लागणार ! पण भूसावर खूप स्वस्त चैनीचें रगड पाणी प्यायल्यावर राष्ट्रांतील अंतःकरणांत महामारीचा उपद्रव होण्याची भीती आहे हें कसें कोणाच्या लक्षांत येत नाहीं ? तुझ्या पत्राच्या शेवटींशेवटीं माझ्या या ज्या त्या वस्तूविषयीं नाक मुरडण्याच्या संवयीविषयीं एक सूक्ष्म ध्वनिरूप टोला तूं मारला आहेस; व माझ्या तपस्येनें माझ्या स्वभावजन्य अवगुणांत काडी इतकाहि फरक झाला नाहीं असाहि एक मृदु परंतु अतितीक्ष्ण वाग्बाण सोडून तूं आपणास अगदीं कृतकृत्य समजत असशील. पण तुझ्या असें लक्षांत येत नाहीं कीं, फोल बोलण्याचें कौतुक करणारें वांया डोलणें कितीहि उदारपणाचें असलें, तरी तें चारुदत्ताच्या चोरानें भिंतींत पाडलेल्या पद्माकार भगदाडाच्या कौतुकाइतकेंच वाङ्मयचोरांस उत्तेजन देणारें व अंतीं राष्ट्राच्या घरधन्यास जास्त दरिद्री करणारें आहे. जर आपल्या दुर्दैवानें म्हणा किंवा आतां या माझ्या हिमालयांतील सात्त्विक, खोल व दूरवर पोंचणाऱ्या दृष्टीनें बोलावयाचें झालें तर सुदैवानें—इंग्रज सरकारच्या शांतिमय राज्यांत विश्वविद्यालयांच्या द्वारानें संस्कृत, इंग्लिश, फ्रेंच, लॅटिन, ग्रीक, जर्मन अशा अनेक मृत व जिवंत भाषांतील वाङ्मयांचे आदर्श आपल्यापुढें येताहेत त्यांच्या तुलनेनें आपलें मराठी वाङ्मय पाहिलें म्हणजे उत्साहपूर्ण आशा उत्पन्न होते कीं, लज्जा व निराशा यांच्या मिश्रणाचें प्रतिबिंबभूत म्लानिग्लानियुक्त हंसूं येतें, याचा तूंच विचार कर. या पूर्वोक्त वाङ्मयांचा सुगंध घेतला म्हणजे साहजिकच प्रश्न निघतो कीं या फुलांची जमीन तरी कशा प्रकारची होती ? जर्मन कवि गटे, हल्लींच्या युद्धाच्या वणव्याला

ज्याचीं पुस्तकें व व्याख्यानें कारणीभूत झालीं तो महालेखक व वक्ता ट्रायस्के, फ्रान्सच्या राज्यक्रान्तीचा भडका उडवून देणारे दोन सुरुंग रूसो व व्होल्तेर, इंग्लंडच्या भौतिक दृष्टींत अंजन घालणारे कार्लाइल, इमर्सन, व वर्डस्वर्थ, यांच्या कृतींचे अवाढव्य राष्ट्रीय परिणाम पाहिले, म्हणजे आमच्या वाङ्मयाच्या फटाक्यांचें कौतुक करणारे व राष्ट्राच्या धाकट्या दिवाळीच्या दिवट्या लावून वाङ्मयाच्या फराळाची भातुकली करून संतोष मानणारे आम्हीं बालक किंवा बालिश नाहीं काय ? या राष्ट्रीय परिणाम करणाऱ्या ग्रंथकारांच्या मनांत कल्पनांचें रण माजल्याशिवाय कां हे ग्रंथ निर्माण झाले ? आमच्या वाङ्मयाची अकालिक सत्वमयता व खोटी शममयता पाहून ‘ मिथ्याचारः स उच्यते ’ हीच वाणी बाहेर पडते. नाहींतर पाश्चात्य संस्कृतीच्या लाटा पौर्वात्य संस्कृतीच्या हजारों वर्षांच्या जोरानें वाहणाऱ्या लाटांवर आदळल्यावर कल्पनांचें वादळ उत्पन्न झाल्याशिवाय कसें राहील ? पण या खऱ्या वादळाचें नांवहि नाहीं असें मी निक्षून सांगतों. पण मग सुधारक व उद्धारक यांच्या शिव्यांच्या चुरचुरीत फोडणीचा आवाज मला ऐकूंच येत नाहीं काय, असा तुझा आक्षेप निघेल ! पण तो खऱ्या मानसिक वादळाचा दर्शक नाहीं, हें मी दोनतीन कस लावून सिद्ध करून देण्यास समर्थ आहे.

पुस्तकांचे राष्ट्रीय जीवितावर झालेले परिणाम ही सर्वांत चांगली परीक्षा आहे. राजकीय वातावरण घ्या, सामाजिक घ्या, धार्मिक घ्या, या सर्व चळवळींच्या क्षेत्राचें व त्यामुळें उडणाऱ्या खळबळीचें विस्तृतत्व मी कबूल करितों; पण त्यांच्या खोलीचें व जोराचें माप घेण्यास माझ्याजवळ चांगलेंच यंत्र आहे, तें मला सांगतें कीं या सर्व चळवळींचा पारा चढत नाहीं याचें कारण, राष्ट्रीय समुद्रावरील धाकट्या लहरी, व्यक्तिद्वेष, जातिमत्सर, व बारीक दोषांकडे पाहण्याची कोती दृष्टि इत्यादि कचरा व मळ धुवून काढण्यास समर्थ नाहींत. हा कचरा राष्ट्रीय सभेंत नाहीं ? कीं सामाजिक परिषदेंत नाहीं ? कीं धार्मिक महामंडळांत नाहीं ? हा कचरा निघून जाऊन उच्च तत्त्वांची मारामारी होऊन पर्वताएवढाल्या लाटा उसळून खरा कल्होळ झाला असता तर माझ्या यंत्रांतील पारा तेव्हांच वरती चढला असता. तीक्ष्ण संवेदना तर म्हाताऱ्याकोताऱ्या पुढाऱ्यांच्या चष्म्यांस सर्वस्वी दोषरूपच भासतात. जणुं कांहीं हल्लींचा कुचका उदासीनपणा उच्च शमावस्थेचाच भाऊ आहे असें त्यांना वाटत असावेसें वाटतें.

उच्च वाङ्मयाची खरी परीक्षा करण्याचा हा कस राजकीय, सामाजिक व धार्मिक

विषयांवरील प्रसिद्ध ग्रंथास लाविला तर त्याचा निकाल मला तरी अनुकूल दिसत नाहीं. चुरचुरीत लेख व त्यांची खोंचदार भाषाशैली हीं वरींच नाचतांना दृष्टीस पडतात. पण याला राष्ट्रसमुद्राचें मंथन असें मी म्हणत नाहीं. ‘ अस्त्रज्वालावलीढप्रतिवलजलधेरंतरौर्वायमाण ’ या चरणांत अश्वत्थाम्यानें वर्णिल्याप्रमाणें राष्ट्र सागर ज्वालावलीढ झाला आहे काय ? हा प्रश्न मला निराशेंत लोटतो. निबंधमाला, विविधज्ञानविस्तार, सरस्वतीमंदिर, केसरी, सुधारक, इत्यादिकांतून उच्च प्रतीचे लेख येऊन गेले नाहींत, असें म्हणण्यापर्यंत माझी दोषैकदृष्टि गेली आहे असें मला वाटत नाहीं; पण राष्ट्रसागर या लेखांनीं खरा हलला आहे असें मला वाटत नाहीं. तो खरा हलल्याची पहिली खूण, कुचका व्यक्तिदोष, हलकट जातिमत्सर व क्षुद्र दोषैकदृष्टि हे तीन मळ साफ धुवून जाणें, हें मी समजतों. उच्च कल्पनांच्या लाटांपुढें हा कचरा राहणें शक्य नाहीं. पण राष्ट्रप्रगतीच्या सर्व संस्थांमध्यें या कचऱ्याची घाण अजून माझ्या नाकाला येत आहे.

निवळ सरस्वतीदेवीची पूजा करण्याचें सोवळें व्रत घेतलेली साहित्यपरिषद देखील या मलापासून मुक्त आहे असें माझें आंतलें मन मला ग्वाही देत नाहीं. कादंबऱ्या, नाटकें व काव्यें यांना तर अनुकरणाच्या पिशाचानें चांगलेंच पछाडलें आहे. मोठ्या ग्रंथकारांचें अनुकरण करूं नये असें कोण म्हणेल ? पण अनुकरण हृदयांत इतकें भिनलें पाहिजे कीं बाहेरील अन्नरसाचें आपल्या शरीरांत जसें रक्त होऊन तें आपलेसें बनून जातें, व बाहेर पडणारी शक्ति निवळ आपलीच आहे अशी भावना आपणांस व लोकांस खात्री पटविण्यास कारण होते, तसेंच ग्रंथकाराचें अनुकरणानें झालें पाहिजे. खऱ्या वाङ्मयाची खरी खुबी अशी आहे कीं, जीवितवृक्षाच्या फोंफावण्यापासून निघालेलें तें फूल आहे, व त्यालाच पुन्हां नव्या राष्ट्रीय जीविताचें फळ येतें. असा निमित्तनैमित्तिक क्रम आहे. हें पहा, खऱ्या जीविताच्या झऱ्यापासून या वाङ्मयाच्या फुलाला फार लांब नेतां कामा नये. नाहींतर त्याचा सुवास कमी कमी होत जाऊन तें जीविताकरितां निरुपयोगी होतें. जीविताकरितां वाङ्मय आहे, वाङ्मयाकरितां जीवित नाहीं; हा सिद्धांत पांडित्याच्या अवडंबराचा दर्शक म्हणून तूं मानणारच. पण मला तो अगदीं जिव्हाळ्याचा भासत आहे. अंतरंगाच्या खोलखोल दरींतून निघालेला वाङ्मयगंगेचा ओघ, उच्चध्येयांच्या धवलगिरिशिखरांवरून खालीं धोधो वाहणारा वाङ्मयशोण नद, हे राष्ट्रीय जीविताच्या सर्व भागांतून वाहत गेल्यावर व्यक्तिद्वेषाच्या काड्या, जातिमत्सराचा

चिखल, कुचक्या उदासीनपणाची चुरशी, साफ कोठच्या कोठें निघून जावयास नको कां ? शास्त्रीय शोधांत दुसऱ्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांचें भाषांतर करून परभृतांची पदवी मिळविण्यांत राष्ट्रीय पुरुषांस धन्यता वाटली असती काय ? प्रतिभा नव्या कवींमध्यें येऊंच नये असा कायदा कोणीच केला नाहीं व कोणी मानणारहि नाहीं. पण नव्या कवीची प्रतिभा उषःकालाप्रमाणें कितीहि रमणीय असली तरी ' सूर्यो जनान् यातयति ब्रुवाणो ' या ऋग्वेद मंत्रांत म्हटल्याप्रमाणें नव्या कवींचा प्रतिभा-सूर्य राष्ट्रजनांना हालवून जागें करीत नाहीं. सूर्य उगवल्यावरोबर आपल्या ऋग्वेद कवींनीं ज्याप्रमाणें एकदम उद्गार काढला कीं ' चित्रं देवानां उदगात् अनीकं '— हें पहा सर्व देवांचें तेज कसें एकवटलें आहे ! ! असाच उद्गार नवें सजीव वाङ्मय उदयास आलें कीं अखिल राष्ट्राकडून निघाला पाहिजे. असो. दुसरा एक कस वाङ्मयाची परीक्षा करणारा मजजवळ आहे. एकंदर टीकात्मक व वादविवादात्मक वाङ्मय वाचून मला एक गंमत वाटत असते ती ही कीं, दोष काढणें तो प्रति-पक्षाच्या मनांत किंवा संस्थेंत खरोखर आहे कीं नाहीं हें न पाहतां, तो दोष ज्यांत असेल अशा भलत्याच व्यक्तीला किंवा संस्थेला प्रतिपक्षाची प्रतिनिधीभूत मानून हल्ला करावयाचा व मनांतल्या मनांत जय झाला म्हणून टाळी मारावयाची. शंकरमामंजी किंवा भटभिक्षुक हे का सनातनधर्माचे खरे प्रतिनिधी ? दोन्हीपक्षास अशा व्यक्तीविषयीं सारखाच तिरस्कार वाटतो. पण सुधारकांचे तीव्रशर सनातन-धर्मव्यवस्थेंतील खऱ्या दोषांवर न पडतां शंकरमामंजीसारख्या अगोदरच मृत झालेल्या शत्रूवर पडतात. यानें काय होतें कीं खरा दोष तर बाहेर पडतच नाहीं, पण मानसिक दारुगोळ्याचा व्यर्थ नाश होतो. जुन्या धर्माचे अभिमानी सुधार-कांच्या मुख्य तटाला हातहि लावीत नाहींत. तर त्यांचा सर्व हल्ला, यथेष्टाचार करून पंचेंद्रियांची अव्यभिचारिणी भक्ति करणाऱ्या आचरट शिरोमणीवर होतो. पण त्यांच्या हें लक्षांत येत नाहीं कीं, हे नराधम वीर सुधारकांसहि तितकेच तिरस्करणीय वाटतात. मिळून टीकात्मक सर्व शक्ति आधींच मृत झालेल्या शवांवर उगीच खर्च होऊन गैरसमज व चिडखोरपणा यांच्या चिळकांड्या उडून घाण होत आहे. खरे वादवीर या नादांत कधींच पडावयाचे नाहींत. त्यांच्या युद्धाचें वाङ्मय यापेक्षां जास्त परिणामकारक असतें. तें फारसें माझ्या दृष्टीला अजून दिसत नाहीं. अस्तु आज शिव्यांचे गोटे तुजकडे पाठविले आहेत. पण त्या गोट्यांत देखील खऱ्या वाङ्मयाच्या मूलभूत असलेले उच्च ध्येयांचे व कल्पनामंथनाचे रंगीत गोटे पेटींत घालून ठेविण्यासारखे आहेत असें तूंहि कबूल करशील. "

## ३

# ‘ चिपळूणकर–आगरकर वि. गोळे–रानडे ’

“......तुझी एकामागून एक दोन पत्रें आलीं. पुष्कळ दिवसांनीं हा मी तुझ्या लेखणींतून निघालेला जोराचा वाक्प्रवाह पहात आहे. त्यांत विनोद, क्रोध, पक्षाभिमान यांच्या छटा इतक्या बेमालूम मिसळून गेल्या आहेत कीं, रात्र केव्हां संपते आणि दिवस केव्हां उगवतो हें जसें नेमकें सांगतां येत नाहीं, तसें तुझा विनोद कोठें संपतो व क्रोधास कोठें आरंभ होतो; अन्यायजन्य सात्विक क्रोध, कोठें संपतो व पक्षाभिमानाचा फूत्कार कोठें उदय पावतो, हें नेमकें सांगणें अशक्य आहे. तरीपण हे सर्व रंग दाखविणारें यंत्र माझ्याजवळ आहे. तें मला कसें मिळालें हें मी सांगूं शकत नाहीं! तुझें आव्हान कितीहि तामसी दृष्टीनें केलेलें असलें, तरी मी त्याचा आनंदानें स्वीकार करितों. विष्णुशास्त्री चिपळूणकर व माधवराव गोळे यांस तूं एकाच पक्षांत गोंवून त्यांच्याविरुद्ध गोपाळराव आगरकर यांचे लेख ठेविले आहेत; व या दोन्हीं पक्षांच्या लेखकांची तुलना करून खऱ्या वाङ्मयाचा कस त्यांना लावण्यास तूं मला आव्हान करीत आहेस. म्हणजे त्यायोगें साहजिकच ‘ अस्पष्ट, मधुर, अव्यक्त ’ अशा ध्वनींनीं आपलें खरें मत मी आजपर्यंत लपवून ठेविलें अशी जी तुझी तक्रार आहे ती नाहींशी होईल! या दोन दरडींवर समतोलपणें हात ठेविण्याची माझी धांदल पाहून मनांतल्यामनांत हास्यरसाचा उपभोग आपण यथेच्छ घेणार! पण मित्रा, मला वाटतें, सर्वांत सोपी गोष्ट जर कोणती असेल, तर एका दरडीवर हात ठेवणें ही होय. सर्व पूर्वपरंपरा एकदम सोडून नवी पाटी नवी पेन्सिल घेऊन, नवा भविष्यकाळ रेखाटणें हें जितकें सोपें, तितकेंच नव्या परिस्थितीकडे पुरी डोळेझांक करून ‘ वासांसि जीर्णानि ’ पांघरून ‘ तातस्य कूपोऽयमिति ब्रुवाणा क्षारं जलं कापुरुषा पिबन्ति । ’ या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें हट्टानें जुन्यास चिकटून राहणें हें सोपें, सरळ व स्वस्तिशांति देणारें आहे. पंचाईत काय ती दोन्हीं बाजूंचीं गटारें टाळून मधला रस्ता धरून चालणाराला! महाकवि कालिदास याला ही अडचण भासली म्हणूनच त्याचे तोंडून पुढील उद्गार निघाले:—

**चंद्रं गता पद्मगुणान्न भुंक्ते पद्माश्रिता चांद्रमसीमभिख्याम् ।**
**उमामुखं तु प्रतिपद्य लोला द्विसंश्रयां प्रीतिमवाप लक्ष्मीः ॥**

लक्ष्मीला चंद्रावर कमळाची शोभा मिळेना व कमळावर चंद्राची मिळेना; पण पार्वतीच्या मुखावर दोहींचें सौंदर्य मिळालें तेव्हां तिला समाधान झालें. 'परस्पर विरोधिन्योरेकसंश्रयदुर्लभम् । संगतं श्रीसरस्वत्योर्भूतयेऽस्तु सदा सताम् ॥' या श्लोकांत ही कालिदासाची चमत्कारिक पूर्णत्वाची भूक स्पष्ट दिसत आहे. सरस्वतीला ढकलून देऊन श्रीची पूजा करणारे हरीचे लाल पुष्कळ आहेत, व श्रीला तुच्छ मानून सरस्वतीलाच माळ घालणारेहि थोडे बहुत मिळतील. पण दोन्ही साधून देशाचें अंतरंग व बाह्यांग सुशोभित करणारे इसम विरळा ! सारांश सरळ रेषेंतलें पूर्णत्व आगगाडीच्या रस्त्याप्रमाणें कालिदासाला निरस वाटलें. त्याला सर्व बाजू सारख्या सुंदर पाहिजे होत्या. त्या या जगांत दुर्लभ होत्या, पण त्या या जगांत मिळतील–मिळणें शक्य आहे–असें त्यास वाटत होतें. अशापैकींच माझा दोन दरडी-वर हात ठेवण्याचा प्रकार आहे. म्हणजे मी कालिदासाशीं आपली तुलना करतों असें नाहीं. हो, काकदृष्टि लोकांना साध्या भाषणांत देखील हे व्रण दिसतात व त्यांच्यावर टोंच मारण्याची संधि आतां तुम्हीं कवीं वांया जाऊं द्यावयाचे नाहींत. अस्तु.

आतां तुझ्या आव्हानाकडे वळूं. पहिल्याप्रथम हें सांगितलें पाहिजे कीं, ज्या उमाळ्यानें किंवा अभिमानाच्या आवेशानें विष्णुशास्त्री सुधारकांवर तुटून पडत असत, तो उमाळा व आवेश माधवराव गोळे यांच्या 'हिंदुधर्म आणि सुधारणा' या पुस्तकांत नाहीं. विष्णुशास्त्र्यांच्या आवेशास उलट बाजूचा आवेश दाखविणारे गोपाळराव आगरकर खरे–त्यांचा विरोध तत्त्वाच्या दृष्टीनें, भाषा पद्धतीच्या दृष्टीनें अगर त्यांच्या प्रकृतिस्वभावाच्या दृष्टीनें पाहिला म्हणजे तो सार्वत्रिक, अखिल विश्वांत सांपडणारा असा आहे खरा. माधवराव गोळे यांनीं मारून मुटकून जुन्याची वकिली पत्करिली होती हें स्पष्ट दिसतें. तसें विष्णुशास्त्री व आगरकर हे वकील नव्हते. ते अभिमानप्रेरित लढवय्ये होते. कदाचित् गोळे यांच्याशीं सामना करणारे विरुद्ध पक्षाचे वकील पहावयास गेले तर न्यायमूर्ती रानड्यांकडे बोट दाखविलें पाहिजे. म्हणजे गोळे व रानडे हे कोर्टांतील दोन वकिलांप्रमाणें उदरंभरि होते असें मात्र अनुमान काढावयाचें नाहीं. वेणीसंहारांतील अश्वत्थामा व कर्ण यांच्या स्वभावांत जो भेद तोच भेद शास्त्रीबोवा–आगरकर या जोडीच्या स्वभावांत व रानडे–गोळे या जोडीच्या स्वभावांत आहे. पहिल्या जोडींत खरा भाव, आवेश,

व त्यांचा आनुषंगिक खरा अंधपणा आहे. दुसऱ्या जोडींत तर्कशुद्धता व समतोलपणा आहे; पण त्यांचाच आनुषंगिक दोष—भावनांच्या उष्म्याचा व उमाळ्याचा अभाव हाहि त्यांच्यांत आहे. अश्वत्थाम्याचा तर्क साफ चुकून त्याचें तर्कट बनतें. कर्णाच्या प्रत्येक बोलण्यावर अश्वत्थाम्याचें उत्तर गालिप्रदानाच्या गाळवोटानें विटाळलें आहे. कर्णाचीं उत्तरें वकिली बाण्याचीं, भारदस्त व समतोलपणाचीं आहेत. पण अखेर वाचक व नाटकांचा प्रयोग पहाणारे प्रेक्षक यांचा ओढा अश्वत्थाम्याकडेच जातो. कर्णाच्या तर्कचातुरीचें कौतुक सर्वजण करतील; पण प्रेमाचा कांटा अश्वत्थाम्याकडेच वळेल. कारण उघड उघड आहे. मनुष्यजाति या जगांत तर्काकरिता अवतरली नाहीं तर उच्च भावनामय जीविताकरितां अवतरली आहे. तर्काला एक कोंपरा दिला आहे, तेथें त्यानें खुशाल कोळ्याच्या धाग्याचीं वस्त्रें विणावीं. तीं दिसण्यांत मोठीं सुंदर असतात, पण जीविताचा धक्का त्यांस सहन व्हावयाचा नाहीं. तर्काचा उपयोग जीवित वहकून जाऊन खड्ड्यांत पडूं नये इतक्यापुरतां लग्नासारखा आहे. पण त्याला मांस नाहीं, हसण्याची शक्ति नाहीं. विष्णुशास्त्री व आगरकर हसतात, रडतात, पाय आपटतात, नाक वांकडें करितात; रागाच्या भरांत अन्याय करितात, राग गेला म्हणजे पुन्हां शांत होऊन हात जोडतात. पण हा खेळ गोळे–रानडे या जोडींत मिळावयाचा नाहीं. वास्तविक धर्म हा विषय शुद्ध भावनांचा आहे ना? पण रानड्यांचीं धर्मव्याख्यानें वाचून बुद्धीवर संस्कार जास्त होतो कीं भावनांवर? या प्रश्नाचें उत्तर द्यावयाचें म्हणजे लगेच दुसरा प्रश्न विचारावा. रानड्यांचीं धर्मप्रवचनें वाचतांना अश्रू कितीकसे येतात? त्यांचीं व्याख्यानें प्रत्यक्ष मी ऐकिलीं आहेत. पण श्रोत्यांच्या मनावर त्यांच्या बुद्धिवैभवाविषयीं आश्चर्ययुक्त प्रेमाशिवाय इतर भावनांचा उमाळा उत्पन्न झालेला मी तरि कधीं पाहिला नाहीं. माधवराव गोळे यांचें पुस्तक वाचतांना तर वाचक त्याचें स्वतःचें चरित्र व त्यांचीं भावनारहित मुखश्री आठवून गालांतल्या गालांत हसल्याशिवाय राहणार नाहीं. तेव्हां अशा बुद्धिवैभवदर्शक परंतु भावनारहित ग्रंथांस वाङ्मय म्हणावें कीं नाहीं, याचाच मला संशय आहे. रानड्यांची व गोळ्यांची सूक्ष्म बुद्धि व खोल विचार हे गुणच वाङ्मयदृष्ट्या दोष होतात, व शास्त्रीबोवा–आगरकर या जोडीचे आवेश, अभिमान, अंधत्व हे दोषच वाङ्मयदृष्टीनें गुण ठरतात. म्हणजे वाङ्मय तर्काची साफ रजा घेऊन यथेच्छ नाचतें, असा अर्थ जर तूं करशील, तर मग बी. ए. च्या परीक्षेंत तर्क व नीतिशास्त्र हे विषय

ऐच्छिक म्हणून घेतल्याचें सार्थकच केलेंस म्हणायचें! वाङ्मयरूपी भाजींत तर्काचें पाणी पाहिजे, पण भाजीचा वास, व फोडणीचा वास व तिखटमीठ हीं तिच्या गुणांचीं आवश्यक साधनें आहेत. याच दृष्टीनें मी शांकरभाष्य व रामानुज-भाष्य यांना वाङ्मय समजत नाहीं. वादविवाद सभेंत या पुस्तकांना अगदीं देव्हाऱ्यांत ठेवा, पण सरस्वतीच्या विलासमंदिरांत या वेदाभ्यासजड पुस्तकांना जागा देऊं नका! तीं रसभंग करितील. आणि याच दृष्टीनें मी उपनिषदांस उच्च प्रतीचें सरस्वतीच्या वीण्यावर नाचणारें वाङ्मय म्हणणार. वास्तविक उपनिषदांतील उपासना भाग व भाषाशैली अर्वाचीन दृष्टीला थोडीं अडाणी व ओवडधोवड भासतात. पण त्या वृक्षांवर ध्वनिकाव्याची वेल चढून तिला जीं गूढतत्त्वांच्या कोमलवासाचीं फुलें आलेलीं आहेत, त्यांची शोभा पाहून प्रत्यक्ष सरस्वती मोरावर नाचत असेल! तिच्या नेहमींच्या चित्रांत तिच्या हातांत एक पुस्तक दिलेलें असतें. तें उपनिषदांचेंच असावें व तीं उपनिषदें ती रोज वीण्यावर गात असावी असें वाटतें. म्हणून विष्णुशास्त्री व आगरकर यांच्या लेखांची मी वाङ्मयांत गणना करितों व रानडे–गोखले या जोडीच्या लेखांस मी बुद्धिवैभवाचे ग्रंथ समजतों. तर्कमय–वकिली वाङ्मम हें नांव जरा तिरस्कारदर्शक आहे, तें मी रानडे–गोखले यांच्या लेखांत देत नाहीं. तें उदरंभरि तामसी लेखकांकरितां मी राखून ठेविलें आहे. तें नांव कोणाकोणाला मी देणार आहें याची यादी एक दिवस तुला पाठवीन. पण तूं आमचें सर्व गुपित बाहेर पाडतोस असा मला संशय येत चालला आहे. तो जर खरा ठरेल तर ती मी पाठविणार नाहीं. आतां विष्णुशास्त्री व आगरकर यांच्या वाङ्मयाचें वजन करूं या. उच्चतम वाङ्मय हें नांव दोघांच्याहि ग्रंथांस मी देत नाहीं. कारण दोघांच्याही मनांतील भावना तत्वचिंतेनें उत्पन्न झाल्या नसल्यामुळें त्यांची वाङ्मयभोगावती अगदीं आत्म्याच्या सप्तम पाताळांतून वर येत नाहीं. सुधारक लोकांना आपल्या देशाच्या वैगुण्याचें प्रदर्शन करतांना इतर सर्व देशांत 'पळसाला पानें तीन' या न्यायानें हीं सर्व वैगुण्यें आहेत, व असलींच पाहिजेत, या गोष्टीचें भान राहिलें नाहीं. मोर जसा नाचण्याच्या भरांत पिसाऱ्याबरोबर दुसऱ्या घाणेरड्या गोष्टींचें प्रदर्शन करून आपण जगाचें हांसें मिळवीत आहोंत ही गोष्ट विसरतों, तशीच हे लोक आपली फजीति परकी राज्यकर्त्यांच्या नजरेस आणून स्वाभिमान-शून्यतेचें प्रदर्शन करीत आहेत याची चीड शास्त्रीबोवांस आली. व त्यांचें वाङ्मय या चिडीच्या आवेशानें भरलेलें आहे. मूलभूत समाजतत्त्वाच्या

जाणिवेनें तें उत्पन्न झालेलें नाहीं. ही जाणीव त्यांच्यांत नव्हती असें नाहीं. रावणाला मारण्याकरितां राम उभा राहतो. सीतेला चोरली नसती तर रामाला रावणाच्या दुष्टपणाची एवढी चीड आली असती किंवा नाहीं याचा संशय आहे. तशीच सुधारकांनीं देशलज्जारूपी सीता चोरल्यामुळें शास्त्रीबोवांना चीड आली होती. सुधारकांच्या मूलभूत तत्त्वज्ञानाची त्यांना निरपेक्ष चीड होती असें मला वाटत नाहीं. म्हणून सापेक्ष भावनेचें उच्च वाङ्मय हें नांव त्यांच्या ग्रंथांस शोभेल. आगरकरांच्या लेखांचा हाच प्रकार. विष्णुशास्त्र्यांच्या लेखांनीं त्यांच्या अनुयायांत समाजाचे दोष लज्जेस्तव लपवून ठेवण्याची खोड उत्पन्न केली व हे दोषरूपी रोग चोरून ठेविले तर समाजाचा घात होईल म्हणून या खोट्या देशाभिमानाची आगरकरांस चीड आली. पण समाजशास्त्राच्या दृष्टीनें हे दोष कित्येक गुणांचे अनुषंगी आहेत, व हे दोष गेले तर ते गुणहि जातील इतक्या खोल विचारांनीं प्रेरित होऊन आगरकरांनीं त्या दोषांवर हल्ला केला नाहीं, तर विष्णुशास्त्री व केसरी हे रावणासारखे दिसून त्यांनीं समाजसुधारणेची सीता चोरली म्हणून या सुधारकवीर रामास चीड आली ! खोल तत्त्वज्ञान दोघांतहि नव्हतें व त्या धांदलीच्या काळांत तें येणें शक्यहि नव्हतें. पण इंग्रजसरकारचें राज्य नसतांना, व जपानसारखें स्वराज्य असतांना, पुराणप्रिय व सुधारणाभक्त यांचें जसें तत्त्वज्ञानप्रेरित वाग्युद्ध झालें असतें तसें हें वाग्युद्ध नव्हे. कार्लाइल, वर्डस्वर्थ, इमर्सन या त्रयींचें मिल्ल, डार्विन वगैरे वीरांशीं युद्ध झालें, तें स्वतंत्र हवेंत झाल्यामुळें त्यांची वाङ्मयभोगावती अगदीं मनुष्यजातीच्या पाताळांतून निघाली आहे. म्हणून त्यांचीं पुस्तकें सर्व जगास वंद्य झालीं; व झालींच पाहिजेत. इतकी सार्वत्रिकता किंवा विश्वात्मकता शास्त्रीबोवा व आगरकर यांच्या ग्रंथांचीं भाषांतरें केलीं तर येईल किंवा नाहीं याची शंका आहे. म्हणून त्यांच्या ग्रंथांस सापेक्ष उच्चत्व आलेलें आहे. हल्लींच्या युद्धांत इंग्रजांच्या परोपकारबुद्धीच्या कोमल विकारांची व धाकट्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यार्थ दाखविलेल्या सरदारी क्षत्रिय बाण्याची किंमत बरीच साक्षेप आहे, तशीच आगरकर व विष्णुशास्त्र्यांच्या लेखांची आहे. आतां वीस पंचवीस वर्षांच्या अनुभवानें समाजास दोघांचेहि गुणदोष दिसूं लागले आहेत. आतां हें साक्षेप वाङ्मय बंद पडण्याची वेळ आहे समाजशास्त्राची प्रगति होऊन इतर समाजांचे गुणदोषहि बरेच चवाट्यावर येत आहेत. अशा वेळीं उच्चतम वाङ्मय कदाचित् उत्पन्न होईल असें मला भासत आहे. पण गुलामगिरींत

रुतलेल्या राष्ट्रांत अज्ञातवासाची हवा फार दिवस टिकल्यामुळें स्वतंत्र विचार व अवलोकन यांचें बीज कायम राहील कीं नाहीं याची वानवा आहे व येथेंच घोडें पेंड खातें आहे. केसरीकारांना ढोंगी म्हणणारांना स्वयंप्रज्ञा नाहीं. समाज-शास्त्राच्या अध्ययनाचें उपनेत्रहि यामुळें 'दर्पणः किं करिष्यति' या न्यायानें त्यांना निरुपयोगी आहेत. कर्त्या सुधारकांस देशाभिमानशून्य म्हणणाराची तितकीच कींव येण्यासारखी स्थिती आहे. म्हणून मी ओरडतों आहे कीं खऱ्या ज्ञानाचें–खऱ्या ज्योतीचें वाङ्मय अशा या संधिप्रकाशांत उदयास येईल तर निभाव आहे. केसरीकारांच्या खोल देशाभिमानाचें, सत्यभक्त सुधारकांच्या प्रगतिप्रियतेशीं जें वाङ्मय लग्न लावील तेंच खरें वाङ्मय होणार! मग अशा लग्नाकरितां कृष्ण-रुक्मिणीच्या लग्नाप्रमाणें खडाजंगी युद्ध झालें तर पाहिजेच आहे. त्यानें देश-सागराचें खरें मंथन होईल, व देवदानवांप्रमाणें उद्धारक व सुधारक यांचें युद्ध सर्वांना हितकर होऊन चौदा रत्नांचा हार हिंदमातेच्या गळ्यांत पडेल. या उपमेंत मी सुधारकांना दानव म्हटल्यासारखा भास तुला होऊन तूं वांकड्या नजरेनें माझ्याकडे पाहतो आहेस असें मला येथून स्पष्ट दिसत आहे. पण पुराणांत व इतिहासांत देव कोणते व दानव कोणते याचा निकाल लावण्याचें सामर्थ्य फक्त सर्वज्ञ परमेश्वरासच आहे. तुम्ही आम्हीं आपल्या तुटपुंज्या स्वार्थबुद्धिप्रेरित दृष्टीनें देवदानवांची देशिक व कालिक अदलाबदल किती केली असेल व किती करूं याला गणतीच नाहीं. वेदांमध्यें इराणी लोक देवांना राक्षस समजतात व असुरांना देव समजतात हाच प्रकार सर्वत्र आहे; व मनुष्याच्या मर्यादितपणाचा तो द्योतकच आहे. पुराणप्रिय देशाभिमानी भारतीयांच्या मनांत जें काहूर चाललें आहे त्याची कल्पना ज्या दिवशीं सुधारकांस येईल, व सुधारकांच्या प्रगतिपर देशाभिमानाची व त्यानें चालविलेल्या मानसिक वर्तनाची पुराणप्रियांस कल्पना करतां येईल, त्या-दिवशीं या देवदानवांच्या नामकरणविधीस कांहीं खरें स्वरूप येईल, नाहींतर भातुक-लीच्या खेळांतील नांवाप्रमाणेंच सर्व प्रकार हास्यास्पद होत आहे. अस्तु. माझ्याकडून होईल तितका समतोलपणा आज मी राखिला आहे. येथील रम्य प्रदेशाचा गुणच असा आहे; पण तो तुझ्या चष्म्यास तसा दिसेल तेव्हां खरा! उत्तराची वाट पहात आहे."*

---

* स्वामींच्या या पत्रानें समाधान झालें नाहीं. मी दोनतीन पत्रांत माझ्या शंका विचारल्या. पण स्वामी आपला हट्ट सोडीत नाहींत! केवळ दिग्दर्शन व विचारजागृति या दृष्टीनेंच मी या पत्रांतील उतारा वाचकांपुढें ठेवीत आहें.

# ४

# ' राष्ट्रीय कवि व राष्ट्रीय कविता '

"......माझीं मतें तुला पसंत पडत नाहींत, असें तुझ्या दोन तीन खोंचदार पत्रांवरून सिद्ध होतें. मी अत्याग्रही आहें, असेंही एका पत्रांत तूं ध्वनित केलें आहेस. शेवटीं कंटाळून तूं परवांचे पत्रांत विषयान्तर करण्यासाठींच ' राष्ट्रीय कविता ' व ' राष्ट्रीय कवी ' या प्रश्नांवर माझीं मतें विचारलीं आहेस. मित्राच्या दुर्गुणाचा परिवार वकिली वाण्यानें कसा करावा हें अर्वाचीन शिक्षणाची वेगड लावलेल्या तुझ्या सभ्यगृहस्थी आत्म्याला करतलामलकवत झालें आहे, हें मी पक्कें जाणून आहें. एकाद्या गृहस्थाची कित्येक विषयांवरील मतें, खोल विचार, अनुभव व वाचन यांच्या भट्टींतून निघून ठाम झालीं, म्हणजे त्याला दोन मार्ग खुले असतात. ' सभ्य गृहस्थ ' ही पदवी सुशिक्षितांकडून मिळवावयाची त्याची इच्छा असेल, तर त्यानें आपलीं मतें होमिओपथिच्या औषधांप्रमाणें ढोंगी मऊपणाचें पाणी सपाटून घालून त्यांचा तीव्रपणा अगदीं कमी करून अगदीं संन्याशी पोषाखांत त्यांना सजवून मांडण्याची कला संपादन केली पाहिजे. नाहींतर अत्याग्रही म्हणून दुसरी कांटेरी पदवी आहे, ती धारण करण्याची तयारी केली पाहिजे. मला आतां ' सभ्य गृहस्थ ' ही पदवी संपादन करण्याचें कारण उरलें नाहीं. व लोकांच्या कांटेरी पदव्यांचें ऊर्फ गालिप्रदानाचेंही भय उरलें नाहीं तेव्हां तुझ्या ध्वनित शिवीचें कौतुक आज येवढेंच पुरे. इतकी प्रस्तावना करून तुझ्या दोन प्रश्नांकडे वळतों.

' राष्ट्रीय कविता ' व ' राष्ट्रीय कवि ' या दोन वचनांत तूं ' राष्ट्रीय ' असें विशेषण घातलें आहेस हें फार चांगलें केलेंस. मला या तुझ्या विशेषणानें कवींचे दोन भाग आयतेच मिळाले. राष्ट्रांतील खळबळीचे द्योतक, राष्ट्रांतील खडबडीनें, घडामोडीनें हलून जाणारे, व आपल्या प्रतिभाचक्षूनें त्या घडामोडींचा खरा आत्मा पाहून त्याचें दर्शन जनसमूहास करून देणारे कवि ' राष्ट्रीय ' होत अशी माझी समजूत आहे. पण या विशेषणाचें याचा वरचा कदाचित् सर्व कवींच्या

मुगुटावर अगदीं वरचा–एक कवींचा वर्ग द्योतित होतो. तो निरुपाधिक, देशकालपरिच्छेदातीत, निरंजन शब्दब्रह्म व परब्रह्म यांत निष्णात अशा कवींचा होय. हे कवी राष्ट्रांतच होतात, असतात व रमतात. पण त्यांना आपल्या भोंवतीं काय चाललेलें असतें याचें भानही नसतें. हे जेव्हां जन्मतात तेव्हांच बरोबर एक तात्त्विक ध्रुव तारा घेऊन येतात. व जन्मभर त्याच ताऱ्याकडे त्यांची दृष्टी असते. त्याच्याशींच ते खेळतात, वागडतात, व रुसतात; व अंतीं तद्रूप होऊन ते या जगरूपी धर्मशाळेंत कांहीं दिवस वास करून स्वगृहीं चालते होतात. यांना एका अर्थी खरे राष्ट्रीय कवी म्हटलें पाहिजे. कारण ज्या राष्ट्रांत हे उत्पन्न होतात त्या राष्ट्रांतील नरांस प्रत्यक्ष नारायणाचें दर्शन हे कवी देत असतात, वं नराचें नारायण कसें व्हावें हें शिकवतात. पण त्यांना मी राष्ट्रीय म्हणत नाहीं याचें कारण, हे कवी सर्व मनुष्यजातीचेंच कल्याण करूं शकतात. सर्व राष्ट्रांत यांचीं कविता 'अभिरूपभूयिष्ठां'स आवडते व आपलीशी वाटते. एकाद्या विशिष्ट राष्ट्रांत त्यांचा जन्म होतो, ही गोष्ट अगदीं आकस्मिक समजली पाहिजे. एवढेंच खरें कीं, ज्या राष्ट्रांत असा निरंजन निरुपाधि कवि कधींच उत्पन्न झाला नाहीं व होण्याचा संभव नाहीं, त्या राष्ट्राला 'राष्ट्र' ही पदवी मिळेल किंवा नाहीं याची शंकाच वाटते. इतकेंच नव्हे, तर कोणतेंही राष्ट्र परिपक्व दशेला आल्याशिवाय अशीं कविरत्नें निर्माण होणेंही अशक्यच आहे.

या दृष्टीनें पाहिलें म्हणजे ऋग्वेद ही कविता राष्ट्रीय आहे व उपनिषदें हीं निरंजन निरुपाधि कवींच्या कृती होत. ऋग्वेदांत आर्यांच्या जीवितवृक्षाची वाढ उत्तम प्रतिबिंबित झाली आहे. व सर्व राष्ट्र भरभराटीस येऊन सर्वांग परिपक्व झाल्यावरच त्या वृक्षाला उपनिषद्रूपी उदात्त फळ आलें आहे. पण हें फळ इतकें कोमल आहे कीं, राष्ट्रीय जीवितास तें फार दिवस लाभत नाहीं. उपनिषदें अजून राहिलीं आहेत. पण त्यांतील काव्यरस चाखण्यास माणसें कोठें राहिलीं आहेत ? त्यांतील रस चाखण्याची योग्यता आपल्या राष्ट्रांतून केव्हांच निघून गेली. तरी राष्ट्र आज हजारों वर्षें त्यांच्या शब्दरूपी कवचीवरच जीभ चघळीत राहिलें आहे. वास्तविक उपनिषदांची गति कधींच कुंठित होतां कामा नये. राष्ट्रांतील प्रत्येक ऐतिहासिक युगायुगाचे ठायीं नवें उपनिषद् निघालें पाहिजे. पण आपलें राष्ट्र 'वेदाभ्यासजड' केव्हांपासून झालें आहे, याची तुला कदाचित् कल्पना करतां येणार नाहीं. संस्कृत कवींपैकीं कालिदास, भवभूति व बाण हे राष्ट्राच्या उच्चावस्थेचे द्योतक आहेत.

अतएव ते राष्ट्रीय होत. दशकुमारचरित, रत्नावलि, प्रियदर्शिका हीं राष्ट्राच्या हीन स्थितीचीं, विषयलोलुपतेचीं, मुसलमानांना राष्ट्राचा सांगाडा आयता कुजलेला सांपडला असें दाखविणारीं काव्यें होत. अर्थात या दृष्टीनें हीं काव्यें व या काव्यांचे कर्ते राष्ट्रीयच होत. पुढें राष्ट्रानें कात टाकण्यास आरंभ केला. तेव्हां ज्ञानेश्वरादि कवींनीं जुनें तत्वज्ञान आपल्या स्वतःच्या अनुभवाच्या मुशींत ओतून राष्ट्राला जिरेल अशा त्याच्या ओंव्यारूपी गोळ्या करून देण्यास आरंभ केला. व ४।५ शतकांत राष्ट्ररूपी वृक्षाला नवी पालवी फुटून तो अंग धरूं लागला. व त्याचें उत्तम फळ शिवाजी व मराठी साम्राज्य हें आपणांस लाभलें.

या मराठी कवींतही भेदाभेदविचार सोडतां कामा नये. ज्ञानेश्वर व एकनाथ यांची कविता उपनिषदांप्रमाणें देशकालाच्या पलीकडली आहे. त्यांना महाराष्ट्रापेक्षां सर्व मनुष्य जातीला उपदेश करावयाचा होता. या प्रश्नाचें उत्तर त्यांना गीता व भागवत या ग्रंथांत जिवंत असें आढळलें, व त्याच्या अनुभवानेंही त्यांना चांगला होकार दिला. त्यांच्या ग्रंथांत राजस अंश नाहींच असें म्हटलें तरी चालेल ज्ञानेश्वरास दैवी संपत्ति दिसली होती व तीच त्यांच्या ओंव्यांमध्यें प्रवाहाप्रमाणें वाहते आहे. एकनाथास गृहस्थाश्रमाचें उच्चतम ध्येय मंत्रद्रष्ट्याप्रमाणेंच दिसलें होतें. तें त्याच्या चरित्रांत व ग्रंथांत तितक्याच जोरानें व जिवंत रीतीनें वर्तन करीत आहे. तुकारामांत कांहीं अंश निरंजन निरुपाधिक आहे व कांहीं राष्ट्रीय आहे. हे दोन्ही अंश वेगळे वेगळे दाखविणें कठीण असलें तरी शक्य आहे व तितकेंच अवश्य आहे. ज्या वेळेस तुकारामाचा आत्मा सात्विक क्रोधानें संतप्त होऊन विषयलोलुपांस, ऐदी आळशी लोकांस, लांगूलचालकांस, दंभनर्तकांस, व सामाजिक व राजकीय विटचेटांस, राजस व केव्हां केव्हां अगदीं तामस गालिप्रदान करण्यास प्रवृत्त होतो त्या वेळेस तो तत्कालीन परिस्थितीचा दर्शक, मारक व तारक आहे असें समजण्यास हरकत नाहीं. इतक्या अंशानें तो पुरा राष्ट्रीय आहे. पण जेव्हां 'तुका झाला पांडुरंग' अशा सात्विक, निस्त्रैगुण्य आकाशगंगेंत तो पोहूं लागतो, तेव्हां त्याची वाणी 'पूर्ण वेदांत' सांगते, व इतक्या अंशानें तो निरंजन निरुपाधि कवि आहे. रामदास व दासबोध ही जोडी तर पुरी त्रैगुण्यविषयक व राष्ट्रीय होय. दासबोधांत निस्त्रैगुण्य वेदान्त पुष्कळ आहे. पण तो परंपरागत असा घरांतल्या म्हातारीप्रमाणें आपला नमस्कार करावयास ठेवण्यासारखा भासतो. रामदासाच्या कवितेचा खरा

झरा पाहिला तर राष्ट्र उभारण्याची तयारी त्यांत अगदीं मूर्तिमंत दिसते. अक्षर कसें वळवावें व मजूर लोकांना कसें वागवावें या क्षुल्लक बाबींपासून तों मुत्सद्दी-गिरीच्या उच्च शिखरापर्यंत सर्व गोष्टींत राष्ट्राला बोध करण्याची या कवीला घाई सुटली आहे. या घाईमुळेंच केव्हां केव्हां क्षुल्लक गोष्टींचें वर्णन करण्यांत गुंतल्यामुळें हा कवी इतका खालीं आला आहे कीं, गद्य व पद्य यांचा भेद नाहींसा होऊन कविता नदीचें पाणी अगदीं तलावाच्या पाण्या इतकें गढूळ व बेचव झालें आहे. पण यामुळेंच त्याच्या उच्च देशाभिमानाला ऊत आला आहे हें नाहीं कां सिद्ध होत ? अगदीं बारीक सारीक कामांत देखील माझे ( देश ) बंधु तरबेज व कार्य-पटु व्हावे ही इच्छा या गचाळ कवितेनेंच जास्त स्पष्ट दिसत आहे. राष्ट्र पतित झाल्यावर त्याच्या पायापासून तों शिखरांपर्यंत सर्व तयारी कशी करावी लागते; सुशिक्षितांपासून अशिक्षितांपर्यंत सर्वांना जागृत करण्याची शैली कशी असते याचें पूर्णत्वास पोंहचलेलें चित्र जर पहावयाचें असेल, तर तें दासबोधांतच मिळेल. इतक्या विशिष्ट कामगिरींत पडल्यामुळेंच दासबोधाला निस्त्रैगुण्य निरंजन काव्या-मृताची हवा सोसावी लागली. रामदासाच्या चरित्रांत निस्त्रैगुण्य निरंजन परमात्म-स्वरूपाला ते पोंचले होते याच्या खुणा पुष्कळ आहेत. पण राष्ट्राच्या अज्ञातवासांत मोठमोठ्या भीमराजांस बल्लवाचेंही काम करणें कसें भाग पडतें याचा दाखला रामदास व दासबोध या जोडीपासून घ्यावा असें मला वाटतें. आपल्या सद्यः-स्थितींतही कित्येक भराऱ्या मारणारे ग्रंथकार राष्ट्राची अज्ञातावस्था ध्यानांत न घेतां उच्च परंतु राष्ट्राच्या सद्यःस्थितीला निरुपयोगी अशा कामांत गुंतलेले दिसतात. परंतु ‘ स्वभावस्तु प्रवर्तते ’ हें त्यांचें समाधान आपल्या राष्ट्राच्या ह्या क्षयरोगी अवस्थेंत कल्पनेच्या भराऱ्या व्यक्तीस सहन होतील, त्या व्यक्तीला पोषक व निरतिशय आनंद देणाऱ्या असतील, पण राष्ट्राला त्या सहन होणें शक्य नाहीं. तेव्हां देशहिताच्या दृष्टीनें हे काल्पनिक उंच भराऱ्या मारणारे लोक एकप्रकारें देश-द्रोहीच होत. पण व्यक्तिस्वभाव दुरतिक्रम असल्यामुळें हा देशद्रोह अपरिहार्य अतएव क्षम्यच होय. एकंदरींत खरी राष्ट्रीय कविता राष्ट्राच्या घडामोडीपासून दूर राहणें शक्य नाहीं. खरें तत्त्वज्ञानही राष्ट्राच्या जीविताच्या झऱ्यापासून लांब असणें शक्य नाहीं. याच्या उलट असें म्हणतां येईल कीं, या राष्ट्रांतील बरेच कवि व तत्त्वज्ञानी राष्ट्रजीविताच्या झऱ्यापासून इतके लांब राहतात कीं, त्या जीविताचा वाराही त्यांना पोंचत नाहीं. अशा राष्ट्राला उच्चावस्था येणें मुष्किलीचें आहे. तें खरें

राष्ट्र नव्हे असें म्हटलें तरी हरकत नाहीं. इतिहास, तत्वज्ञान व वाङ्मय ही त्रिपुटी एकरस, एका सरळ रेषेंत व एकसूत्रमय पाहिजे. हा सिद्धांत आपल्या हल्लींच्या महाराष्ट्र कवींना व कवितेला चांगला लागू पडतो. ज्या वेदान्ततत्वज्ञानाच्या मूळ झऱ्याचा विसर राष्ट्राला पडला आहे, त्याच वेदान्ताच्या वाक्यांवर उगीच मजेखातर नर्तन करणारे ग्रंथकार राष्ट्राच्या जीवितापासून लांब भटकत नाहींत काय ? राष्ट्रांतील दुष्काळ, राजकीय आपत्ति, सामाजिक अराजक स्थिति व पाश्चात्य चैनीचा सुकाळ या घडामोडीचा कांहींच परिणाम न होणाऱ्या आकाशस्थ ताऱ्यांकडे दृष्टि देऊन काव्यपंखांनीं उंच भराऱ्या मारणारे कवि एकतर निस्त्रैगुण्य निरंजन अशा आत्मस्थितींतील समाधि उपभोगित आहेत असें म्हटलें पाहिजे, किंवा राष्ट्रीयत्वाची ज्वाला यांच्या हृदयांत मुळींच न पेटल्यामुळेंच काव्यरचना हीं यांना एक दारुप्रमाणें सद्यःस्थितीचा विसर पाडणारी करमणूक आहे असें म्हणावें लागेल. मुक्तस्थिति ही फार दुर्मिळ असल्यामुळें या कविराजांची अवस्था दुसऱ्या सोप्या मार्गांतली चैनीच्या समाधीची आहे असेंच मला भासतें. फ्रान्सच्या राज्यक्रान्तीनें निरुपाधि निरंजन अशा सृष्टिदेवीच्या वर्डस्वर्थसारख्या परम एकनिष्ठ उपासकास कित्येक दिवस कसें पछाडलें होतें, हें आंग्लवाङ्मयाच्या वाचकांस सांगणें नको. जर्मन महाकवि गटे हाही कित्येक अंशीं निरुपाधिक कोटींतलाच होय. पण याच्या कवितेंत जर्मनीच्या प्रचलित घडामोडीचें आंदोलन स्पष्ट दिसतें. मग हल्लींच्या काळांत निरंजन वेदान्त हिंदुस्थानच्याच वांट्यास आला आहे असेंच ना म्हणावयाचें ? मानसशास्त्राच्या अनुरोधानें या खोट्या वेदान्ताची मीमांसा करणें कठिण नाहीं. सामाजिक गोष्टींत पूर्वबंधनांना भराभर तोडून टाकून स्वातंत्र्याच्या उच्च ध्रुवाजवळ जाण्याला आमच्या कवीराजांजवळ बळकट पंख आहेत. पण जेथें शरीराला व मनाला जरा त्रास सोसावा लागण्याचा संभव तेथें पारतंत्रतेच्या शृंखला या कवींच्या मृदु हृदयाला टोंचीत नाहींत इतकेंच नव्हें, तर त्या फुलांप्रमाणें हलक्या व मधुर भासतात. मला तर माझें आंतील हृदय सांगत आहे कीं, राष्ट्राचें खरें हृदय हलून ही कविता निघत नाहीं. ही कविता मनाची उच्चावस्था दाखवीत नाहीं असें म्हणण्यास मी तयार नाहीं. पण ही उच्चावस्था व्यक्तिविशिष्ट आहे. राष्ट्रीय आंदोलनानें झालेली नाहीं. हा भेद आपणांस आतां समजला पाहिजे. जर कवितेला अनुरूप असे कांहीं विषय असतील, तर या आपल्या परिस्थितींत कविप्रतिभेला ताडन करून जागृत करणारे थोडे का राष्ट्रीय

आंदोलनाचे विषय आहेत ? पण त्या सर्वांना फांटा देऊन आमचे कवि नुसत्या सृष्टिदेवतेचे भोक्ते बनले याचा उलगडा करण्यास मानसशास्त्राचीं गूढ तत्वें उकरून काढण्यास नकोत. ‘ निद्रा तंद्रा भयं क्रोध आलस्यं दीर्घसूत्रिता । ’ या दुर्गुण षट्कांत सर्व उत्तर येत आहे. राष्ट्रीय सभा, जनसमूह, मुत्सद्दीवर्ग व ग्रंथकारवर्ग यांच्यांतून एक रक्त व एक नाडी वाहात आहे असें वाटत नाहीं. वास्तविक राष्ट्राच्या घडामोडींचें व चित्तविकृतीचें मान दाखविणारें यंत्र म्हणजेच राष्ट्रीय सभा व राष्ट्रीय ग्रंथसमूह. जोंपर्यंत या सभा व ग्रंथ यांच्यांत व जनसमूहांत फारच भगदाड आहे, तोंपर्यंत सभेंतील भाषणें फोनोग्राफसारखींच व्हावयाचीं—मग ती सभा मवाळांची असो किंवा जहालांची असो. ग्रंथसमूह व काव्यें हीं पृथ्वीवर नर्तन न करतां पिशाच्चांप्रमाणें लताकुंजांत नर्तन करावयाचीं व बायकांच्या पाठीस लागावयाचीं ! जसा खरा वेदान्त राष्ट्राबरोबर हंसतो, रडतो, दुर्मुखलेला होतो व शेवटीं शांतिही देतो व घेतो, तशीच राष्ट्रीय कविता राष्ट्राबरोबर हंसली पाहिजे, खेळली पाहिजे, रुसली पाहिजे, रागावली पाहिजे. तसें होत आहे का ? मी एक अत्याग्रही आहें. पण तुझ्यासारख्या सभ्यगृहस्थी आत्म्याला तरी हा आपल्या कवितेचा लवचिकपणा भासतो आहे का ? खरें सांग. आपल्या पूर्वजांचें शारीरिक शुद्धि मिळविणारें जपतप, स्नानसंध्या यांचें मूढत्व पाहणारे कवि भेटतात, पण त्यांचा खरा आत्मा शोधून काढून त्यांच्यावरचा मळ धुवून काढणारा मंत्रद्रष्टा व मंत्रकर्ता कवि होऊं नये म्हणजे कवितादेवी किंवा प्रत्यक्ष सरस्वतीच पक्षपाती व स्त्री असल्यामुळें ‘ वामाक्षी ’च आहे असें म्हणण्याची पाळी येते. सर्व राष्ट्रें हिंदु व हिंदुस्थान यांना कस्पटाप्रमाणें लेखीत आहेत. ..................या तिरस्काराच्या विजेचा धक्का एकाही कवीला लागूं नये याचा अर्थ असाच कीं, पंचमहाभूतें व स्वाभाविक मनोवृत्ती यांनी देखील आमच्यावर बहिष्कार घातला आहे ! अरे, थोडा खोल विचार कर म्हणजे तुला स्पष्ट समजून येईल कीं आत्मविश्वासाशिवाय पराक्रम नाहीं, व पराक्रमाशिवाय मान नाहीं. हा सर्वारंभमूलभूत आत्मविश्वास राष्ट्रांत उत्पन्न करणारा एकही कवि मला आज महाराष्ट्रांत दिसूं नये, हें माझ्या हिमालयांतील मिळालेल्या नव्या अंधत्वाचें फल असेल. पण तुला शिवाप्रमाणें तिसरा ज्ञानचक्षु मिळाला असेल, तर त्याचा उपयोग करून एकादा कवि पाहा, व त्याची कविता मला पाठवून दे !

मनुष्याला अजिबात वगळून सृष्टि व ईश्वर यांचें लग्न लावणारें तत्वज्ञान जितकें

लंगडें, तितकीच माणसांच्या सुखदुःखांकडे दुर्लक्ष करून सृष्टिदेवीचें व आकाशस्थ प्रेमांचें कौतुक करणारी कविता लंगडी होय. हा लंगडेपणा माझ्या येथील दृष्टीला स्पष्ट दिसत आहे. कवीचें पहिलें काम माणसांतील दैवी संपत्ति जागृत करण्याचें व दुसरें काम त्याच्यांतील राजस व तामस अंशांना या दैवी संपत्तिचें चाकर करणें. ही दोन्हीं कामें साधण्यासाठीं सृष्टिदेवीकडे जाणें भाग आहे हें मी कबूल करतों. पण खोट्या वेदांताप्रमाणें सृष्टिदेवीच्या पुढें खोटी समाधि घालून बसणारी कविता ही नाटकी अतएव त्याज्य होय हें विसरूं नकोस. मी व्यक्तींचीं नांवें मुद्दाम गाळलीं आहेत. इतक्या अंशानें मी तुझ्यासारखा खरा ' सभ्य गृहस्थ ' झालों आहें. शेवटीं एकच वाक्य सांगतों. खरें आंदोलन ज्या कवीला मिळालें आहे त्याचा मी मित्र आहें. मग तें आंदोलन व्यक्तिगत असो किंवा राष्ट्रगत असो. पण तूं प्रश्नच मुळीं ' राष्ट्रीय ' शब्दाच्या हुंकारानें किंवा ओंकारानें उच्चारिलास, मग राष्ट्रदेवता माझ्या अंगांत संचरली यांत नवल काय ? तुझ्या पत्राची वाट पाहात बसलों आहे कारण या विषयांत आपला चांगलाच खटका उडणार आहे !' *

---

* या विषयांतहीं स्वामींचा व माझा बराच मतभेद आहे. पुष्कळ पत्रव्यवहार होऊन शेवटीं स्वामींनीं ' माझें तेंच खरें ' असा आविर्भाव दाखविला. पण आतां मी स्वामींना ' अत्याग्रही ' असें कसें म्हणूं ?

## ५

# ‘ वाङ्मयाची खुर्ची सध्यां रिकामी आहे. ’

“......तुझीं सर्व पत्रें पोंचलीं. बुकपोष्टानें पाठविलेलें वर्तमानपत्रांचें व मासिकांचें बंडलही पोंचलें. या युद्धाच्या गोंगाटांत बिचाऱ्या वाङ्मयाची मुरली कोण ऐकतो ? पण निळ्या शिसपेन्सिलीनें अंकित केलेलें एक वाक्य दृष्टीस पडलें. यावरून सर्वच लेख वाचनीय आहे असें वाटल्यावरून लेख सबंध वाचून पाहिला. तो लेख सुप्रसिद्ध जॉन मोर्ले यांचा आहे असें कळल्यावर तर फारच आनंद झाला. माझ्या मनांत त्यांतील आणखी एक वाक्य निळ्या पेन्सिलीनें अंकित करावयाचें आहे. सर्व बिंडोळें परत आल्यावर तुला तें तसें दिसेलच. पण आजही तें मला तुझ्या नजरेस आणावेसें वाटतें. I am concerned with the past only so far as it enables me to understand the present and chalk out my path in the future. ” ‘ मला भूतकाळचें ज्ञान इतक्या पुरतेंच पाहिजे कीं, त्याच्या योगानें मला वर्तमानकालांत उत्तम रितीनें कसें वागावें व भविष्यकाळांत कोणता मार्ग स्वीकारावा याचें ज्ञान होईल. ’ मित्रा, हें वाक्य आपल्या देशांतील विद्वान लोक जर ध्यानांत ठेवतील, तर किती कागद, किती शाई व किती मेंदूचे श्रम वांचतील बरें ! अस्तु. तूं खूण केलेलें वाक्य घेऊं व त्याची मीमांसा करूं या. ‘ The chair of Literature is vacant. ’ असें मोर्लेसाहेब म्हणतात, याचा अर्थ काय ? मला तर वाटतें कीं त्यांच्या मनांत हल्लींचें सर्व वाङ्मय वाचून एक प्रकारची निराशा उत्पन्न झाली आहे. सटरफटर पण तुकतुकीत असें वाङ्मय हल्लीं जगांत पुष्कळ निघत आहे. एकंदर भाषासरणी व विचारसरणी उच्च दर्जाची झाली आहे हें मोर्लेसाहेब स्वतः लेखांत, कबूल करितात; पण त्यांच्या मतें हे सर्व लेखक जाजमावर बसण्याच्या योग्यतेचे आहेत. वाङ्मयाच्या खुर्चीवर बसण्याची त्यांची योग्यता नाहीं. सरस्वती देवीच्या पदकमलीं लीन होणारे पुष्कळ आहेत. तिच्यापासून बरेच अंतरावर उभें राहून प्रार्थना करणारे तर

खंडोगणती आहेत. पण तिच्या मांडीवर बसून खेळणारे फारच थोडे व तिच्या अंतःकरण तत्वांच्या स्नेहाची जोड मिळवून 'सरस्वतीकंठाभरण' होणारे वाङ्मयभक्त तर हाताच्या बोटावर मोजण्या इतकेही नाहींत, असें मोर्लेसाहेबांचें म्हणणें आहे. हें जर जगाच्या एकंदर वाङ्मयाविषयीं खरें असेल, तर आपल्या देशाच्या हल्लींच्या वाङ्मयाविषयीं मोर्लेसाहेबांचें काय मत होईल, याची कल्पना तुला होईल काय ? मला असा प्रश्न विचारावयाचा आहे कीं, आम्हीं हिंदुस्तानवासी सर्वस्वी अवनतीस गेलों आहों, पण युरोप व अमेरिका तर प्रगतीच्या उच्च शिखरावर विहार करीत आहेत ना ? मग तेथें सरस्वतीचा विहार असा कां असूं नये कीं, मोर्लेसाहेबही तो पाहून नाचावयास लागावे ? किंवा मोर्लेसाहेबांना देखील आमच्या पुणेंकरांच्या दोषैकदृष्टीचा रोग लागला म्हणावयाचा ? मोर्लेसाहेबांना पाहिजे आहे तरी काय ? या प्रश्नाची मीमांसा करणें आतां अवश्य झालें आहे. वस्तुतः सरस्वतीच्या अत्युच्च शिखरावर अति कोमल वर्तन होण्याला काय काय गोष्टी अवश्य आहेत, हाच प्रश्न मुख्य आहे. वरील प्रश्न याच प्रश्नांचीं रूपांतरें आहेत. या आवश्यक गोष्टी, हल्लीं यूरोप व अमेरिका खंडांत इतर भपकेदार गोष्टी व झकझकीत संस्कृति असूनही जर सांपडत नसतील, तर मोर्लेसाहेबांचें नाक मुरडणें हें त्यांच्या आध्यात्मिक रोगाचा परिणाम नसून वस्तुस्थितीचाच आहे असें कबूल करणें भाग आहे.

मी मागील पत्रांत म्हटलेंच आहे कीं, वाङ्मय किंवा सरस्वतीचा विहार हें व्यक्ती व राष्ट्र यांच्या आंदोलनाची प्रतिक्रिया आहे. राष्ट्रांतील लोकांच्या मनांत जर उल्हास नसेल विचारी सरस्वती तरी मोरावर तेथें कशाला नाचेल ? लोकांच्या हातून वीर्याची कृतिच होणें जेथें अशक्य आहे, तेथें त्या कृतीची प्रतिक्रिया जें सरस्वतीचें तांडव त्यांत तरी जोर कोठून येणार ? विहिरींत नाहीं तर पोहऱ्यांत कोठून येणार ? पण या सर्व गोष्टी युरोप अमेरिकेंत असून, व तेथील मानसिक विहिरी पाण्यानें तुडुंब भरल्या असून, पोहऱ्यांतील पाणी मोर्लेसाहेबांस कां गोड लागूं नये ? म्हणजे वरील मीमांसा कोठें तरी ती कोती पडत आहे. नुसती स्वतंत्रता, नुसती भरभराट, नुसतें वीर्य सरस्वतीच्या आनंदाच्या उच्च कोटीस नेऊं शकत नाहीं, "आनंदाच्या कोटी । सांठविल्या आम्हां पोटीं ।" हें तुकाराम बोवांचें मानसिक वातावरण जसें तिला आकाशांत भराऱ्या मारावयास लावतें, तसें युरोप अमेरिकेंत तिला मिळत नाहीं असें मानणें भाग आहे. 'कातर्यकेवला नीतिः शौर्यं श्वापदचेष्टितम् ।' हें कालिदासाचें रघुवंशांतील रडणें व वरील मोर्लेसाहेबांचें नाक

मुरडणें हीं एकाच मानसिक स्थितींचीं दर्शक आहेत असें मला वाटतें. निव्वळ पोटभरू मुसद्दीगिरीला कालिदास ‘ कातर्य ’ म्हणजे भित्रेपणा हें नांव देतो. व निव्वळ तोफांच्या गडगडाटांत नर्तन करणाऱ्या राष्ट्राच्या शौर्यास त्यानें ‘ श्वापदचेष्टित ’ ही पदवी दिली आहे. कालिदासाला मुसद्दीगिरी व शौर्य यांच्या पाठीमागें कांहींतरी विलक्षण पाहिजे होतें. या विलक्षण वस्तुच्या योगानेंच पृथ्वीवरील सर्व वस्तूंस दैवी संपत्तीचें रूप येतें, नरास नारायणत्व येतें, दुःशासनाचें रक्त पिणाऱ्या भीमास श्रीकृष्णाचा सात्त्विक भक्त असें पदक राजरोसपणें धारण करतां येतें. ही विलक्षण वस्तु असेल तर क्षुद्र गोष्टीनांही महत्व येतें. या विलक्षण वस्तूचें नांव गांव देणें फार कठीण आहे. पण सर्व कवींनीं आपल्या उच्च प्रतिभेच्या योगानें या वस्तूचें दर्शन घेऊन वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे. “ तेथें अधिष्ठान पाहिजे परमेश्वराचें ” असें रामदासानें या वस्तुचें त्रोटक दिग्दर्शन केलें आहे. प्रत्यक्ष नास्तिकही या विलक्षण वस्तूच्या प्रकाशानें ‘ आस्तिक ’ या पदवीस योग्य होतो. या विलक्षण वस्तूच्या प्रभावानें समाजाविरुद्ध बंड करणारांसही समाजसेवक म्हणणें भाग येतें. ‘ सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म ’ हें या वस्तूचें वर्णन उपनिषत्कारांनीं दिलें आहे. पण त्यांना दिसलें एक, मनांत बोलावयाचें होतें दुसरेंच व प्रत्यक्ष शब्द आले ते भलतेच. हा अनंत प्रकाश असाच आहे कीं, तो पकडण्याचा प्रयत्न केला कीं भलतेंच हातीं येतें. तो शब्दांनीं व वाक्यांनी कोंडावयाचा प्रयत्न आपण करितों व करणें योग्यच आहे. पण तो कोंडणें अशक्य आहे. फोनोग्राफनें आवाजही पकडला जातो. पण हा विलक्षण वस्तुप्रकाश पकडणारें यंत्र एडिसनला देखील तयार करणें अशक्य आहे असें मला वाटतें. पण एवढें लक्ष्यांत ठेव कीं, प्रत्येक उच्च मानसिक स्थितींत, प्रत्येक विभूतिमय मानवी संस्थेंत, प्रत्येक प्रतिभामय वाङ्मयांत ही वस्तु रोजच्या हवेप्रमाणें ओतप्रोत भरलेली आहे. ती खऱ्या प्रार्थनासमाजिष्टाची टर उडवीत नाहीं इतकेंच नव्हे, तर बेंबीच्या देंठापासून निघालेल्या त्याच्या प्रार्थनेंत ती उपनिषदांच्या ज्योतीप्रमाणें प्रकाशत असते. दिखाऊ समाजिष्टांची विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं केलेली टर मात्र तीस फार प्रिय आहे. अशा उपहासात्मक वाङ्मयांत ती आवडीनें तांडव करीत असते. राजापासून रंकापर्यंत आपल्या लेखणीनें थरकांप उत्पन्न करणारा उपहासात्मक वाङ्मयाचा आचार्य जो फ्रान्सचा व्हालटेअर तो तिचा अगदीं कंठमणि ! सर्व व्यसनांनीं विटाळलेला बायरन व आपल्या अस्ताव्यस्त वर्तनानें किळस उत्पन्न करणारा रूसो हे तिच्या मांडीवर खेळतात. हा चमत्कार काय थोडा आहे ?

हेंच तत्व गीताकारांना दिसतें. तेव्हांच त्यांच्या तोंडून ‘ आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनं ’ हे उद्गार निघाले व शेवटीं सर्व जगास आपल्या ‘ सप्तपदार्थीं’त गोवूं पाहणाऱ्या तार्किकांस ताकीद दिली कीं, ‘ श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् । ’. ‘ अपिचेत् सुदुराचारो ’ हा श्लोक धर्मविषयांत जसा श्रीकृष्ण छातीला हात लावून बोलतो, त्याप्रमाणेंच वाङ्मय विषयांत सरस्वती देवीही उच्च स्वरानें कोणाची भीडमुर्वत न धरितां हाच श्लोक खऱ्या वाङ्मयभक्तांस उद्देशून गाऊं शकते. यवनीरमण पंडित जगन्नाथ या देवीचे परमभक्त होऊन शेवटीं तरून गेले. आज गद्यरूप काव्यांत तुझी मी बरोबरी करूं पाहण्याचें धाडस करीत आहें, असा तुझा कपोलाच्छादित कोमल व अस्पष्ट हास्ययुक्त आरोप मजवर येऊं पाहात आहे, पण आतां त्याची मला पर्वा काय आहे? येथून जवळच वाहणाऱ्या गंगेप्रमाणेंच हे माझे उद्गार सहज लीलेनें बाहेर पडत आहेत. त्यांना तुझा उपहासही आवरूं शकत नाहीं; व माझी विनय व लोकलज्जा हींही आवरूं शकत नाहींत.

या विलक्षण वस्तूचें वर्णन मी तटस्थ लक्षण पद्धतीनें केलें तें तुला कितपत रुचेल कोण जाणें. माझ्या व तुझ्या भाषेंत तिचें स्वरूप–लक्षण सांगणें अवघड असलें, तरी तें करणें मला भाग आहे. मोर्लेसाहेबांनीं देखील ‘ वाङ्मयाची खुर्ची सध्यां रिकामी आहे ’ अशा रूपकात्मक व लाक्षणिक पद्धतीनेंच तिचें वर्णन केलें आहे. मग तुमची आमची काय कथा? पण राहवत नाहीं! माझ्या गरीबीच्या प्राकृत भाषेंत तिला मी ‘ गुंगणें ’ असें म्हणणार! हल्लींचे ग्रंथकार मोर्लेसाहेबांच्या मतें ‘ गुंगत ’ नाहींत. या गुंगण्याशिवाय कोणतेंही वाङ्मय उच्चतम ध्रुवबिंदूस पोंहचूं शकत नाहीं. पण हल्लींच्या तर्कमय वातावरणांत हें ‘ गुंगणें ’ जवळजवळ अशक्य झालें आहे. होमर, डॅन्टे, गटे, प्लेटो महद्भूतसंचार होऊन गुंगले, व नाचले. आमच्या भौतिक शास्त्रांच्या तर्कमय काटकोनी शिक्षेनें या गुंगण्याची व बतारण्याची आम्हांला लाज वाटूं लागली आहे. पण प्रतिभा व जाणीवयुक्त लज्जा यांचें षडाष्टक आहे हें आपण विसरतां कामा नये. ‘ Genius is unconscious ’ हें कार्लाइलचें वाक्य याच अर्थाचें आहे. जगांतील कोणी आपणांस नांवें ठेवील कीं काय? ही भीति सर्वांच्या पाठीस लागली आहे. विशेषतः तर्कशास्त्री या मांत्रिकांची आम्हांला फार धास्ती बसून गेली आहे. ‘ स्नानीं पानीं अशनीं शयनीं ’ हे आम्हांला छडी घेऊन उभे राहिलेले दिसतात! छडीमास्तराच्या धाकानें उत्पन्न झालेलें वाङ्मय, भीतीच्या व लज्जेच्या

वातावरणांत उत्पन्न झालेल्या अपत्याप्रमाणेंच क्षयरोगी व रडवें निघावें यांत नवल काय ?

या ' गुंगण्या 'शिवाय आणखी एक गोष्ट उच्च वाङ्मयाच्या वाढीस अवश्य आहे. तीही हल्लींच्या विद्याचारसंपन्नेंत जवळजवळ दुर्मिळ झाली आहे. ज्या वस्तूला इंग्रजींत creative power म्हणतात, तिलाच काव्यप्रकाशकारांनीं नुसता ' शक्ति ' शब्द लावला आहे. ही वाङ्मयोत्पादकशक्तिभाष्यें, टीका, व मीमांसा यांच्या वातावरणांत जगणेंच शक्य नाहीं. मग तिच्या वृद्धीचें नांव कशाला ? स्त्री प्रसूत होतांना जशा वेदना होतात व त्याप्रमाणेंच व्यक्तिगत व राष्ट्रगत वाङ्मयाच्या प्रसूतीच्या वेळीं व्यक्तीला व राष्ट्राला वेदना उत्पन्न झाल्या पाहिजेत. पण भाष्यें व मीमांसा ह्या वेदना बंद करितात, व आपल्या तर्कटांनींच व्यक्तीस व राष्ट्रास बौद्धिक कसरतींत गुंतवून टाकतात. वस्तुतः या दोहोंमध्यें विरोध नाहीं. मनुष्याच्या अपूर्णत्वामुळें तो उत्पन्न झाला आहे. काव्यें झालीं, गद्यमय वाङ्मय निघालें, कीं भाष्यें, टीका, व मीमांसा हीं निघालींच पाहिजेत. पण भाष्यकार, टीकाकार व मीमांसाकार हे मर्यादित बुद्धीचे असल्यामुळें त्यांची विद्वत्ताच त्यांचा शत्रू होते. पांडित्य प्रदर्शनाची हौस त्यांना ग्रंथकाराच्या अंतरंगापासून, त्यांच्या आत्म्यापासून लांब नेते. ' The age of reflection is opposed to the age creation in literature. ' हें वाक्य तात्त्विक दृष्टीनें खरें नाहीं. मीमांसा व वाङ्मयोत्पादक शक्ति यांचा जल व वन्हि यांच्या सारखा विरोध नाहीं. पण गुणदोषांच्या साहचर्याचा आजपर्यंतचा इतिहास पाहिला असतां हें वाक्य खरें ठरतें. अठरावें शतक व त्यांतील वाङ्मय यांचा अभ्यास करणाऱ्या अध्येत्यास या वाक्याची सत्यासत्यता चांगली कळून येईल. या शतकांत तार्किक मीमांसक व भाष्यकार जसे पुष्कळ झाले, तसे कवि, गद्यग्रंथकार व उच्च वाङ्मयाचे भोक्तेही पुष्कळ झाले. तेव्हां वरील वाक्याचा अर्थ येवढाच घ्यावयाचा कीं, भाष्यकारानें व मीमांसाकारानें आपल्या भावनामय जीविताचा खून करून टाकितां कामा नये. तर्क व भावना यांचा विरोध आपाततः उत्पन्न होतो; तो टाळणें शक्य आहे. कारण बुद्धि, इच्छाशक्ति, व भावना हीं एकाच मनाचीं निरनिराळीं रूपें आहेत. त्यामध्यें वास्तविक विरोध असणें शक्य नाहीं. पण मर्यादा व उपाधि यांनीं हा घोंटाळा उत्पन्न केला आहे. मीमांसाकाल हा वाङ्मयोत्पादक कालाच्या विरुद्ध आहे हें वरील वाक्याचें तात्पर्य उपाधींचा निरास करण्याच्या हेतूनेंच दिलें आहे.

या वेळीं मला मेकॉलेच्या एका वाक्याची आठवण होते. जगाच्या बाल्यावस्थेंत काव्यमय ग्रंथ उत्पन्न होतात, त्यांच्या प्रौढावस्थेंत ते होत नाहींत. प्रौढावस्थेंत गद्यमय व तार्किक ग्रंथानांच चांगला भर येतो, असें मेकॉलेचें म्हणणें आहे. पण तें त्याच्या इतर मतांप्रमाणेंच त्याच्या मनाच्या उथळपणाचें व कोतेपणाचें द्योतक आहे. वर्ड्स्वर्थ व टेनिसन हे जगाच्या बाल्यावस्थेंत झाले, असें मेकॉलेसाहेब म्हणण्यास तयार होतील काय ? एकंदरींत बुद्धिवैभवाचे ग्रंथ, इच्छाशक्ति प्रज्वलित करणारे धार्मिक ग्रंथ, व भावनांचा परिपोष करणारे काव्यग्रंथ एकाच वेळीं होणें अशक्य नाहीं, हें मोर्लेसाहेबांसही कबूल होईल व हें ध्यानांत ठेवूनच त्यांनीं वाचकांस इषारा दिला आहे कीं, हल्लींच्या काळीं भावनांचा उत्तम परिपोष झाल्याशिवाय वाङ्मयाच्या खुर्च्या रिकाम्या पडतील. हा त्यांचा इषारा आपल्या देशांतील वाङ्मयभक्तांनीं ध्यावा असा निरोप तुझ्याद्वारें मी आपल्या देशबंधूंस पाठवित आहे. मला गिबनचे ग्रंथ पाहिजे आहेत, ते लवकरच पाठवून दे. या ग्रंथकाराचे जगावर उपकार झाले आहेत. कित्येक लोक अपकार झाले आहेत असें मानितात. मी पुन्हां एकदां काळजीपूर्वक वाचून त्याच्या ग्रंथासंबंधानें स्वतःचें मत तुला कळवीन. मनांतल्यामनांत शस्त्रास्त्रांची तयारी करून ठेव. ”

# ६

# ‘ व्यक्तीच्या ओरडीचें वाङ्मय ’

“ मित्रा, आज कित्येक महिने मी प्रवास करीत होतों. त्यामुळें पत्र पाठविण्यास सवड झाली नाहीं. तुझ्या पत्रांचीं पुडकीं आठ दिवसांपूर्वीं मला मिळालीं. तीं वाचून मला तुझें कौतुक वाटलें. नोकरी संभाळून कुटुंबभाराचें ओझें वाहात असतां तुला शांतपणें वाङ्मयतत्त्वज्ञानाच्या खोल डोहांत उडी मारण्याला सवड मिळते ही गोष्ट खरोखर अभिनंदनीय आहे. याचें बरेंच श्रेय तुझ्या सहधर्मचारिणीस दिलें पाहिजे. नाहींतर बहुतेक सुशिक्षितांप्रमाणेंच तुलाहि पल्लवग्राहि पांडित्यावरच निर्वाह करणें भाग पडतें. या पल्लवग्राहि पांडित्याच्या भोक्त्यांना वाङ्मय म्हणजे एक पोट भरण्याचें व करमणुकीचें साधन वाटतें. वाङ्मयाचीं मुळें राष्ट्रीय जमिनींत खोल गेलेलीं असतात. त्याच्या शाखा, फुलें, व फळें राष्ट्रीय मानसिक वातावरणाच्या विशिष्ट अवस्थेंतच उत्पन्न होऊन वृद्धि व क्षय पावतात. इतकेंच नव्हे तर तारखा व सनावळी यांनीं भरलेल्या इतिहासाच्या चोपड्यांपेक्षां वाङ्मयांत प्रतिबिंबित झालेला राष्ट्राचा इतिहास सूक्ष्म दृष्टीच्या वाचकास जास्त खात्रीचें समाजचित्र उभें करून देतो असें मला वाटतें. मात्र तें वाङ्मय पोटभरू, कीर्तिलोलुप किंवा इतर भाडोत्री लेखकांनीं लिहिलेलें असतां कामा नये. तें राष्ट्राच्या मानसिक जमिनींतूनच खरोखरी बाहेर आलेलें पाहिजे. हल्लींच्या छापखानी वाङ्मयाला चाळणीची फार जरूर आहे. ‘ सक्तुमिव तितउना पुनन्तो यत्र धीरा मनसा वाचमक्रत ।’ या ऋग्वेदांतील ऋचेंत सातूचें पीठ जसें तितउ म्हणजे चाळणींतून स्वच्छ करून घ्यावें लागतें, तसें धीर म्हणजे शहाणे लोक मनाच्या चाळणीनें वाणी शुद्ध करून घेतात असें म्हटलें आहे. ही ऋचा लिहिणारा कवि जर आज येथें येईल, तर त्याला केवढी मोठी चाळण आणावी लागेल व तिची भोंकें किती बारीक–किंवा मोठीं–करावीं लागतील याची कल्पना मला होत नाहीं ! एवढें खास सांगतां येईल कीं, खोल मुळें गेलीं आहेत असें वाङ्मय जगांत फारच थोडें आहे.

व तें शोधून काढण्याचें काम आज अवाढव्य होणार आहे. पुस्तकांच्या जाहिराती पाहिल्या म्हणजे मी तर भिऊनच जातों. मला असा भास होतो कीं जगांत पुस्तकें उत्पन्न करणें व तीं वाचणें याशिवाय इतिकर्तव्यता उरलीच नाहीं काय ? नवऱ्यामुलाच्या हुंड्याची रक्कम जशी त्याच्या परीक्षांच्या संख्येवर अवलंबून असते तशी माणसाच्या विद्वत्तेची किंमत त्यानें वाचलेल्या व लिहिलेल्या पुस्तकांच्या संख्येवर करावयाची कीं काय? असे अनेक तऱ्हेचे प्रश्न माझ्या डोक्यांत खेळत असतात. पण या प्रश्नांचा खल आज मी करीत नाहीं. तुझ्या सर्व पत्रांत एकच गोष्ट फिरून फिरून पुढें येत आहे. कोणत्याहि विषयावर तूं लिहूं लागलास किंवा बोलूं लागलास म्हणजे ती गोष्ट आपली मूर्तिमंत तुझ्यापुढें उभी असते. ती तुला लपवितां येत नाहीं. तूं विषयांतर करून लपवूं लागलास, तरी तुझ्या लेखाच्या व भाषणाच्या नाकातोंडांतून, कुढ्या स्वभावाच्या माणसाच्या क्रोधाप्रमाणें, त्या गोष्टीचे वाफारे निघूं लागतात, हें मजसारख्या तुझें हृद्गत जाणणाऱ्या परिचिताच्या तर सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. पण सूक्ष्म दृष्टि असेल तर अपरिचित वाचकासहि ते वाफारे भासूं शकतील अशी माझी खात्री आहे. ती गोष्ट म्हणजे व्यक्तीचें महत्त्व ही होय. तुला हजारों व्यक्तींत दिसून येणारे सामान्य धर्म दिसतच नाहींत. त्या व्यक्ती परस्पर कितीहि भिन्न असल्या, तरी त्यांना एके ठिकाणीं, एका समाजांत बद्ध करणारी, एकगुणात्मक, द्विगुणात्मक, किंवा सांख्यांच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे त्रिगुणात्मक रज्जु असलीच पाहिजे हें तूं पार विसरून जातोस. व्यक्ति ही तुझी देवता, व ‘ व्यक्ति तितक्या प्रकृति ’ या म्हणीवर संतुष्ट न होतां ‘ जितक्या व्यक्ति तितक्या देवता ’ ही नवी म्हण पाडण्याचा तुझा बेत दिसतो ! हिंदूंच्या देवतांचें देवतात्त्व तुला मान्य नाहीं. पण तेहतीस कोटि देव आहेत हें तत्त्व तुझ्या अर्थानें तुला फारच पसंत पडतें. हे तेहतीस कोटि देव एकाच परब्रह्माचीं निरनिराळीं रूपें आहेत. ‘ एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति ’ हें तुला मान्य नाहीं. या अनंत व्यक्ती एकाच घड्याळाचीं चक्रें आहेत, इतकें देखील बोलणें तुला सहन होत नाहीं हें मी पुष्कळ वेळां पाहिलें आहे. कालचा सूर्यास्त आजच्या सूर्यास्तासारखाच सुंदर होता, असें एकदां मी म्हणालों मात्र. तों तूं माझ्या अंगावर घसरलास आणि म्हणालास, ‘ कालचा सूर्यास्त आजच्या सारखा कसा असेल ? कालचा तो कालचा आणि आजचा तो आजचा ! ते अगदीं सारखे

आहेत असें म्हणणें निवळ खोटें आहे!' 'रूपं तदोजस्वि तदेव वीर्यं' हा रघुवंशांतील बापमुलांचें तंतोतंत साम्य वर्णन करणारा श्लोक मी तुझ्यापुढें मुद्दाम म्हणावा व तूं कालिदासाला शिव्या झोडाव्यास हा कार्यक्रम मी अजून विसरलों नाहीं! तेंच तुझें पालुपद तुझ्या आजच्या सर्व पत्रांत मला स्पष्ट दिसतें आहे. 'वाङ्मय राष्ट्रीय कसें असूं शकेल!' 'प्रत्येक व्यक्तीचें वाङ्मय निराळें' या तुझ्या वाक्यांत तेंच पालुपद विस्तवासारख्या ठिणग्या सोडीत आहे. त्या माझ्या अंगाला लागत आहेत. ही तुझी व्यक्तिपूजा नैय्यायिकांना व विशेषतः काणादीय वैशेषिकांना फारच पसंत पडेल. काणादीयांचें 'वैशेषिक' हें नांवच विशेष म्हणजे व्यक्तिरूप परमाणुगत भेद यावरून पडलें आहे. पण या वैशेषिकांना देखील 'सामान्य' हा पदार्थ विशेषाइतकाच खरा व सृष्टीच्या मूलभूत तत्त्वांमध्यें अवश्य गणण्यासारखा वाटत होता हें तूं विसरतां कामा नये. तुझ्या पदार्थगणनेमध्यें 'सामान्य' या पदार्थाला गचांडी मिळणार. काणादाच्याहि वरचा तूं 'कणाद' झालास. तुलाच वैशेषिक हें नांव विशेष शोभतें. तुला समाधान मानण्यासारखी एक गोष्ट आहे, ती ही कीं जगांतील वाङ्मयांत वैशेषिक किंवा साध्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे व्यक्तीच्या ओरडीचें वाङ्मय, फार महत्त्वाचें गणलें जातें. सर्व विभूतिपूजा व गीतेंतील विभूतिवर्णनाध्याय याच वाङ्मयतत्त्वाची द्योतक आहेत. लूथरनें आपली धर्मसुधारणा व्यक्तिपूजेवरच उभारली. हल्लींची राजनीति, विःशेषतः लोकसत्तात्मक राज्यपद्धतीचीं तत्त्वें याच व्यक्तिपूजेवर बांधलीं गेलीं आहेत. 'माझें सर्वस्व मी देईन, पण व्यक्ति–विशिष्टत्व मी देणार नाहीं. तोच माझ्यांतील आत्मा–परमात्मा परब्रह्म आहे. त्याच्याकरितां मी प्राणहि देण्यास तयार आहे.' हें तुझें वाक्य या व्यक्तिपूजेचा आद्यमंत्र आहे. रूसोला जर मराठी येत असतें तर हें वाक्य त्यानें पाठच केलें असतें! पण मला तुला असें विचारावयाचें आहे कीं व्यक्तिपूजा तर्काच्या आकाशांतून ताऱ्याप्रमाणें पृथ्वीवर येऊन आदळली म्हणजे तिच्यापासून कुटुंब, ग्राम, जातिसंघ, समाज, राष्ट्र, वगैरे समष्टि होऊं शकतील काय? त्या आजपर्यंत झाल्या आहेत असें समाज सांगतो. तुझ्या तर्काला इतिहासाची लगाम सहनच होत नाहीं. ही लगाम जर मोकळी सोडली तर व्यक्तिपूजासमाधींत मग्न झालेला तुझा तर्क कुटुंबाची तरी रचना करूं शकेल काय? अमेरिकन तत्वज्ञ इमर्सन यानें आपल्या एका व्यक्तिपूजक मित्राची एके ठिकाणीं हकीकत दिली आहे. ती वाचून तुला आपला समानधर्माच भेटला असें वाटेल. इमर्सन म्हणतो

कीं माझा मित्र बागेंत गेला व तेथें तो एकटा जरी असला तरी झाडें चोरून त्याचें व्यक्तिगत भाषण ऐकतील, कदाचित् हवाहि व्यक्तिगत विचार वाहून नेईल, म्हणून त्याला भीति वाटत असे ! असा मनुष्य समाजांत राहणें शक्य आहे काय ? परवां एक फ्रेंच ग्रंथकार रेल्वेपुलाच्या खालीं प्रेतरूप होऊन लोंबकळत राहिला अशा हकीकतीचें वर्णन वाचलें. त्याची व्यक्तिपूजा इतक्या थराला गेली होती, कीं या जगांत राहणें त्यास अशक्य झालें व म्हणूनच त्यानें अशी आत्महत्या केली असें तेथें लिहिलेलें आहे. हीं दोन उदाहरणें व्यक्तिपूजेच्या अतिशयाचे परिणाम दाखवीत आहेत. व्यक्तीकरितां समाज कीं समाजाकरितां व्यक्ति ? हाच प्रश्न आतां दत्त म्हणून उभा राहतो. व्यक्ति ही ईश्वराची विभूति मानली कीं त्या विभूतीची पूजा केलीच पाहिजे. त्या विभूतीला समाजानें हरप्रयत्न करून बाहेर रणांगणांत आणिलेंच पाहिजे. तिला लढाई करण्याला सवलत दिलीच पाहिजे, व तिचें काम पूर्ण होईतोंपर्यंत तिला स्वतंत्रपणें वावरूं दिलेंच पाहिजे. असा विचार केला म्हणजे समाज हें साधन झालें व व्यक्तिपूजा हें साध्य झालें. पण समाजाशिवाय ' व्यक्ति ' या शब्दाला तरी अर्थ आहे काय ? व्यक्तीचें शरीर, मन, कल्पना, ध्येयें हीं समाजाच्या बाहेरून आलीं काय ? समाजरूपी जमिनींतूनच व्यक्ति हें झाड आलेलें. मग व्यक्तिपूजेनें या जमिनीचीच धूपातीं करून रक्षा केली तर व्यक्ति तरी कोठून येणार ? हा वृक्षबीजन्याय सर्व ठिकाणीं आडवा येतो. व्यक्तीचीं अनंत काल टिकणारीं बीजें ज्या समाजरूपी जमिनींत राहतात तीच एकप्रकारें आतां साध्य झाली. व्यक्तीनें ही जमीन ' मूले कुठारः ' या न्यायानें उध्वस्त करितां कामा नये. सोन्याचीं अंडी उत्पन्न करणाऱ्या हंसीस ठार मारून तिच्या पोटांतील अंडीं उत्पन्न करणाऱ्या शक्तीसच काढून घेतां आलें तर पहावें, म्हणून तिला मारणारा पुरुष जसा मूर्ख, तसाच व्यक्तिपूजा करतांना हा ' मूले कुठारः ' न्यायाचा मूर्खपणा व्यक्तिपूजा करणारानें टाळणें अवश्य आहे. बरें, समाजानें विराट्पुरुषाची पुरुषसूक्तानें षोडशोपचार पूजा करीत असतां व्यक्तींतील ईश्वरांशाचेंच चंदन केलें, तर त्या विराट्पुरुषाचें अंगच नाहींसें होईल. मग तो विराट्पुरुषच कोसळून पडेल. कारण त्याचे सर्व अवयव व्यक्तींचेचे केलेले असतात. तेव्हां, मित्रा, व्यक्तिपूजा व समाजपूजा, व्यष्टि व समष्टि, यांचें समीकरण आपणा सर्वांस सोडविलें पाहिजे. युरोपांत दोन्ही तऱ्हेचें वाङ्मय भरपूर आहे. ग्रीक लोकांनीं राज्यसंस्थारूपी समष्टीचीच पूजा केली व व्यक्तीला गौण ठरविली. लूथरनें व्यक्तीला महत्त्व दिलें त्या मानानें समष्टीला गौणत्त्व आलें. आपल्या समाजांत स्मृतिकारांनीं व धर्मनिबंधकारांनीं समाजधर्मसमष्टीला

महत्त्व देतांना व्यक्तीला गौणत्व आणिलें नाहीं, ही गोष्ट तुला अभिनंदनीय आहे असें वाटत नाहीं काय ? 'मोक्ष' ही कल्पना निःशंकपणें व्यक्तिगत आहे. इतकेंच नव्हें तर समाजधर्म व्यक्तीच्या मोक्षाला साधनीभूत झाल्यामुळें समाज व वर्णाश्रम-धर्म एक प्रकारें व्यक्तीच्या मानानें–व्यक्तिमोक्ष या साध्याच्या मानानें–गौणच ठरतात. आपले ऋषी एकच कालच्या व्यक्तीचे पूजक नव्हते. अनंत कालच्या सनातन व्यक्तिमोक्षाचे ते भोक्ते असल्यामुळें या समाजरूपी विराट्पुरुषाच्या मूलभूत तत्त्वांना त्यांना फार जपावें लागलें. ज्या व्यक्तींना समाजाची जरूरी नाहीं, ज्यांचा मोक्ष समाजाच्या बाहेर राहूनहि साधूं शकतो, अशांना संन्यासाश्रम काढून देऊन पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्याला त्यांनीं एकप्रकारें केवढा वाव दिला याची कल्पना वास्तविक तुला करितां यावी. पण मूळ समाजरूपी विराट्पुरुषाची पूजा केल्याशिवाय, समाजाचें या जन्मीं नाहीं तरी केव्हां तरी ऋण फेडल्याशिवाय संन्यासाला परवानगी नाहीं, ही गोष्ट किती महत्त्वाची आहे ? आणि संन्यासाश्रम तरी समाजापासून अलग कोठें ठेविला आहे ? त्या संन्याशाला समाजाचे नियम लागू नाहींत. पण त्याची व्यक्तिमोक्षपूजा चालली असतां सर्व समाज हजर रहावयाचा. त्याला व्यक्तिपूजा करतांनाच समाजसेवा घडावयाची. फक्त समाज त्याच्या व्यक्तिमोक्षाच्या आड यावयाचा नाहीं, व त्यानें समाजाच्या वर्णाश्रमधर्माला अडथळा करूं नये, अशा तऱ्हेची व्यवस्था शास्त्रांत दृष्टीस पडते. ही व्यवस्था आपलें समीकरण सोडविण्यास बरीच उपयोगी पडेल असें मला वाटतें.

व्यक्ति ही आपल्याबरोबर कांहींतरी ईश्वरांश घेऊन येते ही गोष्ट कबूल केलीच पाहिजे. त्या ईश्वरांशाला विकास किंवा पूर्णता प्राप्त होण्यासारखी समाजाची परिस्थिती पाहिजे हेंहि कबूल केलें पाहिजे. पण व्यक्तिगत सर्व ईश्वरांशांची बेरीज म्हणजेच समाजरूपी विराट्पुरुष हें समीकरण मला पसंत नाहीं. आधीं व्यक्ति व समाज यांचा भेद कोठें आहे याचा विचार झाला पाहिजे. व्यक्ति मरेल पण समाज मरावयाचा नाहीं, व मरतां कामा नये. समाज मेला कीं सर्वच आटोपलें. मग हंसीच्या मरणानंतर सोन्याचीं अंडीं निघण्याचा जसा संभव नाहीं, तसाच मेलेल्या समाजापासून जिवंत व्यक्ति निघण्याचा संभव नाहीं. हंसीपासून निघालेल्या सोन्याच्या अंड्यांचा नायनाट झाला, तरी मूळ हंसी जर असेल तर हजारों नवीं अंडीं उत्पन्न होतील. म्हणजे अंड्यांची बेरीज हंसीची बरोबरी करूं शकत नाहीं त्याप्रमाणेंच व्यक्तिसमूहाच्या बेरजेहून समाज अधिक ठरतो. 'एतावान् अस्य महिमा ततो

ज्यायांश्च पुरुषः ' हें वाक्य आतां मला छान समजूं लागलें. समाजपुरुषाच्या व्यक्ति या केवळ महिमारूप आहेत. पुरुष हा त्या व्यक्तीहून कितीतरी मोठा आहे. हा समाजपुरुष कायम ठेवण्याकरितां व्यक्तीचें पूर्णत्व साधनरूप झालें पाहिजे. इतकेंच नव्हे तर समाजाचा प्राणच व्यक्तीमध्यें अंशाअंशानें असल्यामुळें त्या अवयवरूप प्राणांची वाढ मूळ पुरुषाच्या प्राणोत्क्रमणाला कारण होऊं देणें इष्ट नाहीं. हें वाक्य तुला पढतमूर्खपणाचें वाटेल. पण जगांत असेच चमत्कार भरले आहेत. जग परमेश्वराचे वाहेर नाहीं. जगांत जर पाप आहे, तर परमेश्वरहि पापरूपच झाला. पण आपण असें म्हणत नाहीं. तसेंच व्यक्तींचा व समाजाचा प्राण अंतीं एक झाला तर मधल्या अवस्थांमध्यें अवयव व अवयवी यांचें भांडण होऊन एक अवयव तरी नाश पावतो किंवा अवयवी तरी नाश पावतो. हा प्रत्यक्ष इतिहास आहे. व्यक्तिस्वातंत्र्य समाजाच्या नाशाला केव्हां केव्हां कारण होऊं शकेल हें इतिहास सांगतो. या इतिहासाच्या साक्षीला अनुसरून व्यक्तिसमाजाच्या नात्याचें तत्त्वज्ञान आपणास काढणें भाग आहे. समाजाचा प्राण राहिलाच पाहिजे. तो प्राण राहील, तर प्राणाला पुष्टि येईल. अशा तऱ्हेचेंच व्यक्तिस्वातंत्र्य शक्य व इष्ट होईल. दुसऱ्या बाजूनें असेंहि म्हणतां येईल कीं समाज आपला प्राण रक्षण करण्याच्या भरांत व्यक्तिस्वातंत्र्याचा समूळ नाश करील तर तें समाजाचें कृत्य आत्मघातकीपणाचें होईल. कारण समाजाच्या आत्म्याला व्यक्तींचा समूह हेंच शरीर. या शरिराशिवाय तो मूर्तच होऊं शकत नाहीं. सारांश व्यक्तीच्या ओरडीचें वाङ्मय जितकें अवश्य आहे तितकेंच समाजाच्या ओरडीचे वाङ्मय अवश्य व महत्त्वाचें आहे. गतिरूप वाङ्मय जितकें अवश्य तितकींच बर्केचीं पुस्तकें अवश्य आहेत. व्यक्तिस्वातंत्र्याचे भोक्ते सुधारक जसे राष्ट्राला अवश्य आहेत तितकेच समाजस्थैर्याचे पुराणमतवादी भोक्ते अवश्य आहेत. व्यक्तिरूप अवयवांना पुष्टि देणारें वाङ्मय जोरांत आलें कीं त्यावरोबर समाजाचें काळीज व तेथील रक्त जिवंत राखणारें सनातनधर्माचें वाङ्मय जोरांत फोंफावलें पाहिजे. व्यक्तिभेद दाखविणारे तुझ्यासारखे वैशेषिक जसे पाहिजेत, तसेच ते भेद ज्या सामान्य जमिनीवर नाचतात त्या भरतभूदेवतेची प्राणप्रतिष्ठा करणारे वेदांतीहि पुढें आले पाहिजेत. गमतीची गोष्ट अशी कीं तुला पत्र लिहिण्याच्या दिवशींच दोन मित्रांकडून पत्रें आलीं. एक तुझी री ओढणारा परंतु तुझ्यापेक्षां जास्त जोराचा व तेजाचा, तर दुसरा तुझ्याशीं तितक्याच जोरानें व तेजानें सामना करणारा. एक समाजप्रगतिवादी तर दुसरा समाजस्थितिवादी. एकाच्या पत्रावर ' व्यक्तिपूजकाय कणादाय नमः ' असें नमन, तर दुसऱ्या पत्रावर ' सकलभेदमूलभूतसमाजस्थैर्यो-

त्मने नमः ' असें नमन! खालील दोन उतारे म्हणजे व्यक्तीच्या व समाजाच्या ओरडीचे मासलेच होत म्हणून ते तुझ्यापुढें ठेवीत आहे.

## 'व्यक्तीची ओरड'

'माझ्या सर्व शत्रूंनों! आज मी तुम्हांला कायमची नोटीस देतों कीं तुम्हीं माझे पाहिजे ते हाल करा. तुमच्या अंगांत माझा नाश करण्याची जेवढी ताकत असेल तेवढी खर्च करा. पण आतां मी तुम्हांला हार जाणें शक्य नाहीं. माझ्या मनानें एकदा एक मत कायम स्वीकारलें कीं, मी ईश्वररूप झालों; मग तुम्हां जीवात्म्यांची मजपुढें काय मात्रा चालणार? जोंपर्यंत पुनर्विवाह, जातिभेद मोडणें, स्त्रीशिक्षण वगैरे विषयांवर माझीं मतें डळमळीत होतीं तोंपर्यंत तुम्हांला मी भीत होतों. आतां हीं सर्व मतें माझ्या परमात्म्याच्या खोल गुहेंतून वाऱ्याप्रमाणें जोरानें मजकडे आलीं आहेत. आतां तीं माझीं नव्हेतच. तीं विश्वात्म्याच्या उदरांतून आलीं आहेत. आतां जें जें मी करणार तें तें नारायणाचीच पूजा होणार. आतां माझ्या पुनर्विवाहांत विषयलालसेचें विष नाहीं. आतां माझ्या जातिभेदनिर्मूलनांत जिव्हालौल्याचें नांव नाहीं. आतां स्त्रीशिक्षणाचे बाबतींत चोंचले किंवा शृंगार यांचा विटाळहि नाहीं. मग मी तुम्हांला कशाला भिऊं? माझी व्यक्ति आतां विकास पावणार. आजपर्यंत जपून ठेवलेला माझ्या विशिष्ट मतांचा परमात्मा मला आज प्रसन्न झाला. मग तुमच्या प्रसन्नतेची मला काय जरूर? तुमच्या आत्म्याला तुम्हीं प्रसन्न करा. तो प्रसन्न करण्यांत माझ्या जीवाची आहुति घेणें तुम्हांस इष्ट असेल तर तीहि घ्या. पण तुम्हांला मी आतां शरण येणार नाहीं. मला आतां माझ्या इतर सुधारक बंधूंची जरुरी नाहीं. माझा मातापिताबंधुरूप आत्मा जर मला अमुक कर म्हणून सांगतो आहे, तर 'तुम्हीं माझ्या पंक्तीला बसाल कां?' ही भिक्षांदेहि मी कशाला करूं? जयापजय कांहीं माझ्या हातचा नाहीं. पण या व्यक्तिमतरूपी परमेश्वरी आज्ञेप्रमाणें मरेंतोपर्यंत वागणें माझ्या हातांत आहे. माझी खोल बनलेलीं मतें हेच माझे वेद. त्यांची आज्ञा मी मानणार.'

## 'समाजाची ओरड'

सदसद्विवेकबुद्धीच्या नांवावर विकणाऱ्या अज्ञानी जीवाच्या भजकांनों! तुमचीं खोल मतें तुम्हीं सोडून द्या असें आम्हीं म्हणत नाहीं. पण मतभेद जेथें शक्य झाला, तेथें निवाडा करण्याचा अधिकार मतभेद दर्शविण्याऱ्या पक्षकारांना पोंचत नाहीं हें तुम्हांस विसरून कसें चालेल? तुम्हीं आपलीं मतें आकाशांतून आणिलींत

काय ? तुमच्या आनुवंशिक संस्कारांची व परिस्थितीचींच तीं कार्यें आहेतना ? मग भिन्न संस्कारांचीं व परिस्थितीचीं फळें तुम्हांला दिसल्यावर तुमच्या मतांना धक्का तरी बसला पाहिजे, नाहींतर तुम्हीं आंधळे आहांत व तुमची विचारशक्ति मृत झाली असली पाहिजे. जातिभेद मोडणारी सदसद्विवेकबुद्धि जातिभेद राखणाऱ्या तितक्याच जोराच्या बुद्धीशीं टक्कर मारूं लागली, तर दोघांचें भांडण तोडणारी बुद्धि त्याच्याबाहेर कोठें तरी शोधली पाहिजे ना ? या तोडणाऱ्या शास्त्रालाच आम्हीं श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्म म्हणतों. या धर्मस्मृतिकारांना आपल्या सारखे पक्षाभिमान नव्हते, असें शांतपणें तुम्हांला कबूल करावें लागेल. समाजाच्या आत्मस्वरूपाची किल्ली पक्षांध झालेल्या तुम्हां आम्हांजवळ कशी सांपडणार ? या नश्वर जगांत कायमपणें ती किल्ली बाळगणारीं भक्कम कपाटें धर्मशास्त्रें हींच होत. खोल मतें म्हणजे काय ? व्यक्तीचा अनुभव समाजाच्या एकंदर अनुभवापुढें कितीसा जोर दाखविणार ? व समाजाचा अनुभव त्याच्या धर्मवाङ्मयांत केंद्रीभूत झालेला असतो तो बघितला तर पाहिजे. तो पाहून त्याच्याशीं आपलीं खोल मतें ताडून पाहून मग इतक्या जोराच्या वल्गना व व्यक्तिपुजेच्या भराऱ्या मारण्यांत कांहीं तरी अर्थ आहे. समाजशास्त्र भूमिती इतकें स्पष्ट व खात्रीचें जोपर्यंत झालें नाहीं तोंपर्यंत आपणा उभयतांस काव्यस्फूर्तींची व भविष्यवाद्यांची तेजस्वी भाषा वापरणें शक्य नाहीं. समाजाला जशी गती आहे तशी स्थिती पण आहे. जातिभेद मोडणारानें जातिभेद आले कोठून याची उपपत्ति भूमितीप्रमाणें करून घेणें अवश्य आहे. या खात्रीवरच सर्व तुमच्या व्यक्तिगत मतांचें तेज अवलंबून राहणार ! नाहींतर त्या मतांना पिशाचांच्या वर्तनाची उपमा ! समाजाचा परमात्मा ओळखा. त्याच्याशीं तुमच्या व्यक्तिगत जीवात्म्याची सलोकता, समीपता, सरूपता होऊं द्या. मग परमात्म्याची आज्ञा मानलीच पाहिजे. पण अज्ञानी जीवात्म्यालाच परमात्मा म्हणून चिकटून बसलां, मग 'अहं ब्रह्मास्मि' म्हणून ओरडणाऱ्या मिथ्याचारी वेदांस कोणत्या तोंडानें तुम्हीं हंसणार ? स्त्रियांच्या पूर्णत्त्वाची मीमांसा समाजशास्त्राच्या आधारानें खात्रीची करून घ्या. पुनर्विवाहाला कर्ममुक्तीच्या पायरीची जोड करून द्या, व मग त्याविषयींच्या मताला खोल म्हणा. एरव्हीं तें उथळच !'

हे उतारे मधलेच आहेत. पण उभयमतांची दिशा दाखविण्यास ते बस्स आहेत. हें पत्र घरांत वाचून दाखीव हो ! म्हणजे मला चुरचुरीत शिव्यांच्या फोडणीचा वास येथेंच येईल."

---

## ७

# " रवींद्रनाथांचें 'अध्यात्म' (Personality) "

"......परममित्राचे सेवेशीं. तुझेकडून सर रवींद्रनाथ टागोर यांचें 'अध्यात्म' (Personality) हें पुस्तक आलें; तें आज कित्येक दिवस मी फिरून फिरून वाचीत आहे. रवींद्रनाथांच्या पुस्तकांशीं व त्यांच्या विचारांशीं माझा आज बरेच दिवस परिचय आहे. मला एक गोष्ट नवलाची वाटते कीं रवीन्द्रनाथांची कीर्ति व स्तुति युरोपांतून वाजून गाजून आल्यानंतर त्यांच्याच देशांत पसरते व युरोपीयन आरशांत आपल्याच माणसाचें रूप दिसल्यावर मग तें आम्हांला सुंदर दिसतें. हातच्या कांकणाला आरसा लावण्याचें उदाहरण हें पहिलेंच नाहीं. आपल्या लोकांचीं शरीरेंच परावलंबी झालीं आहेत असें नव्हे, तर बुद्धिहि शरिरापेक्षां जास्त परावलंबी झालेली आहे याचेंच हें द्योतक नाहीं काय? किंबहुना बुद्धि परावलंबी होऊन साफ गेल्यावरच शरीरें जित होऊन मृत होण्याच्या पंथास लागलीं, असाच कार्यकारणभाव असावा असें मला वाटतें. कोणत्याहि माणसाचे गुण स्वतः विचार करून जाणण्याची आमची शक्ति नाहींशी झाली म्हणजे आम्हीं सर्वस्वीं 'धृतः शरीरेण मृतः स जीवति' या अवस्थेसच पोंचलों असें म्हणावयाचें! यामुळें राष्ट्राचें केवढें नुकसान होत आहे याची तुला कल्पना नाहीं. युरोपियन लोक एकाद्या विषयाकडे ज्या दृष्टीनें पाहतात तीच दृष्टि आपली असेलच असें नाहीं. उलट राष्ट्र ही व्यक्ति आहे असें मानणें असेल तर प्रत्येक राष्ट्राची दृष्टि व सृष्टि विशिष्ट व भिन्नभिन्न असते हेंहि मानणें भाग आहे. गीतांजलींतील विचार कोणत्या भारतीयांस नवे वाटण्याजोगे आहेत? ज्यांचा ज्यांचा तुकारामादि महाराष्ट्रीय कवि, चैतन्यादि वंगीय भक्त, कबीरादि उत्तरहिंदुस्थानांतील भक्त, नरसी मेहतादि गुर्जर कवि व भक्त यांच्याशीं परिचय आहे, त्यांना गीतांजलींतील विचार नवे नाहींत असें वाटेल इतकेंच नव्हे, तर ते विचार युरोपीयन लोकांना त्यांच्या नाविन्यामुळें कितीहि कौतुकास्पद वाटले तरी गीतांजलीचें कौतुक भारतीय दृष्टीच्या

मनुष्याला इतकें कां वाटावें याचेंच नवल वाटेल. पण रवीन्द्रांची कीर्ति 'गीतांजली'नेंच केली! व आतां रवींद्रनाथ जें जें सटरफटर लिहितील त्याचें त्याचें कौतुक आम्हीं न करूं तर आमच्यासारखे मूर्ख आम्हींच! मित्रा, काय ही परावलंबितेची स्थिती! अरे वाङ्मयासारख्या केवळ सहृदयतेच्या प्रांतांतदेखील कोणी हिसकावून न घेण्यासारखें स्वराज्य आमचेपाशींच असतां तें आम्हीं केवळ करंटेपणामुळें गमावून बसलों, तर इतर गोष्टींत आम्हीं परवशतेचा शतगुणी जाच भोगींत बसूं यांत काय नवल आहे? अस्तु. रवींद्रनाथ यांचें 'अध्यात्म' (Personality) हें पुस्तक युरोपियन व भारतीय या दोघांनाहि एकप्रकारें नवीन आहे. या पुस्तकांत तूं आपल्या एका पत्रांत म्हटल्याप्रमाणें रवीन्द्रनाथांची प्रतिभा ताजी व 'हरिततृणसस्यांकुरवती' असून 'गंधोद्दामा'हि आहे. वरवर पाहणारास या पुस्तकांतील उदाहरणें व वाक्यें इतकीं सोपीं व परिचयांतलीं वाटतील कीं, त्याला त्याचें कांहींहि कौतुक वाटणार नाहीं. पण या साध्या पोषाखाच्या आंत केवढा 'ज्यायान् पुरुष' आहे व 'एतावान् अस्य महिमा' असें ऋग्वेदांतील पुरुषसूक्ताप्रमाणेंच आपणहि वाङ्मयदृष्टीनें एकदम कसें म्हणूं हें गुह्य तुझ्यासारख्या रसिकालाच माहीत असणार! 'सितांशुकामंगलमात्रभूषणा' अशी ही रवीन्द्रनाथांची भारती विक्रमोर्वशीयांतील पुरूरव्याच्या राणीप्रमाणेंच मोठी मनस्विनी, गंभीर व तेजस्वी दिसत आहे. प्रतिभेची ही खूणच आहे, कीं तिचा पोषाख साधा परंतु भारदस्त असतो. तिला बाहेरील दागिन्यांची मुळींच जरूर नाहीं, तिचें अंतस्तत्व व सत्त्व स्वाभाविकपणेंच इतकें उज्ज्वल असतें कीं "क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे" हीच उक्ति येथें खरी ठरते.

पहिला भाग ललितकलांची उत्पत्ति या विषयाला वाहिलेला आहे. यांत मनुष्यस्वभावाचें परीक्षण उत्तम केलें असून त्या स्वभावांतच कोणत्याहि गोष्टीची 'विपुलता' (Excess) झाली म्हणजे 'गुरुः प्रहर्षः प्रबभूव नात्मनि' या न्यायानें ती दुःखाची किंवा आनंदाची विपुलता ललितकलांच्या द्वारें बाहेर पडते, असा सिद्धांत मांडला आहे. अशाच तऱ्हेची ललितकलांची उपपत्ति अरिस्टॉटलपासून तो काव्यप्रकाशकारांपर्यंत साहित्यशास्त्रकारांनीं दिलेली नाहीं असें मी म्हणत नाहीं. हट्टानें काष्ठ कोरीत बसणाराला हवी ती आकृति बळजबरीनें हव्या त्या खोचीपासून काढतां येईल. पण ती उपपत्ति इतक्या नाविन्याच्या व प्रतिभेच्या कारंज्यांतून उसळलेली मी पाहिली नाहीं. अर्थात् ती उसळून आल्यामुळेंच अपूर्ण आहे, व्यापक नाहीं हें मी

कबूल करितों. पण विपुलतेचा पूर हृदयतडाग फोडून ललितकलांच्या रूपानें बाहेर येतो या सिद्धांताची तेवढ्यापुरती या भागांतील मांडणी अपूर्व व मनाला स्वचमत्कृतीनें हालवून सोडणारी आहे. हा भाग सर्व पुस्तकांत गद्यमय काव्यरसानें ओथंबलेला आहे, व ललितकलेचा एक मासला आहे असेंहि मी म्हणेन. या भागांत दुसरी एक महत्वाची गोष्ट ग्रंथकारानें पुढें आणिली आहे. ती काव्यप्रकाशकार मम्मट यानें आपल्या पहिल्याच कवितेंत मोठ्या शिताफीनें मांडिली आहे. नियति म्हणजे सृष्टि इचे नियम कविनिर्मित जी कविता ती झुगारून देते असें म्हणण्याचा मम्मटाचा आशय उघड आहे. यापेक्षांहि रवीन्द्रनाथांची उडी जरा उंच गेली आहे. आधिभौतिकशास्त्रें व काव्य यांच्या कार्यांची व कार्यक्षेत्रांची तुलना करून सत्य-ज्ञानांत काव्य हें भौतिकशास्त्रांच्या पलीकडे जातें हें ग्रंथकारानें फार कौशल्यानें ध्वनित केलें आहे. अरिस्टॉटलनें इतिहास व काव्य यांची तुलना करून इतिहासाची काव्यापुढें कांहीं मातब्बरी नाहीं असें म्हटलें आहे. उघडच आहे. इतिहास अमुक गोष्ट अमक्या रीतीनें घडली एवढेंच सांगणार; काव्य अमुक गोष्ट अमक्या रीतीनेंच घडावयास पाहिजे, न घडेल तर ती मनुष्यानें तशी घडवून आणिली पाहिजे—निदान तशी घडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अशी भूतवस्तूच्या भविष्यत् व अवश्य कर्तव्यतेची दिशा दाखवून इतिहा-साच्या पुढें उडी घेतें. रवीन्द्रनाथ ही गोष्ट कबूल करून भौतिकशास्त्रावर हल्ला करितात. भौतिकशास्त्रें अमुक अमुक वस्तु अमुक प्रकारची आहे असें सांगून मनुष्य व सृष्टि यांच्यांतील परकीय भाव किंवा दूरचें नातें फक्त दाखवितात. पण काव्य हें अध्यात्मदृष्टीनें प्रत्येक वस्तु मनुष्याला आपलीशी करून दाखवितें इतकेंच नव्हे तर त्याच्याशीं एकजीव करून टाकितें. 'न केवलं तातवियोगः किंतु मे सोदरस्नेहोऽपि एतेषु' हें शकुंतलेचें वाक्य या अध्यात्मदृष्टीचें द्योतक आहे. Personal relation किंवा अध्यात्मसंयोग हा रवीन्द्रनाथांचा साहित्यशास्त्रांतील अगदीं डार्विनइतकाच नवा व काव्यकल्पनेंत क्रांति घडवून आणणारा शोध आहे असें मी म्हटलें तर तुझ्या चेहऱ्यावर नेहमींप्रमाणेंच क्रोधज्वालांची छटा दिसूं लागेल हें मला स्पष्ट दिसतेंच आहे! पण तुझ्या रागाला किंवा तुझ्या सहधर्मचारिणीच्या उपहासात्मक गालांतील हास्यछटेला मी आतां भीक घालीत बसत नाहीं! मला जें वाटेल तें मी लिहिणार. या अध्यात्मदृष्टीलाच व अध्यात्मकसंयोगाच्या तत्त्वाला अनुलक्षून ग्रंथकारानें आपल्या ग्रंथास 'Personality' हें नांव दिलें आहे. यांत औचित्य

व मार्मिकपणा यांचा संयोग चांगला साधला आहे. काव्याप्रमाणें इतरहि सर्व ललितकला सर्व वस्तूंस व वस्तुगतगुणांस जडसृष्टींतून व दूरच्या नात्यांतून चेतनसृष्टींत मूर्तत्त्व देऊन ' मेनकासंबंधेन शरीरभूता मे शकुंतला ' या कालिदासोक्तीप्रमाणें अगदीं शरीरभूत करून टाकितात. ही शक्ति भौतिकशास्त्रांत नाहीं. भौतिकशास्त्रें कोरडें ज्ञान देतात. काव्य व ललितकला ज्ञानांत अध्यात्माचा रस उत्पन्न करितात व ज्ञान झाल्यावर मनुष्य भक्ताप्रमाणेंच नाचूं वागडूं लागतो भौतिकशास्त्रजन्य ज्ञान पोटाची खळी भरण्याचा आनंद देईल. पण ललितकला असें ज्ञान देतात कीं सर्व सृष्टि व ईश्वर आत्मभूत झाल्यामुळें मनुष्याचा आत्मा टर फुगून उच्च हवेंत तरंगूं लागतो. शाकुंतलाचा चवथा अंक वाचतांना किंवा मृच्छकटिकांतील चारुदत्त फांशी जातांना जें वाचकांस रडें येतें तें या अध्यात्मसंयोगाचेंच अगदीं परिचयांतलें उदाहरण आहे. या सिद्धांताप्रमाणें ' चेतनारोप ' हा काव्यांतील नुसता अलंकार नसून सर्व ललितकलांचा आत्मा व वस्तुभूत तत्त्व आहे हें तुला कबूल करावें लागेल. 'आरोप' हाहि शब्द रवीन्द्रनाथांस कबूल होणार नाहीं. ' अचेतनांचें चेतनीकरण ' असेंच ललितकलांच्या कार्यास नांव दिलें पाहिजे. हा सिद्धांतहि जुन्या ग्रंथांतून अस्पष्ट रीतीनें ध्वनित केलेला तुझ्यासारख्या वकीलीवाण्याच्या टीकाकारास आढळून येईल, नाहीं असें मी कोठें म्हणतो आहे ? पण राजश्री, या दृष्टीनें जगांत नवीन असें कांहींच नाहीं ! अरे, यावरून रवीन्द्रनाथांना भौतिकशास्त्रें नको आहेत असें होत नाहीं. भौतिकशास्त्रें विश्वाच्या आत्म्याचें वाह्य शरीर उत्तम रीतीनें तयार करीत आहेत. हें शरीर तयार न झालें तर आत्म्याला भोगायतनच मिळणार नाहीं. परंतु हें शरीर व विश्वाचा आत्मा एकजीव तर झालीं पाहिजेत. याच्या पलीकडेहि थोडेसें जाऊन असें म्हणतां येईल, कीं भौतिकशास्त्रांनीं दिलेली सृष्टि, मनुष्य व हा थोरला विश्वात्मा या त्रिपुटीचें ज्ञान एकजिनसी एकजीव असें होईपर्यंत भौतिकशास्त्रांची इमारत पुरी झालीच नाहीं असें समजलें पाहिजे. तिचा सोन्याचा कळस कवि व इतर ललितकलांचे ब्रह्मदेव हेच तयार करणार. हे भौतिकशास्त्री ' वेदाभ्यासजडां ' प्रमाणेंच ' विषयव्यावृत्तकौतूहल ' आहेत. मग विसाव्या शतकांतील कालिदासानें ' निर्मातु प्रभवेन्मनोहरमिदं रूपं पुराणो मुनिः ' असें त्यांच्याविषयीं तिरस्कारानें म्हटलें तर त्यास काय म्हणून दोष द्यावा हें तुझ्यासारख्या भौतिकशास्त्रसुरोन्मत्त पुरुषास हालवून मीं विचारतों !

या पुस्तकाचा उत्तरभाग विशेष काव्यमय नाहीं. तत्त्वज्ञांस तो बराच उपयोगी

आहे. शांकरमतानुयायांस तर विशेष फलप्रद आहे. शंकराचार्यांचे भक्तच केव्हां केव्हां शांकरमत असें मांडतात, कीं आचार्यांचा आत्मा Save me from my friends 'माझ्या भक्तांपासून मला वांचवा' असेंच म्हणत असेल. मनुष्य, सृष्टि व ईश्वर यांचीं बेरीज शून्य करण्याचा प्रयत्न या भक्तशिरोमणींचा आहे कीं काय असाहि भास केव्हां केव्हां मला होतो. रवीन्द्रनाथांची मांडणी प्रत्यक्ष आचार्यांसहि पटेल, व ते मानच डोलवितील अशी आहे. अद्वैत म्हणजे द्वैताचा नाश नव्हे; तर द्वैतांचें श्रेष्ठ रूपांतर व अद्वैतीकरण होय. मनुष्य एकटा असणें, व कुटुंब, नगर, प्रांत, देश व विश्व यांचा एकजीव झालेला अवयव व तोहि बुद्धिपूर्वक बनून जाणें, या दोन गोष्टी किती भिन्न आहेत हें जो अनुभवानें जाणील तोच निवळ द्वैतीतत्त्वज्ञान व आचार्यांचें उच्च जिवंत अद्वैततत्त्वज्ञान यांतील भेद जाणील. 'क्षत्रं यो परादात् यो ब्राह्मणः अन्यत्र क्षत्रं वेद' या उपनिषदांतील वाक्याचा अनुवादच रवीन्द्रनाथांनीं केला आहे. आत्म्याचें अद्वैतीकरण झालें म्हणजे त्यांत क्षत्रिय, वैश्य, शूद्र व ब्राह्मण या सर्वांस खुशाल स्वतंत्ररीत्या क्रीडा करण्यासारखें विश्व त्या आत्म्याला ज्ञानरूपानें मिळतें. जसें उत्तम शरीरसंपत्तिमान् पुरुषास कोंडा व सुग्रास अन्न या दोहोंनाहि पोटांत घेण्याची शक्ति असते, व तीं रक्तरूपानें त्याच्याशीं एकजीव होऊं शकतात, त्याप्रमाणेंच जीवन्मुक्त पुरुषास सर्व भिन्नता किंवा द्वैत पोटांत घालण्याची शक्ति येते; व ती जिरवून भिन्नतेचा व आपला नाश न करतां असें रूपांतर तो करितो कीं त्यांची बेरीज शून्य न होतां 'आनंदाच्या कोटी सांठविल्या आम्हां पोटीं' या तुकारामाच्या उक्तीप्रमाणें उच्च सत्य, उच्च सौंदर्य, व उच्च आनंद या त्रिपुटीच्या रूपाची होते, हा रवीन्द्रनाथांचा ललितकलांच्या बुडाशीं असलेल्या तत्त्वज्ञानाचा उपदेश आहे. शेवटल्या अध्यायांत बायकांच्या माहात्म्यान्तर्गत खालील वाक्य, तुला व तुझ्या अर्धांगीस दसऱ्याचें सोनें म्हणून सस्नेह अर्पण करून हें पत्र पुरें करितों. "ज्या स्त्रीस जगांतील साध्या गोष्टीपासून आनंद होत नाहीं तिचें स्त्रीत्व गेलें असें समजावें. स्त्रियांचा हा गुणच त्या पुरुषापेक्षां श्रेष्ठ आहेत असें ठरवितो." तुझ्या बायकोला हें वाक्य कितपत रुचेल कोण जाणे! कळावें हे विनंति."

## ८

# " 'वेणीसंहारा'चा तिसरा अंक "

" मित्रा, तुझ्या परवां आलेल्या पत्रावरून असें दिसतें कीं लहानपणीं वर्गांत शिकलेल्या पुस्तकांचें वाचन पुढें मोठेपणीं करतांना अपूर्व गोडी उत्पन्न करितें, याचा तूं अनुभव घेत आहेस. तूं आपल्या धर्मपत्नीबरोबर सध्यां 'वेणीसंहार' नाटक वाचीत आहेस हें मी पक्केपणीं ओळखीत आहे. तूं लपविलेंस म्हणून तें थोडेंच लपलें जाणार आहे ? आपण न्यू इंग्लिश स्कूलमध्यें असतांना तूं अश्वत्थाम्याचा व मी कर्णाचा पार्ट घेतला होता हें तुला आठवतच असेल. तुझी बायको कर्णाचा पार्ट वाचीत असेल. मग तूं 'अरेरे राधागर्भभारभूत सूतापसद' अशी गालिप्रदानयुक्त उसळी मारून तिच्या अंगावर चालून गेल्यावर विचाऱ्या त्या अबलेवर काय प्रसंग ओढवत असेल याची कल्पना मला येथून करितां येतें. पण या विसाव्या शतकांत 'अबला' 'सबला' झाल्यामुळें तुझी बायकोहि तुझ्याइतकीच जोराची उसळी मारून 'जात्या न चेदवध्योऽसि' या श्लोकानें जेव्हां तुमच्या स्वारीवर हातांत पळीची तरवार घेऊन हल्ला करीत असेल, तेव्हां मात्र तुला प्रि. आपट्यांनीं नेहमीं सातव्या यत्तेंत म्हटल्या जाणाऱ्या 'याभिर्विलोलतरतारकदृष्टिपातैः शक्रादयोऽपि विजिता अबला कथं ताः' या श्लोकाची चांगलीच आठवण होत असेल, नाहीं बरें ? तुझी अश्वत्थाम्याबद्दल झालेली अपूज्यबुद्धि मात्र तुझ्या स्वभावांत लहानपणापासून जो मी दोष पहात आहे, त्याचीच साक्ष देत आहे. तुला शांतरसाची आवड; मनोभावना खवळल्या कीं तुला संताप यावयाचा. पण तुझा संताप म्हणजे एक खवळलेली मनोभावनाच आहे, हें तूं विसरतोस ! अरे, मनुष्याचें पूर्णत्त्व म्हणजे मानसशास्त्र्यांनीं दिलेल्या तीन अंगांचें पूर्णत्व. एक अंग बुद्धि. सर्व शास्त्रांचा अभ्यास याच बुद्धिरूप यंत्रानें आपण करितों. दोन अधिक तीन म्हणजे पांच, हें शांतपणें समजून घेण्याचें काम बुद्धीचें. दोन अधिक तीन म्हणजे सहा झाले तर तुला, मला व कोणालाहि क्रोध येण्याचें कारण नाहीं. अशा ज्ञानोनें मनोभावना उसळण्याचें

कारण नाहीं. पण ही बुद्धि पूर्ण झाली म्हणजे आपल्या नरदेहाची सार्थकता झाली असें कां तुला वाटतें ? मानसशास्त्री तर मनाचे बुद्धिशिवाय आणखी दोन भाग देतात. एक मनोभावना व दुसरा इच्छाशक्ति. बुद्धीची पूर्ण वाढ होऊन मनोभावनांची वाढ झाली, किंवा इच्छाशक्ति तशीच दुर्बल राहिली तर काय होतें याची परीक्षा करण्यास हल्लींचें हिंदुस्थान हेंच उदाहरण बस्स आहे ! हिंदुस्थानांत बुद्धिमत्ता कमी आहे असें कोणता मनुष्य म्हणूं शकेल ? आपले राज्यकर्ते देखील आपली बुद्धिमत्ता कमी आहे, असें कधींहि म्हणत नाहींत. तर तुमच्यांत क्षेत्रश्री नाहीं, राज्यकर्त्यास अवश्य लागणारे गुण नाहींत असें ते म्हणत असतात. याचा अर्थ तुम्हांस मनोभावना नाहींत, तुम्हांस इच्छाशक्ति नाहीं असा मी घेतों. राज्यकर्त्यांच्या अंगीं रँग्लरची बुद्धिमत्ता नसली तरी चालते. पण इच्छाशक्ति नसली तर मात्र घोडें अडेल. मनोभावनाहि नसून चालावयाचें नाहीं.

अश्वत्थामा व कर्ण यांच्या स्वभावांतहि हाच फरक भट्टनारायण कवीनें दाखविला आहे. दुर्योधनाच्या समोर हे जे दोन वादीप्रतिवादी बोलत आहेत, ते मनोभावना व इच्छाशक्ति यांचें मूर्तिमंत एकीकरण म्हणजे अश्वत्थामा, व निवळ तार्किक बुद्धिमत्तेचें उदाहरण म्हणजे कर्ण यांच्या द्वंद्वयुद्धाचेच प्रतिनिधि होऊन बोलत आहेत. माझ्या म्हणण्याचा भलता अर्थ करूं नका तुम्हीं दोघेहि नवराबायको माझ्या बोलण्याचा विपरीत अर्थ करण्यांत पटाईत दिसतां इतकेंच नव्हे, तर मुद्दाम मला चिडविण्याकरितां तुम्ही तसें करण्याचा विडाच उचलला आहे असें केव्हां केव्हां मला वाटतें. अश्वत्थामा मुळींच बुद्धिवान् नव्हता असें कोण म्हणेल ? व कर्णाला मनोभावना व इच्छाशक्ति यांचा गंधहि नव्हता असें तरी कोणता शहाणा मनुष्य म्हणेल ? पण माझा म्हणण्याचा उद्देश असा आहे कीं, वेणीसंहाराचा तिसरा अंक हा नारायण कवीची प्रतिभा दाखविणारा आहे असें जर मान्य होत असेल–तें मान्य केल्याखेरीज गत्यंतरच नाहीं, कारण गावोंगावीं शाळांतून विद्यालयांतून या अंकाचा प्रयोग दरवर्षी सारखा होत आहे व पुढें होणार ही गोष्ट त्या कवीच्या प्रतिभेची साक्ष देत नाहीं काय ?—तर तो अंक आत्याबाईच्या गोष्टी सांगण्याकरितां खास लिहिला नाहीं हेंहि कबूल केलें पाहिजे. इतर कवींहून आपलें वैशिष्ट्य दाखविण्याकरितांच ईश्वरानें ही प्रतिभा नांवाची देणगी कवीस दिली आहे. बुद्धिमत्ता व निश्चययुक्त मनोभावना यांचें युद्ध इतक्या बहारीनें देशी किंवा परदेशी कोणत्याहि कवीनें प्रतिबिंबित केलेलें आपण दाखवा असें मी तुम्हां उभयतांस आव्हान करीत आहे. तुझ्या वायकोनें

शेक्सपियर वाचिला आहे. हॅम्लेटची भूमिका मनोभावनामय नाहीं काय ? असें चोरट्या नजरेनें व तितक्याच चोरट्या स्त्रीस्वभावसुलभ अशा दुष्ट वक्रस्मितानें तुझी बायको विचारीत आहे हें मी माझ्या तृतीय नेत्रानें पहात आहे. पण मी सावध आहे हें तुम्हीं पक्कें ओळखून असा. हॅम्लेट हा नुसत्या मनोभावनांचा गुलाम होता. त्याच्यांत निश्चयदार्ढ्य नव्हतें. म्हणूनच त्याची भूमिका इतकी उदात्त असूनहि शेवटीं आदरबुद्धि उत्पन्न करीत नाहीं. तूं व तुझ्या बायकोनें मला मुद्दाम एकदां चिडविल्याचें मला चांगलें स्मरण आहे. मी हिंदुस्थानच्या अवनतीविषयीं उदासपणें व निराशेच्या मनस्थितींत तुम्हांजवळ बोलत असतां तुम्हीं उभयतां माझ्या तोंडावरून हात ओंवाळून बोलूं लागला कीं " अहाहा, काय हॅम्लेटची भूमिका शोभते आहे पण स्वारीला ! शेवटीं हॅम्लेटप्रमाणेंच मनोदौर्बल्याचा कर्मविहीन योग साधा व वंदेमातरम् म्हणून जीव द्या, म्हणजे 'योगेनान्ते तनुत्यजाम्' हा कालिदासाचा उपदेश अनुभवानें खरा करून दाखविल्याचें तुला श्रेय मिळेल." ही मर्मभेदक वाक्यें मी कसा विसरेन ? पण यावेळेस तीं तुम्हांला मर्मभेदक होणार आहेत. माझ्या बाजूची साक्ष देण्यांत तीं मला आज उकरून काढिलीच पाहिजेत. तुम्हींच जर हॅम्लेटला मनोदुर्बल, कर्मविहीन, मनोभावनामय योगाचा प्रतिनिधि म्हणून मानितां तर तो अश्वत्थाम्याहून अगदीं भिन्न आहे हें तुम्हीं कबूल करा. बाप दाखवा नाहींतर श्राद्ध करा, अशा पेंचांत तुम्ही उभयतां स्वाऱ्या सांपडलां आहांत. कर्णाचें महाभारतांतील स्वभाववर्णन पार विसरून जाऊन त्याचें नवेंच स्वरूप या तिसऱ्या अंकांत दाखविलें आहे. तेजस्वी द्रोण पुत्राच्या निधनाची वार्ता ऐकून सूड घेण्याच्या ऐवजीं हात जोडून स्वस्थ कां बसला या दुर्योधनाच्या प्रश्नास कर्णानें जें उत्तर दिलें आहे, तें ऑथेल्लो नाटकांतील आयोगाच्या भूमिकेस शोभेल असें म्हणण्याइतकें चहाडखोराचें तर्कमय विष त्यांत भरलें आहे. त्याच्या इतकें गुलगुलीत तर्कप्रतिष्ठित असें बोलणें उत्तम वकीलाला देखील करितां येईल कीं नाहीं याची शंका आहे. इतक्या सुरेख, रेखीव, काटकोनी भाषणाला अश्वत्थामा नुसत्या गालिप्रदानाच्या आडंबरानें व हेत्वाभासांनीं भरलेल्या कुतर्कांच्या हल्ल्यानें फेटाळून लावितो व तुझ्यासारख्या लुसलुशीत तार्किकांच्या मनांत आपला शत्रू जो कर्ण त्याविषयीं आदरबुद्धि उत्पन्न करून देतो व स्वतःविषयीं उगीचच्या उगीच सर्वांचें मन कलुषित करितो. पण मानसिकशास्त्रानुसार खोल परीक्षा करणारांना अशी भुरळ कधींहि पडणार नाहीं. याची साक्ष नाटकगृहांतील प्रेक्षकलोक 'पांचामुखीं

परमेश्वर ' या म्हणीप्रमाणें नेहमींच देतात. अंक संपल्यावर सर्वांच्या मनांत कर्णाविषयीं तिटकारा व अश्वत्थाम्यावरील प्रेम अशा भावना एकसमयावच्छेदेंकरून उत्पन्न होतात हें तुम्हीं उभयतां कबूल करालच. सर्व लोकांच्या मनांत अशा भावना उत्पन्न झाल्या म्हणजे तुला संताप येतो हें मला माहीत आहे. तो संताप अनाठायीं आहे किंवा नाहीं, हा प्रश्न अगदीं निराळा. पण सर्व श्रोतेजन व प्रेक्षकगण कर्णाचा द्वेष करितात व अश्वत्थाम्याचे भक्त होतात हें तूं नाकबूल करीत नाहींस यांतच सर्व खुबी आहे.

प्रेक्षकगणांच्याच रूपानें ईश्वर आपणास मनुष्यस्वभावाचें इंगित सांगत आहे, कीं बुद्धीचा नुसता उत्कर्ष म्हणजे मनुष्यस्वभावाचें पूर्णत्व नव्हे. जर मनुष्यस्वभावांत शीलाला उच्चस्थान दिलें पाहिजे, तर शीलाची जी दोन महत्त्वाचीं अंगें—मनोभावना व इच्छाशक्ति—त्यांच्या उत्कर्षास बुद्धीच्या पूर्णत्वापेक्षांहि जास्त मान दिला पाहिजे. कर्णाचा तार्किक उत्कर्ष नाटककार कबूल करितो, इतकेंच नव्हे तर त्या कामांत कर्णाला अश्वत्थाम्यापेक्षां कितीतरी जास्त मार्क मिळतात. पण कर्णाचें कौतुक होईल, अश्वत्थाम्याबद्दल आदर, पूज्यबुद्धि उत्पन्न होतात! तारेवरून चालणाराचें आपण थोडें कां कौतुक करितों? पण त्याच्याविषयीं आदर किंवा भक्ति उत्पन्न होण्याला नुसत्या तारेवर कसरत करून भागावयाचें नाहीं. तो सद्भावनायुक्त असेल व त्याची इच्छाशक्ति सद्रूप व दृढ असेल तरच त्याच्याविषयीं आदर व भक्ति उत्पन्न होतील. नाहींतर एकाद्या तरतरीत वात्रट पोराइतकेंच त्याचें कौतुक होणार! माझ्या एका युरोपियन मित्रानें एकदां एक मोठें मार्मिक वाक्य उच्चारिलें, तें मला चांगलें आठवतें. 'Logic is not life, though logic is necessary for life', तर्क म्हणजे जीवित नव्हे, जीविताला तर्काची जरूर आहे इतकेंच. मनुष्याच्या सर्व शक्तींचा उत्तम उत्कर्ष होऊन सर्व शक्तींचें प्रमाणबद्ध एकजीवरूप असें एकीकरण झालें, तर तें दुधांत साखर पडल्याप्रमाणेंच झालें. पण या अपूर्ण विश्वांत हें पूर्णत्त्व कसें साधणार? कृष्णावतारास पूर्णावतार म्हणतात याचें कारण मनुष्याच्या सर्वशक्तींचें श्रीकृष्णामध्यें पूर्णत्त्व दिसलें म्हणूनच. बुद्धि, भावना व इच्छाशक्ति यांचीं पूर्ण वाढ श्रीकृष्णाच्या अवतारांत जशी दृष्टीस पडली, तशी कोठेंहि दृष्टीस पडावयाची नाहीं. सर्व विरोधांचें एकीकरण व संगीत 'एकसंश्रयदुर्लभ' असूनहि ती श्रीकृष्णामध्यें वास करीत होती. 'ज्ञानवलक्रिया' यांचें वसतिस्थान एकत्र कोठें सांपडणार? पण तें श्रीकृष्णांत व्यासाला सांपडलें. अश्वत्थामा व कर्ण हे नरश्रेष्ठ असले, तरी पूर्णावतार नव्हते. त्यांचें पूर्णत्त्व उपनिषदांनीं सांगितल्याप्रमाणें 'आर्त' होतें. या

पूर्णत्त्वाचीच मीमांसा भट्ट नारायण कवीस करावयाची होती. त्याला बुद्धि व निश्चययुक्त भावना यांच्या द्वंद्वयुद्धाची पोटदुखी लागली होती. शेवटीं त्याच्या प्रतिभेचक्षूला एकंदम नवीन देखावा दृष्टीस पडला. जर बुद्धीचा उत्कर्ष परमावधीस पोंचवावयाचा असेल, तर भावनांचा व इच्छाशक्तीचा जोर कमी केला पाहिजे; व इच्छाशक्तियुक्त भावनांचा अत्युत्कर्ष पाहिजे असेल तर बुद्धीला मागें ठेवावें लागेल, अशी पंचाईत त्याच्या काव्योदरांत खुटखुट करीत होती. पण शेवटीं त्याच्या प्रतिभेनें या आर्तपूर्णत्त्वाचें औषध दिलें, तेव्हां त्याची पोटदुखी राहिली. आणि या विचारप्रसूतिवेदनांचें फळ 'वेणीसंहार' या अपत्यरूपानें बाहेर पडलें. तर्कोद्भव शांत वातावरणांत अश्वत्थाम्यानें फार दिवस काढिले नसल्यानें आपल्या बापाचा ज्यांनीं विश्वासघात करून खून केला त्यांचा सूड उगवणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे अशी भावना त्याच्यामध्यें अतिउत्कट होऊन तो वेड्यासारखा झाला. या वेडापुढें कर्णाचें शांत, तर्कमय व वकिलीबाण्याचें शहाणपण त्याला तर्कटाप्रमाणें निःसत्त्व व तिरस्करणीय वाटलें यांत नवल काय आहे? 'सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भयाम्यहम्। दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषं॥' हें कर्णाचें म्हणणें कोणत्याहि देशांत कोणत्याहि कालांत, कोणत्याहि न्यायाधिशापुढें, कोणत्याहि नीतिनिपुणापुढें मांडिलें असतां कर्णालाच शाबासकी मिळून, अश्वत्थाम्याला शिवराळ, मूर्ख, वेडा, या पदव्यांची माळ गळ्यांत घालावी लागेल. पण 'वानोत निंदोत सुनीतिमन्त' या न्यायानें कविप्रतिभा आपणास झालेल्या प्रत्यक्ष दर्शनापासून कधींहि ढळणार नाहीं. ती प्रतिभा अश्वत्थाम्याच्या तोंडातून धर्म, भीम, अर्जुन, फार तर काय, पण साक्षात् भगवान् श्रीकृष्णासहि 'सर्वेऽपि एते पातकिनः।' असें सर्टिफिकेट लिहून देते. आतां मी तुला व तुझ्या शेक्सपियरभक्त पत्नीला असें निक्षून विचारतों कीं, हॅम्लेट व अश्वत्थामा यांच्या स्वभावांतील भेद घटकाभर विसरून ते केवळ मनोभावनांचे पुतळे आहेत असें मानिलें, तर शेक्सपियर व भट्ट नारायण यांचे एका प्रश्नांत एकमत झालेलें तुम्हांस दृष्टीस पडणार नाहीं काय? हॅम्लेट व अश्वत्थामा यांचें वेड कर्णाचा किंवा हॅम्लेटचा द्वेष करणाऱ्या शहाण्यासुर्त्या राजाच्या शहाणपणापेक्षां शेक्सपियरला व नारायण कवीस श्रेष्ठ वाटत होतें कीं नाहीं? बोल, अन्यायाची चीड येऊन सज्जन लोकांस वेड लागलें तर तें सर्व अन्याय दृष्टीसमोर चालले असतां तर्कोद्भव शुष्क शहाणपणाच्या शांतिब्रह्मांत लीन होणाऱ्या महात्म्यांच्या चित्तशुद्धीपेक्षां दोन्ही कवींस श्रेष्ठ वाटतें कीं नाहीं? भट्ट नारायणानें तर कृपाचार्याकडून याचा फार जोराचा निकाल लाविला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. ९४३९

‘ धिक् सानुजं कुरुपतिं धिगजातशत्रुं
धिक् भूपतीन् विफलशस्त्रभृतो धिगस्मान् ।
केशग्रहः खलु तदा द्रुपदात्मजायाः
द्रोणस्य चाद्य लिखितैरिव वीक्षितो यैः ॥

या श्लोकाचा अर्थ अन्वय लावून व्याकरण बघून जरी तुम्ही उभयतांनी केलात तरी दुसरा काय निघणार ? अन्यायाची चीड येऊन वेड्यासारखें बडबडणारा अश्वत्थामा, चित्राप्रमाणें तटस्थ राहून ते अन्याय डोळे उघडून बघणाऱ्या बुद्धिमान् लोकांपेक्षां कृपाचार्यांस श्रेष्ठ—नव्हे वंदनीय-वाटतो हा ध्वनि जर या काव्यापासून कोणी काढिला, तर तो तुम्हांस पटतो की नाहीं ? राष्ट्रांचे, मातांपितरांचे, पतिव्रतांचे अपमान भावनामय सज्जनांना वेड लावितात व तेच अपमान डोळ्यांनीं पहात असतांहि तर्काचार्य लब्धप्रतिष्ठांस शांतिब्रह्मांत लीन करितात, हा इतिहास आजचा कां आहे ? जगाच्या आरंभापासून आतांपर्यंत चालत आला आहे व चालत राहणार ! पण शेक्सपियरला व भट्ट नारायण कवीला येवढेंच दिसलें कीं सज्जनांच्या वेडांत ईश्वरी विभूति आहे, दिव्य तेज आहे; व तर्कमय शांतीत सैतानाचें दुष्ट शैत्य व विष आहे. मोक्षाच्या अनंत पायऱ्यांत दिव्य सुडाच्या भावनेस चांगलीच उच्च जागा आहे. काम, क्रोध, इत्यादि षड्रिपु हे ईश्वरचरणीं अर्पण करावयाचे व त्यांना आपले मित्र करावयाचे म्हणजे शेक्सपियरचा व भट्ट नारायणाचा हा ध्वनिरूप मंत्रच जपला पाहिजे. या जगांत जर मातापित्याप्रमाणें, गुरुप्रमाणें, मातृभूमीप्रमाणें, पतिव्रतेप्रमाणें पूज्य वस्तु किंवा संस्था नसतील, तर मनुष्याला जीवित हें पशूप्रमाणेंच असार व कष्टमय होईल. या पूज्यवस्तूकरितां षड्रिपूंचा उपयोग करणें म्हणजे त्यांचें अर्पण ईश्वराच्या चरणीं करणें होय. ‘ अनर्थः पुरुषो नास्ति ’ त्याचप्रमाणें ‘ अनर्था भावना नास्ति ’ हा सिद्धांत उराशीं बाळगण्यासारखा आहे. आतां तुझी अश्वत्थाम्याविषयीं झालेली तिरस्कारबुद्धि थोडीतरी मंदावली कीं नाहीं हा प्रश्न विचारण्याचें धाडस मी करितों. तुझ्या पत्नीस हा प्रश्न विचारण्याचें कारणच नाहीं ! मला हॅम्लेट म्हणून जिनें माझ्या भोंवतीं फजितीचे दिवे ओंवाळिले तिच्यासमोर अश्वत्थाम्याचें सोंग घेऊन जर मी गेलों तर माझ्यावर काय प्रसंग गुदरेल हें मी पक्कें ओळखून आहे. तेव्हां बाईसाहेबांस दुरूनच नमस्कार ! कळावें हे विनंति. ”

---

# ९

# "कालिदासकृत 'शाकुंतल'"

"मित्रा, बरेच दिवसांत तुला पत्र लिहिलें नाहीं. कारण मी दोन आठवडे या हृषीकेशच्या मंद, सुगंध व शीतल अशा मंदाकिनीच्या गार हवेंत आपल्या सुंदर मठांत ध्यानस्थ होतों. 'महाराष्ट्र शाकुंतल' हें पुस्तक वाचल्यापासून कालिदासाकडे माझें मन पुन्हां वळलें आहे. आज शाकुंतलापासून आजच्या पिढीनें काय बोध घ्यावा याविषयीं थोडे विचार सुचले आहेत ते तुझ्यापुढें मांडावे असा हेतु आहे.

पहिल्या प्रथम शाकुंतलांत गृहस्थाश्रमाला अत्यंत महत्त्व दिलें आहे हें सांगणें आवश्यक आहे. कण्व हा स्वतः नैष्ठिक ब्रह्मचारी आहे खरा, पण त्याचें सर्व आयुष्य संसाऱ्यासारखेंच आहे. त्यास जरी कालिदासानें बायको दिली असती व शकुंतला त्याचीच मुलगी दाखविली असती तरी शाकुंतलाच्या स्वरूपांत कांहींहि फरक झाला नसता. पण कालिदासाचा रोंख ज्याला गीतेंत सांख्ययोग म्हणतात त्याच्या-विरुद्ध आहे. कालिदासाचा काल कितीहि अलिकडे ओढला तरी पांचव्या शतकाच्या अलीकडे तो खास येत नाहीं. शंकराचार्यांचा संन्यास मार्ग म्हणजे गीतेचा सांख्यमार्ग अजून उदयास आला नव्हता. हिंदुस्थान यवनमय झालें नव्हतें. हिंदु समाजाची वाढ अगदीं ऐन जिनसी स्वदेशी तऱ्हेवर होत होती. राजकीय वातावरण जुन्या वळणावरच होतें. पडद्याच्या पाठीमागें ब्राह्मणसमाज, त्यांचें नेहमीं ऐकणारा व त्यांचा योगक्षेम उत्तम रीतीनें चालविणारा राजा, तिसरें प्रस्थ म्हणजे प्रधान-मंडळ, व चौथें प्रजा. अशा चार प्रस्थांवर समाज सुरळितपणें चालला होता. त्या सर्व समाजाचें वळण म्हणजे मनुस्मृतीचें वळण. पण बुद्धाच्या शिकवणीमुळें सांख्य म्हणजे संन्यासमार्गाला जास्त महत्त्व आलें होतें. तें मधल्या सुवर्णरेषेला चिकटून राहणाऱ्या व संसाराचें सार ग्रहण करणाऱ्या बुद्धिमान कालिदासाला खपलें नाहीं. त्यानें शाकुंतलांत सर्व ठिकाणीं शांत व प्रगतियुक्त असा समाज घेतला आहे. रवीन्द्रनाथ टागोर म्हणतात त्याप्रमाणें या समाजसमुद्राचें किंवा गोड पाण्याच्या

सरोवराचें पाणी नुसत्या शहरी सुधारणेनें कुजूं नये म्हणून कण्वासारखा वनसुधारणेचा भोक्ता व वल्लीप्रमाणें फोंफावणारी शकुंतला यांचा संगम शहरी सुधारणेचा प्रतिनिधि जो दुष्यंत याच्याशीं केला आहे. तो संगम इतका हृदयमनोहारक झाला आहे कीं पांचव्या अंकापर्यंत या गंगायमुनेचा संगम मधुर आहे व वनसुधारणा व शहरी सुधारणा याचें मूळ जी उत्तम नीति, तिची वाढ या दोन्ही सुधारणांत सारखी दाखविली आहे. ज्यानें शाकुंतलाचा चौथा अंक काळजीपूर्वक वाचिला आहे, त्याच्या ध्यानांत हें उघड उघड येईल कीं दोन्ही सुधारणांत कुटुंब हा समाजाचा आदिबिंदु आहे. प्लेटोप्रमाणें समाजांतील बालकांची वाढ 'हम् करे सो कायदा' या युद्धमूलक नीतीवरच होत नाहीं, प्रेममूलक नीतीवरच होत आहे. माणसामाणसांत प्रेम असावें इतकेंच नव्हे, तर प्राणिवर्ग व वनस्पतिवर्ग यांच्यावरहि लहानपणापासूनच मुलांचें प्रेम वाढावें म्हणून यांच्याशींहि प्रेमबंधनें लहानपणापासून जडावी अशीं प्रेमाचीं उदाहरणें कालिदासानें चौथ्या अंकांत व पहिल्या अंकांत इतस्ततः विखुरलीं आहेत. सांख्ययोगाचा पहिला सिद्धांत म्हणजे शोपेनहोरच्या सिद्धांताचा व नैराश्ययोगाचा श्रीगणेशायनमः होय. जग हें अतिशय दुःखकारक होय; अतएव कोणी लग्न करूं नये; जर कदाचित् केलें असलें व त्यास दुर्दैवानें मुलें झालीं असलीं तर त्यानें पहिल्याप्रथम बायकोस व मुलांस ठार मारावें व मग आपला जीव द्यावा. अशा तऱ्हेचा तामसी व नैराश्यप्रदर्शक ठराव तामसी युरोपालाच शोभतो. तो आपल्याइकडे आला नाहीं याचें कारण हिंदुस्थानची भूमि ! या भूमींत संहारकारक अशा नैराश्यवादाचें बीं रुजावयाचेंच नाहीं. आज शेंकडों वर्षें हिंदुस्थान परकी अमलाखालीं आहे, पण युरोपमध्यें ज्याप्रमाणें संहारकांचे ( Anarchists ) संघ निघाले आहेत तसे हिंदुस्थानांत निघाले आहेत काय ? अर्वाचीन लोकांनीं शाकुंतलापासून धडा घ्यावयाचा तो असा कीं व्यक्तिविषयक व समाजविषयक मुक्ति म्हणजे संहार किंवा नाश नव्हे. नाहींतर जीव दिला म्हणजे सर्वांनाच मुक्ति !

दुसरा महत्त्वाचा उपदेश म्हणजे नीतीची हळुहळु प्रगति. दुर्वास, कण्व व मारीच हे तीन उपदेशक तीन तऱ्हेच्या प्रकृतींस अनुसरून आहेत, प्रियंवदा ही सर्वांत लहान, अनुसूया जरा तिच्यापेक्षां वडील व शार्ङ्गरव हा समजूतदार, गुरूचें धोरण ओळखणारा व गुरूशीं तादात्म्य पावलेला असा शिष्य आहे. दुर्वासाचें जें स्वरूप पुराणकारांनीं दिलें आहे तें बाहेरून उग्र परंतु आंतून शांत अशा स्वरूपाचें आहे. तेव्हां लहानपणीं शकुंतला, प्रियंवदा व अनुसूया यांना धर्मशिक्षण द्यावयाचें तें

बाहेरून उग्र परंतु आंतून दयाळू अशाच उपदेशकांकडून. दुर्वास जेव्हां शाप देऊन परत जावयास निघाला तेव्हां अनुसूयेनें प्रियंवदेलाच त्याची रदबदली करावयास पुढें केली. कारण ती सर्वांत लहान होती. यामुळें या उग्रमूर्तीचें मन तिच्या लहान वयाकडे पाहून थोडेसें मृदु होईल असें तिला वाटलें. अनुसूयेला तिच्या मध्यम वयाप्रमाणें जास्त समजूत व सारासार विचार होता. दुष्यंताचें घरीं गेल्यावर एकहि पत्र नाहीं व कोणाबरोबर निरोपहि नाहीं या गोष्टीची तिला सारखी हुरहूर लागली आहे. कण्व प्रभासतीर्थाहून परत आला तेव्हां प्रियवंदेला शकुंतलेनें बापाच्या पाठी-मागें दुष्यंताशीं प्रेमविवाह केला या गोष्टीमुळें त्याचें भय वाटलें. पण अनुसूयेनें चक्क उत्तर दिलें कीं बाबांना उत्तम वराला शकुंतलेला द्यावयाची आहे, व दुष्यंताइतका उत्तम वर कोठेंहि मिळावयाचा नाहीं हें बाबांना समजल्यावरोबर त्यांचें समाधान होईल. याचें कारण कण्वाचें मन अनुसूयेनें बरोबर ओळखिलें होतें. शार्ङ्गरव हा कण्वाचा उजवा हात. तो अनुसूयेपेक्षां जास्त कण्वाजवळचा होता. पांचव्या अंकांत जेव्हां दुष्यंतानें शकुंतलेचें ग्रहण न करितां तीस परत पाठवून दिलें तेव्हां शकुंतलेला ' पुरोभागिनी ' ( फाजील ) अशी न्यायनिष्ठुर परंतु आंतून अगदीं दयापूर्ण अशी त्यानें शिवी दिली. याचें कारण हिंदु समाजाची पूर्वपरंपरा अशा भक्कम पायावर उभारली आहे कीं नवऱ्यानें टाकलेल्या मुलीनें ' पतिकुले तव दास्यमपि क्षमम् ' या न्यायानें नवऱ्याच्या घरीं भांडीं घासून निवळ दासीप्रमाणें वागलें तरी हरकत नाहीं, पण परत बापाकडे जातां कामानये. हल्लींच्या सुधारकास ही गोष्ट पसंत पडणार नाहीं. पण कालिदासाची नजर या उतावळ्या सुधारकांपेक्षां जास्त दूरवर पोंहचलेली होती व शांत विचाराअंतीं कालिदासच बरोबर आहे असें प्रत्येक सुज्ञ वाचकास कळल्याशिवाय राहणार नाहीं.

पण कुटुंबधर्म व त्यापासून होणारें सौख्य हीं कांहीं मनुष्यजीविताची अखेरची पायरी नाहीं. यापलीकडे उच्च जीविताचें ध्येय आहे ही गोष्ट मारीचाच्या पत्रावरून कळून येते.

मारीचाचें सर्व वातावरण शांत, ज्ञानाला अनुकूल व मनुष्याला विश्वबंधुत्वाचें वळण लावण्याला व अखेरचें ध्येय साधण्याला जें वर्तन अवश्य आहे त्या वर्तनाचा वस्तुपाठाप्रमाणें उपदेश करणारें असें आहे. गाय आणि सिंह ज्याठिकाणीं एकत्र पाणी पितात, जेथें हरिणाचीं बालकें मुनींच्या मांडीवर लोळतात, अशा ठिकाणींच

दुष्यंत आणि शकुंतला यांना शेवटचें शिक्षण मिळतें, व दुष्यंताचा मुलगाहि लहानपणापासून अशाच वातावरणांत वाढला आहे. खुबी ही कीं हें ध्येय मनुष्याच्या आटोक्यावाहेरचें नाहीं. मारीचाचें लग्न झालेलें आहे. पातिव्रत्य हा सद्गुण इतका खोल व दुष्प्राप्य आहे कीं त्याचे पाठ दररोज कितीहि घेतले तरी मनुष्य अपूर्णच राहणार हें तत्त्व फ्रेंच तत्त्वज्ञानी कॉंटच्या सद्गुणाची अपरिमितता व अनन्तत्त्व या तत्त्वाची उजळणी आहे. मनुष्याला असें वाटतें कीं सद्गुण म्हणजे साधी गोष्ट. माझ्या एका सुधारक मित्रानें एका व्याख्यानांत सांगितलें कीं आतां आम्हांला सीतासावित्री या पतिव्रतांचा कंटाळा आला आहे. ‘ पतिव्रत्य पातिव्रत्य ’ असें कितीदां घोकावयाचें ? या मनःप्रवृत्तीचा कालिदास निःशंकपणें तिरस्कार करितो. सद्गुणांच्या प्रगतीस अन्तच नाहीं. शेवटची अशी त्यांची परीक्षाच नाहीं. अनेक जन्म जर घ्यावयाचे असतील तर सद्गुणांच्या प्रगतीकरितांच. बर्कनें सुज्ञपणाचें दर्शक व सद्गुणांचें अनन्तत्त्व दर्शविणारें असें जें एक वाक्य लिहून ठेविलें आहे तें मननीय आहे. तो म्हणतो, ‘Society is a university for the moral elevation of its members.’ समाज हें एक मोठें विश्वविद्यालय आहे. त्यामध्यें समाजाच्या, व्यक्तींच्या नैतिक प्रगतीला अनुकूल असें शिक्षण मिळतें. यामध्यें समाज ही एक व्यापारी कंपनी आहे, व राजा व प्रजा यांचा संबंध म्हणजे एक करार आहे, या तत्त्वापेक्षां बर्कचें समाजतत्त्वज्ञान किती जिव्हाळ्याचें व उच्च आहे हें सांगण्याची जरुरी नाहीं. हेंच तत्त्वज्ञान कालिदासाचें आहे व शाकुंतल नाटक हें या तत्त्वज्ञानाचें व गीतेचें चालतेंबोलतें चित्र आहे. गीतेचा अर्थ याच तत्त्वज्ञानाला अनुकूल आहे. या तत्त्वज्ञानाचा वस्तुपाठ शाकुंतलांत दिला आहे. तो इतका जिव्हाळ्याचा व उत्तम कलावान् पुरुषाच्या विचाराच्या अगदीं अंतिम शुद्धावस्थेंत निघाला आहे कीं शाकुंतल वाचलें कीं साधारण मनुष्याला देखील आपणास पुष्कळ शिकावयाचें आहे व हें ध्येय आपल्या शक्तीच्या बाहेर नाहीं असें वाटतें. कालिदासाच्या नाटकांत अतींद्रिय वस्तूंचा उल्लेख पुष्कळदां आलेला आहे. पण त्या गोष्टींचा उल्लेख मर्यादित मनुष्यस्वभाव व त्याची हळुहळू होणारी प्रगति या तत्त्वांच्या विरुद्ध नाहीं. उर्वशी ही स्वर्गीय अप्सरा आहे, पण साऱ्या ‘ विक्रमोर्वशीय ’ नाटकांत तिचा स्वभाव आपणासारख्या साधारण माणसासारखाच कालिदासानें रेखाटलेला आहे. ती लाजते, हंसते, तिच्या ठिकाणीं मत्सर आहे. मारीच जरी स्वर्गांत राहतो, तरी त्याच्या आश्रमांतील सर्व व्यवहार मनुष्यांचाच आहे. त्याच्या आश्रमांतील स्त्रिया व दुष्यंताचा

मुलगा व त्याचें सिंहाशीं खेळणें, हें सर्व मनुष्यस्वभावाला इतकें अनुरूप आहे कीं तो सर्वच अंक स्वभावोक्ति या अलंकारानें भरला आहे असें म्हणतां येईल. चवथा अंक तर वात्सल्यरसानें भरला आहे, व मुलगी सासरीं जातांना आईबापांची अवस्था कशी अश्रुपूर्ण होते याचा एक आदर्शच तो अंक होय. पण पूर्वीच्या रसिकवर्यांनीं जो श्लोक दिला आहे त्याचा अर्वाचीन दृष्टीनें विचार केला असतां चौथ्या अंकापेक्षां नैतिक व सामाजिक दृष्ट्या पांचवाच अंक जास्त महत्त्वाचा आहे. चौथ्या अंकांत पितृवात्सल्य दाखविलें आहे व तें स्वाभाविक आहे. पण पांचव्या अंकांत मनुष्यजातीला जो प्रश्न नेहमीं नडतो त्याचा विचार केला आहे. अलीकडल्या काळांत अशी वहिवाट पडली आहे कीं मतभेद जरी असला तरी He acted according to his lights ( तो आपल्या मताप्रमाणें वागला ) अशी विरुद्ध बाजूच्या मतवाल्यांचीहि एखाद्या चांगल्या माणसाविषयीं स्तुति ऐकूं येते. शेक्सपियरनें ज्युलियस सीझर या नाटकांत दोन शहरवासीयांचीं परस्पर-विरुद्ध मतें ॲन्टनी व सीझर यांविषयीं देऊन या विषयाचा नुसता पुसट पुसट उल्लेख केला आहे. पण कालिदासानें या विषयाला सगळा अंक खर्ची घातला आहे. आपआपल्या परीनें वाचकांस दुष्यंत व शकुंतला हीं खरींच वाटतात, व दुष्यंत बोलला कीं तो अगदीं खरा आहे व तो अगदीं मनापासून बोलतो आहे अशी वाचकांची खात्री होते. पण शकुंतला बोलूं लागली कीं मनावर त्याच्या विरुद्ध परिणाम होऊं लागतो व तिची वकिली शार्ङ्गरवानें जोरानें व धीटपणानें केली कीं सर्व ताजवा बदलून वाचकांचीं मनें संशयदोलारूढ होऊन एकीकडे दुष्यंत व दुसरीकडे शकुंतला अशा एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत व फिरून त्यां टोंकापासून या टोंकापर्यंत घड्याळाच्या लंबकाप्रमाणें हेलकावे खात राहतात. प्रायशः नाटकांत किंवा कादंबरींत एक पात्र अगदीं चांगलें व दुसरें पात्र अगदीं वाईट असा विरोध उघडउघड व साहजिक असतो. रामाविरुद्ध रावण हा विरोध वाल्मीकिपासून हरिभाऊ आपट्यांपर्यंत सर्व कल्पनामिश्रित ग्रंथांमध्यें वर्णन केलेला असतो. पण दोन्ही पात्रें शीलानें सारखींच उच्च असून त्यामध्यें विरोध पहिल्या-पासून शेवटल्या पानापर्यंत सारखा टिकविणें व शेवटीं दुष्यंताच्या उपाध्यायानें मनुष्य जातीला शक्य असा निकाल देऊन अंक समाप्त करणें हें काम प्रतिभावान् कवी-शिवाय होणें कठीण आहे. म्हणूनच कालिदासाला 'कविकुलगुरुः कालिदासो विलासः' असें एका कवीनें अनुरूप विशेषण देऊन आपली रसिकता व्यक्त केली आहे.

अर्वाचीन काळाला अगदीं योग्य असा उपदेश कालिदासानें या अंकांत दिला आहे. तुमचीं मतें कांहीं कां असेनात ! तुमचें शील व वर्तन इतकें उत्तम पाहिजे कीं विरुद्ध बाजूच्या लोकांस देखील तुमच्याविषयीं 'ब्र' काढण्याची छाती होतां कामा नये. असाच पुरुष या सर्वथैव अपूर्ण व भविष्यकालविषयीं अज्ञ जगांत पुरुषोत्तम म्हणण्यास योग्य आहे. विद्यार्थिदशेंत म्हणजे सन १८९०।९१ सालच्या सुमारास माझे गुरु लोकमान्य टिळक व सुधारकाग्रणी आगरकर यांचा जो विरोध व खटका दृष्टीस पडे तो इतका कीं दर आठवड्याचा 'केसरी' व 'सुधारक' सोमवार व मंगळवार या दोन दिवशीं केव्हां येतो अशी लोकांना उत्सुकता व हुरहूर वाटत असे. मंगळवारीं टिळकांचें उत्तर वाचून त्याचें आगरकरांकडून पुढल्या सोमवारीं प्रत्युत्तर यावयाचें. तें वाचण्याची तर वाचकांना उत्कंठा. तेव्हां हे मधले ५।६ दिवस कसे काढावयाचे हा प्रश्न प्रत्येक वाचकापुढें असावयाचा ! असा हा टिळक आगरकरांचा विरोध सात्त्विक व दोन्ही बाजू विद्वत्तेनें व शीलानें सारख्याच युक्त असल्यानें मनास उत्तम शिक्षण देणारा होता, व त्यापासून एकच अनुमान व सत्य प्रादुर्भूत होऊन अगदीं निश्चयाची खूण प्रत्येक वाचक स्वतःशीं बांधून ठेवावयाचा, कीं या जगांत अशीं भांडणें अगदीं साहजिक आहेत व त्यांचा निकाल या जगांत कधींहि लागावयाचा नाहीं. त्यांचा निकाल मारीचाच्या स्वर्गीय वातावरणांतच लागावयाचा ! मनुष्यजातीला शेवटलें निकालाचें वाक्य देणें शक्य आहे तें इतकेंच कीं, 'He acted according to his lights' तो आपल्या मतानें व दृष्टीनें योग्य वागला. हें तत्त्व कालिदासानें मोठ्या कलेनें या पांचव्या अंकांत गोवून या जगाचें अपूर्णत्व व मर्यादितत्व यांचें जिवंतचित्र आपल्यापुढें ठेविलें आहे. इतर कोणत्याहि कवीला तें साधलें नाहीं. आतां हा विचार सोडून अर्वाचीन मनाला त्रास देणारा व ज्याच्यावर सुधारक व दुर्धारक या दोघांचीहि निर्वाणीची झुंज चालली आहे त्या प्रश्नाविषयीं थोडेंसें लिहितों. स्त्रीशिक्षण व स्त्रियांचें स्वातंत्र्य हाच तो विषय होय.

कालिदासाचीं मतें हल्लींच्या समंजस सुशिक्षित मनुष्याप्रमाणें स्त्रियांविषयीं उदारपणाचीं आहेत. राजानें हव्या तितक्या बायका कराव्या असें त्याचें मत नव्हतें. परंतु नाटककार हा ज्या वेळचें नाटक लिहितो त्यावेळच्या परिस्थितीचा तो दास असतो. म्हणून दुष्यंताला पुष्कळ बायका होत्या असें त्यानें वर्णन केलें आहे. त्यावेळेस यवनीदेखील दासीप्रमाणें बाळगीत असत. पण राजा हा विषयी

नसून त्यावेळच्या धर्मशास्त्राप्रमाणेंच त्याचें वर्तन सदाचरणी असे. इतकेंच नव्हे तर Character increases insight and insight increases character. असें जें हल्लींचा नीतिशास्त्रज्ञ मार्टिनो म्हणतो त्याप्रमाणें राजाचें सहज वर्तन देखील नीतिशास्त्रानुसारच घडत असे असें 'प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः' या दुष्यंताच्या वाक्यावरून उघड होतें. म्हणून पांचव्या अंकांत जो राजाला वियोग झाला तो पहिल्या तीन अंकांत त्यानें जो उल्लूपणा दाखविला त्याची शिक्षा आहे असें तत्त्व रवीन्द्रनाथ टागोर व डॉ. वेलवलकर यांनीं काढिलें आहे. जर कालिदासाच्या नाटकावरून स्त्रियांच्या उत्तमाधमदशेचें अनुमान काढावयाचें असेल तर शकुंतलेप्रमाणें विवाहित पतीशीं कितीहि संकटें आलीं तरी पातिव्रत्यधर्मानें मनानें व शरीरानें राहणारी स्त्री उत्तम वर्गांत गणिली पाहिजे. मध्यम म्हणजे मनानें कित्येक वेळां पातक होत असेल, पण शरीरानें कधींहि पातिव्रत्यधर्म न मोडणारी स्त्री होय. तिसरी अधम म्हणजे स्वैरिणी. आतां कालिदासाला विधवांचा पुनर्विवाह कबूल होता कीं नाहीं या प्रश्नाचें उत्तर समंजस वाचकाला सहज काढतां येईल. कालिदासाच्या वेळेस लहानपणीं लग्न न झाल्याकारणानें अक्षतयोनि विधवेचा पुनर्विवाह करावा कीं नाहीं हा प्रश्नच निघणें अशक्य होतें. मनूनेंहि फक्त पुनर्विवाहितास श्राद्धास सांगूं नये असाच उदारपणाला शोभेल या रीतीचा निर्बंध घातला आहे. या मनूच्या धर्मशास्त्राप्रमाणें अक्षतयोनि विधवेचा पुनर्विवाह कालिदास हल्लीं असता तर त्याला मान्यच झाला असता. जसें विधियुक्त ब्रह्मचर्य ठेवणारा विवाहित गृहस्थ हा खरा ब्रह्मचारीच असें म्हटलें पाहिजे, तसें अक्षतयोनि विधवेचें लग्न म्हणजे पहिलेंच लग्न असें उदार कालिदासानें म्हटलें असतें याविषयीं संशय नाहीं. मध्यम विधवा म्हणजे मुलें झाली असून देखील कामशांत्यर्थ विवाह करणारी विधवा व अधम म्हणजे स्वैरिणी असा त्याच्या ग्रंथांवरून कयास काढिला तर तो निःशंकपणें ग्राह्य आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. एखाद्याच्या नाटकग्रंथांवरून अशीं अनुमानें काढणें म्हणजे बरेंच धाष्टर्य आहे. कवि हे तत्कालची परिस्थिति हुबेहुब वर्णन करितात. त्यांत कवीच्या दृष्टीनें उत्तम कोणतें, मध्यम कोणतें व अधम कोणतें याचें अनुमान काढणें जरा साहसाचें व वेडेपणाचें आहे हें मला कबूल आहे. पण हा वेडेपणाच पत्करून मी हें आज थोडेसें साहस केलें आहे. त्याची मला तुजसारखे रसिक क्षमा करितील अशी आशा आहे.

माझे मित्र नानासाहेब माईणकर हे वानप्रस्थाश्रम घेऊन प्रो. कर्वे यांच्या महिलाश्रमांत निष्काम सेवा करीत आहेत ही तुझी बातमी ऐकून फार संतोष वाटतो. त्यांच्या या कामगिरीस अनुसरून त्यांनीं व्यवहारचंद्रिका नांवाचा सुभाषितसंग्रह केला आहे. तें पाठविलेलें पुस्तकहि आलें तें सपाट्यासरशीं वाचूनहि टाकिलें. संस्कृतमधला ' सुभाषितसंग्रह ' हा आपल्या पूर्वजांच्या अनुभवाचें नवनीत आहे. त्याला मराठी अर्थ जोडून श्री. माईणकर यांनीं संस्कृत न जाणणाऱ्या अशा बांधवांवर उपकार करून ठेविले आहेत. त्यांत कांहीं सुभाषितें आपल्या स्त्रियांविषयीं अनुदार आहेत असें कित्येकांस वाटेल. परंतु जगांत या अनुदार मताप्रमाणें वागणाऱ्या स्त्रिया जोपर्यंत आहेत तोपर्यंत असलीं सुभाषितें हीं स्वयंपाकांतल्या फोडणीप्रमाणें रुचकर लागतात. परंतु मुख्य पक्वान्नांचा उत्तमपणा त्यामुळें बिघडत नाहीं. उलट तीं पक्वान्नें जास्त रुचकर लागतात. नानासाहेबांनीं आपल्या निष्काम सेवारूप चतुर्थाश्रमाचा असाच सदुपयोग करावा अशी त्यांस मित्रत्वाची सूचना करून हें पत्र संपवितो. "



# १०

# 'महाराष्ट्र-शाकुंतल' व 'राजाचें बंड'

" मित्रा, आज बरेच दिवसांनीं तूं मला भेट पाठविलीस; ती भेट म्हणजे बर्फी-पेढ्यांसारखीच गोड आहे. फलटणचे सरन्यायाधीश के. वि. गोडबोले यांनीं केलेलें शाकुंतलाचें मराठी भाषांतर व त्र्यंबक सिताराम कारखानीस यांनीं रचिलेलें 'राजाचें बंड' ही दोन्हीं पुस्तकें मला पेढ्यांपेक्षां गोड वाटलीं. आजपर्यंत झालेलीं शाकुंतलाचीं भाषांतरें वाचलीं म्हणजे कालिदासाचें तात्पर्यच नुसतें कळत असे. परंतु गोडबोले यांचें भाषांतर मराठी भाषा बोलणारा प्रति कालिदासच आपल्यापुढें उभा करितें. 'स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कर्वी जन्मती' ही जी केकावलींत मोरोपंतांनीं मनापासून प्रार्थना केली आहे तिचें साफल्यच आज गोडबोले यांनीं करून दाखविलें आहे यांत संशय नाहीं. मी आज पांचसहा वर्षें शाकुंतलाचेंच पारायण करितों आहे. पण गोडबोल्यांनीं मला जो आनंद दिला तसा आनंद आजपर्यंत मिळाला नाहीं. वडिलांची कालिदासभक्ति पुत्रांत मूर्तिमंत उभी राहून तीच संस्कृताच्या ऐवजीं तेच शब्द मराठींत बोलते आहे असा अनुभव प्रत्येकाला येतो. या भाषांतरानें खरें भाषांतर कसें असावें याचा कित्ताच गोडबोले यांनीं लोकांपुढें ठेविला आहे. हें काम किती महत्वाचें आहे याचे इंगीत परकी भाषेचे भाषांतरकार वर्गांत शिकविणाऱ्या शिक्षकास किंवा भाषांतर करूं लागलेल्या ग्रंथकारासच माहित. या ग्रंथामध्यें गोडबोले यांनीं आपलें मराठी भाषेवरील प्रभुत्व चांगलेंच दाखविलें आहे. हें भाषांतर जवळ असलें म्हणजे कालिदासाच्या शाकुंतलाची संस्कृत प्रत मूळ श्लोक व त्याचें भाषांतर किती हुबेहूब उठलें आहे हें पाहून आनंद भोगण्यासाठींच ठेवावयाची. मला वाटतें प्रत्येक कुटुंबीयानें या पुस्तकाचा संग्रह करून आपल्या मुलांस कालिदासाचा परिचय करून द्यावा. प्रो. रानडे यांची प्रस्तावना ही त्यांच्या विद्वत्तेला व मार्मिकपणाला साजेशीच आहे. पण स्वतः गोडबोल्यांनीं भाषांतरपरिचय व शाकुंतल परिचय यांत आपले जे विचार प्रकट

केले आहेत ते फारच गंभीर व मार्मिक आहेत. आपल्या लोकांत ' काव्येषु नाटकं रम्यं नाटकेषु शकुन्तला तत्रापिच चतुर्थोऽकस्तत्र श्लोकचतुष्टयम् । ' अशी शाकुंतलाच्या चौथ्या अंकाची प्रसिद्धि व स्तुति केलेली आढळते. पण पाचव्या अंकांत दोन तुल्य धर्मशील माणसांचें जें कडाक्याचें भांडण कालिदासानें फार कुशलतेनें वर्णन केलें आहे त्याविषयीं आजपर्यंत कोठें कांहीं लिहिलेलें आढळलें नाहीं. परंतु हा महत्वाचा मुद्दा रा. गोडबोले यांच्या लक्ष्यांत आल्याशिवाय राहिला नाहीं. आपली या जगांतील कांहीं कांहीं भांडणें अशाच तऱ्हेचीं असतात. त्यांचा निकाल या जन्मांत लागणें कठीण. त्यांचा निकाल मारिचाश्रमासारख्या निस्त्रैगुण्याच्या वातावरणांतच लागावयाचा ! या भांडणाच्या अत्युत्कृष्ट मांडणीनेंच मला असें म्हणावेसें वाटतें कीं, शाकुंतलाच्या चौथ्या अंकापेक्षां कला या दृष्टीनें पांचवा अंकच जास्त सुंदर व मार्मिक आहे.

' राजाचें बंड ' याला ग्रंथकारांनीं ' एक मनोराज्य ' असेंच म्हटलें आहे. तेव्हां तें वस्तुस्थितीशीं किती जुळतें हें टीकाकाराला कधींच विचारतां यावयाचें नाहीं. तरी पण रा. कारखानीस यांनीं फार मनोरम असें सुखस्वप्न आपल्यापुढें ठेविलें आहे. तें वाचून कोणालाही क्षणभर आपण उच्च वातावरणांत वावरतों आहों असेंच वाटेल. त्यांच्या मनोराज्यांत गरिबांत वाढलेला व गरिबांच्या हिताकरितां झटणारा असा ' दीनदास ' प्रत्यक्ष राजकुमारीला वरितो व वत्सलामाईसारखी विश्वानंदासारख्या स्वामीची मुलगी प्रत्यक्ष राजाला वरिते हीं सुखस्वप्नें अनुभवापासून फारशीं दूर नाहींत. फक्त राजाचा व प्रजेचा दृष्टिकोण बदलला पाहिजे, व तें करण्याकरितांच ग्रंथकारांनीं हें नाटक रचिलें आहे. हें नाटक रंगभूमीवर चांगलेंच वठतें अशी कीर्ति मी दुरून ऐकतों. तेव्हां आगमप्रयोगनिपुणत्व ग्रंथकाराच्या अंगीं अगोदर होतेंच तें या नाटकरूपानें उसळून बाहेर पडलें इतकेंच. या सुखस्वप्नाच्या विरुद्ध ' जर तर ' असे संकेतार्थी वापरलेले व जगांतील सर्व सुखांच्या आड येणारे असे दोन डोंगर आलेले आहेत. पण हे दोन डोंगर चढावाचे खास नाहींत. कवीनें या सुखस्वप्नांत ' शशविषाण ' किंवा ' खपुष्प ' यासारखे वस्तुस्थितीशीं अगदीं विरुद्ध केवळ कल्पनेचे खेळ असे दाखविले नाहींत, तर वस्तुस्थितीशीं सुसंगत अशीं हीं सुखस्वप्नें आहेत. केवळ कल्पनेचे विलास म्हणून त्यांनीं माणसांना पंख लाविले नाहींत, किंवा स्त्रिया केलेल्या नाहींत ! फक्त राजा लोकमताचा उत्तम प्रतिनिधी—पहिल्यांदा नव्हे—तर पश्चात्तापानें दग्ध होऊन पावन झालेला, वस्तुस्थिति

पाहून नंतर मग जागा झालेला असा कल्पिला आहे. हें कल्पकत्व हिंदु कल्पनेच्या अगदी विरुद्ध नाहीं. रामाला गादीवर बसवितांना देखील दशरथानें लोकांचें मत घेऊनच त्याला गादी दिली असा उल्लेख रामायणांत आहे. या रामायणानें उल्लेखिलेल्या परंपरेलाच धरून आपलें सुखस्वप्न रा. कारखानीस यांनीं लोकांपुढें मांडलें आहे तें अशक्य कोटींतलें नाहींच नाहीं, तर उपदेश ठसल्यावर लोक व राजा यांचा दृष्टिकोण बदलल्यावर तें सुखस्वप्न जागृतावस्थेंत देखील अनुभवास येण्यासारखें आहे. अशीं सुखस्वप्नें पडावयाला लागलीं हें राष्ट्राला शुभशकुनासारखें आहे. हें सुखस्वप्न पहिल्यानें रा. कारखानीस यांस पडलें याबद्दल त्यांचें मनापासून अभिनंदन केलें पाहिजे.

या दोन नाटकांवरून मला एक महत्वाचा प्रश्न सुचत आहे. तूं वाङ्मयाचा अभ्यासी म्हणून तो तुझ्यापुढें ठेवावासा वाटतो. साऱ्या हिंदु नाटकांमध्यें शोकपर्यवसायी नाटकें मुळींच सांपडावयाचीं नाहींत. सर्व नाटकें सर्व संसार आनंदमय आहे अशाच स्वरूपाचीं. नाटक जर संसाराचें हुबेहूब चित्र होय, तर मग त्यापासून दुःखाची ही आत्यंतिक हकालपट्टी केलेली पाहून व इंग्लंडचा कवितारमणीचा विलासरूप शेक्स्पिअर यानें तर आपल्या शोकपर्यवसायी नाटकांनींच त्रिखंड कीर्ति अजरामर केली आहे हें पाहून आमच्यासारख्या वाङ्मयभक्तांना थोडासा विषाद वाटणें साहजिक आहे. याला मला वाटतें मोठें प्रबळ कारण म्हटलें म्हणजे कल्पनासृष्टींत तरी मोक्षाची कल्पना, सर्व आनंदमय—नारायण—स्वरूप संसारांत खरी करून दाखवावी. 'वचने किं दरिद्रता' या न्यायानें कल्पनाच करावयाची तर अशी दरिद्री कल्पना कशाला करावयाची अशी सर्व हिंदूंची समजूत असावी. शिवाय बेकननें म्हटल्याप्रमाणें कवितेचा उगम जर वस्तुस्थितींत दुःख असतें तें काढून टाकावें व सर्व संसार आनंदमय दाखवावा या मानवी इच्छेंत आहे, तर नाटकेंही कल्पनानिर्मित असल्यामुळें हिंदु संस्कृत कवींस भारतादिकांनीं शोकपर्यवसायी असतां कामा नये असा निर्बंध घातला असावा असें मला वाटतें. बरें आनंदपर्यवसायी हा मराठी शब्द Comedy या इंग्रजी शब्दाचें भाषांतर आहे. पण तें बरोबर आहे असें मला वाटत नाहीं. तसेंच Tragedy शब्दाचें सर्वसाधारण 'शोकपर्यवसायी' असें चुकीचें भाषांतर करितात. पण Comedy चा अर्थ हास्यरसात्मक आणि Tragedy चा अर्थ शोकमिश्र किंवा करुणरसात्मक असाच करावा असें कोशकार देखील सांगतात.

या दृष्टीनें 'शाकुंतल' हें नाटक Tragedy किंवा उदात्तकरुणरसात्मक आहे असें रसिक वाचकांस वाटल्याशिवाय राहणार नाहीं. तसेंच उत्तररामचरितांत देखील करुणरसाचा अतिरेक आहे, तरी तें शेवटीं आनंदपर्यवसायीच झालेलें आहे; तेव्हां त्यासहि 'Tragedy' किंवा करुणरसात्मक असेंच म्हटलें पाहिजे. म्हणजे खऱ्या अर्थानें संस्कृत नाटकांत Tragedy नाहीं हें म्हणणें निर्मूल आहे. पण Tragedy शब्दाचा जनरूढीला अनुलक्षून अर्थ केला तर मात्र संस्कृत नाटकांत शोकपर्यवसायी नाटक नाहीं असेंच म्हणणें प्राप्त आहे. पण माझा पूर्वीचा प्रश्न तसाच राहतो. हिंदु धर्माची अशी ठेवण कां, कीं तें नेहमींच नाटकांत तरी आनंदपर्यवसायी असावें ? तर इतिहासाविरुद्ध हिंदु मनाचें हें बंड आहे किंवा दुसरें कांहीं तरी गूढ कारण असावें ?

बरें, नाटकांतच ही प्रवृत्ति दिसली तर बेकनच्या काव्याच्या व्याख्येप्रमाणें या प्रश्नाचें स्पष्टीकरण झालें असतें. पण महाभारतासारख्या इतिहासमिश्र काव्यांत ही प्रवृत्ति चांगलीच बळावलेली दिसते. सावित्री व नळराजा या गोष्टींचेंहि पर्यवसान आनंदरूपी आहे. या सावित्रीच्या गोष्टी विषयीं मी पुष्कळ विचार केला आहे, व मला अर्वाचीन दृष्टीनें असें म्हणावेंसें वाटतें कीं, हीच गोष्ट आनंदपर्यवसायीच करावयाची तर सावित्रीनें आजन्म विधवा पतिव्रतेचें व्रत पाळून शेवटीं शेवटीं तिला शंकर प्रसन्न होऊन त्यांनीं असा वर दिला असता कीं ज्या बायका हें तुझें व्रत करतील त्यांना अखंड सौभाग्य मिळेल व तुला विमानांत नेऊन तुझा पति स्वर्गांत भेटेल असें मी करतों, तर मरणानंतर अंगुष्ठमात्र लिंगदेहाला प्रत्यक्ष नेणाऱ्या यमराजाला येण्याचें कांहीं कारण नव्हतें. शिवाय या कल्पनेंत लोकांच्या मताला किंवा मनाला कोठेंच धक्का बसण्यासारखें कांहींही नव्हतें. तेव्हां हा प्रश्न तुझ्या-सारख्या वाङ्मयाच्या भोक्त्यापुढें ठेवावा म्हणून त्याचा नुसता उल्लेख केला आहे. माझा कायमचा निश्चय झाला आहे असें समजूं नकोस. तूं पाठविलेलें 'इटालियन तत्वज्ञानी व्हिको यांचें चरित्र व उद्घाटन' हें पुस्तक कालच पोंचलें. त्या विषयीं मी पुढच्या एकाद्या पत्रांत लिहीन. हीं पुस्तकें इतक्या भराभर पाठवितोस तर तुझ्या मनांत तरी काय आहे ? मी कांहीं योगारूढ नाहीं कीं पुस्तक हातांत आल्याबरोबर त्यांत काय आहे हें मला ताबडतोब कळावें."

## ११

# 'इटालियन तत्त्वज्ञानी व्हिको (१६६८–१७४४)'

"मित्रा, मागील पत्रांत मी इटालियन तत्वज्ञानी व्हिको याजविषयीं लिहिण्याचें कबूल केलें होतें. त्याप्रमाणें आजच्या पत्रांत त्या तत्वज्ञाचें थोडक्यांत चरित्र व त्याच्या तत्वज्ञानाचें स्वरूप याजविषयीं कांहीं विचार तुझ्यापुढें मांडण्याचें योजिलें आहे. व्हिको हा कांहीं कोणत्याही युनिव्हर्सिटींत गेला नाहीं. त्यानें घरींच अभ्यास केला. तो इतका काळजीपूर्वक व नियमानें केला कीं त्याला नेपल्स येथील युनिव्हर्सिटींत पहिल्यानें 'वक्तृत्व' या विषयावर प्रोफेसर नेमलें व मरेपर्यंत त्यानें तेथेंच आपलें आयुष्य घालविलें. त्याच्या आयुष्यांत ग्रंथलेखनाशिवाय कोणत्याही घडामोडी झाल्या नाहींत. त्यानें आपली बायको, दोन मुलगे व एक मुलगी यांच्याशीं मोठ्या प्रेमानें वागून बेताबाताचा संसार केला. त्याचा थोरला मुलगा वाईट निघून त्याला कैदेची शिक्षा झाली होती. पण दुसरा मुलगा चांगला निघाला. व्हिको मेल्यानंतर त्याची कॉलेजांतील 'वक्तृत्वा'ची' प्रोफेसरी त्याच्या ह्या दुसऱ्या मुलासच मिळाली.

पहिल्या प्रथम ही गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे कीं, व्हिकोची जी कीर्ति झालेली आहे ती त्याचा जो तत्वज्ञानात्मक ग्रंथ आहे त्याच्यावर मुळींच नाहीं. तो नेहमीं नेपल्सच्या श्रीमंत लोकांवर कविता करित असे. त्या कविता अवास्तव स्तुति व खुशामत यांनीं भरलेल्या असत. त्या कविता अलंकार व इतर साहित्याच्या खुब्या यांनीं रंगवलेल्या असत. सर्व जनसमूहाला त्या कविता फार आवडत असत, व त्यामुळेंच त्याला कॉलेजांत प्रोफेसराची जागा मिळाली. पण ही कवि म्हणून मिळविलेली कीर्ति वस्तुतः युरोपियन विद्वानांपुढें टिकली नाहीं. त्याची खरी योग्यता पुढें त्यानें जो 'नवें शास्त्र' नांवाचा मोठा ग्रंथ लिहिला त्यावरूनच युरोपियन विद्वानांनीं ठरविलेली आहे. याच्यावरून असें एक अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं, मनुष्याची कीर्ति कित्येक वेळीं भलत्याच गुणाबद्दल होते. त्याचा

खरा गुण असतो तो निराळाच असतो. त्याच्या कविता आज कोणी वाचीत देखील नाहीं. परंतु त्याचा 'नवें शास्त्र' हा ग्रंथ यूरोपांत प्रत्येक तत्वजिज्ञासु जवळ बाळगितो व व्हिकोचा हा ग्रंथ वाचल्याशिवाय तत्वज्ञानामध्यें तो प्रवीण आहे असें मोठमोठ्या युनिव्हर्सिट्यांत देखील म्हणत नाहींत. तो स्वतःहि असेंच म्हणतो. 'माझा पैसा मिळविण्याचा धंदा निराळा व माझ्या आवडीचा विषय निराळा. माझ्या कवितांनीं मला स्वस्त कीर्ति व मुबलक द्रव्य दिलें आहे. पण माझा 'नवें शास्त्र' हा ग्रंथ मला शेवटीं विद्वानांकडून मान्यता देईल.' एका विद्वानानें तर असें म्हटलें आहे कीं, ज्याच्या उदात्त चारित्र्यापुढें राजे लोकांनीं लोटांगण घालावें त्यांनीं यःकश्चित् शीलाच्या श्रीमंत लोकांची अशी खुशामत करून पैसा घ्यावा हें व्हिकोपेक्षां नेपल्सच्या लोकांना लांछन आहे ! यावरून 'त्वं राजा वयमप्युपासितगुरुप्रज्ञाभिमानोन्नताः । मयाप्याख्याता न ते चेद्वयमपि सुतरामेषराजन्गतोऽस्मि' अशा निस्पृहबाण्यानें वागणारांची भर्तृहरीनें केलेली स्तुति लक्ष्यांत घेतां आपला देश रानटी लोकांचा नाहीं, फार उच्च हवेंत राहणारा आहे हें सिद्ध होत नाहीं काय ? परंतु हें बोलून उपयोग काय ? आमचे बापजादे हे मोठमोठ्या हुद्द्यावर होते हें बोलणें जसें आचाऱ्याचा धंदा करणाऱ्याला शोभत नाहीं, तद्वतच खुशामती करून व अपमान सोसून सरकारी नोकऱ्या करणाऱ्या आम्हांला भर्तृहरीच्या निस्पृहतेवरील स्तुतीच्या कविता म्हणतांना लाज वाटली पाहिजे. अस्तु. आतां 'नवें शास्त्र' या ग्रंथांत आपल्या देशाला उपयुक्त असें काय तत्वज्ञान आहे या मुद्याकडे वळूं.

'नवें शास्त्र' या ग्रंथाला वास्तविक 'इतिहासविषयक तत्वज्ञान' असें नांव द्यावयास पाहिजे. जगांतील सर्व राष्ट्रांच्या प्रगतीचें चक्र सारखेंच फिरतें, व त्याचीं युगेंहि सारखींच पडतात. मनुष्यस्वभाव सर्व पृथ्वीभर सारखाच आहे. तेव्हां व्हिकोनें सर्व राष्ट्रांना ज्या युगांतून जावें लागतें त्या युगांचे तीन विभाग कल्पिले आहेत. पहिलें युग देवाचें. ह्याला अव्यक्त किंवा अस्पष्ट युग म्हणावयाचें. सर्व सृष्टींतील पदार्थ हे देवतारूप आहेत. त्या देवता प्रसन्न झाल्या म्हणजे मनुष्याचें त्या कल्याण करितात; रागावल्या म्हणजे मनुष्याचें अकल्याण करितात. आपला ऋग्वेद वाचला म्हणजे त्या देवतांचें स्वरूप आपणांस चांगलें कळतें. रुद्र ही देवता देवांच्या क्रोधाची द्योतक आहे व उषा ही देवता देवांच्या प्रसन्नतेची द्योतक आहे. या काळांत राष्ट्रांतील सर्व लोक यज्ञयागांत

गुंतलेले असतात. पुढील युग म्हटलें म्हणजे पौराणिक वीरांचें. महाभारतांतील पांडव, रामायणांतील राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न, इलियड व ओडेसी हीं सर्व या वीरांच्या पराक्रमांची वर्णनरूप होत. तिसरें युग ऐतिहासिक पुरुषांचें. आतां प्रश्न असा उद्भवतो कीं, या युगांचें व डार्विन, लामार्क यांच्या विकासाचें तत्व यांचा संबंध काय ? कारण व्हिको याचा या विकासतत्त्वावर चांगलाच भरंवसा होता. कांहीं कांहीं विद्वान तर व्हिको हा डार्विन याचा पूर्वगामी असेंहि म्हणतात. तर या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, या युगांचें तत्व विकासवादाचेंच एक रूप आहे. देवांच्या युगापूर्वी मनुष्य हा एक रानटी पशु होता. तो पशूंप्रमाणेंच चार पायांवर चालत असे. प्रसिद्ध इतिहाससंशोधक विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं चित्रमय जगतांत कांहीं वेदविषयक लेख लिहिले आहेत. त्यांत त्यांनीं वेदांतील पशुस्वभावाचीं निदर्शक अशीं स्त्रीपुरुषांचीं कृत्यें वर्णन केलीं आहेत. त्याचा कांहीं वेदशास्त्रशून्य व इतिहासशून्य लोकांना अतिशय राग आला. पण विकासवाद खरा असेल–व तो आहे अशी बऱ्याच अर्वाचीन विद्वानांची खात्री झालेली आहे–तर व्हिकोप्रमाणेंच राजवाड्यांची देखील अशी समजूत दिसते कीं, विकासवादाप्रमाणें मनुष्यजात जास्त जास्त सुधारत चालली आहे. पूर्वींच्या काळीं हल्लींपेक्षां कांहीं अंशीं मनुष्यजातीची स्थिति जास्त श्रेष्ठ असेल पण पश्वावस्था पुष्कळ काळपर्यंत गेली नव्हती त्याचींच द्योतक राजवाड्यांनीं दिलेलीं ऋग्वेदांतील कृत्यें आहेत. देवांच्या युगांत पराक्रम फार होत, तर पशूंचीं कृत्येंही जास्त होतीं. आतां पराक्रम कमी आहे तर पशूंचीं कृत्येंहि कमी आहेत. मित्रा, खरें म्हणशील तर हा विकासवाद तंतोतंत मनुष्यजातीस लागू करणें म्हणजे निव्वळ वेडेपणा आहे असें मला वाटतें. ऋग्वेदांत कांहीं सूक्तांमध्यें पशूंचीं कृत्यें वर्णन केलीं असतील यांत संशय नाहीं. पण सातव्या मंडळांतील वसिष्ठानें केलेली भक्ति व त्यानें लिहिलेलीं स्वतःच्या मनःस्थितीचीं वर्णनें इतकीं उच्च दर्जाचीं आहेत कीं, हीं पशुकृत्यें व ही उच्च दर्जाची नैतिक अवस्था हीं एकाच काळीं झालेलीं व विकासवादाच्या एकाच अवस्थेचीं द्योतक आहेत असें कसें म्हणतां येईल ? पण मनुष्यस्वभावाचा अनुभव घेतला तर आपल्याला असें दिसून येईल कीं एकाच माणसांत अति उच्च तत्वें व अति नीच कृत्यें राहूं शकतात. बुद्धीनें अति उच्च जो लॉर्ड बेकन तो पैसे खाण्यासारखीं अति नीच कृत्यें करितो हे इतिहासांत प्रत्यक्ष दिसतें. तेव्हां व्हिकोचें हें विकासतत्व खरें नाहीं असें कशावरून म्हणावें ?

सारांश विकास वादाचें हें परस्परविरुद्ध तत्त्व इतक्या गूढ तऱ्हेचें आहे कीं त्यावरून एक अविच्छिन्न व स्पष्ट असा सिद्धांत बांधतां येत नाहीं.

असो. होमरविषयीं व्हिको काय म्हणतो हें तुला अतिशय चमत्कारिक व मनोरंजक वाटेल म्हणून मी थोडेसें लिहितों. होमर ही व्यक्ति ऐतिहासिक नाहीं. आपल्या व्यासाप्रमाणेंच ही व्यक्ति अतिशय गूढ व अनिर्ज्ञात आहे. व्हिकोच्या मतें होमरचें काव्य हें ऋग्वेदांप्रमाणेंच अनेक ऋषींचें अपौरुष काव्य आहे. तें ग्रीक राष्ट्राच्या स्वरूपाचें द्योतक आहे. ग्रीक राष्ट्राचें युग कसें होतें याची उत्तम रूपरेषा या काव्यांत दर्शविली आहे. पण होमर म्हणून कोणी मनुष्य होता असें म्हणतां येत नाहीं.

अशीच व्हिकोची ज्यू राष्ट्राविषयीं चमत्कारिक समजूत आहे. ज्यू किंवा हिब्रू या राष्ट्रांना व्हिकोच्या युगाचें तत्त्व लागू करण्यासारखें नाहीं. तें देवाचें लाडकें राष्ट्र आहे अशीच व्हिकोची समजूत होती. मानवज्ञातीचा विकास व त्याचीं तत्त्वें हीं ज्यू समाजाला मुळींच लागू पडत नाहींत. तेव्हां हिब्रू राष्ट्र ही एक चमत्कारिक अशी राष्ट्रव्यक्ति देवानें उत्पन्न केली अशी व्हिकोची धर्मभोळेपणाची समजूत होती. इतक्या शास्त्रीय दृष्टीचा मनुष्य इतका धर्मभोळा असावा हें विकासवादाला विरुद्ध असें एक अपवादरूप उदाहरण आहे. थिऑलजी किंवा धर्मशास्त्र याला शास्त्रीय दृष्टि लावतां कामा नये असें लॉर्ड बेकन नेहमीं म्हणत असे. आपले इकडेहि धर्मशास्त्र इतकें सोवळें आहे कीं त्याला लौकिक पुस्तकांचे नियम लागू करतां येत नाहींत. या विसाव्या शतकांत अमेरिकेसारख्या अभिजात विद्याशास्त्रसंपन्न व श्रीमंत देशांत ब्रायनसारखा पंडित हा देखील बायबलमध्यें खरा इतिहास आहे असें मानीत होता. हा ब्रायन व नवे पंडित यांच्यामधील वाद हिंदुस्तानच्या लोकांना अति बोधप्रद आहे. त्याच्याविषयीं मला निश्चित कांहीं सांगतां येत नाहीं. तूं ऐहिकविद्यासंपन्न आहेस तेव्हां तुला या वादाविषयीं काय वाटतें तें मला कळीव. आतां हें व्हिको आख्यान येथेंच पुरें करितों. ”

# १२

## ‘ वाङ्मयाची कला ’

“ मित्रा, आज बरेच दिवसांनीं माझें पत्र तुला मिळत आहे. मध्यंतरीं तूं पाठविलेलें शोपेनहोरकृत “ The art of literature ” “ वाङ्मयाची कला, ” हें पुस्तक सहा महिन्यांपूर्वींच पोंचलें. आज चार पांच वर्षांत मी तुझ्या भेटीस आलों नाहीं याचें कारण, मी कांहींना कांहीं दुखण्यानें आजारी होतों. शिवाय माझे पूर्वाश्रमांतील अनुभव सगळेच बदलून गेले. तेव्हां माझी गीतेच्या पहिल्या अध्यायांत वर्णन केलेली अर्जुनाचीच स्थिति झाली. कार्लाईल हा ग्रंथकार ‘ सनातन अस्ति अथवा सनातन नास्ति ’ या दोन पक्षांमध्यें लोंवकळत राहिला असतांना कायमच्या पोटदुखीनें कसा पीडिला गेला होता हें आपण फ्रुडनें लिहिलेल्या त्याच्या चरित्रांत वाचिलें आहे. तशीच माझी गत झाली. माझी खात्री झाली कीं, उत्तररामचरितामध्यें भवभूतीनें जी वाङ्मयाची व्याख्या केली आहे तीच शेवटीं खरी ठरते. “ **ऋषे प्रबुद्धोसि वागात्मनि ब्रह्मणि ब्रूहि रामचरितम्** ” अशी कोणीकडून तरी अगदीं आंतल्या प्रत्यगात्म्याला स्फूर्ति झाल्याशिवाय कोणीहि हातांत लेखणी धरूं नये. नाहीं तर हल्लीं छापखान्यांतून डुकरांच्या पिलांप्रमाणें थोडीं कां पुस्तकें बाहेर पडत आहेत ! पण त्यांमधील एकांत तरी विचारांची ज्योति दृष्टीस पडत आहे काय ! भराभर भरमसाट विधानें ठोकून देऊन पानें भरून काढलेलीं दिसतात. वास्तविक पश्चिमेच्या विचारांची लाट इकडे येऊन आज शंभराच्या वरती वर्षें होऊन गेलीं. इतक्या वर्षांत सामाजिक चळवळी व राजकीय संक्षोभ यांची भरती कमी होऊन विचारांचा ओघ समतोल होऊं लागला पाहिजे होता. परंतु मुळांत विचार पाहिजे ना ? तर त्याचा पुढें ओघ वहाणार ! पुरुषांनाच खरें शिक्षण मिळत नाहीं तर अशा अर्धविदग्ध पुरुषांकडून बायका मात्र अर्धार्धविदग्ध होतील. मग मूळची संस्कृति गेलीच व नवीनहि मिळाली नाहीं अशा तऱ्हेची ‘ **त्रिशंकुरिव अंतरा तिष्ठ** ’

अशा अर्धवट स्थितींत बिचाऱ्या स्त्रियांनीं काय करावें ? त्यांना घरांतील संसाराचीं कामें टाकून हींच अर्धवट विचारांचीं पुस्तकें वाचीत बसावयाची पाळी आली आहे ! अशा वेळेस तूं पाठवून दिलेलें शोपेनहोरचें पुस्तक फारच कामांत्रें व उपयोगाचें आहे. प्रत्येक स्त्रीनें व पुरुषानें या पुस्तकाचीं गीतेप्रमाणें पारायणें करावीं असें मला वाटतें. प्रत्येक विचार मार्मिक व अनुभवाचा आहे. ग्रंथकार कसा असावा, त्याची लेखनपद्धति कशी असावी, तो बुद्धिमान व तरतरीत असला, तर त्याच्या मागें अरसिक व जड लोकांचे भुंगे कसे लागले असतात, जर का तो ग्रंथकार आपल्या काळाच्या जरा पुढें गेला असला तर हे भुंगे त्याला चावून चावून कसा अर्धमेला करतात; इत्यादि विषयांवर ग्रंथकर्त्यानें फार मार्मिक व सूचक विचार प्रकट केले आहेत. कांहीं विचार इतके महत्त्वाचे आहेत कीं, ते माझ्याच्यानें येथें प्रकट केल्याशिवाय रहावत नाहीं. अर्थात् त्यामध्यें देशस्थितीप्रमाणें थोडाबहुत फेरफार केला पाहिजे.

पहिल्या प्रथम या ग्रंथकारानें लिहिणारांचे तीन वर्ग केले आहेत. अगदीं खालचा वर्ग म्हणजे पैसे मिळविणारांचा. पैशाकरितां आपल्या लेखणीला शीण देणारे ग्रंथकार म्हणजे पैशाकरितां आपल्या सौंदर्याचा व देहाचा विक्रय करणाऱ्या वेश्याच होत. संसाराची वेश्या या माती करितात, तसे हे ग्रंथकार वाङ्मयाची घाण करितात. कोणत्याहि विषयाची यांना आवड नसावयाची; स्फूर्तीनें कोणत्याहि विषयाकडे हे वळावयाचे नाहींत. लिहावयाचें म्हणून लेखणी हातांत धरावयाची, आणि कांहीं तरी भरकटून काढावयाचें. मग अशांच्या ग्रंथांमध्यें खाणावळींतल्या ताकाप्रमाणें कांहीं सत्त्व नसावें यांत काय नवल ? या ग्रंथकारांची कोणत्याहि कामांत गति नाहीं असें व्हावयाचेंच नाहीं. यांना कादंबरी लिहावयास सांगा, यांचीं पात्रें तयारच आहेत. वसंतराव, ऊर्मिला अशीं गोड नांवें देऊन शंभर दोनशें पानांतून हे सहज पोहून निघतात. यांच्या नायक नायिकांना विचारांचें गाठोडें घेण्याची जरूरच पडत नाहीं. यांची नायिका उर्मिला म्हणजे तिला पतीला पत्रें पाठवितां येतील इतकें लिहितां वाचतां येण्याचें सामर्थ्य असेल अशी स्त्री. हिची सासू व सासरा अगदीं जुन्या तऱ्हेचीं असावयाचीं. सासरा म्हणजे शंकरमामंजीच व सासू म्हणजे संतसखूबाईच्या सासूसारखी. मग सासूसासऱ्यांमध्यें व सूनबाईमध्यें दररोज खटके उडावयाचे. या खटक्यांनींच पंचवीस तीस पानें भरून निघावयाचीं. पण असा एखादा ग्रंथकार निघत नाहीं कीं, जो खऱ्या सुशिक्षित बायकोचें चित्र असें

रंगवील कीं, तिचें एकंदर वर्तन व चारित्र्य अशा ' सुवर्णमध्यरेषेंत ' असावें कीं ही जुनी का नवी हें ओळखतां येऊं नये. ती ग्रंथ लिहिते व व्याख्यानेंहि देते. पण घरीं स्वयंपाक किंवा इतर घरचें काम करतांना लोकांना वाटावें कीं ही शिकलेलीच नाहीं. एकदां शंकरमामंजीचें नांव बद्दू झालें कीं, महाराष्ट्रांतील सगळेच सासरे शंकरमामंजी बनतात. त्यांना ही मध्यमवर्तनसुवर्णरेषा सांपडावयाचीच नाहीं! ग्रंथकार, कवि, नाटककार, किंवा कादंबरीकार यांच्या ग्रंथांत कोणत्याहि प्रकारच्या विचारांचा, वर्णनाचा, स्वभावपरिपोषाचा किंवा भावनांचा जेवढा अतिरेक तेवढ्या प्रमाणानें तो लेखक उथळ किंवा भाडोत्री किंवा परप्रत्ययनेयबुद्धीचाच बहुतेक असतो असें अनुमान करणें गैर होणार नाहीं. इतर देशांमध्यें दहा दहा वर्षांनीं समाजामध्यें इतके फरक होताहेत कीं, अगदीं जुन्या काळच्या मनुष्याला हाच समाज आपला हे ओळखूं देखील यावयाचें नाहीं. पण समाजांतल्या समाजांत नव्या माणसाला आपण जुनेच आहोंत व आपल्यांत कांहीं फरक नाहीं, असेंच वाटावें. याला म्हणतात खरी शारीरिक व मानसिक वाढ. जसा एखादा मनुष्य लहानाचा मोठा होतो, पण त्याला आपणांत कांहीं फरक झाला आहे असें कुटुंबांत रहात असतांना वाटत नाहीं तसेंच समाजरूपी पुरुषाचें आहे. त्याची वाढ होते व त्यांत फरकही साहजिक पडतो. पण जुनें व नवें यांची घडी इतकी बेमालूम बसविलेली असते कीं, दोहों मिळून एकच शरीर दिसतें. हाच सामाजिक वेदान्त! वेदान्त म्हणजे शून्य ब्रह्म व शून्य माया नव्हे. तो वेदान्त समाजाच्या व व्यक्तीच्या दर घडीला व हरएक कामांत दृष्टीस पडला पाहिजे. पण मी विषयाच्या भरांत कोठें वाहवलों! असे हे पैशाकरितां लिहिणारे भाडोत्री लेखक.

दुसरा वर्ग हा चोरटे विचारांच्या भाषांतरकारांचा! या दुसऱ्या वर्गाला इंग्रजी व बंगाली कादंबऱ्या फार उपयोगी पडतात. इंग्रजी व बंगाली विचार मराठींत आणतांना महाराष्ट्रीय समाजरचना कांहीं विशिष्ट आहे, हें भाषांतरकारांच्या ध्यानांतहि नसतें. इंग्रजी प्रणयविलास मराठींत आणतांना त्यांच्या ध्यानांतच नसतें कीं, महाराष्ट्रीय विनय म्हणून कांहीं खरी वस्तू आहे. प्रणयशील वधुवरें खुशाल एखाद्या बागेमध्यें उघड्या बांकावर बसून शृंगारचेष्टा करीत बसतात. एका प्रसिद्ध लेखकानें तर आपल्या कादंबरींत एक जाहिरात दिल्याबरोबर एकाची भावी पत्नी दुसऱ्या दिवशींच त्याच्याकडे येऊन थडकते. तेथें आल्यावर लागलीच त्याच्या पहिल्या बायकोचा मुलगा संभाळण्याकरितां ती खुशाल घरांतच रहाते. ही गोष्ट आपल्या

समाजाच्या चालीरीतींना धरून आहे काय? अशा विसंगत विचारांनीं खरी सुधारणा एकाच बाजूला राहून खरे सुधारणावादी देखील नाकें मुरडून दुर्धारणा-वादी बनतात. भाषांतरवजा विचार इतके बेमालूम वठले पाहिजेत कीं, एखादी कुलीन वधू आपल्या सासरच्या घरीं जशी आनंदानें व स्वस्थ चित्तानें राहून कोणा-लाहि सून कां मुलगी हें ओळखूंहि देत नाहीं त्याप्रमाणेंच हे विचार परकी समाजाचें आहेत हें वाचणाऱ्यांस ओळखूं येतां कामा नये. याचें उदाहरण म्हणजे चार पांच महिन्यांपूर्वी जातगंगेवर एका कुशल कादंबरीकारानें मनोरंजनांत एक गोष्ट लिहिली आहे. गोष्ट पहिल्यापासून शेवटपर्यंत वाचल्याशिवाय रहावतच नाहीं. व साऱ्या गोष्टींत एकहि परकी विचार घुसडून दिलेला आढळत नाहीं. ही गोष्ट वाचून अगदीं पुराणप्रिय मनुष्यालाहि शेवटीं कबूल करावें लागतें कीं, अशा प्रसंगांत जातगंगेनें आपला प्रवाह थोडा बदललाच पाहिजे. अशा गोष्टींनींच समाज हालला जातो व इष्ट ती सुधारणा नकळत घडते.

तिसरा वर्ग म्हणजे उच्च ग्रंथकारांचा. आपल्याला एखादा विषय आवडतो म्हणून अंतःस्फूर्तीनें हे ग्रंथकार लेखणी हातीं धरितात. यांच्या लेखांत कृत्रिमपणा मुळींच दृष्टीस पडावयाचा नाहीं. ते जें लिहितात तें त्यांच्या अंतरात्म्याला पटल्या-नंतरच लिहितात. अशा तऱ्हेचे उच्च ग्रंथ मराठींत अगदींच थोडे आहेत असें अगदीं कष्टानें म्हणावें लागतें. प्रत्यक्ष ज्ञान नाहीं, अनुभव नाहीं, जिवंत विचारांचा स्रोत नाहीं, तारतम्य नाहीं, प्रतिभा नाहीं, प्रेरणा नाहीं, स्फूर्ति नाहीं, असे परप्रकाशित ग्रंथकार आपल्या वाङ्मयांत भर घालून सरस कसें बनविणार? निरीक्षण, अभ्यास, मनन वगैरे गुणांच्या अभावीं छापखान्यांच्या वाढीबरोबर भाडोत्री लेखकांची वाढ आपणांत बेसुमार झालेली आढळते. पण जबाबदारीची जाणीव नसल्यामुळें दुष्ट व हीन प्रतीचें वाङ्मय निर्माण करण्यापलीकडे हे लेखक कामास येत नाहींत. उच्चप्रतीच्या ग्रंथकारांची या बिकट परिस्थितींत जोपासना होणेंच दुरापास्त झालें आहे. कामचलाऊ वाङ्मय फोंफावल्यामुळें उच्च प्रतीचें वाङ्मय मागें पडत चाललें आहे. लोकांची अभिरुचि बदलली आहे. सरस व निरस यांची पारख करून योग्य तेंच ग्रहण करावयाचें येवढी बुद्धीची तीव्रता त्यांच्यांत उरलेली नाहीं. व याचा परिणाम काय होणार हेंच कळत नाहीं. या बाबतींत लोकांना योग्य मार्गदर्शक होण्याची जबाबदारी वर्तमानपत्रकार, टीकाकार, साहित्यपरिषदा व प्रकाशक यांच्यावर येऊन पडत नाहीं काय? शेतांतील रान उपटून काढल्याशिवाय

त्यांत उत्तम पीक जोर धरत नाहीं हा विचार वाङ्मयभक्तांनीं मनांत वागवावयास नको काय ?

शोपेनहोरच्या वरील पुस्तकांत ‘ स्वतः विचार करण्याची शक्ति ’ या विषयावर एक अध्याय ग्रंथकारानें लिहिला आहे, तो मननीय आहे. ‘ मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये । यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ’ या श्लोकांत खऱ्या ज्ञानी भक्तांची लोकसंख्याच भगवान श्रीकृष्णानें दिली आहे. तीच व्याख्या विचारमार्गाकडे लाविली म्हणजे लोकसंख्येचें प्रमाण तेंच आहे असें आपणांस भासेल. एखाद्या विषयावर स्वतां विचार करावयाची तसदी घेणारा हजारांत एखादाच मिळावयाचा व त्या तसदी घेणारांत फलदायक विचार करणारा एखादाच ! शोपेनहोरनें पुस्तकें वाचून लोकांच्या चोरट्या विचारांवर व्यापार करणाऱ्या लोकांना स्वतां नाक नसून कातड्याचें कृत्रिम नाम लावणारांची उपमा दिली आहे. कृत्रिम नाकानें उत्तम किंवा वाईट वास कधींच घेतां यावयाचा नाहीं. लोकांनीं वास घेतल्याबरोबर त्यांच्या तोंडाकडे बघून त्यांनीं बरें वाईट तोंड केलें म्हणजे आपणहि बरें वाईट तसेंच तोंड करावें अशी स्थिति या कृत्रिम नाकवाल्यांची असते. आपल्या हिंदुस्थानची स्थिति, विशेषतः महाराष्ट्रियांची स्थिति, हुबेहुब अशीच आहे. एकदां स्त्रीशिक्षणाची किंवा शिकलेल्या स्त्रियांची स्तुति एखाद्या चांगल्या माणसानें करावी म्हणजे सगळ्या देशामध्यें तसाच ध्वनि निघावयाचा. मग शिक्षण म्हणजे काय, याची या लेखकांना कल्पना कां नसेना ! शिकलेल्या बाईचे ग्रंथ कितीहि गचाळ असोत, त्यांची अपरिमित स्तुति करावयाची एवढें माहित. बरें एखाद्या बाईनें विचार करून चांगला ग्रंथ लिहिला असला, आणि ती स्वतः विचार करणारी असली, व या धंदेवाल्या स्तुतिपाठकांच्या शिळ्या विचारांच्या विरुद्ध थोडेसे विचार त्या ग्रंथांत असले, म्हणजे त्या ग्रंथाची या परप्रत्ययनेय स्तुतिपाठकांकडून इतकी सपाटून निंदा व्हावयाची कीं, त्या ग्रंथाला केराच्या टोपलींतच टाकून दिला पाहिजे. इतकी स्वतां स्वतंत्र विचार करण्याची शक्ति ही चीज या जगांत महाग व विरल आहे. या शक्तीच्या अभावीं लिहिणाराचें व जगाचें फार नुकसान होतें. लिहिणाराला लिहितांना ज्याचे विचार आदर्शभूत करावयाचे त्याची हालचाल नेहमीं डोळ्यांपुढें ठेविली पाहिजे. जर का कांहीं अज्ञात कारणानें त्या आदर्शभूत माणसाच्या डोक्यांत परिपाठांतली स्तुति किंवा निंदा आली नाहीं, तर या दुसऱ्याच्या नाकानें वास घेणाराची जी धांदल उडते ती पुसूंच नका. मग त्या स्तुतीच्या किंवा निंदेच्या

वाक्याचा कीस काढतां काढतां काळी गोष्ट असेल ती पांढरी ह्मणण्यापर्यंत पाळी येते. आम्ही डेक्कन कॉलेजांत असतांना प्रोफेसर वेन हे इतिहासाचे प्रोफेसर होते. त्यांनीं एकदां शाळेंतील एका शिक्षकाची गोष्ट सांगितली. शिक्षकानें मुलांना प्रश्न केला कीं, व्हर्जिल या कवीला कोणत्या रंगाचा घोडा आवडत होता. खरें उत्तर पांढऱ्या रंगाचा असें होतें. त्याच्या आवडत्या मुलानें ' काळ्या रंगाचा ' असें उलट उत्तर दिलें. मग पंतोजींनीं हातवारे करून त्या आवडत्या मुलाच्या मनांत ' पांढरा ' असेंच म्हणावयाचें होतें असें म्हणून त्या आवडत्या मुलाला पहिला नंबर दिला. हीच स्थिति या परतंत्र उसने विचार घेणारांची आहे. स्वतंत्र विचार करण्याची शक्ति म्हणजे शंकराचा तिसरा डोळाच आहे ही कल्पना ज्या माणसास सुचली तो खरोखरीच महात्मा असला पाहिजे. खरें शिक्षण म्हणजेच शंकराचा तिसरा डोळा. खरी न्यायबुद्धि हा देखील शंकराचा चर्मचक्षुभिन्न असा तिसरा डोळाच आहे. व स्वतंत्र विचारशक्ति हा देखील जीवाचा तिसराच डोळा आहे, व हा आला म्हणजेच जीव हा शिवरूप होतो. आपल्या जुन्या पुराणांतील कथा अशा दृष्टीनें वाचिल्या म्हणजे जो कांहीं आनंद होतो तो, मित्रा, औरच आहे. असो, पत्र फारच लांबलें. म्हणून सध्यां येथेंच थांबणें बरें. "

# स्वामी सच्चिदानंदांचे विचार

## ( धर्मविषयक )

# १

# ' सांख्ययोग व कर्मयोग '

" ......तुमचें पत्र पोंचलें. मी आपल्या एका पत्रांत स्वतःस अर्जुनाची उपमा दिल्यावद्दल आपणांस अतिशय हंसूं कोसळलें तें आपल्या पत्रांत चांगलेंच प्रतिबिंबित झालें आहे. आपल्या पत्राचा झोंक माझा अहंकार इतकी तपश्चर्या करूनहि गेला नाहीं हें दाखवून मला टोंचून वोलण्यास समर्थ आहे हें मी कबूल करितों. पण माझें पत्र गेल्यापासून तुम्ही भगवद्गीतेचीं पारायणें करूं लागलां आहां ही गोष्ट वरील गोष्टीपेक्षांही जास्त महत्त्वाची आहे, व मला त्याबद्दल आपलें अभिनंदन केलेंच पाहिजे. ' अर्जुनाचा जसा कृष्ण तसा तुम्हांला कोणी भेटला कीं नाहीं ? ' हा तुमचा प्रश्न कुत्सितवुद्धीनें केला आहे असें मी म्हणत नाहीं. पण त्यांत विनोद किंवा उपहास नाहींच असें माझें मानसिक रसायनशास्त्र मला सांगत नाहीं. ' अर्जुन हा कर्मयोगी होता; त्याला अडचण पडली तेव्हां श्रीकृष्णासारखा सांख्ययोगी मिळाला, असा आपणां सर्वांस जर मिळेल तर केवढी भाग्याची गोष्ट ! ' हेंहि तुमचें उद्गारचिन्हमंडित वाक्य माझ्या उपहासानें विटाळलें असलें तरी वस्तुस्थितीला अगदीं धरून आहे असें मला वाटतें. मला तुम्ही सांगतां तसा व माझ्या अंतःकरणाच्या भुकेला शांत करणारा असा योगी अजून मिळाला नाहीं हें मी जितक्या प्रांजलपणें तितक्याच दुःखानें कबूल करितों. पण ही भूकच मृगजलवत आहे असा जो गर्भित टोंच मारण्याचा तुमचा रोंख दिसतो तो मात्र मला बिलकुल पसंत नाहीं. आपणासारख्या तेरड्याप्रमाणें तीन दिवसांत तीन रंग दाखविणाऱ्या संसारमग्न सोळभोकांस ' कर्मयोगी ' हें नांव कितपत शोभेल याचा आपणच विचार करावा. तेव्हां आपले श्रीकृष्ण आपल्या योग्यतेला अनुरूप असेच मिळणार हेंहि तितकेंच उघड आहे ! तुम्ही अशा मासल्याचे कर्मयोगी तर आम्हीं तुमचे तितक्याच मासल्याचे सांख्ययोगी ! मी अजून वेदाभ्यासजड झालों नाहीं व विनोदविमुखहि बनलों नाहीं. पण या मर्यादेपलीकडे विनोद जाऊं न देण्याइतका योगारूढ मी खास झालों आहे.

मित्रा, आज दोनतीन वर्षें घोर तपश्चर्या करून मी काय मिळविलें हा तुझा चोरटा प्रश्न मला चांगलाच समजला आहे; त्याचेंच उत्तर मी आज जरा सविस्तर देणार आहे. अगदीं पहिली गोष्ट जी मला सांगावीशी वाटते ती ही कीं आज तीन वर्षांत मला मन मोकळें करून बोलण्यासारखा पुरुषच मिळाला नाहीं. मी जेव्हां संसारांत होतों तेव्हां देखील माझ्या मनाला हीच उणीव भासत असे. तुझ्यासारखे निष्कपट मित्र एकदोनच होते व त्यांच्याजवळ हितगुजाच्या गोष्टी करून मन बरेंच मोकळें व हलकें होत असे. पण तुझ्याजवळहि न बोलण्यासारख्या गोष्टी पुष्कळ होत्या, त्या मला कोणाजवळहि बोलण्याची सोय नव्हती. 'न मां त्रातुं तातः प्रभवति न चांबा न भवती' हें 'मालती माधवां'तील मालतीचें वाक्य कॉलेजांत वाचल्यापासून तों आजतागायत माझ्या जिव्हेवर व मनांत सारखें घोळत आहे. ज्या गोष्टी जिवलग मित्राजवळहि बोलतां येत नाहींत त्या गोष्टी इतर कोणाजवळहि बोलण्याची सोय नाहीं हें तूं जाणतच आहेस. पण अशा गोष्टी मनुष्याच्या आत्यंतिक कल्याणाच्या व जिव्हाळ्याच्या असतात हें तूं कदाचित् कबूल करणार नाहींस. अशा गोष्टी अगदीं काळ्याकुट्ट असल्या पाहिजेत व अशा असतील तर मीहि काळ्याकुट्ट स्वभावाचा असलों पाहिजे हें अनुमान तूं काढणें साहजिक आहे. पण मी तुला खास सांगतों कीं त्या काळ्याकुट्टहि नाहींत व मीहि तुझ्याशीं व इतर मित्रांशीं विश्वासघात करण्याइतका काळाकुट्ट नाहीं. पण अशा गोष्टी आहेत खास व त्या मला कोणाजवळ तरी बोलाव्या—अगदीं मन मोकळें करून ओकाव्या अशी भूक संसारांत असतांनाच भासत होती व आज तर ती इतकी तीव्र झाली आहे कीं मला जर लवकरच असा पुरुष मिळाला नाहीं तर एकतर मी वेड लागून कुचकामाचा होईन किंवा हा मेंदूचा वैताग शरीरास सहन न होऊन मी प्राणास मुकेन. या गोष्टी सर्वच चांगल्या आहेत असें मी म्हणत नाहीं. पण तुझ्याजवळ त्या बोलून माझ्याबरोबर तुला वेड लावण्याचें पातक पूर्वीच्या पातकांच्या भरीला मी कशाला घालूं? मला तुला एवढेंच दर्शवावयाचें आहे कीं, आपल्यासारख्या यःकश्चित् मनुष्याला जर सांख्ययोग्याचें एवढें वेड लागलें तर अर्जुनासारख्यानें 'शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्' असा हंबरडा फोडावा यांत नवल नाहीं. हीच गोष्ट आज तीन वर्षांच्या तपश्चर्येनें मला कळली. ती आतां जितक्या स्पष्टपणें व जोरानें ठसली इतकी पूर्वी कधींच ठसली नव्हती. आतां मी ठांसून सिद्धांतरूपानें सांगूं शकेन कीं प्रत्येक देशाभिमानी पुरुषामागें सांख्ययोग्याचें पाठबळ नाहीं म्हणूनच वारा प्यायलेल्या वासराप्रमाणें हे पुरुष शुद्ध-

हेतुप्रेरित असूनहि धैर्यहीन होऊन भटकत आहेत. मला चांगलें आठवतें कीं मी सामाजिक सभेंत एकदां बोललों व दुसरे दिवशीं सर्व दैनिक पत्रांत मला शिव्या मिळाल्या. जुन्याच्या भोक्त्यांनीं मला 'वडवाघूळ' अशी पदवी दिली व ज्वलज्जहाल सुधारकांनीं 'शेंपूट घालणारें द्विपाद श्वान' अशी पुष्पांजलि वाहिली. आणि मग तुम्हीं सर्वांनीं मला समाधानाच्या गोष्टी सांगून थोडें शांत केलें. पण मित्रा, आतां तुला खरें सांगतों कीं तुमचें समाधान मला त्यावेळेसच पोकळ वाटत होतें. पुत्रशोक झालेल्या माणसाला समाचाराला आलेले लोक जे समाधान देतात त्यापेक्षां तुमचें सांत्वन जास्त जिव्हाळ्याचें व सद्भावप्रेरित होतें हें कबूल; पण माझा अंतरात्मा त्यानें गार होईना. मला असें वाटे कीं माझ्या संतापाची कींव येऊन तुम्हीं माझ्यासारखें बोलत आहां. मला तंतोतंत न्याय देणारा पुरुष तुमच्यांत नाहीं. अशा सामर्थ्यवान् पुरुषानें माझा कान धरून माझी चूक बरोबर दाखविली असती तर त्याचें वाईट न वाटतां तुमच्या कींवेपेक्षां मला त्याच्या कान उपटण्याची किंमत जास्त वाटली असती. पण असा पुरुष त्या वेळेसहि भेटला नाहीं व अजूनहि भेटत नाहीं. माझ्या जिव्हाळ्याच्या गोष्टी कोणत्यापैकीं आहेत याची कल्पना तुला या गोष्टीवरून थोडीशी करितां येईल. कार्यांत पराभव कां झाला याची मीमांसा बौद्धिक आहे असें मी आजपर्यंत समजत होतों, पण या सर्व गोष्टींचा निकाल लावणारी शमप्रधान हवा समाजाच्या गडबडींत मिळणें कठीण ! पण तेथेंच ती खरोखर पाहिजे असते. मी कांहीं अपराध केला नसतां माझा एकुलता एक मुलगा कां जावा ? हा प्रश्न पुनर्जन्माच्या भोंवऱ्यांत नेणारा असल्यामुळें तो सोडविणारा सांख्ययोगी मिळणें दुरापास्तच. पण मी सद्भावप्रेरित काम करीत असतां माझ्याच पक्षाच्या लोकांनीं माझा संशय घ्यावा व मला दूर लोटावें व शत्रूच्या गोटांत शिरण्याइतकी नीचबुद्धि माझ्यांत नसल्यामुळें मला मनांतल्यामनांत कोंडमारा होऊन वेड लागण्याची पाळी यावी, या रोगी अवस्थेलाहि कोणी वैद्य मला समाजांत मिळूं नये म्हणजे कर्मयोग्यांस सांख्ययोग्यांची किती जरूर आहे हें नाहीं कां सिद्ध होत ? आपलें स्वतःचें शांत चित्त हाच अशा वेळीं आपला सांख्ययोगी असें तुझें सहास्य उत्तर मला येथेंच ऐकूं येत आहे. पण रोग्यांनीं आपली आपण परीक्षा करून चिकित्सा करण्याचें सामर्थ्य कोठून आणावयाचें ? व असे रोगी समर्थ किंवा समर्थ रोगी व योगी कितीसे असतील ? आज माझ्या तीन वर्षांच्या मानसिक प्रगतींत कितीतरी हेलकावे व कितीतरी आशापर्वताच्या शिखरावरून 'चारुमारुतधुतः

पतत्यधः ' या न्यायानें उलटे सुलटे शिरःपात व अधःपात मला भोगावे लागले. ते तुला सांगावेंसे वाटतात पण माझें अगदीं आंतलें मन असें सांगत आहे कीं तें तुला सांगणें हें पातक आहे. तूं आपल्यापरीनें कर्मयोग करीत आहेस व थोडासा तरी समाधानांत व सुखांत नांदतो आहेस, त्या तुला ही कर्मकथा सांगून दुःखांत लोटावें असें माझें मन मला करूं देत नाहीं. कालिदासाचें शाकुंतल हें माझा जीव कीं प्राण ! पण आतां तें पुढें धरवत नाहीं. कालिदासानें माझ्यावर अनंत उपकार केले आहेत ते मी विसरणें शक्य नाहीं. पण आज कालिदासाच्या कोशांत मला पाहिजे तो शब्द सांपडत नाहीं. इंग्रजी तत्त्वज्ञानाचे व वाङ्मयाचे उच्चतम ग्रंथ तुम्हीं आम्हीं एकत्र वाचीत होतों व तासचे तास 'काव्यशास्त्रविनोद' करीत होतों. त्या आनंदाचें व स्वर्गीय शुद्धावस्थेचें मला स्मरण झालें म्हणजे अजून रोमांच उभे राहतात व आनंदाश्रूंचा पूर येतो. पण तीं सर्व पुस्तकें मला आतां गंगेंत फेंकून द्यावींशीं वाटतात. मी अस्थितप्रज्ञ असेन, पण माझी भाषा ते ग्रंथकार स्थितप्रज्ञ असून ओळखीत नाहींत असेंच म्हणावें लागतें. तेव्हां 'स्थितप्रज्ञस्य का भाषा' हा अर्जुनाचा प्रश्न माझ्यापुढें विस्तवासारखा जळत उभा आहे. लहान मूल अस्थितप्रज्ञ असून त्याची भाषा ओळखणारी त्याची आई त्याला जर जगांत मिळते व ईश्वर देतो तर मला योग्य अशी एखाद्या स्थितप्रज्ञाची भाषा धुंडून धुंडून मला कोठेंच ऐकूं येऊं नये हें काय गूढ आहे ? ती ओळखून तरी कशी काढावी, हें सांगणारा माझ्याजोगताच एखादा लहानगा कृष्ण मला कोणी दाखवील काय ? 'किमासीत व्रजेत किं ?' अगदीं हेच माझे शब्द ! तो माझा सांख्ययोगी कसा बसतो, कोठें जातो, कोठें आहे ? हेच माझे प्रश्न ! लहानपणीं 'माझ्या रामाला आणा कोणि जा गे' असें एकतारीवर गाणारे कानफाटे माझ्या घरीं आले म्हणजे मी आईला विचारून विचारून त्रास देई कीं याचा रामा मुलगा सांडला आहे काय ? पण तो प्रश्न व तें गाणें आज माझें झालें आहे. तें मी एकतारीवर बसून रात्रीच्या रात्री गात असतो. माझ्या अंतःकरणाची हांक ऐकून मला ओ देणारा माझा राम कोणी आणून देईल त्याला मी कौसल्येपेक्षांहि जास्त कृतज्ञतेनें व कडकडून भेटेन. पण माझी भूक निवाली पाहिजे. माझें चमत्कार बघण्याचें वेड आतां अगदीं साफ निघून गेलें आहे. माझी भूक अगदीं लहान आहे. अगदीं मन मोकळें करून माझ्या अंतःकरणाचा इतिहास ज्याच्याजवळ मला सांगावासा वाटेल तोच माझा सांख्ययोगी-तोच माझा स्थितप्रज्ञ-तोच माझा सद्गुरु! 'सद्गुरूवांचूनि सांपडेना

सोय ' हें वाक्य तूं म्हटलेंस म्हणजे मी तुझी थट्टा करावी व तुला चीड येऊन तूं दोन दिवस मजपाशीं अबोला धरावास अशी माझी त्यावेळची धर्मोपहासावस्था आतां आठवली म्हणजे माझा मलाच राग येतो व स्वतःविषयीं तिरस्कार उत्पन्न होतो. आतां तुकारामाचें अनुभवाच्या मुशींत ओंतून तांबडें लाल झालेलें सुवर्णमय वाक्य माझ्या रोमरोमांत भिनून गेलें आहे व स्वप्नांत देखील तेंच वाक्य वडबडत असतों असें मला भासतें. ही भूक निवावी म्हणून मी पुष्कळ देशभक्त, लोकमान्य, प्रोफेसर, आचार्य इत्यादि पदव्या धारण करणारांकडे संसारावस्थेंत असतांनाच गेलेला आहे. पण जावें तों काय ? ' तुम्हीं तरुण आहांत; तुम्हांला अनुभवाचा पोक्तपणा येऊन टक्केटोणप्यांनीं चांगलें मुरलांत म्हणजे तुमचें तुम्हांसच कळून येईल ' हा श्रुतिबोध ऐकूं यावयाचा. मठांतील स्वामी, साधुसंत यांकडेहि खेपा घातल्या. तेथें याच्यावरचा हिमालयांतला शेलका विचार-शिलाजित वाक्य-रूपानें कानावर आदळावयाचा ! ' तुमचा अधिकार काय ? प्रश्न स्वतःचा अधिकार पाहून करावा ' अशी आमची स्वामींनीं संभावना केली कीं भोंवतालच्या चांडाळचौकडीनें ' बकैः हीही कृतम् ' या न्यायानें आम्हांला अट्टाहासाच्या सात मजली फूत्कारानें वेडे नसून वेडे करण्याचा प्रयत्न करावा. येथें हिमालयांत तर कित्येक भस्ममालांकित नग्नाधीशांच्या भेटींत गांजाच्या धुरांत शब्द नाहींसे होऊन आम्हांला स्वतःलाच ज्ञानवल्लीचा प्रसाद बळजबरीनें घशांत कोंबून घेण्याचा प्रसंग येऊं लागला. म्हणजे मला भेटलेले सर्वच लोक ढोंगी व कुत्सित होते असा माझ्या बोलण्याचा उद्देश नाहीं. पण माझा रोग माझ्या अंतःकरणाच्या नाडीपरीक्षेनें किंवा इतर उपायांनीं ओळखून मला खूण देणारा पुरुष भेटला नाहीं. भोंदूंच्या सांथीवर कडक लिहिणारे लोक सद्भावपूर्ण असले तरी ते अगदीं चुकत आहेत अशी माझी आतां वालंबाल खात्री झाली आहे. मी पाहिलेल्या तीन चतुर्थांश लोकांत योगसिद्धि प्राप्त झालेले व खरा मार्ग सांपडल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या आत्मविश्वासाचें व निर्भयतेचें तेज दाखविणारे योगी मला बरेच ठिकाणीं दृष्टीस पडले हें मी शपथेवर सांगेन. पण त्यांचा मला उपयोग झाला नाहीं. परवां रात्रींच मी ध्यानस्थ बसलों असतां एकाएकीं मला चमत्कारिक विकार उत्पन्न झाला. मी संसारावस्थेंत असतांना मला हा विकार होणें साहजिक होतें पण मी आज तीन वर्षांत या विकारावर इतका जय मिळविला होता कीं, मी अगदीं निर्भयावस्थेंत घोरत पडलों होतों. पण एकाएकीं असा विकार उत्पन्न झाल्याबरोबर आशेच्या

कळ्यावरून मी निराशेच्या खोल दरींत एकदम पडल्यासारखा झालों. ' विश्वामित्राची साठ हजार वर्षांची तपश्चर्या फुकट गेली मग आमच्या तीन वर्षांच्या तपश्चर्येचा भंग व्हावा यांत नवल काय ? ' असा तुझा शेलका जवाब येईल हें काय मी जाणत नाहीं ? पण मला निराशा सोडीना. आतां ही अवस्था कोणाला सांगूं ? तोंड बांधून बुक्कयांचा मार ! गंगेंत तीन प्रहर डुंबलों, शरीर थंड झालें. पण मन काय मला आंवरणार ? आतां पुन्हां लग्न करावयाचें कीं काय ? हा प्रश्न मनांत आल्याबरोबर मात्र खरोखर मी घाबरलों. कारण पुन्हां संसारांत पडावयाचें नाहीं अशी गीतेवर सातदां हात ठेवून मी प्रतिज्ञा केली होती. शेवटीं ' विद्धि एनं हि वैरिणं ' या मंत्राचा जप करीत आज दोन दिवस बसलों आहे. तुझें पत्र आलेलें दृष्टीस पडल्याबरोबर मी तें कितीतरि वेळां वाचलें ! चमत्कार सांगतों कीं खरोखर माझा विकार थांबला. तेव्हां राजश्री, तुम्हीं गृहस्थाश्रमी आमचे सांख्ययोगी गुरु असें मनांत येऊन आम्हीं आज तुमच्याजवळ मन ओकलों. शेवटीं सांगूं नये ती गोष्ट सांगितली ! पण एवढें लक्षांत ठेव कीं जी सांगितली आहे तिची किंमत न सांगितलेल्या व गुलदस्तांत ठेवलेल्या गोष्टींच्या किंमतीच्या लक्षांशहि नाहीं. मित्रा, तुला या सांख्ययोग्याचा मान द्यावयाच्या वेळेस माझा पूर्वीचा अहंकाररूपी नागोबा अगदीं फणा उभारून फूत्कारूं लागला आहे. पण माझ्या मनाला या वेळेस अगतिक न्यायानें विळखा घालून त्याचा कोंडमारा केला आहे. काय करूं ? शेवटीं ओकलों ! ' सद्गुरुवांचूनि सांपडेना सोय ' हें घोकतां घोकतां ' सन्मित्रावांचूनि सांपडेना सोय ' यावर हें प्रकरण शेवटीं येऊन ठेपलें आहे. खरोखर तूं माझा यावेळीं सांख्ययोगी होशील कां ? प्रयत्न तर कर. मला जर समाधान दिलेंस तर मी तुझ्या पायां पडेन; मला लाज वाटावयाची नाहीं. तीन वर्षांच्या तपश्चर्येनें मी हें मिळविलें ! पण माझ्या सद्गुरो,—छे, माझ्या आई,—यांतलें अक्षरहि कोणाजवळ सांगूं नको हो ! आम्हीं कर्मयोगी व तुम्हीं सांख्ययोगी ! गुपचुप तोंडाला कुलुप !* ”

---

* स्वामींचें हें गुह्य फोडल्याबद्दल मला पाप लागेल काय ? वाचकांनीं क्षमा केल्यावर पांचा मुखीं असलेला परमेश्वरहि क्षमा करील अशी मला आशा आहे.

म. म. जो.

# २

# ‘दृश्य व अदृश्य जग’

“ ...... माझ्या मागील पत्राचें तुजकडून कांहीं उत्तर नाहीं ! हा मूकभाव कशापासून उत्पन्न झाला असावा या मीमांसेंत माझे सात आठ दिवस गेले. इतक्यांत चंडकौशिकाकडून* काशीहून व आत्मारामाकडून§ खानदेशांतून अशीं दोन पत्रें आलीं. चंडकौशिकाकडून भूकंपमय मानसिक फूत्कारांनीं डोक्यांत जेवढी कालवाकालव व ज्वाला उत्पन्न केली, तेवढी सर्व आत्मारामाच्या शांत, समतोल, व्यवहारकुशलतापूर्ण, नागमोडी अशा भाषापद्धतीनें विझून गेली. दोन्हीं पत्रांनीं चारपांच दिवस मला विचारमग्न केलें व शेवटीं तुझ्या या अकल्पित मूकभावामुळें रागावलों असतांहि हें पत्र त्यांना व तुला एकदमच पाठवून दिलें. यांतील विचार-पद्धति तीन स्वभावांच्या तीन माणसांना कशी काय पसंत पडते हें पाहण्यासाठीं आतुर झालों आहे. पूर्वीं तिरस्कारविषय झालेल्या परंतु हल्लीं सद्गुरूच्या ठिकाणीं मानिलेल्या मित्रदेवतेस दया आली तर मी आपणांस धन्य समजेन ! ऋग्वेदांतील प्रसिद्ध ऋचा आतां आठवते व ती तशीच आपल्या पायीं मी आतां वाहतों. ‘मित्रो जनान्यातयति ब्रुवाणो मित्रोदाधार पृथिवीमुतद्यां’—मित्रदेवता सर्व जनांना हांक मारून जागी करिते व हीच मित्रदेवता पृथिवी व स्वर्ग यांना आधार आहे. हें वर्णन सूर्यदेवतेला उद्देशून ऋग्वेदांत केलें आहे. पण मला तें तुझ्यासारख्या मित्रालाच उद्देशून लिहिलें असावें असा भास होतो. मित्रा, अजून खुशामतीची

* आमचे दोघांचेहि एक प्रिय मित्र. काशीस जाऊन निव्वळ संस्कृताध्ययना-करितां राहिलेले असे हे गृहस्थ अतिशय तापट स्वभावामुळें कॉलेज सोडून आईबापांवर रागावून एकदम निघून गेले. कॉलेजमध्येंच त्यांच्या स्वभावास अनुरूप असें हें नामाभिधान आम्हीं त्यांना दिलें. बाहेरून जितका रागीट तितकाच आंतून प्रेमळ असा हा मनुष्य आहे.

§ खानदेशांत वकिली करून नांवारूपास आलेले आमचे एक मित्र.

काव्यमय कला मी विसरलों नाहीं! पण विद्वान् लोकांची खुशामत ब्रह्मावर जशी माया खुलते व सत्यशी भासते तशी थोडी सत्यावर उभारलेली पाहिजे म्हणजे मग थोडी अतिशयोक्ति जरी झाली तरी मायेप्रमाणें खुलते व जगभर विजयी होते!

अस्तु. आतां दोघांच्या पत्रांतील दोन उतारे तुझ्यापुढें ठेवितों. त्यांचें चांगलें मनन कर, म्हणजे 'मुरारेस्तृतीयः पंथाः' तुझ्या चांगला ध्यानांत येईल. चंड-कौशिकाची भाषा तामसी पण विचार सत्त्वरजोमयांचें उत्तम मिश्रण दर्शविणारे आहेत. आत्मारामाची भाषा कोमल व सात्त्विक, पण सूक्ष्म दृष्टीला तींतील राजस-तामस गुण प्राधान्येंकरून दिसतील असें वाटतें. उतारे न देतां अगोदरच वर्णन करून तुझा राग मी वाढवीत आहे. पण तुला चिडविण्याची कॉलेजांतील संवय अजून जात नाहीं! 'निग्रहः किं करिष्यति? प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति,' दुसरें काय?

**चंडकौशिकः**—'सर्व जग दृश्य फलांच्या, दृश्य साधनांच्या व दृश्य सुखाच्या पाठीस लागलेलें पाहून बिचाऱ्या भर्तृहरीच्या पायाची आग मस्तकास जाऊन पोंचली व त्याच्या मुखांतून उद्गार निघाले, 'पीत्वा मोहमयीं प्रमादमदिरां उन्मत्त-भूतं जगत्.' मला वाटतें ही भर्तृहरीची भाषा अगदीं मवाळ आहे. तुकारामाला जर संस्कृत कविता करतां आली असती तर त्यानें 'तुका म्हणे ऐशा नरा। धरूनि माराव्या पैजारा' याच अर्थाचा एक चरण लिहिला असता. 'पादोऽस्य विश्वा भूतानि। त्रिपादस्यामृतं दिवि'—सर्व ज्ञेय जग या पुरुषाचा फार झालें तर चतुर्थांश होईल; बाकी तीन चतुर्थांश अज्ञेय अजरामर असा अगदीं वर आकाशांत जाऊन बसला आहे. अशी पुरुषसूक्त कंठरवाने ग्वाही देत असतांहि या मूढ लोकांची दृष्टि उघडत नाहीं! 'पी हळद कीं हो गोरी' ही मराठी म्हण या मूढांकडे पाहूनच म्हणीच्या कर्त्यास सुचली असावी. 'अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत, अव्यक्तनिधनान्येव' याचा अर्थ करण्याला भाष्याची कां जरूर आहे? जो साधारण डोळे उघडून पाहील त्याला सहज हें कळेल. वस्तूंचा आरंभ अज्ञेय, वर्तमानकाळ कायतो ज्ञेय, व पुनः भविष्यकाळ भूता इतकाच अज्ञेय! हें आंधळ्याशिवाय सग-ळ्यांना दिसेल. पण डोळे असून बहुतेक आंधळे राहिले तर त्यांत डोळे देणाराचा काय अपराध? समाजाचा आरंभ कोणत्या समाजशास्त्र्यास किंवा इतिहासकारास करतलामलकवत् दिसतो आहे? भविष्यकाळाविषयीं तर कोणीहि कितीहि विद्वान् असला तरी त्यास कांहीं शहाणपण असेल तर तो गप्प बसला पाहिजे. वर्तमानकाळ काय तो डोळ्यांपुढें. पण त्याची मीमांसा करण्यास कांहींतरी किल्ली मिळाली पाहिजे

ना ? नाहींतर पेटींत दहालक्ष रुपये पण कुलूप उघडत नाहीं ! अशीच अवस्था वर्तमानकाळाची किल्ली मिळाली नाहीं तर होणार नाहीं काय ? ती भिन्नभिन्न मतांच्या गलबल्यांत होत नाहीं का ? अशा स्थितींत विचारी मनुष्य सद्गुरु शोधण्याशिवाय दुसरी कोणती गोष्ट करूं शकेल ? पण तो शोधणारा मनुष्य मृगजळाचे पाठीस लागणार ! आणि एकामागून एक मेंढरांसारखे खड्डयांत पडून तेथील शेणामातीचा समाचार घेऊन बाह्येंद्रियांचे कौतुकांत रममाण होणारे, बाह्य जयाकरितां धडपडणारे, नेपोलियनसारख्या बाह्य विजयी पुरुषांचें स्तोम माजविणारे, व पशुवृत्तीला पराक्रमाची बेगड लावून त्या ताबुताला घेऊन ' हुसेन हुसेन ' म्हणून नाचणारे हे दृश्यपूजक आपणांस मोठे व्यवहारकुशल म्हणून समजत असतात ! आंधळ्यानें सूर्यावर थुंकण्यापैकींच हा प्रकार होय ! हल्लीं चालू असलेल्या युद्धाची मीमांसा मोठमोठे विद्वान् तज्ञ करीत असतांना मी पाहिलें कीं हंसावें कीं रडावें हें समजत नाहीं. अहो ही वडबड करण्यापेक्षां तुम्हीं स्वस्थ कां बसत नाहीं ? मेंदूचा, जिव्हेचा, हातांचा व शाईकागदांचा शीण तरी वांचेल ! आतां ' कर्मणो गहना गतिः ' याच मंत्रांचा सर्वांना जप करावा लागणार. ख्रिस्ती शांति, सोशियालिस्टांचा बंधुभाव, व हेगच्या शांततापरिषदेची घरभरणी इत्यादि गोष्टी जर कोणी जिव्हावरि बोलूं लागला तर खरोखर हात भलतेंच काम करण्यास स्फुरण पावतात. मला तर आज उपनिषदांचा व गीतेचा सिद्धांत खास पटला. दृश्य अदृश्यांतून निघालें आहे व अदृश्यांत मिळणार ! त्या अदृश्याची किल्लीच दृश्याचें कुलूप उघडूं शकेल. तुम्हीं आम्हीं पडद्याच्याआंत बघण्याचा प्रयत्न न करितां नियतकर्माचा हुकूम शिपायाप्रमाणें पाळणें हेंच योग्य. व्यर्थ बडबडीनें लोक चावट मात्र होताहेत ! '

आतां आत्मारामाच्या पत्रांतील उतारा बघः—

' गूढ, अज्ञेय, अदृश्य, या शब्दांच्या जादूनें जितके लोक स्वकर्तव्यमूढ होऊन फसले आहेत, तितके कोणत्याहि गोष्टीनें फसले नसावे असें माझ्या अल्पमतीस वाटतें. म्हणजे अदृश्य, गूढ, अज्ञेय असें कांहींच नाहीं असें कोणाचें म्हणणें नाहीं. पण आपण ज्या बेटावर रहात आहों त्याच्याभोंवती अदृश्य समुद्राचा अफाट सागर भरला आहे असें जरी कबूल केलें तरी बेटाबाहेर जाण्याची जोपर्यंत कोणी कांहीं युक्ति स्पष्टपणें सांगत नाहीं तोपर्यंत या अज्ञेय सागराचें स्तोत्र गाण्यांत काल व उत्साह यांचा व्यर्थ व्यय होत नाहीं काय ? मरण येईतोंपर्यंत या दृश्य जगावर जेवढें ज्ञान मिळेल, जेवढें बळ मिळेल, जेवढी क्रिया होईल, तेवढ्यांचा उपयोग

करणें चांगलें, किंवा या अज्ञेयसागराकडे पाहूनच ' अहाहा ' करीत बसणें चांगलें ? इतकी गोष्ट उघड असतां हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागणारे अज्ञेयभक्त धड व्यवहाराच्याहि उपयोगी पडत नाहींत, व धड सागराच्या पलीकडे जाऊन धाँड मारून येऊन आम्हां अज्ञजनांस उपदेशहि करीत नाहींत. तेव्हां हा ' त्रिशंकुरिव अंतरा तिष्ठ ' म्हणणारा मार्ग ज्या देशांतील वहुतेक लोक पसंत करितात तेथें त्या देशाच्या शत्रूंनीं कांहीं तरी जादूटोणा केला आहे असेंच म्हणणें भाग येतें. '

मित्रा, हे दोन्ही उतारे कोणत्याहि विचारी माणसास डोकें खाजवावयास लावितील असें तुला नाहीं कां वाटत ? दोघेहि सद्भावप्रेरित असल्यामुळें त्यांच्या सद्भावाचें प्रतिबिंब दोन्ही उताऱ्यांत स्पष्ट उमटलें आहे. तसेंच दोघांचेंहि स्वभाव-वैषम्य तितकेंच स्पष्ट होत आहे. आतां येथें निकाल कसा द्यावयाचा ? मला जे विचार सुचले ते निकालाचे आहेत असें मी कसें म्हणूं शकेन ? बरें इतके दिवस तप करून शांत विचाराच्या हवेंत घालवून या दोन विचारपद्धतींचा भेद व मूळ थांग जर मी शोधून काढिला नाहीं तर मग स्वार्थ व परमार्थ या दोहींनाहि मीं पुरा मुकलों असेंच झालें म्हणावयाचें. ' उभयोरपि दृष्टोऽन्तः अनयोस्तत्त्वदर्शिभिः ' या उक्तीचा आतां चांगलाच अनुभव येत आहे. या दोन पक्षांच्या भेदाचा, मूळाचा व शेंड्याचा थांग ज्याला लागला नाहीं, त्यानें आपल्याला ' तत्त्वदर्शी ' म्हणून नुसतें आडनांव घेण्यांत काय तात्पर्य आहे ? असे थोर आडनांवाचे भोक्ते जगांत पुष्कळ आहेत. पण मी जग सोडून दिलें तें या आडनांवाकरितां काय ? असे अनेक विचार मला त्रास देऊं लागले. शेवटीं निश्चयानें उठलों व कागदपेन्सिल घेऊन सायंकाळीं सहाचे सुमारास एक दिवस गंगेच्या कांठीं जाऊन बसलों. स्नानसंध्या केली व पेन्सिल तोंडाशीं धरून सारखा गंगेच्या प्रवाहाकडे नजर लावून बसलों. इतक्यांत गंगेच्या प्रवाहाच्या मध्यभागीं मला शेषशायी भगवान् लक्ष्मीसह पडले आहेत असा देखावा दृष्टीस पडला. याला तूं दृक्भ्रम म्हण, हांस, रड, पाहिजे तें कर ! पण मला त्या देखाव्याचें विस्मरण होणें शक्य नाहीं व त्या आभासाचा परिणामहि माझ्या चित्तावरून जाणें शक्य नाहीं. माझी पेन्सिल तो देखावा पाहिल्यावरोबर हातावरून कागदावर हालूं लागली व एक तासभर त्या हास्यमय, प्रेममय, ज्ञानज्योतिर्मय देववदनाकडे वघत पानेंच्यापानें खरडून काढिलीं. या सर्व पानांचें भारूड मी तुझ्यासारख्या चोरट्या उपहासकापुढें ठेवणें हें माझ्या दृष्टीनें पातक आहे. पण तूं आणि मी एका कॉलेजांतच शिकलों असल्यामुळें एका गांवचे

अगदीं एका घरचे–चोर झालों. तेव्हां अर्वाचीन युरोपीयन पद्धतीची बेगड त्या विचारांना लावून त्या रंगबेगडीच्या गोळ्या तुला चांगल्या पचतील व पटतीलहि असें जाणून आज पाठवीत आहे. सर्टिफिकेट अनुभवानंतर मिळेलच. इतका विनोद करून प्रकृत विषयाकडे वळतों.

मित्रा, चंडकौशिक व आत्माराम दोघेहि अखिल विश्वांतील तत्त्वांच्या विरोधाचे प्रतिनिधिभूत आहेत. हें भांडण व्यक्तींत तर रोज चाललें आहे. पण प्रत्येक राष्ट्रांत या दोन्ही पक्षांचे वकील नेहमीं उत्पन्न होतात. फक्त त्यांचे पोषाख व भाषा हीं बदलत असतात. ऋग्वेदांतील ' सजनास इंद्रः ' या ध्रुपदाच्या सूक्तांत एक अदृश्य इंद्रावर विश्वास ठेवणारा व कधींहि न फसणारा; व दुसरा इंद्राचीं सोंगें घेऊन नाचणाऱ्या भलत्याच देवांवर विश्वास ठेवून फसल्यामुळें जगांत इंद्रच नाहीं इतक्या नास्तिकपणाच्या थराला गेलेला, असे दोन्ही पक्ष उत्तम रीतीनें मांडिले आहेत. बायबलांत, बनियनच्या 'पिल्ग्रिम्स् प्रॉग्रेस'मध्यें व अर्वाचीन सर्व सुधारलेल्या देशांतील उच्च, उच्चतर व उच्चतम वाङ्मयांत निरनिराळ्या पोषाखांत या दोन पक्षांचे प्रतिनिधि दृष्टीस पडतात. ज्याअर्थीं जगाच्या आरंभापासून आजपर्यंत या दोन्ही पक्षांचे प्रतिनिधि एकसारखे उत्पन्न होत आहेत त्याअर्थीं मनुष्याच्या मर्यादित अवस्थेला–अपूर्णत्वाला औषध म्हणून या दोन्ही मात्रांची आवश्यकता आहे, असें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं. पण अर्वाचीन काळचे नास्तिक व प्राचीन काळचे नास्तिक यांत बराच फरक आहे असें मला वाटतें. अर्वाचीन काळचे नास्तिक जितके सत्यप्रिय आहेत तितकेच सत्यप्रिय पूर्वींच्या काळचे नास्तिक होते. पण प्राचीन काळचे नास्तिक आपल्या तत्त्वज्ञानास 'समाजहितकारक' 'राष्ट्रोद्धारक' 'विश्वकुटुंबहितवादी' अशा उच्च नांवानें संबोधित नव्हते. हें संबोधन हल्लीं ढोंगाचें आहे असें मी म्हणत नाहीं. पण दोहोंमधला फरक लक्षांत ठेविला पाहिजे. प्राचीन नास्तिकांस 'संहतिः कार्यसाधिका' हें तत्त्व फारसें माहीत होतें असें दिसत नाहीं. हल्लीं नास्तिकांना जर्मन कायसराप्रमाणें सर्व जगभर आपलें निशाण फडकवावें व कायसरप्रमाणेंच सर्व जगभर आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार होऊन मनुष्यजातीचें कल्याण व्हावें, अशी मनापासून महत्त्वाकांक्षा वाटत आहे. जर्मन कायसरप्रमाणें तोफांच्या भडिमारांत हें तत्त्वज्ञान हल्लींचे नास्तिक शिकविण्यास तयार होतील किंवा नाहीं हें मी खात्रीनें सांगूं शकत नाहीं. पण मनुष्यजातीची कल्याणेच्छा व संघशक्तीचें महत्त्व हल्लीं सर्वच तऱ्हेच्या लोकांत जितकें प्रमुखत्त्वानें फडकत आहे, तितकें प्राचीन काळीं फडकत नव्हतें हें कोणीहि

इतिहासज्ञ कबूल करील. स्थलांतरानें व कालान्तरानें साध्यांचे, साधनांचे व भाषेचे पोषाख बदलतात हेंच तत्त्व यावरून सिद्ध होतें. पूर्वीच्या लोकांना लोककल्याणाची इच्छा नव्हती व त्यांचा मोक्ष आपलपोटेपणाचा होता या कल्पना आतां पोरकट अतएव त्याज्य झाल्या आहेत. पण साधनें व भाषा यांच्यांत स्पष्ट फरक दृष्टीस पडतो हें कबूल केलें पाहिजे. शिवाय आस्तिक व नास्तिक या शब्दांचे अर्थहि स्पष्ट नाहींत. कालिक व देशिक या संबंधानें तोच मनुष्य आस्तिक व नास्तिक असें दोन्ही तऱ्हेनें म्हणतां येईल. आध्यात्मिक दृष्ट्या आस्तिक असणाऱ्यास समाजहित-वादी व कुटुंबहितवादी नास्तिकच म्हणणार! व तो अध्यात्मवादी समाजहितवाद्यांस व कुटुंबपोषणरतांस 'नास्तिक' अशीच संज्ञा देईल. इंग्लंड व तत्साहाय्यकांस कायसर व जर्मन लोक नीतिदृष्ट्या नास्तिक वाटतात, तर ट्रायश्के, कायसर व बर्नहार्डी, हे राष्ट्रहितदृष्ट्या इंग्लंड वगैरेस नास्तिक म्हणण्यास कमी करीत नाहींत, हें तुझ्या प्रो. क्रँबच्या पुस्तकावरून * सिद्ध होत आहे. विषयांतर होईल, पण माझ्याच्यानें सांगितल्याशिवाय राहवत नाहीं कीं तूं पाठविलेलें प्रोफेसर क्रँबचें पुस्तक म्हणजे अर्वाचीन काळची जिवंत गीताच आहे असा मला भास होतो. इतकें त्या पुस्तकानें मला अगदीं वेडें करून सोडिलें आहे. अस्तु. 'या निशा सर्वभूतांना' या श्लोकांत हा सर्व प्रकार साद्यंत येत आहे. पण आपणास एक सावधपणा ठेविला पाहिजे कीं दोन्ही पक्षांचीं शब्दशस्त्रें नीट तपासून घेतलीं पाहिजेत. नाहींतर तरवारीचें नांव सांगून कोणी वाघनख खिशांतून काढितील व भेट व आलिंगन या शब्दाचा अर्थ मान आवळून प्राण कासावीस करणें असाहि राजव्यवहार-कोश तयार होईल! शिवाजी व अफझुलखान इतिहासांत दोनच झाले, पण वाद-विवाद सभेंत त्यांचे अवतार आम्हांला रोज दृष्टीस पडतात. इतिहासांत सोंग व त्यांची वतावणी प्राणावर संकट आणितात; पण वादविवादांत 'वचने किं दरिद्रता' या न्यायानें सर्वच गोष्टी स्वस्त. शिवाजीहि स्वस्त आणि अफझुलखानहि स्वस्त! अदृश्याची-अज्ञेयाची-पूजा करणारे व दृश्याची पूजा करणारे असे दोन पक्ष चंडकौशिक व आत्माराम दोघेहि मानतात. पण शब्दार्थ सूक्ष्म रीतीनें पाहिल्यास निवळ अदृश्य असें काय आहे व अशा केवळ अदृश्याची पूजा करणें शक्य आहे काय? या प्रश्नाची मीमांसा केली पाहिजे. तसेंच निवळ दृश्यफल म्हणजे काय? व त्याची पूजा करणारे पशूंत देखील किती सांपडतील हेंहि पाहिलें पाहिजे. माझ्या

* 'England and Germany'-Lectures by Professor Cramb.

एका मार्मिक वैरागी मित्रानें एका कोंबडीची गोष्ट सांगितली. एका कोंबडीच्या पिलांवर कुत्र्यानें हल्ला केला. त्याबरोबर कोंबडी इतक्या त्वेषानें त्या कुत्र्याच्या अंगावर धावून गेली कीं त्या त्वेषानेंच तो कुत्रा जास्त बळकट असून मागें सरकला. पण पिलें घरांत स्वस्थपणीं गेल्यानंतर पुन्हां कुत्र्यानें तिच्यावर हल्ला केला. तेव्हां तिचा त्वेष नाहींसा होऊन ती एखाद्या गोगलगाईप्रमाणें मान टाकून कुत्र्याच्या स्वाधीन झाली. येथें कोंबडी ही निवळ दृश्याची पूजा करणारी होती असें आत्माराम छातीस हात लावून सांगेल काय? कोंबडीचें पिलांवरचें प्रेम निवळ दृश्य कोटींत गणणें कितीसें युक्तीला धरून आहे याचा तूंच विचार कर. माझ्या मतें तर निवळ दृश्य असें कांहींच नाहीं व निवळ दृश्याची पूजा करणारे पशुकोटींतहि कोणी आढळणार नाहींत; मग 'किमुत ये प्रतिबोधवन्तः' असें ज्यांना कालिदासानें म्हटलें त्या माणसांची गोष्ट काय सांगावयाची? प्रत्येक दृश्यांत स्पष्ट म्हणा, अस्पष्ट म्हणा, अदृश्याचा-अज्ञेयाचा किरण असतो व त्या किरणामुळें पाठीमागचें सर्व पुरें दिसत नाहीं, म्हणून त्याला अदृश्य किंवा अज्ञेय असें नांव देतात हें उघड आहे. दृश्य शरीराला जागरणाचा त्रास देऊन अदृश्य मनोरंजनाची पूजा करणारा नाटकप्रिय निवळ दृश्यपूजक कसा म्हणतां येईल? जवळचें दृश्य, लांबचें अदृश्य, असा कांहीं भेद काढणें आवश्यक आहे. उनाड पोराला कुटुंबहित अदृश्य आहे. पण उनाडपणामुळें मिळणारी गंमत जनावराइतकी त्याला अदृश्य नाहीं. कुटुंबपोषणरताला समाजहित किंवा देशहित अदृश्य असेल, पण दृश्य शरीराची व ज्ञेयमनाची पूजा टाकून तो कुटुंबहिताकरितां झटतो हें उनाड पोराला अदृश्य असणारें कुटुंबहित याला दृश्य आहे. पण याला अदृश्य असणारें देशहित कै. रानडे, गोखले व आपणा सर्वांच्या नशीबानें विद्यमान असलेले लो. टिळक यांना दृश्य होतें व आहे. कचेरींतील दृश्य काम चोख करून भागल्यानंतरहि अहर्निश पुस्तकें, रिपोर्ट व सार्वजनिक सभेचे अर्ज यांत मुरणारे कै. न्या. रानडे दृश्याची पूजा करीत होते हें म्हणणें आत्मारामासारख्या वकिलांच्या राजास शोभेल काय? इंग्लंड व जर्मनी या देशांतील जे वीर धारातीर्थी पडत आहेत, ते दृश्य सुख टाकून अज्ञेय मृगजलाच्या पाठीस लागलेले वेडे मृगच म्हणावयाचे काय? म्हणजे एकाला दृश्य तें दुसऱ्याला अदृश्य असल्यामुळें हा शिविगाळीचा प्रसंग येत आहे. खरा प्रश्न येथें येऊन आदळतो कीं प्रत्येक व्यक्तीनें या दृश्यादृश्याच्या परंपरेंत पुढें किती सरकावें व थांबावें कोठें? म्हणून चंडकौशिक व आत्माराम या दोघांनाहि मीं

पांडित्यप्रदर्शक भाष्यें व इंग्रजी ग्रंथ सोडून देऊन नुसती भगवद्गीता रोज मनन करावी असें लिहिलें आहे. भगवद्गीतेनें अर्जुनास भलत्याच अज्ञेयमृगजलाच्या पाठीस लागण्यास सांगितलें आहे काय? अर्जुन तर दृश्य युद्ध टाकून अदृश्य संन्याससुखा-साठीं धडपडत होता. श्रीकृष्ण त्यास या अदृश्यापासून मागें ओढतात व युद्धाच्या दृश्य दावणीस बांधतात. यावरून कित्येक वरवर पाहणाऱ्या लोकांस अचंबा वाटून भगवद्गीता कोणीतरी युद्धप्रिय कायसरनें लिहिली आहे असें वाटतें. पण सूक्ष्म दृष्टीनें वाचणारास याच गीतेंत मोक्षप्रसादाच्या सर्व पायऱ्या स्पष्ट दिसतील. खालच्या दर्जाच्या इंद्रियसुखांत मग्न झालेल्या त्या सुखाचा थोडाथोडा यज्ञ केला असतां वरचें इंद्रियसुख दृश्य होत जाईल असें सांगितलें आहे. त्यांना काम हाच पुरुषार्थ. तो साधला म्हणजे अर्थ म्हणजे खरी महत्त्वाकांक्षा हा पुरुषार्थ दिसूं लागेल. त्याकरितां जर्मन लोकांप्रमाणें सर्व कामांची होळी करण्यास तो सहज सिद्ध होईल. हा पुरुषार्थ साधला म्हणजे धर्मसूर्य क्षितिजावर येईल. मग महत्त्वाकांक्षांचाहि वीट येईल व रामदासाप्रमाणें राज्यभिक्षा टाकून साधी भिक्षाच गोड वाटूं लागेल. शेवटीं धर्माधर्मादि द्वैतांचें भांडण मिटून सुख व कर्तव्य यांचें लग्न लागेल व मोक्षाचें द्वार खुलें होईल. चार पुरुषार्थांचें विवरण करणारें तत्त्वज्ञान या दृश्यादृश्याची–ज्ञेयाज्ञेयाची उत्तम व्यवस्था लावीत आहे. तिकडे चण्डकौशिक व आत्माराम हे दोघेहि लक्ष देतील तर त्यांचें भांडण मिटणें शक्य आहे असें मला वाटतें. चण्डकौशिक शेवटल्या अदृश्याला भुलून खालचीं अदृश्यें दृश्यांतच घालीत आहे ही त्याची चूक आहे; व हीच चूक सर्व हिंदी राष्ट्र तुकाराममय करणारांची होत आहे. राष्ट्र ही अनंत अधि-कारांच्या व अधिकारानुरूप कर्मांच्या गुंतागुंतीचें जाळें आहे. तें ओळखूनच 'उत्तमा सहजावस्था मध्यमा ध्यानधारणा । अधमा प्रतिमापूजा तीर्थयात्राधमाधमा ॥' असा उपदेश खरा हिंदुधर्म करीत आहे. या जाळ्यांत–अखिल विश्वांत–इंग्लंडला जागा आहे, कायसरला जागा आहे, बुद्धाला जागा आहे, तुकारामाला जागा आहे. आत्मारामाला व त्याच्या दृश्यपूजक संवगड्यांना सर्वांत मोठें पटांगण राखून ठेविलें आहे. चण्डकौशिकाला पंख दिले आहेत, त्यानें खुशाल उंच उडावें. पण त्याचा क्रोधवैरी त्याला खड्ड्यांत पाडील याची मला भीति आहे. अरे, बेटांत सर्वजणच आपण अडकलों आहोंत. पण भोंवतालच्या समुद्राविषयीं थोडीबहुत माहिती सांगणारे कॅप्टन स्कॉटसारखे धीरवीर पुरुष सर्व देशांत झाले आहेत. तुकाराम, सॉक्रेटिस, गटे, शेक्सपियर–किती नांवें घेऊं?

थोडक्यांत इतकेंच सांगतों कीं सर्व देशांतील खरे साधुसंत, उदात्त कवि व ग्रंथकार, दूर दृष्टीचे मुत्सद्दी, इतिहासकार व वक्ते यांना कोणी वेड्याच्या इस्पितळांत जोंपर्यंत टाकीत नाहीं, किंवा यांना ढोंगी, ठग म्हणून हद्दपार करीत नाहीं, तोंपर्यंत मनुष्य-जातीचा या लोकांवर—या नावाड्यांवर—थोड्याबहुत प्रमाणांत भरंवसा आहे, ही खूण तूं अगदीं गांठी घालून घालून आपल्या हृदयाच्या अगदीं खोल पिशवींत वाळगून ठेव. आत्मारामाला मीं हेंच पत्र लिहिलेलें आहे. 'Socrates was either a victim of a miserable delusion or he must have seen something which we cannot see and which he wants us to see' (सॉक्रेटीस याला एक वेडा तरी म्हटला पाहिजे किंवा असें कबूल करणें भाग आहे कीं त्याला कांहीं तरी खरोखर उच्च असें दिसलें होतें व तो आपणास 'तें पहा' असें म्हणत होता.) हें वाक्य सर्वस्वी अर्थपूर्ण आहे. आपण सध्यां पडलों आहोंत तेव्हां आपलें क्षितिज खालच्यांच असणार, या दृष्टीनें आत्मारामाच्या म्हणण्यांत पुष्कळ अर्थ आहे. पण हें श्रीकृष्ण केव्हांच बोलून चुकला आहे. परंतु राष्ट्रानें पडावें तर बेलजियमसारखें पडावें म्हणजे पडतां पडतांदेखील ईश्वरदर्शन होतें. आम्हां हिंदु लोकांच्या समजुतीप्रमाणें अशा लोकांना मोक्ष मिळतो. "द्वाविमौ पुरुषौ लोके सूर्यमंडलभेदिनौ। परिव्राड् योगयुक्तश्च रणे चाभिमुखे हतः।"—दोन पुरुष या जगांत सूर्यमंडल फोडून ऐटींत स्वर्गांत प्रवेश करितात. एक सर्व-संगपरित्याग करून देहाचें सार्थक करणारा ज्ञानवीर व दुसरा धारातीर्थी पडणारा युद्धवीर! हें आत्मारामाला खरें वाटेल तेव्हां खरें. तूं तर बोलून चालून उपहासक! अस्तु."

# ३

# ' ईश्वरसाक्षात्कार '

" मित्रा, आज कित्येक महिने तुझ्या दरएक पत्रांत एक ताजा कलम आहे. त्याविषयीं माझ्या दरएक पत्रांत माझा पूर्ण मूकभाव पाहून तुला माझी चीड येणें साहजिक आहे. आज त्या मूकभावाच्या व्रताचें पारणें करीत आहें. त्यानें तुझा राग कितपत शांत होईल कोण जाणे ?

मला ईश्वरसाक्षात्कार झाला किंवा नाहीं, हा तुझ्या ताज्या कलमांतील मुख्य प्रश्न. संसार सोडून तीनचार वर्षें झालीं ! तपही बरेंच केलें. तेव्हां हा प्रश्न कोणाच्याही मनांत येणें स्वाभाविक आहे. मग संसारत्याग करणाऱ्या सर्व लोकांना उडाणटप्पूंच्या वर्गांत घालणाऱ्या व त्यांचा उडाणटप्पूंच्या सरकारी कायद्यानें पूर्ण समाचार घेऊं पाहणाऱ्या तुला या प्रश्नानें पछाडिलें यांत नवल काय ? संसाराकरितां संसार सोडणें, चांगलें खातां यावें म्हणून उपवास करणें, समाजांत चांगलें वागतां येण्याचें सामर्थ्य येण्याकरितां कांहीं दिवस समाजाचे बाहेर राहणें, हा साधनसाध्य–विचार तुझ्या डोक्यांत येत नाहीं याचें कारण तुझें मंदबुद्धित्व खास नाहीं. तुझ्या दुराग्रहपिशाच्याचीच ही अद्भुत् लीला आहे. मी आपल्या एका पत्रांत तुला स्पष्ट लिहिलें आहे कीं, देशसेवेकरितांच मी संन्यास घेतला आहे. प्रत्यक्ष सेवा करितांना विचारापेक्षां विकारांचें प्राबल्य जास्त असल्यामुळें अनेक भयंकर चुका झाल्या. प्रतिपक्षांशीं अन्यायाचें वर्तन किती बेहोष रीतीनें झालें याची कल्पना आतांच येऊं शकते. व ती आली म्हणजे अंगावर शहारे येतात. किती लोकांना देशद्रोही ठरविलें, कित्येकांना तृतीया प्रकृति म्हणून नांवें ठेविलीं, प्रतिपक्षाच्या ज्या चुका, त्याच माझ्या चुका; प्रतिपक्षावर केलेले आरोप हे जणूंकाय माझ्याच अपराधांचे प्रतिध्वनि. मृच्छकटिक नाटकांतील शकाराप्रमाणें आपण स्वतः भित्रे असून " अरे भीतोऽसि " म्हणून त्या स्वतःच्या भीतीची छाप दुसऱ्या सज्जनांच्या स्वच्छ अंगरख्यावर बेलाशक ठोकून सदसद्विचारावर कायमची तिलांजलि ओतली !

ज्या परमेश्वरानें माझें कुटुंबसर्वस्व हरण करून माझ्या डोळ्यांत अंजन घातलें, त्याचा साक्षात्कार मला आणखी कोणता राहिला आहे ! अन्यायाच्या मार्गापासून परावृत्त करून न्याय्यपथ शोधण्याची बुद्धि ज्यानें मला दिली, तो सर्वभूत परमेश्वर आतां 'नाहीं' असें मी केव्हां तरी म्हणेन काय? माझे सर्व दोष मला दिसूं लागले व मला न्यायान्यायाचा, सदसद्विवेकाचा नवा धारवाडी कांटा आतां मिळाला हीच गोष्ट ईश्वरसाक्षात्कार सिद्ध करीत नाहीं काय? सर्व पृथ्वीचें राज्य कोणीं देऊं केलें तरी मी आतां दुसऱ्यावर द्वेषमूलक टीका कधींही करावयाचा नाहीं व देश-हिताकरितां खरी खरमरीत टीका करण्यास भिणार नाहीं. ही न्यायाची व धैर्याची दृष्टी देऊन शंकरानें मला आपला तृतीय नेत्रच दिला नाहीं काय? जीवाशिवाची भेट तीं आणखी ती कशी असावयाची? आतां माझ्या हातून जें जें कृत्य घडेल तें तें 'परस्मै नारायणाय'च समर्पण होणार. 'नैवं पापमवाप्स्यसि' व 'यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः' या चरणांचा अर्थ मला आतां जो कळला आहे, तो भाष्यें व रहस्यें सर्व कोळून प्यायलों असतों तरी कळला असता किंवा नाहीं याचा मला संशयच आहे. आतां मला यच्चयावत् पदार्थांचा उपयोग व दुरुपयोग म्हणजे काय, याची पूर्ण कल्पना आली आहे. आतां मला जो क्रोध येईल तो शंकराच्या तृतीय नेत्राचा फूत्कार म्हणून समज. आतां जी मी क्षमा करीन ती ऋग्वेदांतील द्यावापृथ्वीचा वरदहस्त असें समज. 'भिडे भिडे पोट वाढे' या तऱ्हेची गोडबोली, पोकळ शांतीच्या व मित्र-पणाच्या कोठारांतून भुसाप्रमाणें घळघळ गळणारी व भरकन् जळून जाणारी ही क्षमा नव्हे. ही क्षमेची दृष्टी मजजवळ असूनही ती मला दिसली नाहीं हा माझा अंधपणा घालविणारा मीच खरा; पण पूर्वींचा मी जीवरूपानें होतों, तर हल्लींचा कल्याणगुणात्मक मी शिवरूपी झालों हा साक्षात्कार तुला कमी दर्जाचा वाटतो काय? आतां कालाचा अपव्यय न करण्यांत मी इतका लोभी झालों आहें, माझ्या देशाच्या कीर्तीविषयीं व अब्रूविषयीं इतका मत्सरी झालों आहे कीं, त्याविषयीं कोणालाही 'ब्र' म्हणूं देणार नाहीं. मी पुरुषसूक्त बी. ए. च्या वर्गांत शिकलों. त्यावेळीं एका विराट पुरुषाच्या देहाचें वर्णन वाचून निव्वळ ऋग्वेदीय काव्यदृष्टीचें कौतुक मी करीत असे व त्यांत उपहासाचीही छटा असे. पण तें सूक्त आतां मी म्हणूं लागलों कीं, सर्व हिंदुस्थानचा नव्हे, सर्व जगाचा—विराट् पुरुष माझ्या दृष्टी-समोर उभा राहतो. माझ्या देशाचें सच्चिदानंदरूप मला आतां स्पष्ट दिसूं लागलें

आहे. मायेच्या दृष्टीला माझ्या देशाच्या दुर्गुणांचेंच भांडार दिसतें. मला जी नवीन दृष्टी उत्पन्न झाली आहे, ती त्या दुर्गुणांच्या रोगाकडे पाहात नाहीं असें नाहीं. पण हे रोग औषधोपचारानें गेल्यावर उत्पन्न होणारी माझ्या देशशरीराची दिव्यकांति एकाद्या कुशल वैद्याप्रमाणेंच मला आतां दिसूं लागली आहे. अंधश्रद्धा व डोळस श्रद्धा यांच्या भेदाचा काथ्याकूट करण्याचें मला आतां प्रयोजन नाहीं. मानसिक प्रत्यक्षालाच श्रद्धा म्हणावयाचें; व हेंच प्रत्यक्ष प्रत्यहीं उज्ज्वल होत होत 'तस्मिन् दृष्टे परावरे' चा कोटीला जाऊन पोंचतें व माझें पोंचणार. आतां सामाजिक, राजकीय, धार्मिक हे मला भेद राहिले नाहींत. शरीर निरोगी झाल्यावर अन्नपचन, रुधिराभिसरण, शरीरकांति व मनाची प्रसन्नता हीं जशीं भिन्न भिन्न मानण्याचें कारण नाहीं, तसेंच माझ्या सर्व देशाच्या सर्वावस्थात्मक आरोग्याचें बीज उदार पौरुषांत आहे ही माझी भावना स्पष्ट तऱ्हेची व अंतरात्म्याच्या मुळाशीं जाऊन भिडली असल्यामुळें, मला आतां पंक्तिभेद उरलाच नाहीं. इंद्रियबंधनांतून हळुहळू मुक्त होण्याकरितां क्रममुक्तीचा मार्ग पत्करणारी पुनर्विवाहित विधवा कोणती, व हिचाच वेष घेऊन इंद्रियांची जास्त जास्त पूजा करून नरकद्वाराचें साधन करून घेणारी खोट्या सुधारकांच्या कळपांत दडून बसणारी अखंड सौभाग्यवती यांचा स्पष्ट भेद दाखविणारी दृष्टि मला मिळाली आहे. तिला तूं साक्षात्कार म्हण, अगर दुसरें कांहीं म्हण. आलस्यामुळें भिकारी राहणारा उडाणटप्पू बैरागी व आपल्या देशाला मानसिक रीत्या व भौतिकदृष्ट्या श्रीमंत करण्याकरितां 'श्मशाने-ष्वाक्रीडा' करणारा विभूतिमान् शिवरूप योगी यांचा भेद आपल्या देशबांधवांना स्ववर्तनानेंच स्पष्ट दाखवीन ही धमक मला आली आहे. हा साक्षात्कारच असें मी समजतों. आणखी एक साक्षात्काराची खूण मला स्पष्ट दिसूं लागली आहे. थोडा ग्राम्य विनोद केला तर रागावशील. पण माझ्यानें राहवत नाहीं. मी पुरुष असून चाळिशीच्याआंतच माझा 'विटाळ' गेला आहे. ईश्वरसेवेकरितां, देशसेवेकरितां मी साहेबी पोशाख करीन, पाहिजे तें खाईन, खुशामत करीन, सरकारी नोकरी करीन; व 'पद्मपत्रमिवांभसा' या न्यायानें माझ्या ईश्वरभक्तीला व देशभक्तीला कलंक लागावयाची गोष्ट दूरच राहिली, पण 'केनापि दिक् प्रकटिता पुरुषोत्तमेन' या चरणांत वर्णन केलेल्या 'पुरुषोत्तमा'चीच कुशलता, ऐश्वर्य व चित्तशुद्धि हीं लक्षणें माझ्या चरित्रास शोभा देतील. सुधारकांचा न्यायप्रेरित बंडखोरपणा व जुन्या लोकांची कर्मनिष्ठा, पाश्चिमात्यांचा साहसी उद्योग

व पौरस्त्यांची अगाध शांति, कद्रू लोकांची बद्धमुष्टिता व उदारचरितांची ऐहिक गोष्टीविषयींची बेपर्वाई, या सर्व विरोधांच्या पलीकडे जाऊन मला अशी एक दृष्टी आली आहे कीं, या विरोधात्मक वस्तूंचा एकसमयावच्छेदेंकरून उपयोग मला करतां येईल. उपाधिकृत दोष या वस्तूंतून मी काढूं शकेन व माझ्या ईश्वर-सेवेच्या व देशभक्तीच्या मुशींत या सर्वांचें सोनें करण्याची किमया मला साधली आहे. ही किमया माझ्या जवळच असून ती मला आजपर्यंत आली नाहीं. पण आली ती कोणत्या उपायानें ? त्याला मी साक्षात्कारच म्हणतों. हा साक्षात्कार ही एक किमयाच आहे. जी खुशामत पूर्वी मी पोटाची खळगी भरण्यासाठीं केली असल्यामुळें कोळशाप्रमाणें काळीकुट्ट दिसत असे, ती आतां ईश्वरसेवेकरितां व माझ्या देशबांधवांकरितां करणार असल्यामुळें त्या कोळशाचें सोनें झालेलें माझ्या दृष्टीस आज दिसत आहे. ही मानसिक किमया साक्षात्काराच्या गुरुपासूनच मला मिळाली असें म्हणण्यांत मी खोटेपणाचें पाप करीत आहें असें मला वाटत नाहीं. पण ही किमया कांहींच नाहीं. संसारावस्थेंतील माझ्या दोषांच्या कोळशाचें ज्या किमयेनें आज सोनें केलें व जिच्यामुळें माझा आत्मा अणूएवढा होता तो विश्वाएवढा मोठा होऊन याच चिमकुल्या शरीरांत राहून अगदीं पूर्वीच्या क्रिया करीत आहे व करीत राहणार, ती किमया मला तरी अपुरीच वाटते. आतां मी हंसेन, रडेन, ओरडेन सर्व करीन. पण पूर्वी या सर्व क्रिया माझ्या अप्पलपोटेपणाच्या मायेचें नर्तन होतें. आतां तें माझ्या परमात्मरूपी शिवाचें तांडव होणार. ‘ भवति च पुन-र्भूयान् भेदः ’ असें तुला कबूल करावें लागेल. पूर्वी कोणतीहि स्त्री पाहिली कीं निरुपाधि, निरपेक्ष अशा सौंदर्यदृष्टीच्या पांघरुणाखालीं हळूच माझी कामलालसा लपून बसत असे व आपलें काम साधत असे; पण आतां सर्व स्त्रिया देवतारूप आहेत असा मला नुसता भास होत नाहीं तर हें पार्वतीस्वरूप माझ्या रंध्रारंध्रांत भिनून गेलें आहे. आतां सुशिक्षितपणाच्या बेगडीखालीं आपल्या सर्व चैनी, मनाचा हलकेपणा, व कामलालसा लपविणारी विदुषी मला भुरळ पाडूं शकणार नाहीं; व आपल्या अशिक्षितपणाच्या चिखलाखालीं पातिव्रत्य, सुग्रणपणा, धैर्य इत्यादि गुणरत्नांच्या राशी लपविणारी गृहलक्ष्मी सैरंध्रीप्रमाणें अज्ञातवासांत असली तरी तिला शोधून काढण्याचें सूक्ष्मदर्शक यंत्र मला ज्या उपायानें मिळालें त्याला मी ‘ साक्षात्कार ’ हें नांव न देईन तर मी कृतघ्न ठरेन. स्त्रियांना शिक्षण देणें अगर न देणें हा मजजवळ आतां प्रश्नच नाहीं. स्त्रीपुरुषांना पूर्णत्वाच्या

मोक्षास जाणें आहे. पण पुरुषांच्या शिक्षणाविषयीं जेथें शंका उत्पन्न झाली, तेथें तेंच शंकास्पद शिक्षण स्त्रियांच्या डोळ्याकानांत कोंबून त्यांचे देवतात्व साफ धुवून काढण्याचें महत्पाप माझे हातून होणें नाहीं. पुरुषास काय किंवा स्त्रीस काय, धर्मार्थकाममोक्षापैकीं काम हाच पुरुषार्थ साधिलात कीं पलीकडल्या तिहींत कांहीं प्रवेशपरीक्षा दिल्यात हाच प्रश्न मुख्य आहे. पलीकडच्या तिहींमध्यें प्रवेश करण्यांत जर हल्लींचें पाश्चिमात्य शिक्षण मदत करीत असेल–व तें थोड्यावहुत अंशानें करितें असें माझें मत आहे—तर त्या शिक्षणाचा पुरुषांसही विटाळ नाहीं व स्त्रियांनाही नाहीं. पड्यांत ठेवून कडक पहारा ठेवून आलेलें वावळें पातिव्रत्य अजागलस्तनाइतकेंच निरर्थक आहे. पातिव्रत्य ही वीज आहे, ती दुष्ट वुद्धिला जाळून मोक्षाची इमारत उठविण्याला उपयोगी पडते. ती इतकी मंदतेज व वावळी राहून ऐहिक किंवा पारमार्थिक उपयोगास कशी येणार? पण नीच उपयोगवाद वाईट म्हणून उच्च उपयोगवादाला फांटा देण्याइतका मी विवेकहीन नाहीं. ही पराक्रमाची कर्मभूमी आहे हें तत्व पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांनाही लागू पडतें. पण तात्पुरत्या झकाकीला भुलणारी दृष्टि घात करीत आहे. जें शिक्षण अंगांत मुरून तेज उत्पन्न करतें तें दोघांनाही देणें इष्ट आहे. पण असें शिक्षण काय वाटेवर पडलें आहे? तें वाजारी शाळांतून जर मिळतें तर जपतपाचें नांव काढण्याची जरूरी नव्हती. गीतेनें कंठरवानें सांगितलें आहे. कीं, ‘यज्ञो दानं तपः कर्म पावनानि मनीषिणाम्’ या उपायाची महती गीतेला सांगण्याचें मग कारण नव्हतें. निव्वळ तर्कवुद्धि पुष्ट करणारें शिक्षण जर पुरें होतें तर मग शाळा, कॉलेजें हीच साधन संपत्ति वस्स झाली असती. पण मला या शिक्षणानें तयार झालेल्या मंडळींच्या चेहऱ्यावर ‘शील व शहाणपणा’ या गुणद्वयाचें तेज फारसें दिसत नाहीं. ही साक्षात्काराची दोषैकदृष्टि म्हणून तूं वोलणारच! पण या थट्टेनें आतां मी घावरणार नाहीं. मला खरोखरच ‘नररत्न तोचि तूंचि स्त्रीरत्न’ असें ठांसून म्हणण्याइतकें दोघांचें ध्येयस्वरूप स्पष्ट दिसत आहे. आंतील प्रकाश तुला शब्दांनींच वर्णन करून दाखविणें मुष्किलीचें आहे हें मी कबूल करितों.

या सर्व वर्णनांत तुला विनोदाची लकेर दिसेल पण ती तेथें नाहीं हें मी निक्षून सांगतों. एकनाथाला झालेलें श्रीदत्तात्रयाचें दर्शन हा साक्षात्कार झाला असें मी मानतों. माझी त्याच्यावर पूर्ण श्रद्धा आहे. पण या जन्मीं माझ्या तें नशिवीं नाहीं अशी माझी खात्री झाली आहे. अशा उदात्त साक्षात्काराला जी चित्तशुद्धि लागते ती आज तर

मजजवळ नाहींच पण या जन्मीं साधेल किंवा नाहीं याचीच शंका आहे. 'The new man is always troubled by the old man' अशा तऱ्हेचें जर्मन तत्वज्ञानी कॅण्ट याचें एक वाक्य मला आठवतें. तें माझ्या पूर्ण अनुभवास येत आहे. माझ्या भूतकालाचा आत्मा पिशाच्चाप्रमाणें माझ्या नव्या आत्म्याच्या मानगुटीस बसत आहे हें मला समजतें. एकनाथाचा जुना आत्मा जनार्दनस्वामींच्या संगतींत पार जळून गेला होता. माझा जुना आत्मा लंगडा किंवा अनंग झाला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. पण अनंग असून तो अनंगाप्रमाणें त्रास द्यावयास कमी करीत नाहीं. पण तो त्रास मला आतां असह्य झाला आहे इतकेंच नव्हे तर तो कापसाप्रमाणें अगदीं दह्यावस्थेंत आहे. आगकाडी लावावयाचा उशीर! पण ती आगकाडी मजजवळ नाहीं, व ती लावणारा सद्गुरु या जन्मांत मिळण्याची मला आशा नाहीं. या निराशेंतच झालेल्या प्रगतीवरून 'अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्' या गीतावाक्यावर माझी पूर्ण श्रद्धा बसत चालली आहे. हा शेवटचा साक्षात्कार होईपर्यंत गौण साक्षात्कारांवरच मी संतुष्ट होत आहें. शेवटच्या साक्षात्कारापेक्षां हे गौण जरी असले, तरी ते माझ्या भूतकालिक पशुवृत्तीच्या मानानें किती तरी उच्च दर्जाचे आहेत. मी पशूचा मनुष्य झालों, सभ्य गृहस्थांच्या पंक्तिस बसून पावन झालों. आतां तेथून देवभक्त व देशभक्त या उच्च पदवीची आकांक्षा करण्याइतकी धमक आली आहे. तेव्हां पुढील एकाद्या जन्मीं याच्याही पुढली पायरी गांठतां येईल हें मानणें म्हणजे अगदींच मृगजळावर विश्वास ठेवण्यासारखें आहे असें तुझ्यासारखा जडवादीही म्हणूं शकेल असें मला वाटत नाहीं. ईश्वर ईश्वर म्हणजे काय तो भिंतीसारखा हातीं लागण्यासारखा पदार्थ आहे? आपलें उच्च ध्येय पूर्णपणें ज्या मूर्तींत आपणांस दिसतें तोच आपला ईश्वर. त्याचे गुण आपल्या अंगांत उतरविणें हाच साक्षात्कार. जसजसें ध्येय उच्च उच्च होत जाईल तसतशी ईश्वराची कल्पनाही बदलत जाणार. ती शेवटीं कोठें थांबणार याची कल्पना मला आज होत नाहीं, तेथें श्रुतिमाउलीसच शरण गेलें पाहिजे. पण ती कोठें दाद देत आहे? 'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसासह!' या वाक्यानें तिनें वाटाण्याच्या अक्षता देऊन टाकल्या आहेत. म्हणून झालेली नैतिक व धार्मिक प्रगति मी खोटी म्हणूं कीं काय? उपनिषदांत मनुष्यांच्या आनंदापेक्षां गंधर्वांचा आनंद शंभरपट असें एक लांब कोष्टक दिलें आहे. त्याच्या फोडणीचा नुसता वास मला येऊं लागला आहे. 'श्रोत्रियस्य अकामहतस्य,' म्हणजे शेवटला ब्रह्मानंद येथेंच मिळूं शकतो असें

बृहदारण्यकोपनिषदांत म्हटलें आहे. पण तो कोणाला? तर जो श्रोत्रिय निर्लोभ असेल त्याला. येथें श्रोत्रियत्व मिळविण्याचीच पंचाईत. मग निर्लोभपणा कोठून मिळावा? पण मित्रा, या वाक्यानें मला रस्ता दाखविला यांत शंका नाहीं. हे दोन डोंगर चढून जाणें कठिण तर खरेंच, पण चढावयाला आपणांस ईश्वरानें पायऱ्या व पाय हीं दोन्हींही साधनें दिलीं आहेत. तुझ्या जुनागडास गिरनार पर्वतावर मी व तूं दोघेही चढत असतांना आपली काय धांदल उडाली हें तुला अजून आठवत असेल! पण हल्लीं प्रमाणेंच त्या वेळेस देखील तूंच माझा गुरु झालास; एकएक पायरी दोघांनीं हातांत हात घालून चढून शेवटीं दत्तात्रेयांच्या पादुकांचें दर्शन आपण घेतलें ना? त्याप्रमाणेंच मी तिकडे आलों म्हणजे आपण या श्रोत्रियत्व व निर्लोभत्व यांच्या पायऱ्या हातांत हात घालून चढूं. फराळाचें सामान करून देणारी कोणीतरी तुझ्या घरांत आहेच. तिला तसदी पडणार, पण तिला तुझें निम्में नाहीं—सगळेंच पुण्य मिळणार असें मी म्हणतों. पण अगोदर परवानगी घेऊन ठेव."

# ४

# ' धर्मभोळेपणा '

" ........मित्रा, तुझीं एकाच विषयासंबंधानें लिहिलेलीं चार पांच पत्रें पोंहचलीं. या सर्व पत्रांत माझ्या धर्मभोळेपणाविषयीं तूं माझा एकसारखा उपहास करीत आहेस असें मला स्पष्ट दिसत आहे. तुझ्या उपहासाचें मला कांहीं वाटत नाहीं, पण तुझी सहधर्मचारिणीहि या उपहासाच्या धर्म (?) कार्यांत तुझी खरो-खरीची सहचारिणी झालेली दिसते! कारण प्रत्येक पत्राच्या शेवटीं लिहिलेला ताजा कलम तिचा आहे. एवढेंच नव्हे तर आंतील कोमल शिव्या व व्याजोक्ति हीं पुरुषाचीं खास नव्हत, हें ओळखण्याइतकी व्यवहारदशा माझ्या ह्या शमावस्थेंतदेखील कायम राहिली आहे. कोणीकडून व कसें कां होईना, हें नवरावायकोचें ऐक्यमत पाहून मला तुझें व तुझ्या धर्मपत्नीचें कौतुक व अभिनंदन केल्याशिवाय राहवत नाहीं. तूं स्वतः तिला शिक्षण देऊन व तिनें त्या शिक्षणाचें सार्थक करून या उच्चावस्थेला दोघेंही पोंचलांत हें पाहूनही मला एक प्रकारचा आनंद होत आहे.

**' संसारिकेषु च सुखेषु वयं रसज्ञाः '**

हा उत्तररामचरितांतील श्लोक स्वतःस उद्देशून तूं कितीदां तरी म्हटला असशील. तरी पण बरें, तो एकाद्या पत्रांत मोठ्या अक्षरांत लिहून मला हिणवून दाखविण्याची घाई केली नाहींस! नाहींतर आपल्यासारख्या उतावळ्या नवऱ्यास खुद्द धर्मपत्नीनेंच वाशिंग बांधल्यावर तो प्रकार होणें स्वाभाविक होतें! मी धर्मभोळा आहे असें वारंवार ठांसून सांगण्यापूर्वीं धर्मभोळेपणा कशाशीं खातात याचा तरी तुमच्यासारख्या सुशिक्षित नवराबायकोनीं विचार करावयाचा होता! पण सुशिक्षित-पणाची बेगडी झकाकी पांघरून उसन्या शहाणपणानें निःसंशय झालेल्या लोकांना हा विचार कोठून सुचणार? आज तुझ्या गालिप्रदानयज्ञाचें अवभृत स्नान पुरें करून घ्यावें या विचारानें ही लेखणी हातीं धरीत आहें. यज्ञाची दक्षिणा येत्या पत्रांत भरपूर मजकडे पावती होईलच.

अरे, प्रत्येक संस्थेंत शरीर व आत्मा हे दोन अंश असलेच पाहिजेत. आणि संस्था म्हटली म्हणजे व्यवहारदशा आलीच. व्यवहारदशेंत शरीराशिवाय आत्मा मिळणें अगदींच अशक्य आहे. धर्म या संस्थेंत शरीर व आत्मा हे दोन अंश असलेच पाहिजेत. कारण धर्म हा व्यक्तिगत असो वा राष्ट्रगत असो ती व्यवहारदशेंतीलच एक संस्था आहे. धर्माच्या हजार व्याख्यांपैकीं मी येथें एकही देत नाहीं. कारण व्याख्यांचा मला तिटकारा आहे. वादविवाद व्याख्यांवर येऊन ठेपला कीं शब्द-च्छलाला आरंभ झालाच असें समजावें. म्हणजे वादविवादांत व्याख्यांचा उपयोग नाहीं असें अनुमान काढूं नकोस. पण शब्दच्छलापर्यंत त्यांची केव्हांही मजल येतां कामा नये. व्यक्ति व समाज या दोघानांही पूर्णतेस नेणारी संस्था किंवा नियमाचें जाळें अशी तात्पुरती व्याख्या शब्दच्छलाच्या भानगडींत पडत नसलास तर तुझ्या-पुढें मी ठेवतों. तेव्हां पूर्णत्वास नेणारी शक्ति हा या संस्थेचा आत्मा आहे. व त्या शक्तिस प्रदर्शित किंवा व्यक्त करणारें धर्माचें ब्राह्मस्वरूप हें त्या संस्थेचें शरीर होय. या शरीरांत जोपर्यंत आत्मा आहे तोंपर्यंत तें जिवंत असतें, नाहींतर प्रेत! व्यक्तीस किंवा समाजास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें पूर्णत्वास नेण्याचें सामर्थ्य असतें तोंपर्यंत तो खरा धर्म–जिवंत धर्म, म्हणून समजावें. हें सामर्थ्य नाहींसें होत चाललें कीं तो धर्म हानिकारक धर्मभोळेपणाच्या प्रांतांत हळुहळू जात चालला म्हणून समजावें. धर्माचा पगडा व्यक्तीवर किंवा समाजावर जोंपर्यंत खरा आहे–तोंपर्यंत तो त्यांस हळुहळू पूर्णत्वास नेत आहे, अशी त्या व्यक्तीची व समाजाची खात्री आहे, तोंपर्यंत इतर द्रष्टयांस तो धर्म कितीही अडाणीपणाचा वाटला तरी त्या व्यक्तीपुरता तो धर्म खराच आहे असें धरून चालण्यास काय हरकत आहे? इतर द्रष्टयांनीं तो धर्म अडाणीपणाचा किंवा खाड्यांत लाटणारा आहे असें त्या त्या व्यक्तीस किंवा समाजास दाखवून देण्याचा–खात्री करून देण्याचा खुशाल प्रयत्न करावा; त्यांत कांहीं एक वावगें नाहीं. सर्व गोष्टींत धर्म हीच वाव अंतरात्म्याच्या खात्रीची आहे. 'तेथें कांहीं चाड नाहीं कुणाची' हें लक्षांत ठेव. म्हणून धर्म व धर्म-भोळेपणा ह्या गोष्टी व्यक्तिसापेक्ष आहेत, समाजसापेक्ष आहेत. या कामांत कोणी कोणास हंसू नये. हें मराठी क्रमिक पुस्तकांतील वाक्य साधें पण अत्यंत अर्थपूर्ण आहे, हें आपल्या समाजांतील मोठमोठ्या विद्वानांसही समजूं नये, ही देशाच्या दुर्दैवाची गोष्ट आहे. गीतेमधील 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।' हा श्लोक हेंच तत्व सर्व मनुष्यजातीस कंठरवानें सांगत आहे. व्यवहारदशाच मुळीं सापेक्ष

आहे. तिच्याकडे केवळ निरपेक्ष दृष्टीनें पाहणें म्हणजे रत्नाची किंमत रसायनशास्त्र-दृष्ट्या करण्या इतकेंच शहाणपणाचें होईल.

माझ्या धर्मभोळेपणाविषयींची दोन तीन उदाहरणें तूं देऊन आपल्या श्रेष्ठ तत्वांचा सोदाहरण खुलासा करण्याचा प्रयत्न केला आहेस हें मी कबूल करतों. पण तो प्रयत्न निष्फळ झाला आहे हें मी तितक्याच जोरानें सांगतों. मी अजून मूर्तिपूजा करतों हें पाहून तुझ्या नाकाला मिरची झोंबली. पण मूर्तिपूजेपासून माझी मानासिक संपत्ति वाढली कीं कमी झाली, हें मिल्लसाहेबांच्या 'जनहितवाद' पुस्तकाचीं पारायणें करून सुद्धां तूं आपल्या मनाला विचारूं नयेस याचेंच मला आश्चर्य वाटत आहे! मूर्तिपूजेपासून व्यक्तीरूपानें माझा किंवा समाजाचा काय तोटा झाला आहे याचें गणित तरी मला एकदां कळूं दे. देवालयांत गेल्यावर मनुष्याच्या मनांत सात्विक भाव उत्पन्न होतात, कीं राक्षसी—आसुरी कल्पना येतात, या प्रश्नाचें उत्तर आपण सहकुटुंब सहपरिवारें द्यावें. स्नानसंध्या केल्यावर जरा बरें वाटतें, हे उद्गार आपले मोठेमोठे सुधारक वीरही केव्हां केव्हां काढतांना दृष्टोत्पत्तीस येतात. मीं 'केव्हां केव्हां' असें मुद्दाम म्हणत आहें. कारण, सुधारणेच्या सभांत धूपारती चालू असतां त्यांच्या अंगांत सुधारणा देवीचा संचार होऊन जें ते बडबडतात तो सर्व देवीच्या धूपाचा प्रभाव असें मला वाटतें. म्हणजे मूर्तिपूजेला मी अगदीं उच्चस्थान देत आहें असें तूं समजूं नकोस. 'अधमा प्रतिमापूजा। तीर्थयात्राधमाऽधमा। हें तत्व मला कबूल आहे. पण वरची पायरी हातीं आल्याशिवाय खालची सोडून कसें चालेल? 'मध्यमा ध्यानधारणा'च हातीं येण्याची पंचाईत! मग 'उत्तमा सहजावस्था' प्राप्त होणें लांबच राहिलें! या एका उदाहरणानेंच तुझी चूक कोठें होतं आहे हें तुझ्या ध्यानांत येईल. साध्य वस्तुविषयीं दोन्ही पक्षांचें एकमत आहे हें मी गृहीत धरून चालतों. कारण मनुष्याचें इहपरलोकचें आत्यंतिक कल्याण व्हावें हा हेतू दोन्हीं पक्षांस मान्य होईल. तुला पाहिजे तर 'परलोकचे' हा शब्द काढून टाक. इहलोकींचेंच सर्व कर्तव्य चांगलें पार पडावें हा हेतु तुला खात्रीनें मान्य होईल. इतका कबूल केलास तरी माझ्या म्हणण्याला कांहीं बाध येत नाहीं. आतां हा हेतु कबूल केलास तरी मान्य केल्यावर प्रश्न एवढाच राहील कीं, स्नानसंध्या जपतप, मूर्तिपूजा वगैरे साधनें किंवा तुझ्या भाषेंत बोलावयाचें म्हटलें म्हणजे धर्मभोळेपणाचे प्रकार, या इहपरलोकींचा किंवा तुझ्या समजुतीप्रमाणें इहलोकच्याच कर्तव्याला साहाय्य करितात किंवा प्रतिबंध करितात! या प्रश्नाचें उत्तर नीट विचार

करून दे. ढोंगी लोकांच्या स्नानसंध्येला मी स्नानसंध्याच म्हणत नाहीं. तिनें झालेलें नुकसान स्नानसंध्येच्या माथ्यावर न मारितां ढोंगाच्या माथ्यावर लादलें पाहिजे. नैय्यायिकांचे मला फार आभार मानावेसे वाटतात. हा दोष आपण सर्वलोक हरहमेश तर्क करीत असतां करीत असतों. कार्याचें नियत कार्य समजून घेण्याला फार प्रयत्न करावा लागतो. पण प्रयत्न करणें विद्वानांच्या व अविद्वानांच्या मनाला, फारसें भावत नाहींसें दिसतें. निदान दुर्दैवी हिंदुस्थानाला सर्वगुण भावतात, पण जोराचा प्रयत्न हा तेवढा गुण भावत नाहीं. घटाला माती व कुंभार हीं खरीं कारणें. माती आणणारा गाढव हें कारण अन्यथासिद्ध अतएव औपधिक आहे. देशाच्या अवनतीला धर्मभोळेपणा हें कारण असेंच निव्वळ औपाधिक किंवा अन्यथासिद्ध आहे. मनोदौर्बल्य हें खरें कारण. तें असलें म्हणजे सोन्याची देखील माती होते. मग धर्म व धर्मभोळेपणा यांची गोष्ट काय सांगावी? अखिल भारतललामभूत साध्वी अहिल्याबाई होळकर हिच्यांत मनोदौर्बल्य नव्हतें. तिचा धर्मभोळेपणा हिंदुस्तानला नडला अगर उपयोगीं पडला याचें उत्तर तुझ्या सुशिक्षित बायकोनेंच शुद्ध मनानें द्यावें. शिवाय शरीरास जशी मलाची व मलद्वारांची जरूर आहे तशीच धर्माची गोष्ट आहे. मलापासून शरीरास इजा होतां कामा नये. मल हा तेथें व्हावयाचाच. तो मल बाहेर जाण्याची व्यवस्था जशी निरोगी शरीरांत आपोआप होते तशीच व्यवस्था बळकट धर्मशरीराची आहे. समाजरूपी शरीराचीही अशीच गत आहे. दररोज नवें रक्त उत्पन्न होऊन शरीराची वाढ होण्यासही मलोत्पत्तीची व मलपरिहाराची व्यवस्था अवश्य आहे. धर्मभोळेपणाला सर्वथैव मलाची उपमा देतां येईलसें मला वाटत नाहीं. पण घटकाभर तुझ्या करितां तो मलरूप आहे असें धरून चाललें तरी शरीराची उपमा पूर्ण करून घेऊन असें म्हणतां येईल कीं, धर्मभोळेपणाचा मल आपोआप बाहेर जाण्यास वीर्यवान् धर्मशरीरांत चांगलीच सवड असते. वीर्य असेल तर तो धर्मभोळेपणा जिरून जातो. व बाकीचा मल उरला तरी तो आपोआप बाहेर निघून जातो. पण माझ्या दृष्टीनें धर्मभोळेपणा हा मलच नव्हे. मल घालविणारें तें एक डिसइन्फेक्टंट आहे. शारीरिक व मानसिक मल तर्कानें जातात असा तुम्हां सर्व सुशिक्षितांचा ठाम सिद्धांत झालेला दिसतो. तो अनुभवानें खोटा ठरतो. मनुष्याच्या मनाच्या तीन शक्ति मानसशास्त्रवेत्त्यांनीं सांगितल्या आहेत. तर्कबुद्धि, भावना व इच्छाशक्ति अशीं मी मराठींत त्यांना नांवें देतों. आपलें बहुतेक जीवित पहिल्या शक्तिपेक्षां दुसऱ्या दोन शक्तींवरच चाललें आहे. पहिलीचा उपयोग

दा. क्र.

निषेधरूपाचा आहे. पहिली शक्ति जर पूर्ण वाढीस गेली तर मनुष्य उत्तम कौलक्ष व सूक्ष्म भेद काढणारा होतो. पण दुसऱ्या दोन्ही शक्ती चांगल्या वाढल्या तर मनुष्याला पहिल्या शक्तीची वाढ न होतां देखील त्या देवत्व देऊं शकतील. ह्या दोन्ही शक्तींना धर्मभोळेपणाचें पौष्टिक वेतानें दिल्यास चांगलें मानवतें इतकेंच नव्हे तर तें त्यांच्या वृद्धीस अवश्य आहे. मनुष्याची भावनाशक्ति, कल्पनाशक्ति, इच्छाशक्ति लंगड्या तर्कानें उचंबळत नाहींत. धर्मभोळेपणा म्हणजे कल्पनाशक्तीचाच खेळ आहे. हा खेळ बहुरंगी असून तो खेळतांना या शक्तींना एकप्रकारचें भरतें येतें. त्यावेळेस जर अकलेचा किंवा शहाणपणाचा मसाला त्यांच्यांत घातला तर सत्कृत्यांची चमचमीत मेजवानी तयार होते; हा मसाला नसेल तर भरत्याचें वेडेपणाचें भरीत होतें. तें देखील मोठें चवदार असतें. मोठेमोठ्या कवींना तें फार आवडतें; इतिहासकार व तत्ववेत्ते या सोंवळ्या भट भिक्षुकांस चोरून खावेंसे वाटतें. पण उघडपणें तें खाण्यास भितात व बाहेरून त्याचा तिट्कारा आहे असें दाखवितात. या बिनअकली धर्मभोळेपणापासूनच इतिहासांतील महाभयंकर उत्पात झालेले दृष्टीस पडतात हें मला कबूल आहे. पण कोणता चांगला पदार्थ अकलेच्या उणीवेमुळें या जगांत बिघडला नाहीं ? ही अक्कल म्हणजे तर्कशुद्धीचा गुण नाहीं हें पक्कें ध्यानांत धरून ठेव. ही एक विलक्षण चीज अध्यात्मविचारांच्या लहरींत उत्पन्न होणारी आहे. ती धर्म व धर्मभोळेपणा ह्यांच्या संरक्षणांत फारच अवश्य आहे.

कोणत्याही संस्थेचें तत्वज्ञान पुरें समजण्यास त्या संस्थेचा प्रत्यक्ष घडलेला इतिहास अवश्य आहे. इतिहासाशिवाय तत्वज्ञान कोरडें असतें व तत्वज्ञानाशिवाय इतिहास आंधळा होय. या ऐतिहासिक दृष्टीनें आपण धर्मभोळेपणाची मीमांसा केली, तर सर्व भूतकाल धर्मभोळेपणाच्या आवश्यकतेची व उपयुक्ततेचीच साक्ष देईल. म्हणजे बिनअकली धर्मभोळेपणानें इन्क्विझिशनसारख्या क्रौर्यमूलक संस्थांचा व क्रूझेडसारख्या मौर्ख्यप्रेरित युद्धांचा इतिहास मी विसरलों आहे असें तूं समजूं नकोस. मला एवढेंच सिद्ध करावयाचें आहे कीं, कुटुंब, नगर व राष्ट्र या संस्थाचा प्रत्यक्ष अनुभव व भूतकालिक इतिहास हे धर्मभोळेपणाची मनुष्यजातीच्या पूर्णत्वास आवश्यकता आहे असें दाखवितात. कारण धर्मभोळेपणा हा मनुष्याच्या कल्पनाशक्तीस व भावनामय जीवितास पोषक आहे, तो पोषक न होतां दूषक होतो ही गोष्ट सर्वच चांगल्या संस्थांस लागू पडते. मग धर्मभोळेपणाच्याच माथीं हें खापर कां फोडावें हें मला समजत नाहीं.

दुसऱ्या एका दृष्टीनेंही सुमर्यादित धर्मभोळेपणाची उपयुक्तता मला दिसून येते. तिचा नुसता निर्देश करून हें पत्र संपवितों. महाकवि भवभूतीनें उत्तररामचरितांत कुटुंबस्नेहास ' एषा मोहमयी रज्जुः ' असें म्हटलें आहे. म्हणजे या रज्जूनें सर्व मनुष्यजात बांधली आहे. ह्या मोहाच्या पलीकडे जाणें मुक्तांसच शक्य आहे. इतकेंच नव्हे तर पृथ्वी व गंगा या देवतांना सुद्धां या रज्जूनें बद्ध केलेलें भवभूतीनें दाखविलें आहे. ही गोष्ट भवभूतीच्या मनांतील गूढभावार्थ काय आहे हें चांगलें दाखविते. तो भावार्थ हाच कीं, खरें सात्विक प्रेम कितीही वेडेपणाचें असलें तरी तें देवतांनासुद्धां शोभादायक आहे व या प्रेमाच्याच रज्जूनें मनुष्यजात पूर्णत्वास पोंचते. प्रेमाचा वेडेपणा व धर्मभोळेपणा यांत मला फारसें अंतर दिसत नाहीं, व प्रेमाच्या वेडेपणाचा मनुष्यजातीस जो उपयोग आहे तोच धर्मभोळेपणाचा आहे असें मला स्पष्ट दिसत आहे. ज्या दिवशीं प्रेम हें आंधळें व वेडें म्हणून सोडून देऊं त्याच दिवशीं धर्मभोळेपणा हा वेडेपणाचा प्रकार आपण खुशाल सोडून द्यावा. जों पर्यंत वेडें प्रेम आहे तों पर्यंत वेडा धर्मभोळेपणा असणारच व तो अवश्यही आहे.

आत्मबीजाची पूर्ण वाढ होण्यास जशी प्रेमाच्या कवचाची जरूरी आहे, शरीराच्या रक्षणास जशी कातडीच्या कवचाची जरूरी आहे, तशीच धर्मबीजाच्या रक्षणाला धर्मभोळेपणाच्या कवचाची जरूर आहे. आंत बीज जर नसेल तर कवच जसें निरुपयोगी तद्वतच खऱ्या धर्माचें जिवंत बीं नसेल तर धर्मभोळेपणाच्या कवचाची स्थिति आहे. तेव्हां कांहीं धर्मभोळेपणा उपयुक्त व कांहीं धर्मभोळेपणा हानिकारक असा भेद करणें अवश्य आहे. माझी स्नानसंध्या हानिकारक आहे असें तूं पाहिजे तर म्हण. मला ती अजून तशी वाटत नाहीं. माझ्यापेक्षांही तुझ्यासारख्या कुटुंबीजनास तर ती किती पटीनें अवश्य आहे हें उभयतांस ज्या दिवशीं कळेल तो सुदिन. झालें आमचा यज्ञ संपला. तुमचा गालियज्ञ पुन्हां सुरूं करावा. व तो करितांना आपले धर्मपत्नीसच अध्वर्युपण द्यावें म्हणजे आमची आहुति पडली तरी ती जरा कोमल रीतीनें तरी पडेल! संन्यासी झालों तरी कालिदास कांहीं पाठ सोडत नाहीं! त्याचा शृंगार ध्वनिरूपानें लेखणींत येऊन बसतो. त्याला मी काय करूं ? "

---

# ५

# ‘ खरी मूर्तिपूजा ’

“ मित्रा, मी आज सुमारें एक वर्ष अज्ञातवासांत घालविलें. तुझीं दोन तीन पत्रें तशींच पडून राहिलीं होतीं, त्यांचा समाचार आज घेण्याचें मनांत योजिलें आहे. तिन्ही पत्रांत तूं व तुझी धर्मचारिणी एक प्रकारच्या कलहांत आहांत हें स्पष्ट दिसत आहे. तुम्हीं आतां परस्परांशीं धर्मचर्चा करूं लागलां आहांत हें पाहून एक प्रकारचें अत्यंत समाधान वाटतें. ‘ एक प्रकारें ’ असें म्हणण्याचें कारण ‘ वादे वाद जायते तत्त्वबोधः ’ या ऐवजीं ‘ वादे वादे जायते तत्त्वनाशः ’ ही म्हण आतां पडत जाणार कीं काय अशी भीति प्रचलित वादविवादांचे आदिमध्यान्त पाहिलें असतां मनांत येणें स्वाभाविक आहे. निदान तुमच्या घरगुती विवादांचें पर्यवसान छत्तीसाच्या आंकड्यांत न होवो हीच ईश्वराजवळ प्रार्थना आहे. तुमच्या वाद-विवादाचा विषय ‘ मूर्तिपूजा ’ हा आहे. तुझी पत्नी तुला रोज देवपूजा करण्याचा आग्रह करिते व तुला देवपूजेंत वेळ घालविणें म्हणजे समाजसेवेचा तितका वेळ कमी करणें असें वाटतें. हें भांडण मजकडे आलें, हें मी आपलें भाग्य समजतों. कारण या विषयावरील माझे विचार बरींच वर्षें मनांतल्यामनांत तुंबून राहिल्यामुळें विक्रमोर्वशीय नाटकांतील विदूषकाच्या पोटाप्रमाणें माझें मन फुटतें कीं काय अशी मला भीति होती, पण आतां तुम्हींच त्या विचारपूरोत्पीडास बाहेर जाण्यास वाव दिल्यामुळें वरील प्रसंग टळला. मित्रा, जॉर्ज ईलिअटची ‘ ॲडमबीड ’ ही कादंबरी आपण दोघांनीं बरोबर वाचली हें तुला आठवतें काय ? त्या कादंबरींतील पहिल्याच भागांत दोघां भावांचा ईश्वरप्रार्थना व कामधंदा यांच्या गुणावगुणाविषयीं चाललेला वादविवाद तुला या तुमच्या कलहाच्या वेळीं कसा आठवला नाहीं याचेंच मला आश्चर्य वाटतें. समाजसेवा व नियतकर्म हीच ईश्वराची खरी सेवा याबद्दल प्रश्नच नाहीं. पण ईश्वरप्रार्थना किंवा देवपूजा इत्यादि पावन कर्मांशिवाय समाजसेवा किंवा नियतकर्म बरोबर होईल किंवा नाहीं याचीच मला शंका आहे. तूं जर असें म्हण-

शील व शुद्ध वर्तन हीं साधनें नियतकर्मसिद्धीस पुरे आहेत व या कीं, साधन...ला ईश्वरप्रार्थनेची किंवा देवपूजेची मुळींच जरूर नाहीं तर यावर मग स्वस्थच बसणें भाग आहे. कारण माझी मूर्तिपूजा किंवा देवपूजा हें साधन आहे, साध्य नाहीं. तुझें साध्य जर साधनाशिवायच तुला प्राप्त होत असेल, तर त्यांत मला आनंदच आहे. साध्याची गंगा तुझ्या दाराशीं आयतीच वाहात असेल तर साधनाच्या कावडीची कांहींहि जरूर नाहीं हें उघड आहे. पण मला असें वाटतें कीं, हा तुझ्या शुद्ध तर्कावलंबी मनःप्रवृत्तीचा परिणाम आहे. तुझ्यासारखेच नुसत्या तर्कानें जर व तर या डोंगरांचें उल्लंघन करून साध्य गंगेंत घोडे न्हाले असें म्हणणारे हरीचे लाल या जगांत थोडके नाहींत. आपल्या ह्या अभागी हिंदुस्थानांत तर त्यांचा फारच सुकाळ आहे. ‘ वचने किं दरिद्रता ’ या म्हणीचा गूढार्थ मला या लोकांकडे पाहून हसतां हसतांच कळूं लागला. बाबा, मनुष्य-स्वभावाचें परीक्षण पुरें झाल्याशिवाय असल्या गोष्टींचा निकाल लागत नसतो. एका इंग्रजी ग्रंथकारानें मानवी जीवितांत दोनच अडचणी आहेत, त्या दूर झाल्या म्हणजे चारी मुक्ती हातांत आल्याच म्हणून समजावें असें म्हट-ल्याचें मला स्मरतें. त्या त्याच्या अडचणी कोणत्या म्हणून विचारशील तर याच कीं, कर्तव्य किंवा नियतकर्म कोणतें हें समजणें. व हें समजल्यावर तें पुरें तडीस नेण्याचें धैर्य असणें. किती थोड्या शब्दांत या अडचणी मांडतां आल्या! या शब्दांतून क्रियेकडे जाणें म्हणजे या अडचणी प्रत्यक्ष दूर करणें हें काम किती श्रमाचें, किती सद्गुणांच्या प्राप्तीवर अवलंबून असणारें, किती विघ्नांनीं दडपलेलें आहे याची तुला कल्पना आहे का? ईश्वरप्रार्थना किंवा देवपूजा यांचा उपयोग या दोन अडचणी नाहींशा करण्यांत होत असेल तर मग तुझ्या पत्नीचें म्हणणें केवळ आग्रही, धर्मभोळेपणाचें किंवा धर्मभोळ्या वेडसर आग्रहाचें आहे असें कसें म्हणतां येईल? पण, मी जी मूर्तिपूजा तुम्हां दोघांस करावयास लावणार आहे ती याहून थोडी निराळी आहे. तिला तत्वज्ञानाचा आधार आहे व तिचें शिखर अभ्युदय व निःश्रेयस या सुवर्णमय कळसांनीं सुशोभित झालेलें आहे!

मी आज वेदान्त किंवा तुझ्या नेहमींच्या मस्करीच्या भार्षेतील ‘ वेडान्त ’ या विषयाचें नांवही काढीत नाहीं. प्रत्येक माणसाचा जन्मतःच कांहीं गुणांकडे ओढा किंवा प्रवृत्ती असते हें तुम्हां दोघांना किंबहुना सर्व लोकांसही पटण्यासारखें आहे. या गुणांची पूर्ण वाढ किंवा प्राप्ति हें त्या माणसाचें अंतिम ध्येय ठरलें. परंतु गुण

ही कांहीं दृश्य वस्तु नाहीं कीं ती पटकन् पाहून ओळखून घेतां येईल. त्या गुणाची मूर्तिपूजा प्रथम झाली पाहिजे. त्या गुणाची मूर्ति दृश्यरूपांत–अनुभवकक्षेंत–आली पाहिजे तेव्हां तिची पूजा होईल. ज्या गुणाचें आपणांस ज्ञान हवें असेल तो गुण मूर्तिमंत ज्या माणसांत दिसेल त्या मनुष्याचें आपणांस दर्शन घेतलें पाहिजे. यालाच मी तीर्थयात्रा म्हणतों. ही तीर्थयात्रा नेहमींहून जरा निराळी आहे. पण नेहमींच तीर्थयात्रा कुचकामाची असते असा माझा भावार्थ नाहीं. ती तीर्थयात्रा आमच्या या मूर्तिपूजेला फार उपयोगी आहे पण तें काम शेवटलें आहे. गुणांचें हुबेहूब चित्र काढणारे सर्व ललितकलांचे भक्त हे नवीं तीर्थें उत्पन्न करितात. त्यांनीं उत्पन्न केलेल्या या तीर्थांत स्नान केल्याशिवाय या गुणांच्या शब्दब्रह्माचेंच ज्ञान होणार नाहीं, मग परब्रह्माची गोष्ट कशाला पाहिजे? आमच्या तीर्थयात्रेपासून गुणांच्या शब्दमूर्ति दृष्टीस पडतात. चित्रकार आपल्या प्रतिभा–सृष्टींतून तसबिरींच्या रूपानें या मूर्ति आपणांस दाखवितात. ते शब्दचित्रें काढून आपणांस उच्च गुणांच्या मूर्तींचें दर्शन घडवितात. इतिहास, कादंबऱ्याही हेंच मूर्ति घडविण्याचें व तीर्थें उत्पन्न करण्याचें काम करितात. हिंदु विधवेच्या प्रखर पातिव्रत्याचें व तीव्र असिधाराव्रताचें महातीर्थ बाणकवीनें महाश्वेतेची शब्दमूर्ति काढून जें एकदां उत्पन्न केलें आहे तें जगांत संस्कृत वाङ्मय आहे तोंपर्यंत उज्ज्वल माहात्म्यानें स्फुरतच राहणार. सीता, सावित्री, शकुंतला, वसंतसेना, ह्या निरनिराळ्या परिस्थितींतील पातिव्रत्याच्या व शुद्ध दांपत्यप्रेमाच्या मूर्ति निरनिराळ्या कवीनीं आपल्या प्रतिभेनें उत्पन्न केल्या आहेत. त्यांचें दर्शन वाङ्मयतीर्थांत स्नान केल्यावरच होणार. अशींच उत्तमोत्तम ऋषींची, वीरांचीं, वैश्यांचीं, व शूद्रांचीं मूर्तिदर्शनें महाचित्रकार व महाकवि आपणांस जेव्हां करून देतील, तेव्हां कोठें आपल्या मूर्तिपूजेला आरंभ होणार. यानंतर आपण व्यवहारांत पडल्यावर 'जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मणि वर्तते !' या गीतोक्तीप्रमाणें आपणांस चांगली जिज्ञासा उत्पन्न होते, व शब्दब्रह्मांतून आपण परब्रह्माच्या मार्गांत प्रविष्ट होतों. मग अनुभवांत आपल्याला या गुणांच्या मूर्तींचें दर्शन होऊं लागतें, व आपल्या कल्पनेप्रमाणें एखादी जिवंत गुणाची मूर्ति भेटली कीं, आपण विभूतिपूजेंत प्रविष्ट होतों. तीर्थयात्रेंतून शाब्दिक मूर्तिपूजेंत, व शाब्दिक मूर्तिपूजेंतून सगुण भक्तींत किंवा अर्वाचीन कालांयलीन भाषेंत जिला विभूतिपूजा ( Hero worship ) म्हणतात तींत प्रविष्ट होतों. विभूतिपूजेनंतर त्या गुणाचें ध्यान करावें लागतें. व ध्यानाची

तंद्री लागतां लागतां आपणांमध्येंच त्या गुणाची मूर्ति उत्पन्न होऊन त्या गुणाचा सहजावस्थेंतला लाभ आपणांस मिळतो. मित्रा, खऱ्या मूर्तिपूजेला अशा रितीनें बाह्य जगांत आरंभ होतो, व अंतीं तिचा प्रवेश आपल्या अंतरात्म्याच्या अगदीं गाभ्यांत होतो. तेव्हांच तिला गुणाची सहजावस्था असे म्हणतात. या सहजावस्थेंत असतानांच आपणांस नियतकर्मे बरोबर समजतात व या सहजावस्थेंत तीं कर्मे पुरीं पडण्यास जो आत्मविश्वास लागतो व अनासक्तीचें धैर्य लागतें व जी तितिक्षादि गुणांची परंपरा अवश्य असतें तीं सर्व आपणांस सहज मिळते. ही सहजावस्था प्राप्त झाल्याशिवाय आपले सर्व व्यवहार रंग बेगडीचे होत यांत संशय नाहीं. अलीकडे 'कर्मयोग' याविषयीं जो तंटा माजला आहे तो आमच्या ह्या मूर्तिपूजेच्या ज्ञानाच्या अभावामुळेंच. भगवद्गीतेंत विभूतिवर्णनाचे सर्व श्लोक आमच्या मूर्तिपूजेचेच मंत्र आहेत हे तुझ्या ध्यानांत आतां आलेंच असेल. कर्मयोगाला सर्व नैतिक गुणांची आवश्यकता आहे. प्लेटोनें हे सर्व गुण आपल्या गुणपंचकांत निविष्ट केले आहेत. ज्ञानयोगही या गुणांशिवाय किंवा या विभूतिपूजेशिवाय शक्य आहे असें मला वाटत नाहीं. ज्ञानयोगाचा आत्मा जो निर्वासनत्व तो उच्च गुणांची पूजा व प्राप्ति होऊन निरामय आनंद झाल्याशिवाय कसा लाभणार हेंच मला समजत नाहीं. ज्यांना समाजाची किंवा चातुर्वर्ण्याची जरूर नाहीं पण ज्यांची समाजाला व चातुर्वर्ण्याला जरूर आहे अशा पुरुषांना मी ज्ञानयोगी समजतों. पण ईश्वरी आनंद, ईश्वरी सौंदर्य व ईश्वरी, सत्तत्व या सच्चिदानंदत्रयीची पूर्ण ओळख पटल्याखेरीज यांना समाज किंवा चातुर्वर्ण्य तुच्छ कसें वाटणार हें हें मला समजत नाहीं. व या त्रयीची ओळख पटल्याशिवाय जर तो चातुर्वर्ण्यादि संस्थांस तुच्छ लेखील तर तो तुझ्या आवडत्या उडाणटप्पूंच्या कायद्याच्या तडाक्यांत आलाच म्हणून खुशाल समजावें. हल्लीं या उडाणटप्पू ज्ञानयोग्यांचा सुळसुळाट बैराग्यांच्या रूपानें समाजाला नागवीत आहे असें मात्र तूं समजूं नकोस. हे उडाणटप्पू ज्ञानयोगी संस्थांच्या प्रकृतीप्रमाणें लोहित, शुक्ल, कृष्ण रंगाचेच केवळ आहेत असें नव्हे; तर ते बहुरूपी आहेत. बी. ए., एम्. ए. प्रोफेसर, वकील, सर्व धंद्यांत या खोट्या ज्ञानयोग्यांचा यथेच्छ उपभोग किंवा नरकसाधन प्राप्तियोग चाललेला आहे. ज्याला ज्याला उच्च गुणांची मूर्तिपूजा व सहजावस्था प्राप्त झाली नसून समाजव्यवस्थेंत केवळ यथेष्ट आहारविहारांकरितां बिघाड करण्याची इच्छा होते व समाजाच्या आपत्कालीं समाजाच्या कमकुवतपणामुळें व 'शाश्वत

धर्मगोप्ता ' भगवान् शेषशायी होऊन योगनिद्रेंत गाढ झोंपल्यामुळें, उन्मत्तपणाच्या निशेंत विघाड करण्याची शक्तिही असते, त्याला त्याला खोटा सांख्ययोगी, किंवा ज्ञानयोगी म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. प्रतिभेच्या नांवावर आळशी-पणाच्या गादीवर लोळणारा प्रोफेसर, कलियुगाचा प्रभाव म्हणून सर्व दुर्गुण व चैनी आपद्धर्माच्या सदरांत लोटणारा मिथ्याचारी ब्राह्मणब्रुव, धंद्याच्या प्रकृती गुणावर सर्व नैतिक जवावदारी लोटून सर्व व्यवहार खोट्यानाट्या गोष्टींनीं चालवून "उदासीन वदासीन " आपणांसच म्हणून घेऊन सदसद्विवेकबुद्धिवर लेप मारणारा वकील, ' पुरुषानीं ताळ सोडला, तेव्हां आतां आम्हीं तरी काय म्हणून बंधनें पाळावीं ? ' या उद्दामवृत्तीस ' ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहं ' हा भगवद्गीतेचा आधार घेऊन सैतान ज्या प्रमाणें वायबलाचा घेतो त्याचप्रमाणें शुद्ध सैतानी पद्धतीचा अंगी-कार करून ज्या विनयादि स्त्रीभूषणभूत गुणांना भराभर रजा देतात त्या सुशिक्षित-त्वाचें वहुमूल्य वस्त्र धारण करणाऱ्या ढालगज स्त्रिया, ब्राह्मणाचा एकही सद्गुण आंगीं न वाणतां व शूद्रांचें आगर बनून ब्राह्मणादि उच्च वर्गांना भलभलत्या शिव्या देणारा खालचा वर्ग, हे सर्वजण या असत्य ज्ञानयोग्यांच्या कळपांत खुशाल घालावे. याच्या विरुद्ध आमचा सहजावस्थादि चार पायऱ्यांची खरी मूर्तिपूजा करणारा पुरुष कोणत्याही वर्णाचा, जातीचा, देशाचा असो; तो आपल्या देशाचें, समाजाचें व जातीचें इहामुत्र कल्याण करणारा आहे असें समज. मित्रा, या गुणांचा अभाव आपल्या देशांत असल्यामुळेंच प्रचलित मूर्तिपूजा यांत्रिक बनून फलद्रूपतेला आंच-वली आहे, नाहीं तर तिच्यामध्यें लाज वाटण्यासारखें कांहीं एक नाहीं, असें माझ्या मनाला इतका खोल विचार करूनही वाटत आहे. ख्रिस्ती, आर्यसमाजी, प्रार्थना समाजी इत्यादि डोळस अंधलोक एक डोळाच उघडून तीर्थयात्रा या अंत्य व उपान्त्य पायऱ्यांस व्यर्थ दोष देत आहेत. निदान मनुष्यस्वभावाचें ज्ञान मिळवून व फोटोची विसाव्या शतकांत चाललेली मूर्खपणाची व अंधभक्तीची निःशंक मूर्तिपूजा पाहून तरी ज्या गृहस्थांनीं आपला गुणदर्शक दुसरा डोळा उघडला असता तर आम्हां सर्वांवर त्यांचे उपकार झाले असते. कारण या दुसऱ्या डोळ्याबरोबर कदा-चित् आध्यात्मिक दृष्टीचाही डोळा यांना मिळण्याचा संभव होता व जीवदशेंतून शिवदशेंत जाण्याचाही त्यांना व त्यांच्या अनुयायांना एक मार्ग खुला झाला असता. कार्लाईलला इमर्सनचे रानटी लोकांच्या मंबोजंबो नांवाच्या मूर्तिवरील सणसणीत कोरडे यांच्या पाठीवर व्रणरूपानें माझ्या सूक्ष्म दृष्टीस अजून दिसत आहेत. पण

विसाव्या शतकांत एक प्रकारचें गुणांधत्व रातांधळ्याप्रमाणेंच येतें असें मला तुझा इतिहास पाहून म्हणण्यास हरकत नाहीं. मित्रा, अदृश्य वस्तूंना प्रेमामुळें, आदरामुळें पूज्यबुद्धीमुळे, दृश्य स्वरूप दिल्याशिवाय मनुष्याच्यानें राहणें शक्य नाहीं, हा सिद्धांत तूं आपल्या दृश्य पेटिकेंत अगदीं खोल पुरचुंडींत बांधून ठेवच त्याजबरोबर प्रत्येक व्यक्ती व राष्ट्र यांची अदृश्य गुणांची मूर्ति भिन्न आहे हें हिंदुधर्मानेंच ओळखिलें असेंही स्वाभिमानानें तेथेंच लिहून ठेव. कोणता धर्म कालवशात् यांत्रिक बनत नाहीं व धर्माची बाह्यरूपें ' वासांसिजीर्णानि ' या महावाक्यानुसार कोठें जातमृत व मृतजात होत नाहींत हें तर मला सांग ! पण नाकावर फोड आला असतांना फोडाला कांपतांना नाकाचीच विल्हेवाट लावून सर्वांना अपशकुन करणाऱ्या दिवट्या माणसास काय म्हणावें ? तुझ्या बायकोचा आग्रह यावर लिहिलेल्या तत्वज्ञानाचाच अबुद्धिपूर्वक केलेला अनुवाद आहे. तिचा पक्ष घेतला म्हणून रागावूं नकोस. नाहींतर दोघांचें भांडण व तिसऱ्याचा लाभ होण्याच्या ऐवजीं माझें स्नेहनाश-रूपी मरणच ओढवेल ! पण हें सर्व अशक्य आहे. मंगलमय अशा या दसऱ्याचें सोनें पत्रांत पाठवीत आहे. दोघांनींही मान्य करावें हेंच विनंति. "

६

# ' मी स्वतंत्र आहे काय ? '

" मित्रा, आज दोन तीन वर्षें मी समाधींत होतों. तुझ्या पत्रांचीं पुडकीं मला काल मिळालीं. एकंदर सर्व पत्रें वाचून तुझ्या धार्मिक मनांत हळुहळु फरक पडलेला दृष्टीस पडत आहे हें तूं कबूल करणार नाहींस; पण मला तो स्पष्ट दिसत आहे. तुझ्या शेवटल्या पत्रांत तर ऋग्वेदाची एक ऋचा अवतरणरूपानें फडकत आहे. उपनिषदांचाही थोडासा अभ्यास चालला आहे असा मला भास होतो. स्पेन्सरला श्रुतिस्मृति व बायबल यांच्यापेक्षां जास्त मान देणारा व टेबलावर सर्व पुस्तकांच्यावर स्पेन्सरचें पुस्तक मुद्दाम मला चिडविण्याकरितां फुलें वाहून ठेवणारा तूं, आपल्या पत्रांत ऋग्वेदाची ऋचा व औपनिषदिक विचारांची छटा यांचा विटाळ मानीत नाहींस, इतकेंच नव्हे, तर त्याविषयीं मला शंका विचारण्यास तयार होऊन त्यांतील गोष्टी फार विचारार्ह आहेत अशी लेखी कबूली निमूटपणें देतोस हा मतान्तररूपी चमत्कार माझ्या तीन वर्षांच्या तपःसमाधीचाच परिणाम म्हणून मला दृष्टिगोचर होत नाहीं कीं काय, असा मला संशय येतो. अस्तु. तुझ्या शेवटल्या ऋग्वेदाच्या सातव्या मंडळांतील ' न सः स्वोदक्षो ' या ऋचेचा उल्लेख आहे. या ऋचेचें सायनभाष्य वाचून तुझ्या मनावर दैववादाचा पगडा बसतो आहे म्हणजे जीव दक्ष म्हणजे सामर्थ्यवान् किंवा स्वतंत्र नाहीं, ईश्वरेच्छेवर सर्वस्वी अवलंबून आहे. याच्या समर्थनार्थ सायनाचार्य उपनिषदांतील ' यदा एष उन्निनिषते तदा साधु कर्म कारयति ' या वाक्याचा आधार देतात. त्याचा अर्थ ईश्वराच्या मनांत जेव्हां मनुष्याची उन्नति करावी अशी इच्छा उत्पन्न होते तेव्हां तो मनुष्याकडून चांगलें कर्म घडवून आणितो. हा अर्थ तुला पटला आहे असें स्पष्ट दिसून येतें. यावरून तूं जें अनुमान काढीत आहेस तें मात्र तुझ्या उतावळ्या स्वभावाचें दर्शक आहे असें मला वाटतें. तूं मला जोरानें विचारीत आहेस कीं, स्पेन्सर साहेबांचा कार्यकारणभाव मनुष्यास सर्वत्र निगडित करीत आहे; या कार्यकारणभावाचें

बंधन मनुष्याला इच्छास्वातंत्र्य मुळींच ठेवीत नाहीं व तुमच्या उपनिषदांनीं सर्वांतर्यामी परमेश्वराची घोरपड जीवाच्या गळ्यांत बांधली आहे. ‘न सः स्वोदक्षः’ हा मंत्र जोंपर्यंत तुमचीं शास्त्रें एकसारखीं जपत आहेत तोंपर्यंत जीविताचें स्वातंत्र्य नीतिदृष्ट्या तुम्हीं कसें सिद्ध करणार? नीतिस्वातंत्र्य गेलें कीं उपदेशाला जागा कोठें राहिली? ‘यः सदिदं असदिदं इति विवेक्तुमलं स खलु उपदेशमर्हति’ हा बाणाच्या कादंबरींतील पुंडरीकाचा शोक, तुझा वेदान्त किंवा वेडामध्यें अंत पावणारें शास्त्र सर्व जीवांस करावयास लावीत आहे. भौतिकशास्त्रांचा कार्यकारणभाव व वेदान्तशास्त्राचा ईश्वरेच्छाबंध हे दोन्ही नीतिदृष्ट्या जीवाचें स्वातंत्र्य सारखेंच हरण करितात. मग स्तुतिनिंदेला तरी कोठें जागा राहिली? उंटाची मान लांब व देह कुरुप म्हणून उंटाला कोणीतरी दोष देतो काय? व हरिणांच्या सौंदर्याबद्दल व पर्णाशनतपाबद्दल त्यास कोणी मानपत्र देत आहे काय? गुलाबाचीं फुलें सुंदर व सुवासिक आहेत म्हणून त्यांचे आभार मानण्याची सूचना पुण्यास किर्लोस्कर थेटरामध्यें तुझ्यासारखा वजनदार व तात्विक पुढारीमन्यांनीं टाळ्यांच्या गजरांत कां न मांडावी? व लगेच त्या गुलाबाला कांटे आहेत म्हणून तुझ्या प्रतिपक्ष्यांनीं एखादी मृदु निंदेची मवाळ भाषेंतील अमेंडमेंट किंवा उपसूचना कां न आणावी? अज्ञानजन्य दैववाद व तात्त्विक विचारानंतर उत्पन्न झालेला ज्ञानजन्य दैववाद यांच्यांत परिणामाच्या दृष्टीनें भेद कोठें राहिला? असा हा पूर्वपक्ष तुझ्या शब्दांनीं जरी मांडला नाहीं, तरी माझ्या निर्विकल्प समाधिशक्तीच्या योगानें मला परकायाप्रवेश करतां येतो, इतकेंच नव्हे तर परात्मप्रदेशाची किल्लीही गुरुकृपेनें मला मिळाली आहे. म्हणून मी खात्रीनें असें सांगतों कीं, माझे हे शब्द वाचून तुला असें वाटलेंच पाहिजे कीं, जणूं कांहीं तूंच आपले रोजचे हातवारे करून मला उद्देशून बोलत आहेस. ह्या माझ्या शक्तीबद्दल दुसऱ्या कोणाची साक्ष देण्याचें कारण नाहीं. पण तुझी इच्छा असेल, तर तूं आपल्या पत्नीरूपी द्वितीय हृदयाला विचार. पुरुषांपेक्षां स्त्रियांचें हृदय जास्त कोमल असल्यामुळें सत्यासत्याचा निर्णय–निदान भावनामय प्रश्नामध्यें–त्याच-बरोबर देऊं शकतील. तुझ्या येथें तर ‘यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः’ या वाक्याच्या रंगीत पाट्या सर्व ड्रॉइंग–रूमभर टांगलेल्या आहेत. मग तुला तुझ्या हृदयदेवतेची साक्ष स्वमनोदेवतेपेक्षांही ज्यास्त किंमतीची वाटावी यांत नवल काय? बाकी घड्याळ बाळगणाऱ्याला वेळेची किंमत जितकी समजते,

तितकीच किंमत, ह्या उंचावर निव्वळ शोभेकरितां टांगलेल्या वाक्यांच्या पाट्यांना, तुम्हीं बोलघेवडे व 'वाचि वीर्यं द्विजानाम्' या वाक्याचा हरघडीं प्रत्यय आणून देणारे, सुधारकमन्य लोक देणार व देत आहांत असें मला कष्टानें म्हणावें लागतें. आतां विनोद पुरे. तुझी शंका बरोबर आहे. जगांत जे प्रश्न मोठमोठ्या नीतिनिपुणांसही निश्चयपूर्वक सोडवतां येत नाहींत, अशांपैकींच हा जीवाच्या स्वातंत्र्य-बंधनाचा प्रश्न आहे.

पण जितका प्रश्न कठिण तितकेंच खऱ्या सत्यशोधकास जास्त बाहुस्फुरण उत्पन्न होतें, व तपःसिद्धि झाल्यावर 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते' या न्यायानें ज्यास्त समाधान होतें. स्वातंत्र्य हा शब्द सापेक्ष आहे. जेथें बंधनच नाहीं तेथें 'मी स्वतंत्र आहें' याची जाहिरात कोण कशाला देईल? जेथें विधवाच दृष्टीस पडत नाहींत तेथें सौभाग्यवती ही पदवी देण्याचें कारण नाहीं. जेथें परराज्याचा गंध नाहीं तेथें स्वराज्यवादाची उठाठेव कोण करिल? सारांश, मनुष्यस्वभावाचीं बंधन व स्वातंत्र्य हीं दक्षिणोत्तर ध्रुवांप्रमाणें दोन टोकें आहेत. मनुष्यस्वभावाचींच कशाला, अखिल सृष्टीचीं हीं दोन टोकें आहेत. कार्यकारण भावानें निगडित झालेली सृष्टि आपाततः स्वातंत्र्यहीन दिसते. पण सूक्ष्म विचार केला असतां अखिल विश्वाला हें बंधन घालणारा स्वतः बद्ध असून कसें चालेल? तोच जर स्वतः बद्ध असेल तर त्याला बंधन घालणारा आणखी कोणी शोधिला पाहिजे. मग सत्राजिताचा बाप अठराजित्, त्याचा बाप एकोणीसजित्, या अनवस्थेच्या सांखळीचें लंचाड शंका काढणाराच्या गळ्याशीं लागेल. तेव्हां ईश्वर म्हणजे सकल भूत–भविष्य–वर्तमान वस्तूंची समष्टि किंवा समुदाय असा भौतिक शास्त्रांना अनुकूल असा जरी अर्थ घेतला तरी, सृष्टि ही व्यष्टि किंवा व्यक्तिरूपानें कार्यकारण-भाव–निगडित असल्यानें समष्टि किंवा समुदायरूपानें ती स्वतंत्र मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं. नाहींतर हा कार्यकारणभाव सृष्टीच्या गळ्यांत बांधणारा दुसऱ्या एका बाह्य सृष्टीचा तुकडा उत्पन्न करावा लागेल. मग अनवस्थेचें जानवें जास्त गुंतून यज्ञोपवीत न होतां गळ्यालाच फांस लावील. सृष्टि ही भिन्नभिन्न दृष्टीनीं बद्ध व स्वतंत्र आहे ही कबुली तूं दिलीस कीं सृष्टीचा बुद्धिमान् अंश जो मनुष्य तोहि बद्ध व स्वतंत्र आहे हें कबूल करणें भागच आहे. व्यक्ति-रूपानें मनुष्य बद्ध आहे, पण त्यानें अखिल सृष्टीच्या समदृष्टीचें आकलन करून तिच्याशीं ऐक्य केलें कीं, तो त्या समदृष्टीप्रमाणेंच स्वतंत्र आहे असें म्हणण्यांत

भौतिक शास्त्रांना डोळे वटारण्यासारखें मी काय करीत आहें ? इतकेंही मी अनुभवानें सांगण्यास तयार आहें कीं, ज्या मानानें या समष्टीशीं किंवा आम्हां गरीब धार्मिक लोकांच्या अडाणी भाषेंत बोलायचें झालें तर ईश्वराशीं मनुष्याचें ऐक्य किंवा अद्वैत होईल त्या मानानें मनुष्याची नैतिक स्वतंत्रता जास्त फोंफावेल व पौष्टिक औषधाच्या सेवनानंतर जसा शक्ति वाढल्याचा अनुभव येतो. तसाच मनुष्याला माझी स्वतंत्रता जास्त वाढत आहे, मी आतां कार्यकारणभावाच्या बंधनांतून जास्त मोकळा होत आहें, असा अनुभव येत जाईल. खरी स्वतंत्रता बद्धावस्थेंत नाहींच म्हटलें तरी चालेल. ' निश्चयाचें बळ, तुका म्हणे तेंचि फळ ' हें तुकारामाचें वाक्य मनाच्या व इंद्रियांच्या गुलामगिरींत नरकांतील किड्याप्रमाणें लोळणाऱ्या बद्ध जीवास अगोदर पटणें कठीण; पटलेंच तर पचणें कठीण ! हें वाक्य पटण्यास आरंभ झाला कीं सृष्टीच्या समष्टीशीं किंवा ईश्वराशीं ऐक्य होण्याला आरंभ झाला म्हणून समजावें. मग ईश्वरेच्छा व जीवाचा निश्चय हीं एकरूप नव्हत काय ? किंवा ईश्वरेच्छा म्हणजे जीवाचीच अंतिम, खोल व खरी इच्छा असेंच शास्त्रदृष्ट्या म्हणणें प्राप्त आहे. मग उपनिषदांनीं ' यदा एष उन्निनीषते तदा साधु कर्म कारयति ' असें निक्षून सांगण्यांत कोणता अपराध केला ? बंधनांतून मुक्त होण्याला ईश्वरेच्छेशीं जीवाच्या इच्छेचें तादात्म्य होण्याखेरीज दुसरा कोणता उपाय आहे ? कारण सृष्टीच्या समष्टीशिवाय किंवा ईश्वराशिवाय कार्यकारणभावाच्या तडाक्यांतून कोण सुटला आहे ? जें जगांत स्वातंत्र्य आहें तें ईश्वरशक्तीचेंच; जीवनशक्तीचें नव्हे, असें म्हणण्यांत जीवाला काय कमीपणा आला ? ' न सः स्वो दक्षः ' ही ओरड बद्धावस्थेंतील आहे. परराज्यांत स्वदेशभक्तीला व पराक्रमाला कोठें जागा आहे ? हें जसें रडतराऊत वाक्य राजकीय गुलामगिरीच्या कोंदट हवेंत रुळलेल्या राजकीय आजाऱ्यांना शोभतें तसेंच ' सर्वत्र निरुद्धचेष्टाप्रसारस्य बंधनमिव राज्यम् न राज्यम् ' हें मुद्राराक्षसांतील चंद्रगुप्ताचें वाक्य ईश्वररूपी चाणक्याचें खरें मर्म न जाणणाऱ्या बद्धालाच शोभतें !

आतां तूं साहजिकपणेंच विचारशील कीं, हें तादात्म्य मिळविण्याचा उपाय काय ? तर या उपायाच्या औषधांची जाहिरात हल्लींच्या कुजक्या वर्तमानपत्रांत तर मिळणें दुर्लभच, पण भौतिकशास्त्रांच्या अवाढव्य शोधांच्या सोमलानें धार्मिक रीत्या बहुतेक गतप्राण झालेल्या युरोपीय पंडितांच्या बड्या बड्या पुस्तकांतूनही मिळणें दुरापास्तच ! त्याला पौरस्त्य वेदान्तरूपी आर्यवैद्यकाचीच कांस धरिली पाहिजे !

हिंदुस्ताननें जगाला जर कांहीं नवें ज्ञान देऊन ऋणी करून ठेवलें असेल तर ह्याच दिव्य औपनिषद ज्ञानाचा शोध लावून केलें आहे हें आतां मला कोणत्याही परदेशस्थाला जोरानें सांगतां येईल. परवां एका शास्त्रज्ञानें हवेंतील अर्गान नांवाच्या वायूचा शोध लावला म्हणून त्याचें केवढें कौतुक होत आहे ? मॅडम क्यूरी व तिचा नवरा यांनीं रेडियमचा शोध केला म्हणून सर्व युरोप त्यांची पूजा करीत आहे. मीही ह्या शोधांबद्दल त्यांचें मनापासून अभिनंदन करितों. पण नैतिक स्वातंत्र्याचा प्रश्न भौतिकशास्त्रांतील प्रश्नांपेक्षां कमी महत्वाचा आहे असें कोणीही म्हणूं शकणार नाहीं. भौतिक पदार्थांचें पृथक्करण रसायनशास्त्र करून दाखवितें म्हणून मी त्याचें कौतुक करीत नाहीं असें नाहीं. पण मानवी मन किंवा आत्मा हा विश्वांतील अति महत्वाचा पदार्थ आहे; त्याचें पृथक्करण करणारें औपनिषद ऋषींचें आध्यात्मिक रसायनशास्त्र भौतिक शास्त्रापेक्षां कितीतरी जास्त महत्वाचें मानिलें पाहिजे. आत्मा हा स्वतंत्र आहे किंवा नाहीं याचें उत्तर फ्रेंच तत्वज्ञानी बर्गसाँ यालाही नीटसें देतां येत नाहीं, पण तो प्रभावशाली तत्वज्ञ औपनिषद तत्वज्ञानाच्या जवळजवळ येत चालला आहे व या भौतिकशास्त्रप्रवीण सोनारानें युरोपियन तत्वज्ञांचे कान टोंचल्याबरोबर त्यांनाही आतां पटूं लागलें आहे कीं, निव्वळ भौतिकशास्त्रपद्धतीनें जीवस्वातंत्र्य विषयक प्रश्नांचीं उत्तरें देतां यावयाचीं नाहींत. भौतिक शास्त्रपद्धतीनें तर हा जीव बद्ध आहे. त्याला नैतिक स्वातंत्र्य असणें शक्य नाहीं. जीव स्वतंत्र असला तर कार्यकारणभावाचा नियम सार्वत्रिक मानतां येत नाहीं. तो सार्वत्रिक नसेल तर भौतिकशास्त्रांची इमारत ढांसळलीच पाहिजे. म्हणून सर्व भौतिक शास्त्रज्ञांचा कल मनुष्याला भौतिकसृष्टींतच कार्यकारणभावांच्या शृंखलांनीं कैद करण्याकडे आहे. डॉक्टर मार्टिनोना ‘ Science instead of ethicizing nature, naturalizes man ’ भौतिकशास्त्रें सृष्टीला अध्यात्मस्वरूप द्यावयाचें सोडून माणसालाच सृष्टीचें पशुस्वरूप देण्याचें महत्पाप करितात ’ असा टोला मारिला आहे त्याचें रहस्य तुला आतां समजेल. पण उपनिषत्कारांनीं पहिल्यानें मानवी मंत्रांचें पृथकरण करून त्यांतील जीवस्वातंत्र्याचा शोध लावून तें स्वातंत्र्य अखिल सृष्टीला देण्याचें महापुण्य संपादन केलें आहे. नीतीला धर्माचा पाया पाहिजे हा सिद्धांत लौकिक रीत्या कसाहि मांडिला व पटला तरी त्याचें रहस्य औपनिषद तत्व पटल्याशिवाय समजावयाचें नाहीं. नैतिक स्वातंत्र्य सृष्टीच्या समष्टीशीं किंवा ईश्वराशीं ऐक्य झाल्याशिवाय शक्यच नाहीं, हा सिद्धांत आज जगाला हिंदुस्तानच

शिकवूं शकेल. पण आज भौतिकशास्त्रांच्या शोधांची आरती चालली आहे ! तिच्या झांजा व ढोलकीं यांच्या आवाजांत अध्यात्मशास्त्राच्या सतारीचा मृदुस्वर कोणाला ऐकूं येणार ! पण आज नाहीं उद्यां मनुष्यप्राणी या आरतीला कंटाळल्याशिवाय राहणार नाहीं. त्याची खोल भूक भौतिकशास्त्रांच्या रत्नानीं–रत्नें ही दगडच असल्यामुळें–कधींही निवणार नाहीं. त्याला अध्यात्म्यशास्त्राचें अन्नच पाहिजे. युरोपियन नीतिशास्त्रकार जीवाचें स्वातंत्र्य गृहीत धरून चालतात. त्या गृहीत कृत्यावर झालेली त्यांची इमारत सुंदर आहे हें मीहि कबूल करितों, पण नीतिशास्त्र हें सृष्टीच्या अखिल ज्ञानाचा एक अंश आहे-एक भाग आहे, हें विसरतां कामा नये. या अंशाचा किंवा भागाचा इतर भागाशीं मेळ वसला पाहिजे. हा मेळ वसला नाहीं तर सृष्टीचें ज्ञान एकजीव होतां न अठरा धान्यांचें कडबोळें बनेल. व हा प्रसंग भौतिकशास्त्रांनाही जड जातो. कारण त्यांची मोठी महत्वाकांक्षा अखिल सृष्टीला एकजीव करण्याची आहे. एक नियमबद्ध अशी सर्वांगसुंदर इमारत ती आहे हें सिद्ध करण्याची हांव जोंपर्यंत त्यांना आहे तोंपर्यंत निरनिराळीं शास्त्रें एकमेकापासून अलग ठेवण्याचें धैर्य असणें शक्य नाहीं. नीतिशास्त्र जीवनस्वातंत्र्याच्या गृहीत कृत्यावर रचलें गेलें आहे. फार उत्तम. जीवस्वातंत्र्याचा दगड अखिल सृष्टीच्या पायांत जर जिवंत रितीनें नीट वसला नाहीं, जीवस्वातंत्र्य जर गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणें अखिल विश्वाच्या तत्वज्ञानानें कबूल केलें नाहीं, तर नीतीशास्त्र हें निव्वळ काल्पनिक ठरेल व सर्व विश्वाच्या ज्ञानाच्या कॉन्फरन्समध्यें त्याला तिकीटही मिळणार नाहीं व खुर्चीही मिळणार नाहीं. या सर्व शास्त्रांची एकजीव इमारत करणाऱ्या शास्त्राला इंग्रजींत Metaphysics म्हणतात. त्यालाच आपण वेदान्त म्हणतों. अपराविद्या निरनिराळ्या शास्त्राचें ज्ञान अलग रितीनें देतें, पण पराविद्या किंवा वेदान्त या शास्त्रांना एकजीव करून त्यांचें सजीव शरीर बनविते यावरून ‘ Ethics requires a metaphysical basis ’ या इंग्रजी तत्वज्ञानांतील वाक्याचा अर्थ व नीतिशास्त्राला धर्माचा किंवा वेदान्ताचा पाया पाहिजे, या आपल्या लौकिक वाक्याचा अर्थ एकच आहे व त्याचें रहस्यही ‘ निहितं गुहायां ’ अशा प्रकारचेंच आहे हें तुला समजेल. या वेदान्तानें जीवस्वातंत्र्य गृहीत न धरतां मनुष्याच्या आत्म्यांतील परमात्म्याचा शोध लावून त्याच परमात्मरेडिअमच्या अविनाशी किरणांपासून नैतिक स्वातंत्र्य अस्तित्वांत येतें हें तपःसिद्धिच्या एक्सपेरिमेंटनें, व तर्काच्या कसोटीला लावूनही जगाला सिद्ध करून दाखविलें आहे. आतां तूं स्पेन्सरचा कार्यकारणभाव व उप-

निषदांचा ईश्वरेच्छाबंधाचा नियम हे दोन्ही एक नव्हेत व त्यांचे परिणामही एक नव्हेत हें ध्यानांत ठेव. ईश्वरेच्छेचें बंधन हें जीवाला बंधनच नव्हे तर खरें खोल स्वातंत्र्य देणारें असें तत्व आहे हेंही कबूल कर. लौकिकरीत्या ' ईश्वरेच्छा बलीयसी' या वाक्यानें दर्शविला जाणारा दैववाद व त्याचे फायदे व तोटे या विषयावर मी आज कांहीं लिहीत नाहीं. तो स्वतंत्र विषय आहे. मी आज येवढेंच सांगतों कीं, कोणतेंही उज्ज्वल तत्व मूळचें चांगलें असूनही कालान्तरानें जिवंत परंपरेचा झरा आटला म्हणजे तें तत्व कुजतें व त्या तत्त्वरूपी वृक्षाचा शुष्क सांगाडा लोकांना-विशेषतः परदेशस्थांना, उपहास करण्याला चांगली संधी देतो. पण सूक्ष्म विचार करणाऱ्यांना या शुष्क सांगाड्याचे दोष मूळ निर्दोष तत्वावर लादणें म्हणजे महत्पाप वाटतें. मूळ ख्रिस्तीधर्म किती चांगला असला पाहिजे याची कल्पना मला येथें एकान्तवासाच्या व गंगेच्या पवित्र हवेंत चांगली करितां येते. पण आज कित्येक शतकें त्या मूळ तत्वाचा वृक्ष कुजत कुजत अगदीं शुष्क होण्याच्या पंथांत आहे व त्याची घाण तुजसारख्या वीर 'देशाभिमानी' व अतएव कोत्यादृष्टीनें दूषित चित्तांच्या नाकालाच येऊं लागली आहे असें नाहीं तर खऱ्या ख्रिस्तभक्तांनाही, ही स्वधर्माची घाण, आपल्या धर्माची घाण आपल्या स्वताला जशी येते तशी, येऊं लागली आहे हें तुझ्यासारख्या अवाढव्य वाचनपटूस सांगावयास हवें असें नाहीं. अस्तु; तुझ्या पत्नीला ही घटपटादि खटपट कितपत रुचेल हें मला येथूनच दिसतें आहे. तिला यांत विशेष गम्य नाहीं असें मी म्हटलें तर पुढील पत्रांत तिच्या गालिप्रदानाचा खाऊ षड्रसांनीं थबथबलेला असा खावयास मिळेल, व त्यांच्यापुढें तुझ्या सगळ्या नवरसात्मक काव्यपत्राची रुचि विघडून तें बेचव होईल, या भीतीनें तसें मी म्हणत नाहीं. बाकी ' सर्वे गुणाः स्वभार्यामाश्रयन्ते ' हें वाक्य कवीनें केवळ छंदोभंगाच्या धास्तीनें घातलें नाहीं, व तो बिचाऱ्या 'कांचना'वर घसरला हें माझ्या परचित्तप्रवेशविद्येनें मला उपनिषद्रूपानें सांगितलें आहे ! ''

# आधुनिक सुशिक्षिताचा वेदान्त.

# आधुनिक सुशिक्षिताचा वेदान्त.

## ‘ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या’ म्हणजे काय ?

१ ‘वेदान्त’ हा शब्द उच्चारिल्याबरोबर कित्येक लोकांच्या मनांत ‘आम्हांला हा असला वेदान्त नको,’ ‘आम्हीं पुष्कळ वेदान्ती पाहिले आहेत,’ ‘अशा वेदान्ताच्या गप्पा आम्हीं पुष्कळ ऐकिल्या आहेत,’ अशा वाक्यांनीं निर्दिष्ट अशी तिरस्कारयुक्त भावना उत्पन्न होते. वेदान्ताच्या खऱ्या भक्तांच्या मनांत याच्या अगदीं उलट म्हणजे उदात्त भक्तिरसाची भावना असल्यामुळें त्यांना हीं तिरस्कारदर्शक वाक्यें नास्तिकपणाचीं द्योतक वाटतात. हें परस्परविरोधीपणाचें नातें मनुष्यस्वभाव आहे तोंपर्यंत कायम रहावयाचेंच. पोटदुखीच्या माणसाला पोटांतील कळ नाहींशी व्हावी या उत्कट भावनेचा घोर लागल्यामुळें ‘दुःख हें सुखाच्या मुळाशीं आहे,’ किंवा ‘दुःख हें सुखाचें रूपांतर आहे’ अशीं वाक्यें कर्णकटु लागावीं, हें साहजिक आहे; इतकेंच नव्हे तर त्या वेळेस “तुम्हीं अमुक केलेंत म्हणून पोटांत बिघाड झाला; थोडें आत्मसंयमन केलें असतें तर असा प्रसंग आलाच नसता” अशी वस्तुस्थितिदर्शक कारणमीमांसा देखील त्याला दुःखावर डागण्या देणारी वाटते. त्याची दृष्टी तात्पुरती त्या क्षणावरच असते. तो ज्ञानाभिलाषी नसतो तर कार्याभिलाषी असतो. अशा वेळेस त्याला ‘**ज्ञानान्मोक्षः**’ हें वाक्य विषतुल्य वाटावें यांत नवल नाहीं; त्याचें महावाक्य ‘**औषधान्मोक्षः**’ हेंच असणार ! या उपमेच्या द्वारें आपणास संसाररूपी पोटदुखीनें संतप्त झालेल्या लोकांना ‘वेदान्त’ शुष्क कां वाटतो, याची कल्पना करतां येईल. पुष्कळ दिवस पुष्कळ सुखें उपभोगिल्यावर एखादें दुःख आलें, तर पूर्वीच्या सुखाची कितीही आठवण केली तरी प्रकृत दुःखाची तीव्र वेदना अंशतःही कमी न होतां उलटी ती पूर्वसुखस्मरणानें वाढते. अशा स्थितींत ‘संसार हा मृगजळवत् आहे’ ह्या वेदान्ताची तेथें काय दाद लागणार ? अंधार हा उजेड आहे, असें हजार वेळां घोकल्यानें अंधारांतील दुःखस्थिति सुखमय होईल काय ? म्हणून वेदान्ताचें उच्च व उदात्त स्वरूप लोकांस

पटवून द्यावयाचें असल्यास तर्कानें म्हणा किंवा अनुभवजन्य ज्ञानानें म्हणा, संसाराची पोटदुखी कमी करणारी मात्रा देणारा वेदान्त जर कोणी दाखवील तर त्याला सांप्रत कोणीतरी मान देईल. सारांश, हल्लींच्या सुशिक्षितांस वेदान्ताविषयीं जी तिरस्कारबुद्धि आहे, ती वेदांत खोटा आहे म्हणून नव्हे, तर वेदांत कार्यक्षम नाहीं म्हणून.

२. सुशिक्षितांची पोटदुखी दोन प्रकारची आहे. एक तार्किक व दुसरी आनुभविक. हल्लींच्या काळांत इंद्रियजन्य ज्ञानावर सर्व ज्ञानाची इमारत बांधली असल्यामुळें, इंद्रियांचें प्रामाण्य एका लेखणीच्या सपाट्यानें साफ कुचकामाचें असें म्हणणारा वेदान्ती वेड्याच्या इस्पितळांतच घातला पाहिजे असें म्हणण्यास सर्व सुशिक्षित एका पायावर उभे आहेत. पण इंद्रियजन्य ज्ञान व इंद्रियप्रामाण्य यांना तिलांजलि देणारे गृहस्थ वेड्यांच्या इस्पितळाशीं स्पर्धा करणाऱ्या अभागी हिंदुस्थानांतच आहेत असें नाहीं. **कॅन्ट, हेगेल, बार्क्ले** इत्यादि इंद्रियप्रामाण्याविषयीं शंकित असणारे तत्त्वज्ञानी मेंदू शाबीत असलेल्या युरोपखंडांतही उत्पन्न झाले आहेत; इतकेंच नव्हे तर तेथील ज्ञानमय उद्यानांत मोकळेपणानें विहार करितांना ते दृष्टीस पडतात, व त्यांची ज्ञानी लोकांच्या अड्ड्यांत म्हणजे विश्वविद्यालयांत अग्रपूजा झालेलीही दृष्टीस पडते. या गोऱ्या ऋषींस वेडे कसें म्हणावयाचें ? शंकराचार्य हिंदुस्थानांतले असल्यामुळें त्यांना वेडे म्हणण्याला आम्हांला मुळींच भीती वाटावयाची नाहीं. पण हे गौरकाय आणि ते वेडे म्हणजे अब्रह्मण्यच ! अशी पंचाईत पडल्यामुळें हल्लींचे सुशिक्षित लोक युरोपिअन तत्त्वज्ञानी व शंकराचार्य या दोघांनाही वेडे म्हणण्याच्याऐवजीं दोघांनाही शहाणे म्हणण्यास कबूल झाले. पण या कबुलींत 'परप्रत्ययनेयबुद्धित्वाचा' भाग बराच मोठा आहे. मनांतल्या मनांत '**उभौ तौ न विजानीतः**' अशा आवाजाची टिकटिक यांना ऐकूं येत असते; पण बाहेर बोलण्याची सोय नाहीं. या संशयात्मभावाला भित्रेपणा हेंच नांव शोभतें. हें मानसिक दौर्बल्य राष्ट्राला अत्यंत विघातक आहे. इंद्रियप्रामाण्याला लाथ मारणारे लोक आपणांस जर खरोखर तिरस्कारार्ह वाटत असतील तर तसें स्पष्ट बोलण्यांत विशेष पौरुष आहे व हितही आहे. मग त्यांचा जन्म हिंदुस्थानांत होवो, युरोपांत होवो किंवा उत्तरध्रुवावर होवो. जग हें माया आहे, असें म्हणणारा कॅन्ट असो, शंकराचार्य असो किंवा ब्रह्मदेव असो, त्याचें म्हणणें आपणास पटत नसलें तर तसें स्पष्ट सांगण्यांत भीत भीत केलेल्या परावलंबी नमस्कारापेक्षां जास्त मनोधैर्य आहे हें

खास. प्रच्छन्न संशयात्मे खरोखरीचेच दीन म्हटले पाहिजेत. या संशयात्म्यांच्या मनोदौर्बल्यरोगाला आंत राहूं देण्यांत राष्ट्राचें अत्यंत नुकसान आहे. धर्म काय, किंवा मतान्तरें काय, असल्या दुर्बल वृत्तीच्या लोकांच्या वायां डोलण्यांनीं किंवा फोल बोलण्यांनीं वृद्धि पावणें कधींही शक्य नाहीं. '**आमचा दुष्काळ व मिशनऱ्यांचा सुकाळ**' या म्हणीला कारणीभूत होणाऱ्या ख्रिस्तभक्तांच्या झुंडीप्रमाणें या भित्र्या, चोरट्या व अतएव खोट्या स्तुतिपाठकांच्या झुंडी वेदांताला काय व इतर मतांतरांस काय, शेवटीं बाधकच होणार. हा संशयाचा रोग नाहींसा करणारी वेदान्ताची उपपत्ति आतां अगदीं अवश्य झाली आहे. संसारांतील अनुभवसिद्ध पोटदुखीला अनुभवाचीच मात्रा पाहिजे. तेथें "**बोलाचाचि भात आणि बोलाचीच कढी**" अशा शब्दमय तर्कानें कांहीं होणार नाहीं, हें जरी उघड असलें तरी वर सांगितलेल्या तार्किक पोटदुखीला तार्किकच मात्रा पाहिजे. निदान बुद्धीला समाधान देणें हें अर्धेअधिक काम झाल्यासारखें आहे. हें समाधान निव्वळ एकपक्षी उपन्यासानें करण्यापेक्षां दोन कट्टया योद्धयांची वादविवादरूपी लढाई वर्णन केल्यानें जास्त सुलभ व बोधप्रद होईल, म्हणून तोच मार्ग येथें स्वीकारला आहे. हे दोघेही वाग्योद्धे अर्वाचीन युरोपियन व प्राचीन आर्य संस्कृतीच्या भट्टींतून निघाले आहेत. त्यांना पडद्याच्या आड फार वेळ न ठेवितां रंगभूमीवर एकदम आणावें हें बरें.

३ **वेदान्तीः**—हें पहा, आज मी अगदीं निकराची लढाई करणार. मी लढाईत जित झालों तर तुमची दीक्षा घेऊन तुमचा 'करिष्ये वचनं तव' अशा रीतीचा शिष्य बनणार. तुम्ही जित झालांत तर तुम्हांलाही त्याचप्रमाणें मी सांगेन तसें वागलें पाहिजे, आहे कबूल ?

४ **शंकितः**—नुसत्या जोराच्या शाब्दिक वल्गना बिनबारी बंदुकीच्या आवाजाप्रमाणें शुष्क होत. अशा तुमच्या डुरकावणीला भिण्याइतका मी ज्ञानपंगू किंवा वादमूक नाहीं. तुम्हीं जशीं चार इंग्रजी व संस्कृत पुस्तकें वाचलीं आहेत, तशीं मींही माझ्या अल्पशक्तीप्रमाणें वाचलीं आहेत. तुम्हांला देवानें विचारशक्ति व वाचाशक्ति जशी दिली आहे, तशी मलाही थोडीबहुत देऊन त्यानें आपलें न्यायसमत्व व दातृत्व सिद्ध केलें आहे. तुमच्या अटी मला सर्वस्वीं कबूल आहेत, असें मी शपथपुरःसर सांगतों. प्रस्तावनेंत फार वेळ न गमावितां लढाईला सुरुवात करावी हें बरें.

५ **वेदान्तीः**--फार उत्तम. मी एक सिद्धांत घेतों व त्याचें विवरण अगदीं युक्लिडच्या पद्धतीनें करितों. युक्लिडची पद्धति अशा मनोमय विषयास अगदीं तंतोतंत लागू पडणार नाहीं, अशी माझ्यासारखी तुमचीही कदाचित् खात्री असेल; परंतु युक्लिडचीं स्फटिकाप्रमाणें स्वच्छ अशीं प्रमाणें मांडण्याची रीति आपणांस खास घेतां येईल. प्रथम '**ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या**' हाच सिद्धान्त घेऊं व त्याचा वर निर्दिष्ट केलेल्या पद्धतीनें विचार करूं. आपल्या मर्यादित इंद्रियदृष्टीला भासणारें जगत् अगदीं मिथ्या आहे व खरी वस्तु एकच आहे. ती सत्‌चित् आनंदरूप आहे, असें वेदांत कंठरवानें म्हणतो. याचा अर्थ नीट स्पष्ट करून घ्या. पटला तर बरें, नाहीं तर ईश्वरदत्त वाचाशक्तीचा उपयोग करण्यास तुम्हांस पूर्ण अधिकार आहे. अगोदर 'मिथ्या' व 'सत्य' या शब्दांचे अर्थ लोकदृष्टीनें घ्यावयाचे नाहीत. लोकदृष्टि व तात्विकदृष्टि यांचा भेद न समजल्यामुळें फार घोंटाळा उडालेला आहे. आतां मी तुम्हांस असें विचारितों कीं, अपूर्ण ज्ञान हें पूर्ण ज्ञानाच्या मानानें मिथ्या ठरेल किंवा नाहीं ? आपण एखाद्या अपरिचित मनुष्याजवळ गेलों असतां पहिल्याच बैठकीला झालेलें त्या माणसाविषयींचें ज्ञान पुष्कळ परिचयानंतर बदलावें लागतें. तेव्हां परिचयांतीं झालेल्या ज्ञानाच्या मानानें पहिलें ज्ञान मिथ्याच झालें; व पहिल्या ज्ञानाचा विषयही त्या मानानें मिथ्याच ठरला कीं नाहीं ? एखादा मनुष्य पहिल्यानें तुम्हांस तिरसट, क्रोधी व अहंमन्य दिसतो. पण बराच परिचय झाल्यावर हें बाह्यस्वरूप त्याच्या अंतःस्वरूपाचें खरें ज्ञान झाल्यामुळें दोषरूप न दिसतां गुणरूपानेंच भासूं लागतें. तेव्हां पूर्वज्ञानविषयीभूत तो तिरसट मनुष्य व त्याचें जग मिथ्याच ठरलें म्हणावयाचें. त्या माणसाच्या स्वभावाचें पूर्ण ब्रह्म आपणांस कळण्याचा जर अपूर्व योग अनेक प्रसंगांनीं आणिला तर '**भिद्यते हृदयग्रन्थिः छिद्यन्ते सर्वसंशयाः । क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे**' अशीच स्थिति आपली होणार नाहीं काय ? सारांश, प्रत्येक वस्तूचें ज्ञान म्हणजे तिचे दुसऱ्या वस्तूशीं जेवढे संबंध असतील तेवढे सर्व पुरे समजणें हें होय. हें पुरें समजणें आपल्या या मर्यादित बुद्धीला जवळ जवळ अशक्यच ! पण आपल्याला जरी समजले नाहींत, तरी ते पुरे समजण्याची शक्ति असणारी बुद्धि कोठें तरी असली पाहिजे; इतकेंच नव्हे तर आपणांतही या पूर्ण ज्ञानाची भूक असल्यामुळें केव्हां तरी ती निवालीच पाहिजे, असा भरंवसा वेदान्तशास्त्र देत आहे. सर्व संबंध पुरे कळल्यावर हें जगाचें चित्र कांहीं निराळेंच दिसेल व

आपलें पूर्वीचें अपूर्ण ज्ञान आपल्याला फार फसवीत होतें, असेंच आपणास वाटेल. लहानसहान गोष्टींत देखील जर या पूर्वपश्चात् ज्ञानतुलनेनें आपली आपणास लाज वाटते, तर या अवाढव्य विश्वाच्या सर्व दृश्य व अदृश्य संबंधांचें सबंध जाळें आपणांस कळलें तर अर्जुनाची विश्वरूप पाहिल्यावर जी तारांबळ उडाली तशीच आपली नाहीं का उडणार ? या सिद्धान्तासंबंधानें दोनच विधानें महत्वाचीं आहेत. एक वस्तूंचे सर्व संबंध आपणास कळल्याशिवाय ती वस्तु आपल्या अपूर्ण ज्ञानामुळें आपणास मिथ्याच झाली. या दृष्टीनें अपूर्ण ज्ञानाच्या विषयाला पूर्ण ज्ञानाच्या विषयाच्या मानानें ' मिथ्या ' म्हणणारा वेदान्ती वेडा म्हणावा कीं शहाणा म्हणावा हें तुम्हीच ठरवा. निव्वळ इंद्रियज्ञानानें आपणांस सर्व वस्तूंचे सर्व संबंध पुरे कळणें अशक्य आहे हें तुम्ही कबूल करालच. या स्पष्टीकरणावर काय आक्षेप घ्यावयाचे असतील ते घ्या.

६ **शंकितः—**हें तुमचें व्याख्यान ऐकून मीं आपल्या अनुभवावरून काढलेल्या एका सिद्धांताची मला आठवण होते. अर्वाचीन सुशिक्षितांच्या मनांत पुराणग्रंथां-विषयीं एकदां अनुकूल ग्रह झाला म्हणजे त्यांच्या भक्तिरसाला इतका ऊत येतो कीं, जुन्या ग्रंथकारांच्या मनांत जें नसेल तें देखील हातचलाखीनें--किंवा बुद्धि-चलाखीनें म्हणा—त्यांच्या ग्रंथांतून गारुड्याप्रमाणें या मंडळींना काढितां येतें. पण तें तसें काढणें हें सत्यास किती धरून असतें याविषयीं मला तरी निदान संशय आहे. शिवाय लोकदृष्टि व तत्त्वदृष्टि या मोठमोठ्या शब्दांच्या व त्यांच्या भेदाच्या अवडंबरानें शब्दांचे मूळचे अर्थच जर तुम्ही बदलूं लागला तर ' खरें म्हणजे खोटें ' व ' पांढरा म्हणजे काळा ' असा देखील अर्थ करितां येईल. वेदान्तामध्यें संसाराला मृगजळाची उपमा दिली आहे; तर मृगजळाप्रमाणेंच कांहींही ठिकाणावर नसतां संसाराचें अस्तित्व आपणास उगीच भासतें, असा याचा सरळ अर्थ आहे व तो तसाच घेतला पाहिजे. असा सरळ अर्थ सोडून संसार सापेक्ष रीतीनें मिथ्या आहे असें म्हणणें जरासें अप्रमाणिकपणाचें दिसतें ! मृगजळाच्या उपमेवरून पहातां संसार हा मृगजळासारखाच मिथ्या आहे, असा कोणीही सामान्य मनुष्य अर्थ करील, तर त्याची चूक कोठें होत तें समजत नाहीं ! मृगजळाचें मिथ्यात्व व तुमचें सापेक्षमिथ्यात्व हीं एक नाहींत. मिथ्यात्व म्हणजे सापेक्षत्व किंवा संस्कारपात्रत्व हा अर्थ तुमच्या पदरचा आहे, असा मला संशय येतो. तुम्हीं स्वतः पाहिजे तर एक नवें दर्शन काढा; पण तें व शंकराचार्यांचा वेदान्त हीं एकच, ही तार्किक हालचाल दाखवून आम्हांस दुधखुळे बनवूं नका.

७. बरें, दुसरें असें. जगांतील वस्तूंचे सर्व संबंध आपणांस कळले नसले म्हणून काय झालें ? जितका आमचा संबंध येतो तितकेंच आमचें ज्ञान तात्पुरतें जर कार्यक्षम होतें आहे, तर त्या ज्ञानास निव्वळ 'खोटें' कसें म्हणतां येईल ? जितका भ्रमाचा अंश असेल तितका तो संस्कार किंवा शुद्धीकरण यांनीं निघून जाईल. पण कार्यक्षम भाग सारखाच आहे. भ्रमही खराच-भ्रम असल्यामुळें त्याचे दुष्ट परिणामही खरेच होत. मग जगन्मिथ्या म्हणून डांगोरा पिटविण्यांत काय अर्थ आहे ? मला तर वाटतें या डांगोऱ्यानें आळशी व व्यसनी लोकांना मात्र तुम्हीं वेदान्तरूपी उत्तम बॅरिस्टर मिळवून दिला आहे. इंद्रियजन्य ज्ञान पूर्णज्ञान नाहीं, हें कोणीही कबूल करील; पण तें सर्वांशीच खोटें आहे, असें वेदान्त सांगतो. निदान असें बहुतेक लोक मानितात, व या मानण्याला वेदांत ग्रंथाची संमति आहे असें दिसतें. तर मग पूर्वीचा वेदान्त टाकून तुम्ही विशाल बुद्धीचे लोक एक नवेंच दर्शन कां काढीत नाहीं ? मग 'षड्दर्शना' च्या ऐवजीं 'सप्तदर्शन' हा शब्द हिंदुस्थानच्या इतिहासांत अजरामर होऊन तुमची कीर्तिही अजरामर होईल. 'हिंदुस्थानांतील कल्पकता मेली' म्हणून जी लोकांत आज ओरड चालली आहे ती तरी बंद पडेल. आणि मग 'चिरस्य वाच्यं न गतः प्रजापतिः' असें म्हणून तुमचें आम्ही अभिनंदन करूं. पण गारुड्याचा शाब्दिक खेळ किती दिवस चालणार ? जुन्या ग्रंथांचे शब्द संदर्भानें व वाक्यमीमांसेनें बरोबर छानून घ्या व त्यांचा अर्थ असेल तसा घ्या. मग त्यापासून तुमचे आचार्य वेडे ठरले तरी हरकत नाहीं. पण तुमची पुराणप्रियता असत्यास सत्य व सत्याला असत्य भासविण्याची हातचलाखी करूं लागली कीं तुम्हांला व राष्ट्राला दोघांनाही खड्ड्यांत गाडील हें लक्षांत ठेवा.

८. **वेदान्तीः**—तुमचा पहिला सर्वसाधारण सिद्धान्त खरा तर नाहींच; पण वेदान्तभक्तांवर लपंडावीचा आरोप करण्याचें धाष्ट्र्य हा सिद्धांत करणारे लोक कसें करितात, याचेंच मला आश्चर्य वाटतें. तुमचा सिद्धांत खरा आहे असें जरी धरून चाललें, तरी मीं सांगितलेल्या दृष्टीनें जर जगन्मिथ्यात्व वस्तुभूत व अतएव ग्राह्य ठरलें तर त्याला वेदान्त हें नांव दिलें काय किंवा दुसरें एखादें दिलें काय त्यापासून तत्त्वांत बदल होत नाहीं. पण मी असें सिद्ध करून दाखविण्यास तयार आहें कीं, वेदांताचे सर्व ग्रंथ तात्पर्यदृष्टीनें व मार्मिक बुद्धीनें वाचले तर 'मिथ्या' शब्दाचा अर्थ मी सांगतों असाच वेदान्त ग्रंथांतून घेतलेला आढळेल. '**नासतो विद्यते भावोः नाभावो विद्यते सतः । उभयोरपि दृष्टोन्तस्त्वनयोस्तत्त्वद-**

र्शिभिः ॥' या श्लोकाचा आपाततः दिसणारा अर्थ घेतला तर तो हास्यास्पद होईल. सत् वस्तू कधींही असत् होणार नाहीं व असत् वस्तु कधींही सत् होणार नाहीं, ही केवळ शब्दार्थबोधक वृथोक्ति सांगण्यास तत्त्वदर्शी कृष्ण कशास पाहिजे, असें अपाततः वाटणें साहजिक आहे. पण खोल दृष्टीनें पाहिलें असतां हें वाक्य वेदान्तग्रंथांचें सारभूत आहे. त्याचा खरा अर्थ पुढें दिल्याप्रमाणें आहेः--

९. इंग्रजींत एक वेदान्तमताला अनुकूल अशी म्हण आहे कीं, 'Man is the measure of things' म्हणजे वस्तूंचें अस्तित्व मनुष्यांवर अवलंबून आहे. याचा अर्थ वस्तु मनुष्याच्या ज्ञानाव्यतिरिक्त असूं शकत नाहीं असा नव्हे; तर प्रत्येक वस्तु आपणास दिसेल तसा आपला तिच्याशीं व्यवहार होणार. आपला सर्व व्यवहार आपल्या ज्ञानावर आहे व आपणांस वस्तूंचें ज्ञान आपल्या इंद्रियांनीं, मनानें व आत्म्यानें होणार. हे तीन आपले चष्मे आहेत. हे चष्मे साफ नसले कीं, आपलें जगही आपणांस भलतेंसलतेंच दिसूं लागेल. तेव्हां जग आहे तसें आपणांस दिसावें व आपला व्यवहार खरा व्हावा, अशी जर इच्छा असेल तर हे चष्मे रोज वदलणार; व त्याप्रमाणें जगही रोज बदलणार ! अशा चित्रविचित्र वदलणाऱ्या जगाला खरें तरी कसें मानावयाचें व तिच्याशीं आपला व्यवहार तरी खरा कसा होणार ? चष्म्यांच्या या बिघडलेल्या स्थितींतील जग बदलणारें अतएव असत्, परंतु हे चष्मे शमदमादि साधनांनीं साफ केलेले असले म्हणजे जगत् यथास्थित जसें आहे तसें आपणांस दिसतें; आणि आपला आत्मा व जगत् असें एकरूप झालें म्हणजे आपला व्यवहारही शाश्वतरूपाचा, कधीं न बदलणारा व हितकारक होतो. ही हितकारक खरी दृष्टि येण्याला तत्त्वदर्शी कृष्णासारख्या ज्ञानचक्षु वैद्याशिवाय तरणोपाय आहे काय ? सत् जगत् म्हणजे ईश्वरी ज्ञानमय जगत्. असत् जगत् म्हणजे मर्यादित दोषयुक्त अशा-मनुष्यदृष्टीनें केलेलें जगत्. हा भेद खरा नाहीं काय ? व हा भेद तत्त्वज्ञान्याशिवाय कोणाला समजणार ? जगत् खोटें नाहीं; तें ब्रह्मरूप शाश्वतच आहे. पण मनुष्यज्ञानाचें जगत् खोटें. ईश्वरी दृष्टीचें-ज्या माणसानें आपलें नरत्व घालवून नारायणदृष्टि मिळविली आहे त्याचें-जगत् सत् व शाश्वत आहे. युद्धामध्यें अर्जुन शत्रुपक्षीय योद्धयांना 'बांधव' म्हणून गोंजारूं लागला, तेव्हां त्याचा चष्मा क्षणिक व खोट्या दयेचा होता. म्हणूनच त्याचें जगत् 'मिथ्या' होतें; त्याची दृष्टि कोत्या बुद्धीची होती व तो मायेनें ग्रस्त झाला होता. ज्या या मायेच्या तडाक्यांत त्याच्या हातून अनार्यजुष्ट, अकीर्तिकर व भीरुजनोचित

वर्तन होण्याची पाळी आली त्या मायेच्या रोगाला तत्त्वदर्शी कृष्णानें जर वेळेवर मात्रा दिली नसती तर केवढा अनर्थ झाला असता हें भारतीय इतिहास जाणणारांस सांगणें नको. त्या प्रसंगाची खरी सृष्टि वीर्याची असतां अर्जुनानें तेथें प्रेमसृष्टि कल्पिली—एका अर्थी उत्पन्न केली--हाच त्याचा मिथ्याग्रह व हीच त्याची मायासृष्टि. ही मायासृष्टि मृगजळाप्रमाणेंच भ्रममूलक व घातुक आहे असें म्हटल्यास त्यांत वावगें काय आहे ? आपल्या अज्ञानामुळें आपण किती जगें उत्पन्न करीत आहोंत व या स्वतःच्या परिवाराचे अनर्थ सर्व समाजाला आपण कसे भोगवीत आहोंत, याची नुसती कल्पना जर आपल्यापैकीं कित्येकांस करतां येईल, तर मग तत्त्वदर्शी कृष्णाचा उपदेश किती अवश्य आहे, हें नीट समजेल. तुम्हीं म्हटलेंत कीं, उपयोगाच्या कक्षेंत जितके संबंध असतील तितके समजले म्हणजे सर्व संबंध जाणण्याची आवश्यकता नाहीं. पण अर्धवट जाणलेल्या संबंधाची कक्षा खरी उपयोगाची आहे किंवा नाहीं हें आपण ध्यानांत आणिलें नाहीं. रत्न हें ' कार्बन ' आहे इतका संबंध रसायनशास्त्रज्ञाच्या कक्षेंतला आहे. पण रत्न या वस्तूचे इतर संबंधही फार महत्वाचे आहेत. रासायनिक संबंधाच्या कक्षेंतच बुद्धिसर्वस्व खर्चून जर एखाद्या रसायनशास्त्रज्ञानें वर्तन करण्यास आरंभ केला तर उकिरड्यांत सांपडलेल्या रत्नाची विल्हेवाट लावणारा कोंबडा व हे रसज्ञ परंतु अरसिक पंडित यांमध्यें भेद कोणता राहिला ? सारांश, सर्व तेजस्वी व कार्यक्षम तत्त्वज्ञाचा विषय, ज्ञानभूत व ज्ञानजन्य जगाची किंमत ठरविणें हाच आहे. आत्मशांतीला व कार्यक्षमतेला, किंवा भगवद्गीतेच्या भाषेंत बोलावयाचें म्हटलें म्हणजे कर्मयोगास योग्य अशा जगास उत्पन्न करणारी दृष्टि कोणती व कोणते संबंध त्या दृष्टीच्या आवाक्यांत आणून मिथ्याभूत जगत् सत्य व ब्रह्मरूप करावयाचें, हेंच काम तत्त्वज्ञानाचें. उदात्तदृष्टीला दिसणाऱ्या सत्य व महत्त्वाच्या संबंधापासून ' इतरे जनाः ' असणारे भोजनभाऊ संबंध निवडून काढणारी चाळण तत्त्वदर्शी कृष्णाशिवाय कोणाजवळ असणार ?

१०. बाह्य जग खोटें नाहीं, असा सिद्धान्त बादरायणाच्या **' नाभावः उपलब्धेः '** या सूत्रांत स्पष्टपणें दिला आहे. ' बाह्य जग आहे, कारण तें प्रत्यक्ष दिसत आहे, ' असा या सूत्राचा अर्थ आहे. या सूत्रावरील शांकरभाष्यांत बाह्य जगाला खोटें मानणाऱ्या विज्ञानवादी बौद्धांना मूर्ख ठरविलें आहे. तेव्हां बाह्य वस्तु खोट्या असें म्हणणारा वेदान्त मूढ लोकांच्या अज्ञानानें नासलेल्या डोक्यांतला आहे.

पूर्णत्व व शांति देणारें जग कोणत्या सत्त्वदृष्टीला दिसेल, व कोणत्या कोत्या दृष्टीनें शुष्क संबंधांचें जग उत्पन्न होऊन अनर्थ घडतात, या सर्व गोष्टी योगेश्वर कृष्णच सांगूं शकेल. मृगजळाची उपमा जगाला दिली ती लोकदृष्टीनें कितीही हास्यास्पद भासली, तरी मृगजळानें मृगाला सोसावी लागणारी अनर्थपरंपरा, आणि शारीरिक सुख व चैन यांचा चष्मा लावल्याबरोबर उत्पन्न होणाऱ्या जगांत रंगून दंग होणारा नरमृग ज्या अनर्थपरंपरेंत गटांगळ्या खातो ती अनर्थपरंपरा, यांमध्यें साद्दश्य नाहीं असें कोण म्हणेल ? The world of mere opinion is unreal, while the world of sincere conviction and faith is real ' असें कोठेंसें वाचल्याचें मला स्मरतें, त्याचा अर्थ तरी हाच. कोत्या, नासक्या व अशुद्ध चित्ताच्या दृष्टीनें उत्पन्न केलेला संसार हा किती क्षुद्र व असार आहे, हें कोणीही सांगेल. पण साधनचतुष्टयीनें पूत केलेल्या दृष्टीला—नारायणमय होऊन गेलेल्या दिव्यदृष्टीला—यथास्थित रूपानें दिसलेलें जग ' शुद्ध बीजा पोटीं, फळें रसाळ गोमटीं ' ह्या उक्तीप्रमाणें किती आनंदमय असेल याची कल्पना तरी आपणांसारख्या क्षुद्रांस करितां येईल काय ? ' जगन्मिथ्या ' याचा खरा अर्थ हा आहे कीं, कोत्या दृष्टीनें उत्पन्न केलेलें जग बुडबुड्याच्या जगाइतकेंच खोटें व अनर्थावह आहे, असेंच म्हटलें पाहिजे. साधनचतुष्टयसंपन्न मुमुक्षु या इंद्रियसुखदृष्टीच्या—कल्पनासृष्टिमय—जगाला मिथ्या समजतो व जगताचें सर्वांगसंपूर्ण ज्ञान करून घेण्याचा म्हणजे ब्रह्म-ज्ञान करून घेण्याचा तो प्रयत्न करितो. ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' या वाक्याचें तात्पर्य इतकेंच कीं, ब्रह्मवेत्त्या पुरुषाचें ज्ञानविषयीभूत जगत् खरें जगत्, व सामान्य सुखाभिलाषी संसारिकाचें जगत् तें खोटें जगत्. अखिल विश्वाचें—त्यामधील सर्व द्रव्यांचें, त्यांच्या गुणधर्मांचें, प्रेरणांचें, प्रवृत्तींचें व हेतूंचें परिपूर्ण व यथावत् ज्ञान ज्याला झालें, सर्व गोष्टींचा कार्यकारणभाव ज्याला करतलामलकवत् विशद झाला, सर्व गोष्टींचें उद्दिष्ट कार्य ( Function or purpose ) ज्याला कळलें, निश्चित श्रेय कशांत आहे हें ज्याला समजलें व उमजलें आणि सर्व गोष्टींची कमी अधिक श्रेयस्करता ज्याच्या मनांत पूर्ण विंवून गेली, त्यालाच खरें जग कळलें व त्याचेंच जग ' ईशवास्यमिदं सर्वं ' या न्यायानें खरें ठरतें. इतरांचें ज्ञान अपूर्ण, अतएव मिथ्या व त्यांचें ज्ञानविषयीभूत जगत्ही मिथ्याच ! असो; तुमच्या म्हणण्यांत तथ्यांश नाहीं असें मी म्हणत नाहीं. वेदांत जिवंत विचाराच्या भट्टींतून काढण्याइतकी शक्ति ज्यांच्याजवळ नाहीं त्यांना वेदान्ताचें सोनें मातीसारखेंच होय.

ती माती खरें सोनें म्हणून ते बाजारांत विकण्यास घेऊन गेले तर त्यांची फजिती व्हावी यांत नवल नाहीं. आळशी व व्यसनी लोकांना हा खोटा वेदान्त मोठा चतुर बॅरिस्टर मिळाला आहे, ह्याही म्हणण्यांत पुष्कळ तथ्यांश आहे. पण सर्वच सुंदर व उच्च वस्तूंची हीच गति आहे. परीक्षा करणारा भेटला तर रत्न, नाहीं तर रत्नाला बोर समजून 'अन्तःसारविचारणव्यसनिना चूर्णीकृतं नाश्मना' या चरणांत सांगितल्याप्रमाणें आंत काय आहे हें बघण्याकरितां तें धोंड्यानें फोडून टाकिलें नाहीं म्हणून या कथांतर्गत मर्कटाप्रमाणें एखाद्या वेदान्तक्रुन्मर्कटाचे आभारच मानावे लागणार!

११. तुमचा आतां एकच मुद्दा राहिला. अखिल विश्वांतील सर्व संबंधांचें परिपूर्ण ज्ञान जरी आम्हांस नसलें, तरी जें कांहीं अल्पस्वल्प ज्ञान आहे तें कार्यक्षम आहे व तें आमच्या नित्य कार्यास पुरेसें आहे, असें तुमचें जें म्हणणें आहे, त्यांत थोडासा तथ्यांश आहे. किंबहुना या वाक्यांत एका अर्थी खऱ्या कर्मयोगाचें लक्षणच तुम्ही देऊन चुकले आहांत, असेंही मी म्हणण्यास तयार आहें. पण कार्यकक्षेला उपयुक्त संबंध शोधून काढण्यास साधनचतुष्टयसंपन्न दृष्टि असावी लागते, हें विसरतां कामा नये. नित्यानित्यवस्तुविवेक, शमदमादि षट्साधनसंपत्ति, आत्मानात्मविचार व मुमुक्षुत्व हे शब्द बोलावयास जितके गोड आहेत तितके कृतींत आणण्यास सर्व जगांतील नीतिशास्त्रें अगस्त्यमुनीप्रमाणें पिऊन टाकलीं तरीही पुरेशीं होणार नाहींत. आपली बहुतेकांची दृष्टि शारीरिक सुखापलीकडे गेलेली नाहीं. धर्मदृष्टीचें जग आपणांस गोचर होण्यास पहिल्यानें आपणास कोणीतरी साक्रेटीस किंवा तुकारामासारख्या ज्ञानवैद्यानें चांगलें रेचकच दिलें पाहिजे; म्हणूनच भगवद्गीतेनें '**मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चिद्यतति सिद्धये। यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः॥**' असें म्हणून धर्मदृष्टीचा मनुष्य किती विरळा आहे, याची खानेसुमारी आपणास दिली आहे. चोवीस तासांत धर्मदृष्टीनें व्यवहार किती होतो व पंचेंद्रियांच्या पूजेच्या दृष्टीनें किती होतो, याचा विचार ज्याचा त्यानेंच करावा. म्हणजे सुखदृष्टीचें जग मिथ्या व अनर्थावह आहे; धर्मदृष्टीचें जग सत्य व ब्रह्मरूप आहे; व धर्मदृष्टीला '**सर्वं खल्विदं ब्रह्म**' असें आनंदलहरींत कसें म्हणतां येतें, याचाही थोडासा अजमास होईल.

१२. **शंकितः**—तुमच्या या सरस्वतीचा ओघ मला अगदीं थक्क करून टाकीत आहे. हे वेदान्ताचे विचार जुन्या ग्रंथांचें मंथन करूनही मला आढळलेले नाहींत!

त्याचा दोष आमच्या अज्ञानाकडे असेल, किंवा कदाचित् तुमच्या विज्ञानाच्या प्रकाशानेंच हीं गूढ रत्नें आम्हांला दिसूं लागलीं असतील, असाही प्रकार असण्याचा संभव आहे. माझें बोलणें तुम्हांला केवळ थट्टेचें वाटेल; पण मी मनापासून सांगतों कीं, तुमच्यासारखा शंकराचार्य बादरायणाला किंवा उपनिषदांना मिळाला असता म्हणजे आमच्यासारख्यांवर तर ईश्वराचे उपकारच झाले असते; पण उपनिषत्कार व बादरायण यांना देखील तुम्हांविषयीं कौतुक वाटल्याशिवाय राहिलें नसतें असें म्हटल्याशिवाय मला राहवत नाहीं ! मला वाटतें, थिऑसॉफिस्ट लोक नवीन अवतार होण्यासाठीं जी रोज जोराची प्रार्थना करीत आहेत किंवा प्रार्थनेच्या नऊ नऊ चिठ्यांचें पार्सल पोस्टामार्फत पाठवित आहेत म्हणतात, त्याचा परिणाम खास झाला असला पाहिजे. आपण तर उद्यां सर्व थिऑसॉफिस्ट लोकांना पाचारण करणार व सांगणार कीं, त्या कृष्णमूर्तीच्या बापाला कां त्रास देतां ? नवीन शंकराचार्य मूर्तिमंत आमच्याजवळ आहेत. तुमचें नांव पाहिजे तर 'शंकरमूर्ति' असें ठेवूं ! असो. माझें मुख्य काम म्हटलें म्हणजे तुमच्या स्पष्टीकरणावर शंका काढण्याचें; तें सोडून देऊन ही शंकरमूर्तिपूजा करीत बसणें ठीक नाहीं. तुमचें स्पष्टीकरण वेदान्तग्रंथांना अनुसरून आहे किंवा नाहीं, हा मुद्दा सध्यां मी सोडून देतों. तुमच्या म्हणण्याचा सारांश ध्यानांत आला. सुखदृष्टीचें जग आपणच उत्पन्न करितों व तें मिथ्या आहे हें कोणीही शास्त्रज्ञ कबूल करील; कर्तव्य किंवा धर्म यांच्या दृष्टीचें जग आनंदमय व सत्य आहे, हेंही कोणी नाकबूल करणार नाहीं. पण नवीन भौतिक शास्त्रांची दृष्टि कोती समजावयाची किंवा उदात्त ? तसेंच भौतिक शास्त्रांच्या दृष्टीचें जग खोटें किंवा खरें ? या प्रश्नांचा उलगडा झाला पाहिजे. भौतिक शास्त्रांची मदार पंचमहाभूतें व त्यांची कार्यें यांचा मनुष्यजातीच्या सुखदुःखाशीं जो संबंध आहे त्याच्यावर आहे. तेव्हां तुमच्या सुखदृष्टीच्या जगाची जी वाट लागली तीच वाट या भौतिकशास्त्रांची लावण्याचें धाष्टर्य तुम्हीं करितां कीं काय, हें पाहिलें पाहिजे.

---

# भौतिक शास्त्रें व वेदांत.

१३. **वेदांती**:—वेदान्त व भौतिक शास्त्रें यांचा संबंध, हा विषय तुम्हीं काढिला हें बरें झालें. पुष्कळ लोक भौतिक शास्त्रांच्या अजब शोधांनीं दिपून गेले आहेत, आणि त्यांना जुनीं शास्त्रें व विशेषतः वेदान्त यांच्याविषयीं तितकीच तिरस्कारबुद्धि वाटत आहे. दुसऱ्या बाजूनें पाहिलें तर वेदान्ताचे अंध-भक्त भौतिक शास्त्रें हीं जांगिळमामाची माया किंवा फसवाफसवीचा गारुडी बाजार आहे असें समजून तितक्याच जहाल द्वेषविषानें वेडे होऊन त्या शास्त्रांची हेळसांड करितात. तेव्हां वेदांततत्त्वज्ञानाची भौतिक शास्त्रांविषयीं कोणत्या प्रकारची दृष्टि असावी, हा प्रश्न अत्यंत शोधक बुद्धीनें सोडविला पाहिजे.

१४. वास्तविक वेदांत हें विश्वव्यापी तत्त्वज्ञान असल्यामुळें दरएक तत्त्वज्ञानात्मक दर्शनाप्रमाणें त्यासही ईश्वर, मनुष्य व सृष्टि या पदार्थत्रयीचा संबंध योग्य रीतीनें जुळवून दाखविणें अवश्य आहे. त्यांपैकीं ईश्वर म्हणजे परमात्मा व मनुष्य म्हणजे जीवात्मा यांचें ऐक्य आहे असें वेदांत कंठरवानें सांगतो. जीवात्म्याच्या अज्ञानावस्थेंत भोगार्थसृष्टीची आवश्यकता असल्यामुळें भोग होऊन ज्ञान झालें म्हणजे सृष्टीचें कामच उरलें नाहीं, अशा प्रकारच्या सृष्टीच्या सापेक्ष अस्तित्वामुळें वेदांतदृष्टीला भौतिक शास्त्रांचे शोध आपल्या कक्षेच्या थोडेसे बाहेरचे वाटणार. परंतु निरपेक्ष ब्रह्मदृष्टि मुक्तांच्याच वांट्यास आल्यामुळें सर्व इंद्रियविज्ञानविचार व भौतिक शास्त्रें यांना वेदांतानें 'अपराविद्या' असें नांव देऊन, जीवात्म्याला अपरा विद्या ही 'परा विद्या' म्हणजे 'निरपेक्ष ब्रह्मज्ञान' याची शिडी आहे, व ब्रह्मज्ञानाच्या माडीवर जीवात्मा पोंचल्यावर त्यानें ही शिडी फेंकून दिली तरी हरकत नाहीं अशी व्यवस्था वेदांतशास्त्रामध्यें केलेली आढळते. तेव्हां वेदांतशास्त्र हें भौतिकशास्त्रांचे विशेष कौतुकही करीत नाहीं व त्यांजविषयीं तिरस्कारबुद्धिही दाखवीत नाहीं, दोहोंमध्यें विरोध आहे म्हटला तर आहे व नाहीं म्हटला तर नाहीं. उपनिषदांत एके ठिकाणीं 'अविद्यया मृत्युं तरति विद्यया अमृतमश्नुते'

असें म्हटलें आहे. संदर्भावरून अविद्या म्हणजे अपराविद्या व विद्या म्हणजे परा विद्या असाच अर्थ घेतला पाहिजे. अपरा विद्या किंवा भौतिक शास्त्रें यांनीं मृत्यूचा नाश होतो म्हणजे पराविद्येची तयारी होते, असाच त्याचा अर्थ घेतला पाहिजे. ही तयारी कशी हाते याची थोडी मीमांसा केली पाहिजे. मनुष्याच्या मर्यादित बुद्धीचा अति उच्च विकास म्हटला म्हणजे भौतिकशास्त्रांचें पूर्णत्व हेंच होय तेव्हां भौतिक शास्त्रपद्धति आपणांस किती उंच पोंचविते हें पूर्णपणें लक्षांत आल्यानंतर पुढच्या क्षितिजाची कल्पना येईल. स्पेन्सरनें भौतिक शास्त्रपद्धति अगदीं पूर्णत्वास नेली तेव्हांच त्याला विश्वाच्या मूलबीजाचें अज्ञेयत्वरूपी क्षितिज दिसूं लागलें. तेव्हां भौतिक शास्त्रांनीं आपली कमाल करून सोडावी या कल्पनेला वेदान्ताचा विरोध कां असावा, हें समजत नाहीं. उलट ही कमाल करून सोडल्यावरच बुद्धीला खरा थकवा येतो व समाधान न झाल्यामुळें ती गमजा करीनाशी होते; व 'यतो वाचा निवर्तन्ते अप्राप्य मनसासह' या न्यायानें ती बहि-र्मुखता सोडून खरी अंतर्मुख होते, व ब्रह्मज्ञानाच्या मार्गास लागते. या बाजूनें विचार केला म्हणजे भौतिकशास्त्रांची शेवटली कड म्हणजेच एक प्रकारें वेदांताचा आरंभ, असें म्हटलें असतां चालणार आहे. पण प्रत्येक मनुष्याला या तीरापर्यंत गेलेंच पाहिजे असें मात्र सिद्ध होत नाहीं. दुसऱ्या प्रवाशाच्या हकीकती वाचून त्यांचे हाल कळले म्हणजे पुष्कळ लोक सावध होऊन खऱ्या मार्गाला लागतात. कोणत्या तरी रीतीनें मानवी बुद्धि किती जाऊं शकते व शेवटीं तिचे शेणामेणाचे पंख आत्मज्ञानाच्या व खऱ्या समाधानाच्या हवेंत कसे गळून पडतात याचें खरें मर्म कळल्याशिवाय वैराग्य व अंतर्मुखता येणेंच शक्य नाहीं. 'पांडित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत्' या वाक्याचा अर्थ तरी हाच आहे, कीं बुद्धिचें पांडित्य सर्व खर्च झाल्यावर मनुष्य लहान मुलासारखा आत्मज्ञानाच्या भुकेनें रडूं लागतो. त्याच्या कपटाचे सर्व आविर्भाव निघून जातात व आपल्या खऱ्या आईजवळ गेल्याशिवाय त्या बालआत्म्याचें खरें समाधान होत नाहीं. तेव्हां भौतिकशास्त्रांच्या कमालीची गति पाहणें हें खऱ्या वेदान्त्याला पाहिजेच आहे. येन केन प्रकारेण खरें आत्मसुख पाहिजे आहे. तें जर भौतिकशास्त्रांच्या मदतीनें मिळत असेल तर खुशाल मिळूं द्या, त्यांत अम्हांला आनंदच आहे. पण आजपर्यंत जे तत्त्ववेत्ते झाले व अजून होत आहेत त्यांना विचारून पाहिलें तर त्यांची साक्ष तुम्हांला अनुकूल होईल असें दिसत नाहीं. जर्मनीचे हल्लींचे महाविद्यात तत्त्वज्ञानी

'आयकेन' (Eucken) यांनीं 'Naturalism or Idealism?' या विषयावर एक लहानच परंतु अत्यंत खोल विचारांनीं परिप्लुत असा गोड निबंध लिहिला आहे. त्यांत त्यांनीं म्हटलें आहे कीं, भौतिक शास्त्रांनीं सृष्टीला आत्म्याच्या अगदीं जवळ आणून ठेविली आहे. पण त्या विहिरीचें पाणी किती जवळ आणिलेंत व अगदीं ओंठापर्यंत पोंचविलेंत तरी तें त्याच्या घशांत उतरण्यास आत्म्याला तहान लागली पाहिजे व ती तहान बहिर्मुखतेनें कधींहा उत्पन्न व्हावयाची नाहीं. 'आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः' अशी उंच हांक तरी हेंच सांगत आहे. याची परीक्षा पहाण्यास लांब जाणें नको. आगगाड्या, तारायंत्रें, ग्रामोफोन इत्यादि शोधांचा मनुष्यानें सदुपयोग केला आहे, किंवा पंचेंद्रियांची पूजा करून तळीराम गार करण्यांत दंग होऊन या साधनांचा दुरुपयोग केला आहे, याचा प्रत्येकानें आपआपल्या मनाशीं विचार करावा. विमानांची विद्या घ्या. सृष्टिज्ञानानें परमेश्वरी कृतींचें कौतुक करण्यांत मनुष्यजातीचें कल्याण करण्यांत ती खर्च होण्यापेक्षां, ऐहिक सत्ता व तदनुषंगिक दिग्विजयाचा टेंभा मिरविण्यास मिळावा म्हणूनच सर्व पौरुषयुक्त राष्ट्रांचें तिकडे लक्ष लागलेलें दिसतें. या सर्व शास्त्रांचा उपयोग मनुष्याच्या आत्यंतिक कल्याणाकडे करण्याचें काम सोपें नाहीं. एवढी अंतर्मुखता बहुजनसमाजांत असणें दुर्घटच आहे. तेव्हां तात्त्विक दृष्टीनें वेदान्तास या शास्त्रांच्या विरुद्ध जाण्याचें जरी कारण नाहीं तरी या बाह्यसिद्धि अंतरात्म्याच्या खऱ्या सिद्धीच्या आड येण्याचा संभव जास्त आहे, अशी भीति खऱ्या वेदान्तभक्तांस वाटणें साहजिक आहे. दिलीप राजाला स्वस्त्रीस भेटणें अवश्य होतें; पण त्या भरांत पूज्य कामधेनूला विसरणें योग्य नव्हतें, व तें विस्मरण घडल्यावर त्याला शिक्षा होऊन वसिष्ठ मुनीकडून अंजन मिळालेंच पाहिजे होतें; तशीच गोष्ट तुमच्या भौतिक शास्त्रांच्या भक्तांची आहे. खरें साध्य सृष्टि, मनुष्य व ईश्वर यांमध्यें प्रेम, ऐक्य व तादात्म्य करण्याचें; परंतु हें कार्य राहतें बाजूलाच, उलट भौतिक शास्त्रें हीं साधनें या तिहींचें भांडण लावून आकाश-पृथ्वीला वणवा लावण्याचें काम करण्यांत योजिलीं जात आहेत. तेव्हां आम्हीं हंसावें कीं रडावें हाच प्रश्न आहे. मनुष्यजातीचें ऐक्य, मनुष्यसृष्टीचें ऐक्य व शेवटीं दोहींचें ईश्वराशीं तादात्म्य हें काम भौतिक शास्त्रें व तन्मूलभूत तत्त्वज्ञानें जर करूं लागतील तर तीं सर्व वेदांताचीं भावंडेंच आहेत व वेदान्ताला त्यांची भाऊबंदकी नडणार नाहीं, इतकेंच नव्हे तर वर सांगितल्याप्रमाणें 'अविद्यया मृत्युं

तरति ' म्हणजे भौतिक शास्त्रांनीं मृत्यूचा नाश होईल. सृष्टि व परमेश्वर या आई-बापांचें भांडण झाल्यामुळें बिचारें जीवात्मरूपी बालक मृत्यूच्या दाढेंत पडतें; परंतु भौतिक शास्त्ररूपी मामा येऊन त्यानें हें भांडण तोडून टाकिलें तर तें बालक पुनः आईबापांच्या मांडीवर बसेल. पण ' मामा ' पडले लोभिष्ट व भौतिक म्हणजे षड्रिपुरूपी सहा भूतांची त्यांना बाधा झालेली; तेव्हां त्यांनीं आई, बाप व बालक यां तिघांनाही आग लावण्याचा धंदा केला तर त्यांत नवल काय ? हें काम जोंपर्यंत भौतिक शास्त्रें करीत आहेत तोंपर्यंत वेदान्ताला तीं साहाय्यभूत नाहींत असेंच म्हटलें पाहिजे. तात्त्विक दृष्ट्या हा विरोध अवश्य नाहीं, इतकेंच नव्हे तर जीवात्म्याच्या उद्धारास हीं शास्त्रें अत्यंत उपयोगी आहेत, असें प्रतिपादन करण्यास आम्हांला मुळींच संकोच वाटत नाहीं.

१५. **शंकितः**—पहिल्यांदां माझें मलाच अभिनंदन केलें पाहिजे. कारण प्रश्न विचारल्याबरोबर माझ्या मनाला अपशकून वाटूं लागला होता कीं, आतां जुन्या शिव्या तर सगळ्या संपणारच, पण नवीन शिव्यांचा शोध भौतिक शास्त्रांच्या स्पर्धेनें आपणाकडून लागून त्या तोफांचा भडिमार आमच्यावर होणार. पण प्रश्न विचारण्याला मुहूर्त उत्तम लागला म्हणावयाचा. भौतिक शास्त्रांविषयीं आपली अंध भक्तिही नाहीं व अंध तिरस्कारबुद्धिही नाहीं, ही आनंदाची गोष्ट आहे. पण वेदान्त-शास्त्रानें भौतिक शास्त्रांना ' अविद्या ' कां म्हटलें याचा उलगडा झाला पाहिजे. अगोदर उपनिषदांतील ' अविद्या ' शब्दाचा अर्थ व हल्लीं भौतिक शास्त्रें ज्यांना म्हणतात ती वस्तू हीं एकच आहेत किंवा कसें याविषयीं मला संशय आहे. वेदांत आगगाड्या, तारायंत्र, विमानें, सगळें आहे, असें म्हणण्यापैकींच ' भौतिक शास्त्राचें मंडणखंडण सर्व कांहीं वेदान्तामध्यें आहे, ' हें म्हणणें आहे असें मला वाटतें. यूरोपांतील भौतिक शास्त्रांचा इतिहास मननपूर्वक पाहिला असतां असें दिसून येईल कीं, सोळाव्या शतकानंतर मुळीं त्या शास्त्रांना आद्यस्फूर्ति मिळाली. बेकन हा त्यांचा पहिला मुनि. आरिस्टॉटलला देखील भौतिक शास्त्रें व तन्मूलभूत तत्त्वज्ञान यांचें कांहीं अंधुक ज्ञान होतें किंवा नाहीं याचा संशय आहे. मग आरिस्टॉटलाच्या पूर्वी कित्येक शतकें होऊन गेलेल्या वेदान्ताला हीं सर्व तत्त्वें माहीत होतीं हें आमच्या-सारख्या अर्वाचीन वेडगळांना कसें पटावें ? तेव्हां त्याचा उलगडा जरा सविस्तरपणें होईल तर बरा. शिवाय सृष्टीच्या अस्तित्वाविषयीं तुम्हीं आतां थोडी हातचलाखी केली असें वाटतें. मला असें स्मरतें कीं, तुम्हीं बाह्य सृष्टि ही वेदान्तमतानें खरी

मानिलीं आहे, असें सिद्ध केलें आहे. एक सूत्रही तुम्हीं म्हणून दाखविल्याचें स्मरतें. मग या सृष्टीचा विचार वेदान्तविषयाच्या बाहेर आहे, असें तुम्ही कसें म्हणतां ? 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' यांचा अर्थ तुम्ही कृत्रिम रीतीनें कसाही करा. त्याचा लौकिक अर्थ सर्व लोकांच्या हाडीमाशीं इतका खिळला आहे कीं, तुम्हीं दक्षिणी ब्राह्मणाचें सोंग घेतलेल्या परंतु झोंपेंतून खडबडून जागा झालेल्या मारवाड्याप्रमाणें आपली स्वभाषा बोलून गेलांत. ही लटपटपंची सर्वांनाच अहितकारक आहे. 'व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे । तदेकं वद निश्चित्य ' असें अर्जुनाप्रमाणें आम्हीही म्हणणार.

१६. **वेदान्तीः**—अविद्या या शब्दाचा अर्थ भौतिक शास्त्रें असा मीं केलेला आहे. त्याला आधार म्हटला म्हणजे त्या ग्रंथावर झालेल्या भाष्यांचा आहे. त्याचा विस्तार करण्याचें आतां प्रयोजन नाहीं. पण मनुष्याच्या मर्यादित बुद्धीला झालेलें सर्वज्ञान ' अविद्या ' या नांवानें मोडतें. कारण वस्तूंचे मूलभूत संबंध या ज्ञानाला गोचर होत नाहींत. उपनिषदांमध्यें एक ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, जो मनुष्य ब्राह्मणांना आत्मव्यतिरिक्त मानितो त्याला ब्राह्मण टाकून देतात. असेंच सर्व वस्तूंविषयीं सांगितलें आहे. म्हणजे त्या मनुष्यानें ब्राह्मणादि वस्तू पाहिल्या नाहींत असें नाहीं, त्याला त्या वस्तूंचें ज्ञानही नाहीं असें म्हणणें नाहीं; पण तें सर्व ज्ञान ' अविद्या ' आहे. कारण त्या वस्तूंचा अंतरात्मा या माणसाच्या अंतरात्म्याशीं संलग्न न झाल्यामुळें तें सर्व ज्ञान बाह्य किंवा अपुरें आहे. ' आतमेतत् ' असें वाक्य उपनिषदांत पुष्कळ वेळां आलेलें आढळतें. त्याचा अर्थ ' अपुरें ' असाच आहे. तेव्हां या सर्व संदर्भावरून सर्व इंद्रियज्ञान व मर्यादित बुद्धीनें ग्रहण केलेलें ज्ञान याला ' अविद्या ' म्हटलें आहे, असें म्हणण्यास कोठें बाध येत आहेसें मला वाटत नाहीं.

१७. तुमची दुसरी शंका फार चांगली आहे. भौतिक शास्त्रपद्धतीस खरा जोर आला, तो सोळाव्या शतकानंतरच युरोपमध्यें आला, हेंहीं म्हणणें बरोबर आहे. पण मीं ' जोर ' शब्द वापरला आहे; ' आरंभ ' शब्द वापरला नाहीं; तो तुमचा आहे. कारण माझ्या मतें समाजामध्यें ' तत्त्वज्ञान ' उत्पन्न झालें कीं तत्त्वज्ञानात्मक सर्व प्रकार आलेच पाहिजेत. अमुक एक तत्त्वाची जोराची प्रगति अमुक वेळीं झाली हें म्हणणें निराळें, व अमुक तत्त्वें अमक्या वेळीं उत्पन्न झालीं हें म्हणणें निराळें. या

जगांत नवें कांहींच नाहीं, विचार तर मुळींच नाहींत. ' नवे विचार ' असे शब्द जेव्हां लोक वापरतात तेव्हां त्याचा अर्थ ते विचार जगांत पूर्वी नव्हतेच असा घ्यावयाचा नाहीं. तर ते विचार जोरानें व जिवंत अनुभवाच्या फोडणीनें बहारदार करून दाखविले म्हणजे त्यांना ' नवे ' म्हणावयाचें इतकेंच. आरिस्टॉटलला Induction किंवा भौतिक शास्त्रांची अनुभवजन्य पद्धति माहीत नव्हती हें म्हणणें जरा धाडसाचेंच वाटतें. त्याचा मेटाफिजिक्स हा ग्रंथ ' फिजिक्स ' या ग्रंथाच्या मागाहून झाला, म्हणूनच त्यास Metaphysics ( Beyond physics ) फिजिक्सच्या मागाहून झालेला असें म्हटलें आहे; व त्याचा ' फिजिक्स ' हा ग्रंथ भौतिक शास्त्रांविषयींच आहे. हल्लींप्रमाणें आरिस्टॉटलच्या वेळेस ही पद्धति इतक्या जोरानें फलद्रूप झाली नव्हती हें म्हणणें अगदीं बरोबर आहे. पण तिची त्यास कल्पनाही नव्हती हें म्हणणें अगदीं खोटें आहे. त्याचप्रमाणें ही पद्धति वेदांताच्या वेळेस मुळींच माहीत नव्हती हें म्हणणें धाडसाचें आहे, इतकेंच नव्हे तर खोटें आहे. वेदांतसूत्रामध्यें गौतमाच्या न्यायदर्शनाविरुद्ध टीका केलेली आहे. यावरून न्यायसूत्रें वेदांतसूत्रांच्या पूर्वीचीं आहेत हें उघड आहे; व गौतमसूत्रामध्यें जी अनुमानपद्धति आहे ती Induction व deduction म्हणजे शाब्दिक व आनुभविक अशी दोन प्रकारची आहे हें सिद्ध करण्याची जरूरी नाहीं. ' पर्वतो वह्निमान् धूमात् ' या हजारों विद्यार्थ्यांनीं घोकलेल्या वाक्यानेंच तें सिद्ध होत आहे. धूम आहे अशी खात्री खरा अनुभव आल्यावांचून होणें शक्य नाहीं. व ' जेथें जेथें धूम आहे तेथें तेथें अग्नि असलाच पाहिजे ' हा सिद्धांत हजारों प्रत्यक्ष अनुभवांवांचून काढणें शक्यच नाहीं. तेव्हां बीजरूपानें म्हणा किंवा अस्पष्टरूपानें म्हणा ही पद्धति तत्कालीन लोकांना माहीत होती. हल्लींइतके प्रचंड शोध त्या वेळेस लागले नसतील हें कबूल. पण तत्त्वपद्धति ही कांहीं शोधांच्या संख्येवर अवलंबून नाहीं. आणखी शंभर वर्षांनीं हल्लींपेक्षां हजारपटीनें जास्त शोध लागतील, म्हणून पद्धतींत भेद झाला कीं काय? तेव्हां तत्कालीन तत्त्वज्ञानांत सृष्टिज्ञानाला व अनुभवमूल पद्धतीस जागाच नव्हती हें तुमचें म्हणणें व्यर्थ आहे.

१८. तुमच्या तिसऱ्या शंकेचें समाधान पूर्वी झालें असून ती तुम्ही पुनः पुनः उकरून काढितां, तेव्हां तुमच्यावर देखील पूर्वसंस्काराचें दडपण चांगलेंच बसलें आहे असें वाटतें. येन केन प्रकारेण वेदान्ताचा लौकिक अर्थ खरा ठरावा व त्या पद्धतीचा उपहास व्हावा, हीच इच्छा तुमच्या विचारांच्या मुळाशीं दिसते. सत्यान्वेषणाची

तुम्हीं वरतीं जिल्हई दिलेली आहे. तरी खऱ्याला मरण नाहीं. मी पुन्हां तो विषय थोडक्यांत सांगतों. तुम्हीं आमच्या विचारांना 'लटपटपंची' हें नांव दिलें तरी त्याचें सत्यत्व कांहीं नाहींसें होत नाहीं. बाह्यसृष्टि खरी आहे. पण तिचें ज्ञान आत्मःज्ञानावांचून पुरें होत नाहीं असें मीं पूर्वी सांगितलेंच आहे. सृष्टिही आमच्या दृष्टीनें आत्म्याशीं इतकी संलग्न आहे कीं, आत्म्याच्या बाहेर तिला स्थान दिलें कीं ती आपणास नाहींशी झाली म्हणून समजावें. मुलाशिवाय बाप हा शब्द अशक्य आहे तसेंच आत्म्याशिवाय सृष्टि कोठें असणार? 'आत्मनि विज्ञाते सर्वं विज्ञातं भवति' या वाक्याचा अर्थ तरी हाच कीं, अखिल विश्व ही एक शरीररचना आहे. तो एक जीव आहे. तिच्या अंतरात्म्याला तोडून तिला भिन्न करून टाकिली कीं, तिच्यांत कांहींच अर्थ उरत नाहीं. जिवंत शरीराच्या प्रत्येक परमाणूंत जसा जीव किंवा आत्मा असतो, तसाच या विश्वरूपी शरीराला आत्मा आहे व तो एकच आहे. तेव्हां मनुष्याचा आत्मा व सृष्टीचा आत्मा भिन्न मानावयाचा कीं एकच मानावयाचा ही शंका उरते. तिचें समाधान हेंच कीं, सर्व विश्व जर एक शरीर आहे तर मनुष्य व सृष्टि हे त्या शरीराचे अवयव होत. या प्रत्येक अवयवांत एकच आत्मा वास करीत आहे. पोट आणि अवयव यांचें भांडण जसें अज्ञानमूलक आहे, तसेंच सृष्टि व जीवात्मा यांचें भांडण अज्ञानमूलक आहे. आतां हें आत्मैक्य आपल्या मर्यादित बुद्धीला ग्रहण कसें व्हावें हा मात्र अति बिकट प्रश्न आहे. 'ज्ञातृ–ज्ञेय' 'भोक्तृ–भोग्य' असें द्वैत आपल्या बुद्धीला इतकें चिकटून गेलें आहे कीं, या दोहींच्या ऐक्याची कल्पना आपणास अगदीं अशक्यच वाटते. पण तर्कानें देखील या ऐक्याच्या जवळ जवळ आपणास जातां येईल. ज्ञाता व ज्ञेय अगदींच भिन्न असतील तर त्यांमध्यें भोगसंबंध तरी कसा घडावा? भोक्ता व भोग्य अत्यंत भिन्न असतील तर त्यामध्यें भोगसंबंध तरी कसा घडावा? अन्न जर आपणास न रुचेल तर त्या अन्नामध्यें व आपणामध्यें भोग्य–भोक्तृत्वसंबंध होणेंच अशक्य. त्याप्रमाणेंच सृष्टि ज्ञेय होण्याला व मनुष्य ज्ञाता होण्याला त्यांना जोडणारा दोरा आपणांस अदृश्य परंतु गृहीत धरल्याशिवाय गत्यंतर नाहीं. तेव्हां ज्ञेय सृष्टि कोणत्या तरी रूपानें पहिल्यांदां आत्मगत असल्याशिवाय त्यांचें हें लग्न जुळावयाचें नाहीं. तेव्हां बाह्य-सृष्टीचें ज्ञान भौतिक शास्त्रें जें देतात तें आत्मैक्यदृष्टीनें देत नसल्यामुळें मनुष्य व सृष्टि यांचें भांडण मिटावयाचें नाहीं. भांडण आहे तोंपर्यंत मनुष्य हा सृष्टीला वाघ किंवा सिंहाप्रमाणें भिणार; आणि भीति व प्रीतिचा परस्परविरोध आहे. इंग्रजी

शास्त्रीय पुस्तकांतून ' conquest of nature ' म्हणजे सृष्टीला जिंकणें असे शब्द येतात ते द्वैतमूलकच आहेत. सृष्टीला हिंदुस्थानाप्रमाणें तरवारीनें कितीही जिंकिलेंत, तरी जित व जेते यांचा अंतरात्मा एक झाल्याशिवाय एकमेकांविषयीं संशय व भीति रहाणारच. पण वेदान्तास या संबंधानें समाधान होणें शक्य नाहीं. वेदान्त तर कंठरवानें म्हणणार कीं ' अथ उदरमन्तरं कुरुते अथ तस्य भयं भवति ' म्हणजे सृष्टि, जीवात्मा व परमात्मा यांचें इतकें एकसूत्र आहे कीं त्यांमध्यें ' अरम् ' म्हणजे थोडें देखील ' अंतर ' असलें–थोडी देखील भेदाची किंवा द्वैताची कल्पना तेथें असली–तर भय उत्पन्न झालेंच पाहिजे. राज्यकर्ते व प्रजा यांचें देखील असेंच आहे. वेदान्ताची राजनीतिही इतर राजनीतींपेक्षां या द्वैताद्वैतविचारानेंच भिन्न होणार. ज्या पद्धतीनें राजा व प्रजा यांचें हितैक्य इतकें बेमालूम होऊन जातें कीं, संशयाला व भयाला कोठेंच जागा रहात नाहीं, तीच पद्धति वेदान्ताला मान्य होणार. मग राजा प्रजानियुक्त असो, आनुवंशिक असो किंवा अन्य प्रकारचा असो. या बाह्य उपाधींशीं वेदान्तास कांहीं कर्तव्य नाहीं. जरा विषयान्तर झालें आहे; पण दृष्टान्ताशिवाय या विषयांत बोलणेंच शक्य नसल्यामुळें इतर विषयांतील दृष्टांत घेणें भाग पडतें. या एकंदर विवरणावरून मीं जें पूर्वीं म्हटलें कीं, सृष्टीचें विशिष्ट ज्ञान वेदान्ताच्या जरा बाहेर आहे, तें अगदीं बरोबर आहे. एकदां सृष्टीशीं जीवात्म्याचें तादात्म्य झालें कीं, विशिष्ट ज्ञानाची काय महती राहिली ? तें तेव्हांच मिळूं शकेल. पण विशिष्ट ज्ञानानें हें तादात्म्य जर आपण विसरलों तर मात्र भौतिक शास्त्रें आमचीं शत्रुच आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां आमची खरी सृष्टी ही तादात्म्य दृष्टीची; तुमची शाकुंतलांतील पहिल्या पांच अंकांतील शकुंतलेसारखी. ' न च खलु परिभोक्तुं नैव शक्नोमि हातुम् । ' धड घेतां येत नाहीं धड टाकतां येत नाहीं; तेव्हां तुमच्या सृष्टीला आम्हीं खोटें म्हटलें यांत नवल तें काय ? आमची सृष्टि शकुंतला व तिचा जीवात्मारूपी दुष्यन्त यांचें परमात्मस्वरूप मारीचासमोर आलिंगन घडून 'नित्यश्रीर्नित्यमंगलं' रूपी भरत आम्हाला मिळून आमचें खंड भरतवर्ष होऊन गेलें आहे. मी म्हणतों हें सर्व तुम्हांला काव्य वाटेल; पण वर निर्दिष्ट केलेल्या दृष्टि किती भिन्न आहेत व ' भवति च पुनर्भूयान्भेदः फलं प्रति तद्यथा ' या न्यायानें त्या भिन्न दृष्टींचे मनुष्याच्या वर्तनावर व एकंदर राष्ट्रीय जीवितावर किती भिन्न भिन्न परिणाम होतात याचा जर तुम्हीं विचार केलात तर तुम्हांला केवळ भौतिक शास्त्रदृष्टि किती चुकीची आहे, हें लक्षांत येईल.

१९. भौतिकशास्त्रदृष्टीनें सृष्टि ही बंदिवासांतील दासी होय; वेदान्तदृष्टीनें ती स्वयंवरानें झालेली सहधर्मचारिणी होय. पहिल्या दृष्टीनें ती केवळ इंद्रियसुखार्थ किंवा करमणुकीकरितां आणलेली नर्तकी होय; तर दुसऱ्या दृष्टीनें ती जीवात्म्याच्या धर्म–अर्थ–काम व मोक्ष ह्या चारी पुरुषार्थांचें साधन होय. या संसारांतील सर्वच शाखांमध्यें या भिन्न दृष्टीचे भिन्न परिणाम दृष्टीस पडतील. तेव्हां तुमच्या फोनोग्राफाच्या करमणुकीला साधनभूत होणारी सृष्टि आत्मसंलग्न नसल्यामुळें आम्हांस खोटा व वेदान्तप्रांताच्या बाहेरील, अशी वाटली तर त्यांत नवल कोणतें? विषय वाढेल तितका वाढतो व कमी करवेल तितका कमी करितां येतो. पण माझें म्हणणें काय आहे हें आपल्या सूक्ष्म व ज्वलज्जहाल शास्त्रीय दृष्टीच्या आवांक्यांत आलें म्हणजे मी आपणास धन्य मानीन. शेवटीं सृष्टिज्ञानांत देखील ‘ आत्मा वा अरे द्रष्टव्यः ’ हें विसरतां कामा नये.

२०. **शंकितः**—हें पहा, तुम्हीं भौतिकशास्त्रें व वेदांत यांचा जो संबंध दाखविला त्याविषयीं शंका घ्यावयास जागाच नाहीं, असें समजूं नका. पण तुमची दृष्टि व विचारदिशा साधारणपणें सर्वांस मान्य होतील असें मला वाटतें. तथापि, या वादामध्यें एक ध्यानांत ठेवण्यासारखी चमत्कारिक गोष्ट आहे. ती ही कीं, वेदांतभक्त किंवा ज्यांना इंग्रजींत ‘ आयडिॲलिस्ट ’ ( Idealist ) म्हणतात हे लोक भौतिकज्ञानासंबंधीं बोलतांना अनेक रूपकें योजून मोठें प्रेम दाखवीत असतात. पण याच्या मतानुयायांपैकीं एकही मनुष्य भौतिक शास्त्रांचा अभ्यास करितांना दृष्टीस पडत नाहीं; मग त्या शास्त्रांत अनेक नवे शोध लावणें दूरच राहिलें. म्हणजे तात्विक दृष्टीनें वेदांत व भौतिकशास्त्रें यांचा विरोध जरी नसला, तरी व्यवहारांत दोहोंचा मनुष्याच्या मनावर परस्परद्वेषजनक असा परिणाम होतो, असें दृष्टीस पडतें.

२१. तात्त्विक दृष्ट्या विरोध नसणें पण व्यवहारांत तो दिसणें ही गोष्ट आपल्या या चमत्कारमय संसारांत वेदांतविषयांतच दृष्टीस पडते असें नाहीं, तर दरएक विषयांत ती आहे. ज्याला राजकीय अन्यायांची चीड येते त्याला समाजाच्या अन्यायांची चीड कां बरें येऊं नये? पण येत नाहीं. तात्त्विक दृष्ट्या राजकीय अन्याय व सामाजिक अन्याय हा भेद खोटा आहे. पण प्रत्यक्ष व्यवहारांत हा भेद चांगला दृष्टीस पडतो. राजकीय प्रांतांतील जहाल हा सामाजिक विषयांतही तितकाच जहाल असला पाहिजे, पण तो असत नाहीं हा चमत्कार! भाषाविषयांत

ज्याची बुद्धि उत्तम चालते, त्याची बुद्धि गणितविषयांत चाललीच पाहिजे हें तात्त्विक दृष्टया बरोबर आहे, पण व्यवहारांत प्रत्यक्ष अनुभव याच्या उलट येतो. तात्त्विक दृष्टि व व्यवहार हा भेद तुम्हीं आम्हीं दोघांनींही विसरतां कामा नये. तेव्हां वेदान्त व भौतिक ज्ञान यांचा विरोध व्यवहारकक्षेंतही दिसूं नये, अशी खटपट उभयपक्षीं झाली पाहिजे. इतकेंच बोलून ह्या विषयाची मी आतां रजा घेतों; कारण या विषयापेक्षां सर्व दृष्टीनें अत्यंत महत्वाचा असा एक विषय माझ्या मनांत पुष्कळ दिवस घोळत आहे. तो विषय ' प्रेम ' हा होय.

# वेदान्त व प्रेम.

२२. या विषयावर प्रचलित वेदांताचीं मतें इतकीं प्रसिद्ध आहेत, आणि हरिदास व पुराणिक तीं इतक्या जोरानें प्रतिपादित आहेत कीं जणूं काय 'प्रेम' हा शब्द उच्चारिला कीं वेदांत्याच्या मस्तकाला तिडीक आलीच पाहिजे; व वेदांत हा शब्द उच्चारिला कीं प्रेमभक्तांस ओकारी आलीच पाहिजे. तेव्हां 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' या सिद्धांताची बॅरिस्टरी करणारे तुम्ही गतानुगतिक न्यायानें 'का ते कान्ता कस्ते पुत्रः' किंवा 'कोणी कोणाचें नव्हेरे बापा' अशा रीतीनें हरिदास पुराणिकांची री ओढणार, किंवा तुमच्या वेदान्तरूपी सहारा वाळवंटांत प्रेमाच्या झऱ्याला थोडीशी जागा तुम्ही देणार, याविषयीं जिज्ञासा उत्पन्न झाली आहे.

२३. **वेदान्ती**:—भौतिक शास्त्रें व वेदान्त यांच्या परस्परसंबंधाविषयीं मीं जें सांगितलें त्याविषयीं तात्त्विक दृष्टीनें कां होईना तुमची अनुमति आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत दोन प्रवृत्तींचा परस्पर द्वेष दृष्टीस पडतो; हा तत्त्वाचा दोष नाहीं, तर अनुयायांच्या अज्ञानाचा आहे, हेंही आपण कबूल करालसें वाटतें; कारण ज्याअर्थीं तुम्हाला हा चमत्कार वाटतो त्याअर्थीं तात्त्विक दृष्टींत तुम्हाला कांहीं दोष दिसत नाहीं हें उघड आहे. तेव्हां प्रत्यक्ष व्यवहार हा अज्ञानमूलक अतएव खोटा आहे हें वेदान्ताचें तत्त्व या तुमच्या चमत्कारानेंच सिद्ध होत आहे. या अज्ञानदृष्टीला दिसणारा विरोध तत्त्वदृष्टीनें दूर होईल व जसजसें तत्त्वज्ञान आचरणांत येऊं लागेल तसतसें अज्ञान व तज्जन्य विरोधाभास नाहींसे होतील हें उघड आहे. तुम्हीं या चमत्काराचीं दुसरीं उदाहरणें दिलीं त्यांत जी थोडी हातचलाखी दाखविली आहे, ती माझ्या ध्यानांत आहे. राजकीय जहाल जसा सामाजिक मवाळ असतो तसाच सामाजिक जहालही राजकीय प्रांतांत मवाळ असतो, ही त्याच प्रमेयाची दुसरी बाजू तुम्हीं कां लपवून ठेविली? पहिला जितका चमत्कार तितकाच दुसराही चमत्कारच आहे, असें कोणीही तिऱ्हाईत कबूल करील, व दोन्ही चमत्कार मनुष्याच्या अज्ञानावृत अतएव समर्याद अवस्थेचे द्योतक

आहेत; असेंही तो कबूल करील. परंतु तुम्हांला एक चमत्कार दिसतो पण दुसरा दिसत नाहीं! असो; वेंदान्तभक्त व भौतिक शास्त्रांचे भोक्ते यांचा परस्परद्वेष नाहींसा करण्याविषयीं उभयपक्षीं प्रयत्न चालवावे याविषयीं मतभेद असणें शक्य नाहीं. इतकेंच सांगून तुमच्या व मला वाटतें सर्वांच्याही मतें अत्यंत महत्वाचा जो 'प्रेम' हा विषय तुम्हीं काढिला आहे तिकडे मोर्चा फिरवितों. 'का ते कान्ता कस्ते पुत्रः' व 'कोणी कोणाचें नव्हेरे बापा' अशा अर्थाचीं वाक्यें उपनिषदांतही सांपडतात. तेव्हां बिचाऱ्या हरिदासांना व पुराणिकांना कां पकडतां? मूळ अपराध्यालाच पकडा. बृहदारण्यकउपनिषदांत याज्ञवल्क्य व मैत्रेयीं यांच्या संवादांत 'न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति' अशा तऱ्हेचीं आठदहा वाक्यें आहेत. त्यांचें एकंदर तात्पर्य खोटें प्रेम व खरें प्रेम यांचा भेद दाखविण्याकडे आहे; सरसकट प्रेम वाईट व खोटें असें दाखविण्याचा नाहीं. हें तात्पर्य लक्षांत घेतलें म्हणजे हरिदास व पुराणिक यांच्या उपदेशाचें तात्पर्यही सात्विक शुद्ध अशा प्रेमाच्या विरुद्ध मुळींच नाहीं, तर दुनियेमध्यें जें प्रेम विकतें आहे तें प्रेम खरा माल नव्हे हें सांगण्याकडेच आहे. तात्त्विक दृष्टीनें हें कामच आहे कीं, खोटया मालाचा स्फोट करून खरा माल कोणता हें लोकांना दाखववायाचें. पण खोट्या मालाला भुलणाऱ्या लोकांना तो खोटा आहे असें दाखविण्यास प्रत्यक्ष व्यवहाराचें स्वरूप सविस्तरपणें व वक्तृत्वपूर्ण रीतीनें लोकांपुढें मांडणें अवश्य आहे; व हीच मांडणी सर्व वेदान्तग्रंथांत आहे. पण ही केवळ निषेधरूप आहे; विघातक आहे. या प्रेमयांचें विधिरूप किंवा संघटनात्मक निरूपण लगेच पुढें दिलेलें असतें; तें मूढ जनांच्या लक्षांत येत नाहीं.

२४. एवढी गोष्ट आधींच कबूल केली पाहिजे कीं, वेदान्तविषयाचें विघातक स्वरूपच लोकांपुढें मांडण्यांत आल्यामुळें आपल्या राष्ट्राचें फार नुकसान झालें आहे. असें होण्याचें कारण काय याची मीमांसा करणें हें अत्यंत उपयोगाचें पण कठीण आहे. या दोषाचा भार सर्वस्वीं आपल्या पूर्वजांवर लादणें हें अन्यायाचें आहे, म्हणूनच ही गुंतागुंतीची कारणमीमांसा अवश्य झाली आहे. एखाद्या गोष्टीची विघातक बाजूच लोकांपुढें वाङ्मयांतून व वक्त्यांच्या भाषणांतून येणें याची मीमांसा त्या वेळच्या परिस्थितीच्या ज्ञानानेंच होणार आहे; अन्यथा होणार नाहीं. पण एकच गोष्ट मी आपणापुढें मांडतों. ती माझ्या मतें आपल्या पूर्वजांवरील दोषारोप घालविण्यास बरीच समर्थ आहे. ज्या ज्या वेदांतभक्त कवींनीं संसार व त्यांतील

प्रेम यांची विटंबना केली आहे त्याच कवींनीं पुराणांतील धीरोदात्त स्त्रीपुरुषांचें प्रेम वर्णन करितांना कोठेंही नाक मुरडलें नाहीं. इतकेंच नव्हे तर त्या प्रेमयशाचें वर्णन करितांना त्यांची शृंगारलहरी वरीच उच्च कोटीला गेलेली दिसते. संस्कृत कवि तर या धीरोदात्त नरनारींच्या शृंगारवर्णनांत इतके दंग झाले आहेत कीं, केव्हां केव्हां ते दोषास्पद झाले आहेत. मराठी कवि संस्कृत कवींपेक्षां जरा जास्त सोंवळे आहेत, हें कबूल केलें पाहिजे. पण त्यांनाही नलदमयन्ती, कृष्णसत्यभामा, रामसीता यांच्या प्रेमाचें वर्णन करितांना कमी भरतें आलें आहे, असें दिसत नाहीं. तेव्हां शुद्ध सात्त्विक प्रेमाचा तिट्कारा वेदांतभक्तांस येतो, असें संस्कृत व मराठी वाङ्मयावरून निःसंशय सिद्ध करितां येईल असें मला वाटत नाहीं. हरिदास व पुराणिकही पहिलें ब्रह्मज्ञान विघातक करून आख्यानांत शुद्ध सात्त्विक प्रेमाची तुतारी वाजविण्यांत आपण कांहीं असंबद्ध बोलत आहों, असें मानीत नाहींत. तेव्हां ही चूक होत आहे कोठें याचें सूक्ष्म निरीक्षण केलें पाहिजे. मला वाटतें, तत्त्वज्ञान व त्यानें उत्पन्न केलेलें सामाजिक वातावरण कितीही शुद्ध व आरोग्यमय असलें तरी असा एक काळ येतो कीं, तें तत्त्वज्ञान पोपटपंचीसारखें यांत्रिक व निर्जीव बनतें व बराच काळ लोटल्यावर त्या तत्त्वज्ञानाचे अनुयायी पोपटाप्रमाणेंच त्या तत्त्वज्ञानाचा अनुवाद करीत रहातात. पण यामुळें पूर्वींचें सांगोपांग विघातक व संघटनात्मक दोनही प्रकारचें विवरण विसरून जाऊन कांहीं अलौकिक परिस्थितीच्या आनुकूल्यामुळें त्या तत्वज्ञानाची एकच बाजू अशा यांत्रिक रीतीनें पुढें येऊं लागते; पण परिणाम मात्र भयंकर होतो. अपूर्ण विद्येचे भयंकर परिणाम सर्व ग्रंथकारांनीं वर्णिलेले आहेत; तेच परिणाम आज आपण भोगीत आहोंत. पण या अपूर्ण ज्ञानाच्या दोषांचा आरोप मूळ झऱ्यावर लादूं नका, असें आमचें सांगणें आहे. मूळचा औपनिषद ज्ञानरूपी झरा फार शुद्ध आहे, तिकडे चला, त्याचा रसास्वाद घ्या व मग बोला, असें म्हणणें न्यायाला धरून आहे, हें तुम्हीही कबूल कराल.

२५. **शंकितः**—तुमचें स्वतःचें तत्त्वज्ञान आम्हांस नको आहे. तें कितीही चांगलें असलें तरी लोकांना नेहमींचा वेदांत जो ऐकूं येतो, तो सरसकट 'प्रेम खोटें आहे' अशा तऱ्हेचा विघातक स्वरूपांत ऐकूं येतो, व त्यापासून भयंकर परिणाम उत्पन्न झाले आहेत व होताहेत हें तुम्हीच कबूल करितां. तेव्हां या विषयाचें संघटनात्मक अथवा विधिस्वरूप तुमच्या डोक्यांतून न निघतां वेदांतग्रंथांतून निघालेलें आम्हांस पाहिजे आहे. तुम्हीं उपनिषदांचें वर्णन केलेंत तें बरोबर

आहे. वेदांतज्ञानाचा तो मूळ झराच आहे. पण हरिदास लोक जें ब्रह्मज्ञान सांगतात, तें संसार व प्रेम यांच्यावर सरसकट हल्ला करीत असतें; व पुढील आख्यान तर संसारी व प्रेमाधीन नरनारींच्या वर्णनांनीं भरलेलें असतें. तेव्हां हा असंबद्धपणा त्यांच्या लक्षांत येऊं नये काय ? पण येत नाहीं ! तरी पण तुम्ही हीच गोष्ट आपल्या विचारसरणीस अनुकूल अशी घेतां हें मोठें मला नवल वाटतें. हरिदास-पुराणिक लोकांचा अंधपणा दोषरूप न धरितां त्याला तुम्हीं गुणाचेंच स्वरूप देतां, हें न्यायपद्धतीस धरून आहे, असें मला वाटत नाहीं. उपनिषदादि ग्रंथांत देखील सात्विक प्रेमाची महती गाइलेली आहे, असें दिसत नाहीं.

**२६. वेदान्ती**:--हरिदासपुराणिकांचा अंधपणा हा मी दोषच मानितों. पण कित्येक दोषांपासून देखील आंतील मनःप्रवृत्तीचें अनुमान होतें. मनुष्य रागाच्या सपाट्यांत अंध होऊन असंबद्ध बोलतो, पण त्याच्या बोलण्यावरून त्याच्या रागद्वेषांचें अनुमान चांगलें होतें. न कळत कां होईना, ब्रह्मज्ञान व पुराणांतील आख्यानें यांमधील विरोध वक्तयाच्या व श्रोत्याच्या मनाला भासत नाहीं. यावरून शुद्ध वेदांत हा सात्विक प्रेमास विरुद्ध नाहीं, अशी निदान सर्व लोकांची अगदीं आंतील मनाची खात्री आहे, असें अनुमान काढणें चुकीचें होईल काय ? माझें स्वतःचें तत्वज्ञान मी तुम्हांपुढें ठेवीत नाहीं. एकंदर वाङ्मयाचा अभ्यास करून मनावर जे संस्कार होतात तेच मी आपणांस सांगत आहें. उपनिषदांतील तत्वज्ञानाची अशी गंमत आहे कीं, तें युक्तिवादाच्या पद्धतीनें मांडिलेलें नाहीं. अप्रत्यक्ष ध्वनि व सूचक उदाहरणें हीं देऊनच बहुतेक सिद्धान्तांचें उद्घाटन केलें आहे. उपनिषदें हीं ध्वनिकाव्याचीं उत्कृष्ट उदाहरणें आहेत, असें मला वाटतें. या ध्वनिकाव्यांतील एक दोन सूचक गोष्टी मी आपणांस सांगतों, म्हणजे प्रेमाविषयींचे सिद्धांत अप्रत्यक्षपणें व मोठ्या खुबीनें उपनिषदांत कसे मांडलेले आहेत, तें तुम्हांला समजेल. जानश्रुति नांवाचा राजा रैक्व ऋषीकडे द्रव्याचे गाडे भरून घेऊन गेला. पण रैक्व पडला अत्यंत निःस्पृह; त्याने 'अपेहि रे शूद्र' म्हणून त्यास झिटकारून दिलें. या 'शूद्र' शब्दावर अनेक टीकाकारांनीं अनेक प्रवचनें केलीं आहेत. पण तीं सर्व अरसिकपणाचीं आहेत. मला वाटतें, काव्यदृष्टीनें पाहिलें म्हणजे या शब्दाचा अर्थ 'शुचा द्रावयति' या महत्पांडित्यदर्शक पण वेड्यावांकड्या व्युत्पत्तीनें घेण्याचें कारण नाहीं. रैक्वानें जानश्रुतीला 'शूद्र' अशी शिवी दिली,

याचें कारण पैसे देऊन तो ब्रह्मज्ञान विकत घेण्यास आला हें होय. पैशानें ब्रह्म-ज्ञान मिळेल अशी घाणेरडी समजूत अत्यंत तामसी वृत्तींची व जडबुद्धीची दर्शक आहे, असा ध्वनि या 'शूद्र' शब्दापासून निघतो. आणि असा अर्थ घेतला म्हणजे एकंदर संदर्भ काव्यमय होतो. हें थोडें विषयांतर झालें, पण तें अवश्य होतें. पुढें जानश्रुति घरीं परत गेला व पुनः आपल्या तरुण व सुंदर मुलीला घेऊन आला. या मुलीचा चेहरा पाहिल्याबरोबर रैक्व फार खूष झाला व त्यानें जान-श्रुतीस ब्रह्मज्ञान सांगितलें. आतां या गोष्टीपासून अनेक अनुमानें काढितां येतील. रैक्व हा ब्रह्मज्ञानी होता; साधारण मनुष्य नव्हता. तो नुसत्या शारीरिक सौंदर्याला भुलणारा नव्हता. असें असून जानश्रुतीच्या मुलीवर त्याचें प्रेम बसून त्यानें तिच्या प्रेमामुळें जानश्रुतीला ब्रह्मज्ञान सांगितलें. मूळ ग्रंथांत तर असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, या मुलीचा चेहराच तुझें गुरुतीर्थ झालें आहे; हा चेहरा मला दिसला नसता तर तुला कधींही विद्या मिळाली नसती. तेव्हां रैक्वाचें हें प्रेम सात्विक, शुद्ध व निर्दोष असेंच समजलें पाहिजे व तें त्याच्या ब्रह्मज्ञानाच्या विरुद्ध नाहीं, हें स्पष्ट होत आहे. त्या मुलीचा आत्मा व रैक्वाचा आत्मा इतका एकरूप झाला कीं, 'अन्याला जरि देह भिन्न दिसती ती एकचित्ता प्रिया' असाच अनुभव तेथें आला.

२७. दुसरी गोष्ट खुद्द याज्ञवल्क्य ऋषीचीच. या ऋषीचा अधिकार केवढा होता हें बृहदारण्यक उपनिषद् ज्यांनीं ज्यांनीं वाचिलें आहे त्यांच्या त्यांच्या ध्यानांत आल्याशिवाय राहणार नाहीं. या ऋषींनींच गार्गीच्या कठीण प्रश्नांस उत्तरें देऊन जनकराजाची सर्व सभा तटस्थ करून टाकिली. यांनींच जनकराजाला अनेक उप-देश करून 'अभयं वै प्राप्तोऽसि जनक' या पदाला पोचविलें. या अधिकाराच्या ऋषीला एक सोडून दोन बायका होत्या हंसूं नका; हा विनोद नाहीं. माझ्या म्हणण्याला या गोष्टीनें चांगलीच पुष्टि येत आहे. पण या क्षुल्लक बाबीपेक्षां पुढची हकीकत जास्त महत्वाची आहे. याज्ञवल्क्याच्या मनांत संन्यास घेण्याचें आलें. त्यांनीं आपल्या दोघी बायका जवळ बोलावून आणिल्या व त्यांना सांगितलें कीं, तुमच्या जिनगीची मी तुम्हांस वांटणी करून देतों, म्हणजे भांडणांस जागा उरणार नाहीं. त्या दोन बायकांपैकीं एक कात्यायनी 'स्त्रीस्वभावा' म्हणजे संसार व त्यांतील उपभोग यांत गढून गेलेली होती पण दुसरी मैत्रेयी संसारांत असून तत्त्वज्ञानाची भुकेली होती. वांटणी करतांना ती आपल्या पतीस म्हणाली, 'महाराज, आपण चाललां पण मला पुष्कळ शंका आहेत; त्यांचें समाधान झाल्याशिवाय मी आप-

गांस जाऊं द्यावयाची नाहीं.' तेव्हां ऋषि म्हणाले, 'विचार.' ती म्हणाली, 'ह्या दागिन्यांनीं व संपत्तीनें मला अत्यंत सुख मिळेल काय?' ऋषि म्हणाले, 'गाड्याघोडे नाचविणाऱ्या पुरुषांना जें सुख मिळत असतें तसलें तुला मिळेल. पण 'अमृतत्व' म्हणजे ब्रह्मानंदाचें शाश्वत सुख नुसत्या संपत्तीनें तुला कधींही *मिळावयाचें नाहीं.' तेव्हां साहजिकपणें तिनें 'तें सुख कशानें मिळेल' म्हणून* विचारलें, तेव्हां ऋषींनीं या जगांत आपण जें दुसऱ्यावर प्रेम करितों ते *त्याच्या-*करितां करीत नाहीं, तर आपल्या स्वतःकरितां करितों, इतका आपला स्वतःचा आत्मा आपणांस प्रिय आहे; इतका जर तो प्रिय आहे, तर त्याचें स्वरूप काय आहे हें पहाणें अत्यंत अवश्य आहे; पुढें सर्व वस्तूंचा आत्मा व आपला आत्मा एकरूपच आहे, असें अनेक रीतींनीं तिला त्यांनी समजावून दिलें व शेवटीं सांगि-तलें कीं 'असा जो हा शाश्वत नित्यनिरंजन आत्मा त्याचें ज्ञान झाल्यावर त्या परमात्मदृष्टीनें आपण सर्व भूतांवर प्रेम करूं लागलों कीं तेंच प्रेम ब्रह्मानंद होय. मग तें पतिपत्नीरूपाचें असो, मित्रत्वाचें असो, अगर तिसऱ्या एखाद्या स्वरूपाचें असो. तेंच प्रेम शुद्ध व सात्विक. नुसतें शारीरिक प्रेम टिकाऊ नव्हे; तें मायारूप आहे.' आतां या गोष्टींत 'प्रेम' या विषयाचें सांगोपांग विवेचन आहे असें मला वाटतें. पहिल्या प्रथमच कात्यायनी व मैत्रेयी या दोन बायकांच्या अधिकारामध्यें जो भेद काढला आहे तोच साधें प्रेम व दिव्य प्रेम यांच्या मुळाशीं आहे. आपण जें प्रेम करितों तें प्रेमविषयीभूत झालेल्या माणसाला बाह्यसुख देण्यापुरतेंच असतें. ज्या प्रेमाच्या योगानें परस्पर आत्मोन्नति होत नाहीं तें प्रेम, संपत्ति व गाड्याघोडे-इत्यादि उपकरणांपासून मिळणाऱ्या चैनीइतकेंच बाह्य आहे. त्याचा अंतरात्म्याला स्पर्श होत नाहीं इतकेंच नव्हे तर अभ्यासानें चैनीच्या विलासाप्रमाणेंच तें आत्मो-न्नतीस बाधक आहे, म्हणून तें त्याज्य होय. हें दाखविण्याकरितां सर्व वेदान्तग्रंथांत ह्या बाह्य प्रेमावर जितका हल्ला करितां येईल तितका केला आहे. याव्यतिरिक्त 'इदं सर्वं यदयमात्मा' या दृष्टिनें केलेलें प्रेम हें शुद्ध व टिकाऊ आहे, त्याचा स्वीकार करावा हा ध्वनि यापासून आपोआप निघतो. याच याज्ञवल्क्याचा संवा-दांत एक दोन वेळां त्या ऋषीचे मैत्रेयीविषयीं जे प्रेमोद्गार निघाले आहेत, ते कोणत्याही उच्च नाटकांतील धीरोदात्त नायकास शोभणारे असेच आहेत. यावरून हें नाहीं का सिद्ध होत, कीं शुद्ध व सात्विक प्रेम याज्ञवल्क्याच्या ब्रह्मज्ञानाला बाधक होत नाहीं? इतकेंच नव्हे तर तो संन्यास घेऊन गेल्यावरही मैत्रेयीच्या

मनांतील या सात्विक भावाला ओहटी न लागतां आपला पति आपलें शाश्वत कल्याण करून गेला या जाणीवेमुळें दोघांचीं शरीरें वियुक्त असतांही त्या प्रेम-सागरास सारखी भरतीच येत गेली ! आतां उपनिषदें हीं पुराणें, आख्यानें, काव्यें व नाटकें यांची मातृभूत असल्यामुळें या सर्व पुस्तकांतून हाच झरा दृष्टीस पडतो व मराठी संत कवींनीं देखील याच झऱ्याचें पान केल्यामुळें त्यांचे ग्रंथांत देखील शुद्ध सात्विक प्रेमाला अग्रस्थान मिळालें आहे. फार कशाला, आपले सर्व मराठी संत कवि कुटुंबी होते, ही अगदीं निव्वळ ऐतिहासिक गोष्ट माझ्या विधानास किती बळकटी देत आहे याची कल्पना करा. आमचे देव देखील कुटुंबी; आमचे ऋषि कुटुंबी; पार्वती–परमेश्वराची जोडी आमच्या हृदयांत सात्विक व दिव्य प्रेमाची प्रतिमा या दृष्टीनेंच वसत आहे. ‘ कान्तासंमिश्रदेहोऽप्यविषयमनसां यः पुरस्तायतीनाम् ’ असें कालिदासानें शंकराविषयीं म्हटलें आहे. पार्वतीचा वियोग एक क्षणभरही होऊं नये म्हणून तिला अर्धांगी केली, तरी पण विषय–पराङ्मुख झालेल्या यतींमध्यें श्रेष्ठ, अशी त्या देवाची प्रार्थना केली आहे. राष्ट्रांतील जुन्या दंतकथा इतिहास नसतील, पण त्या सर्व गोष्टी राष्ट्राचें ध्येय व चित्तवृत्ति यांचें प्रतिबिंब आपणांस प्रमाणिकपणें देतात, हें तत्त्व भूमितींतील सिद्धान्ताइतकें स्पष्ट व खरें आहे. ‘ ममापि च क्षपयतु नीललोहितः । पुनर्भवं परिगतशक्तिरात्मभूः ॥ ’ अशी जन्ममरणापासून सुटण्याची इच्छा करणारा कालिदास ‘ दुष्यंतशकुंतला ’ ‘ पुरूरवस् उर्वशी ’ इत्यादि जोडप्यांच्या शृंगारवर्णनांत मनमुराद पोहतो याचें तरी बीज वेदांताला शुद्ध प्रेम पाहिजे आहे हेंच नव्हे काय ? तेव्हां ‘ का ते कान्ता कस्ते पुत्रः ’ अशा तऱ्हेच्या वाक्यांचा अर्थ ‘ सात्विक प्रेम वाईट,’ असा घेऊन कसें चालेल ? या वाक्यांनीं द्योतित तिरस्कार भाडोत्री प्रेमाविषयीं आहे. हें भाडोत्री प्रेम जगांत फार सवंग आहे; व ज्या मानानें तें सवंग आहे त्या मानानें बाह्यतः मोह पाडणारेंही आहे. तेव्हां हें मोहजाल दूर करण्याकरितां भाडोत्री प्रेमाची टवाळकी कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं केलेल्या भाडोत्री सुधारणेच्या टवाळकी इतकीच जाज्वल्य असली पाहिजे, हें उघड आहे.

१८. या तिरस्काराचें समर्थन दुसऱ्याही एका दृष्टीनें करितां येतें. सात्विक प्रेम हें स्वाभाविक आहे व धर्मानुकूलही आहे; पण जीवितांतील अनेक कर्तव्यांपैकीं तें एक आहे. प्रसंगानुसार जेव्हां ‘ प्रेम ’ व इतर कर्तव्यें यांचा विरोध येतो आणि शास्त्रदृष्टया व सदसद्विवेकबुद्धिदृष्टया इतर कर्तव्यें ‘ प्रेमा ’ पेक्षां जास्त उच्च

दर्जाचीं ठरतात, तेव्हां प्रेमास झुगारून देऊन तीं तीं कर्तव्यें केलीं पाहिजेत, असें वेदांत कंठरवानें सांगतो. धर्म किंवा अर्वाचीन भाषेंत बोलावयाचें म्हटलें म्हणजे कर्तव्यकर्म याच्यावरच सर्व मोक्षशास्त्रांची भिस्त आहे व ती बरोबर आहे. कर्मठांच्या मंत्रतंत्रापेक्षांही या कर्तव्यकर्म–योगाची किंमत जास्त आहे, असें गीताशास्त्र सांगतें. 'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरण व्रज' याचा अर्थ तरी इतर सर्व ऐहिक हेतूंस झुगारून देऊन मला स्मरून कर्तव्यकर्म कर, असाच आहे. तेव्हां कर्तव्यकर्माच्या आड जर प्रेम येत असलें तर माता, पिता, भार्या या सर्वांचाच त्याग केला पाहिजे. त्याजवरील प्रेम कितीही शुद्ध असो त्याची किंमत कर्तव्यकर्म किंवा नियत–कर्मापुढें कांहीं नाहीं. या दृष्टीनें 'का ते कांता कस्ते पुत्रः' या उपदेशाची आवश्यकता त्रिकालाबाधित आहे. हल्लींच्या काळीं तर प्रत्येक सुखाला कर्तव्याखालीं ओढण्याचे कामांत आपलें शिक्षण ( Culture ) आपणांस तरबेज करीत आहे. प्रत्येक उच्च ध्येयाकडे जावयास लागा, कीं काकीमामीवरील देखील प्रेम 'सात्विक' या सदरांत आपण कसें पटकन् घालून देतों व कर्तव्यपराङ्मुख होतों, हें हल्लींच्या पांचपंचवीस वर्षांच्या इतिहासाचें अवलोकन केलें असतां सहज दिसून येईल. माझ्या एका विनोदी मित्रानें शिक्षणाची व्याख्या अशी केली कीं, 'ज्याच्या योगानें मनसोक्त आचारास धर्माचे स्वरूप देण्याची शक्ति येते त्यास शिक्षण म्हणावें.' यांत विनोदाची बाजू असली तरी तथ्यांशही आहे. या दृष्टीनें सुखसंगी लोकांना जागृत करण्याकरितां 'का ते कान्ता कस्ते पुत्रः' 'परे ब्रह्मणि कोऽपि न लग्नः' 'किं निशंकं शेषे शेषे वयसि त्वमागते मृत्यौ' अशा तऱ्हेचीं उद्बोधक वाक्यें शंखनादानें कानींकपाळीं कोंबणारा एखादा शंकराचार्य आम्हांस आजही पाहिजे आहे, असें सिद्ध होत नाहीं काय ! भाडोत्री प्रेम नको आहे, शुद्ध सात्विक प्रेम पाहिजे आहे; पण अगोदर शुद्ध चरित पाहिजे आहे. अशी वाक्यत्रयी वेदान्ताची त्रिपदा गायत्रीच होय. या गायत्रीचा अन्तःकरणपूर्वक जप करणारा मनुष्य वेदान्ताच्या अन्तर्गृहांत आलाच म्हणून समजावें. नियत कर्तव्याच्या यज्ञामध्यें तात्विक प्रेमाची देखील आहुति देणारे रामासारखे राजे–परशुरामासारखे ब्राम्हण पुराणांतरीं मिळतीलच. पण अगदीं ऐतिहासिक पुराव्यानें सिद्ध झालेल्या रजपूत वीरांच्या गोष्टी वाचिल्या म्हणजे वेदान्तदृष्ट्या ठरलेलें प्रमेय किती सत्य आहे, याची प्रत्यक्ष साक्ष मिळते.

**२१. शंकितः**—मला आतां असा भास होतो कीं, तुमच्या वक्तृत्वानें तुम्हीं

मयासुराच्या गृहाप्रमाणें जमीन आहे तेथें पाणी भासवून द्याल; म्हणजे तुम्ही म्हणतां तें खोटें आहे असें मी म्हणत नाहीं. पण तत्त्वज्ञानासारख्या विषयांत वक्तृत्व हा मी गुण मानीत नाहीं. ज्या ठिकाणीं सूक्ष्म भेद काढावयाचे असतात, तेथें वक्तृत्वाची कारंजीं दृष्टीला भ्रम उत्पन्न करितात व सूक्ष्म भेद विसरून जाऊन मनाची होडी एकाच बाजूला कलंडते; व 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' याऐवजीं 'जायते तत्त्वमोहः' असें म्हणण्याची पाळी येते. सांगावयास कारण कीं, या वादांतील मुख्य मुद्दा तुमच्या वक्तृत्वामुळेंच मीही विसरलों असें मला वाटतें. प्रेमाला दोन माणसें लागतात. प्रेम करणारा व ज्याच्यावर प्रेम करितो तें माणूस. तुमच्या वेदांताचें पहिलें सूत्र 'एकमेवाद्वितीयं' हें आहे. तेव्हां अशा या निष्कलंक अद्वितीय आत्मैक्यांत द्वैतांमध्यें पोहणाऱ्या बिचाऱ्या प्रेमाला उभें रहाण्यास देखील जागा नाहीं, अशी आमची मनोदेवता आम्हांला सांगते. तुमच्या मनोदेवतेला कौल लावा व ती काय सांगते तें आम्हांला सांगा.

**३० वेदान्तीः**—याज्ञवल्क्य हा सिद्ध होता व त्या अवस्थेंतच त्याला दोन बायका होत्या, अशी गोष्ट मीं सांगितली. त्या वेळेसच ही शंका काढावयास पाहिजे होती. पण माझें वक्तृत्व किंवा तुमची विस्मृती कांहीं म्हणा—आड आलें. असो; मी वक्तृत्वही दाखवीत नाहीं, व मयासुराची मायाही दाखवीत नाहीं. अगदीं 'भूतार्थव्याहृतिः सा हि' अशा रीतीनें चोखीचोख बोलतों. वेदान्तशास्त्रांत अद्वैत शब्द आहे, तो फार महत्वाचा आहे. अद्वैताबद्दल ऐक्य म्हटलें तर कोशाप्रमाणें बरोबर भाषांतर होईल; पण तत्त्व चुकेल. द्वैत जिकडे तिकडे आहे हें वेदान्त कबूल करितो. पण त्या शास्त्राजवळ एक यक्षिणीची कांडी आहे. तिच्या योगानें जिकडे तिकडे त्या द्वैताचेंच अद्वैत होतें, व सात्विक प्रेम हें त्या यक्षिणीच्या कांडीचेंच भावंड आहे. या सर्व वादाच्या मुळांशीं आपणां सर्वांची एक चूक होत आहे. ती ही कीं, ब्रह्म किंवा जीवात्मा हे 'पाणी', 'विस्तव' इत्यादि जड वस्तूंप्रमाणेंच वस्तू आहेत, असें आपण समजतों. ही जडदृष्टि आपल्याला शेवटपर्यंत नडते. वेदांताला तर ती फारच नडते. चेतन वस्तूचे गुणधर्म सांगतांना जड सृष्टींतील दृष्टांत घेतल्याशिवाय चालत नाहीं. असा दृष्टान्त घेतला कीं दार्ष्टान्तावर जडत्वाचा आरोप आलाच. 'जीवात्मा व परमात्मा दोन नाहींत,' 'जीवात्मा परमात्म्यांत लीन होतो' अशा सिद्धान्तांचें स्पष्टीकरण करितांना पाण्याची उपमा देतात. पण या उपमेमुळें लोकांचा गैरसमज होतो. उपमा दिल्याशिवाय तर गत्यंतर नाहीं; पण आपण वाद करितांना

कांहीं तरी युक्ति काढून या जडत्वाचा आरोप नाहींसा केला पाहिजे. दर शरीरीं आत्मा आहे हें तर तुम्ही कबूल करालच. तो मलीन व अपूर्ण अवस्थेंत असला म्हणजे आपला आपणांस कळतो. पण केव्हां केव्हां अत्यंत पापी मनुष्याला देखील असा एक क्षण येतो कीं, त्या वेळेस त्याचा आत्मा शुद्ध, बुद्ध, मुक्त होऊन कांहीं विलक्षण तऱ्हेचें तेज त्याचें त्यालाच भासमान होतें. दिव्य प्रतिभेचे ग्रंथ वाचतांना तुम्हांला देखील हा भास झाला असेल. हाच क्षण जीवात्मा परमात्म्यांत लीन होण्याचा व अद्वैतावस्थेचा. अरिस्टॉटल एके ठिकाणीं असें म्हणतो कीं आपल्या उच्च चित्तवृत्तीचा एक क्षण आपणास जें सुख देतो तें सुख देवांना अहोरात्र मिळत असतें. आपल्याच आत्म्याची क्षणिक दिव्य प्रतिभा कायमची टिकली म्हणजे ती ब्राह्मी स्थिति. मिठाचा खडा पाण्यांत विरघळला म्हणजे सर्व पाणीच. पण ही उपमा जीवात्मा–परमात्म्याच्या ऐक्याला लावली म्हणजे कल्पना स्पष्ट होते. पण आत्म्यावर जडत्वाचा आरोप येऊन आत्म्याचें ऐक्य म्हणजे पाण्यापाण्याचें ऐक्य अशी भावना होऊन प्रेमासारख्या सात्विक व दिव्य भावनांना जागाच नाहीं, असा आपणांस भास होतो. पण ही चूक आहे. जीवात्म्याची कलंकरहित व उपाधिरहित शुद्ध पूर्णावस्था तीच ब्रह्मावस्था. विषयच असा आहे कीं, यापेक्षां जास्त स्पष्टीकरण करतां येत नाहीं. पण इतक्या ऊहापोहापासून तुम्हांस हें कळून येईल कीं, ‘ तत्त्वमसि ’ या महावाक्याचा अनुभव आला तरी ‘ प्रेमा’ला जागा आहे, इतकेंच नाहीं तर सच्चिदानंदमय ब्रह्माचें देखील ‘ आनंद ’ हें अंग आहे व आनंद म्हणजे ‘ प्रेमातिशय ’ असें मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं. प्रेमाला लागणारें द्वैत त्या अद्वैतांतच आहे, बाहेर नाहीं. आपले द्वैतांत विष असतें; उच्च प्रेमाच्या किंवा ब्राह्मी स्थितीच्या द्वैतांत अमृत असतें, म्हणजे अद्वैत असतें. उच्च कल्पनारूपी पंख लावा म्हणजे तुम्ही या द्वैताद्वैत–महाकाशामध्यें उड्डाण कराल व ती वरची अद्वैत–प्रेमाची हवा तुम्हीं खाल्ली कीं, पुनः या पृथ्वीवर तुम्हांस यावेंसें वाटणार देखील नाहीं. मग तुम्ही शंकराचार्यांच्या भाषेंत बोलावयास लागाल व एकदम उद्गार काढाल कीं, ‘ का ते कान्ता कस्ते पुत्रः । संसारोऽयमतीव विचित्रः ॥ ’

**३१. शंकितः**—आतांचा तुमचा आवेश व स्वर अगदीं हिमालयांतील महात्म्यांना शोभेल असा भासतो. पण भूमितीच्या पद्धतीचा स्वीकार करून प्रमाणशीर बोलण्याचा आव घालणाऱ्यांना शेवटीं ती पद्धति सोडून देण्याची पाळी यावी, व आवेशयुक्त भाषणानेंच प्रमाणांची उणीव भरून काढणें भाग पडावें, हें पाहून

त्यांची मला खरोखर कींव येते. शेवटीं माझ्या कल्पनेचे पंख मी लावणार ! मग तुमच्या वेदान्ताच्या हवेची गोडी मला लागणार ! व नंतर 'का ते कान्ता कस्ते पुत्रः' याची जाणीव मला बरोबर होणार ! वा ! मग वादविवाद नकोच. पाहिल्या प्रथमच मला तुम्हीं असें सांगितलें असतें तर येवढ्या वाग्यज्ञाची जरूर नव्हती. माझ्यापेक्षां तुम्हांलाच जास्ती बोलावें लागलें आहे म्हणा; पण यज्ञांतील अध्वर्यु-पणाची तसदी देखील तुम्हांला पडली नसती. माणसाची शक्ति कितीही उच्च झाली तरी ब्रह्मानंदाची कल्पना येणें त्या अवस्थेंत अशक्यच, असें वेदान्ती म्हणत असतात; व तुम्ही तर म्हणतां कीं, माणसाच्या चित्तवृत्तींची अगदीं उच्चावस्था म्हणजेच ब्राह्मी स्थिति. शिवाय वेदान्त ग्रंथांमध्यें ब्राह्मी अवस्थेंत विषय, विषयी व ज्ञान या त्रिपुटीचा लय होतो व विशिष्ट ज्ञान म्हणून कांहीं रहात नाहीं, असें म्हटलेलें असतें. उपनिषदांत 'न प्रेत्य संज्ञा अस्ति' अशासारखें वाक्य आहे, त्याचा अर्थ, ब्राह्मी स्थितींत 'मी' 'तूं' या प्रकारची भेदविशिष्ट संज्ञा नसते असाच आहे. तेव्हां तुमच्या शेवटील सिद्धांताची व्यवस्था कशी लागावयाची ? तुमचा आशय असा दिसतो कीं, ब्राह्मी अवस्थेंत सर्व सात्विक मनोभाव उत्पन्न होण्यास हरकत नाहीं. ते तर पडले द्वैतावस्थेंतले, तेव्हां हा विरोध प्रमाणें देऊन नाहींसा करावयाचा असेल तर करा. नुसत्या आवेशयुक्त व अधिकारी वाणीचा आव घालून हें काम कसें भागणार ?

**३२. वेदान्तीः**—तुम्ही आमच्या आवेशाचा खुशाल उपहास करा. हल्लींच्या सुशिक्षितांस–विशेषतः तुमच्यासारख्या पंडितांस–'आवेश' म्हटला कीं राग येतो. तुम्हांला खरा राग जरी आला तरी तो काटकोनी मोजमापानें अगदीं प्रमाणशीर पद्धतीनें तुम्ही व्यक्त करणार, हें मी पूर्णपणें जाणून आहें. तरी पण जेथें जेथें आवेश असतो, तेथें तेथें प्रमाण नसतेंच असें म्हणण्याइतकी माझी तयारी नाहीं. माझ्या भाषणांत मीं प्रमाण कोठें सोडिलें आहे असें मला वाटत नाहीं. या वाग्य-ज्ञाचें अध्वर्यूपण मीं घेतलें नाहीं; तें मला नको आहे. मला या वादाची हौस असल्यामुळें तसदीही भासत नाहीं. तुम्ही कंटाळले असल्यास सांगा. तुमच्या शिव्याकडे लक्ष न देतां मुख्य मुद्याकडे वळतों आतां. मीं ज्या वेळेस उच्च व दिव्य अशा अवस्थांचा उल्लेख केला, त्या वेळेस मर्यादित मनुष्यबुद्धीच्या पलीं-कडील हवेंत आपण क्षणैक पाहूं शकतों, अशा अर्थाचें वाक्य मी योजिलें होतें. इतकेंच नव्हे तर 'प्रेमा' सारखी उच्च भावना, हें एक यक्षिणीच्या कांडीचें भार्वेड

आहे. असें मीं म्हटलें होतें. त्याचा अर्थ असा कीं, ब्राह्मी अवस्थेचा पूर्ण जरी नाहीं तरी थोड्या अंशानें कां होईना पण खरा अनुभव या दिव्य प्रतिभेच्या अवस्थेंत आपणांस क्षणभर मिळतो. निदान कल्पना तरी खास येईल. हा विषय माझ्या वाक्यांनीं स्पष्ट झाला नसेल; पण मुद्दा व प्रमाण सुटलें आहेसें मला वाटत नाहीं. प्रेमासारख्या भावनेंत देखील पायऱ्या आहेत. आरंभीं भावनेंत द्वैत असतें, पण ती जसजशी उच्च होत जाईल तशी तशी अद्वैतावस्थेच्या प्रांतांत जाते; व शेवटीं अत्युत्कट प्रेम म्हणजेच ब्राह्मी अवस्था असें आपण समर्याद बुद्धीच्या माणसांस तरी म्हणण्यास हरकत नाहीं. 'आत्मानमपि नैषा विभावयति किं पुनरागन्तुकम्' असें वाक्य शकुंतलेविषयीं तिच्या सखीनें म्हटलें आहे. शकुंतलेला स्वतःचीच स्वतःला जाणीव नव्हती, तर अतिथि आलेला कोठून कळणार? इतकी तन्मयावस्था प्रेमाच्या आरंभावस्थेंत होते, तर मग 'कालेनावरणात्यये परिणते यत्स्नेहसारे स्थितम्' अशी अवस्था झाल्यावर विषय व विषयी दोन असले म्हणून काय त्याला द्वैतावस्था म्हणावयाची? शब्दांचे अर्थ करितांना व्याकरण व गणित हीं दोन शास्त्रें केव्हां केव्हां मोठी घाण करितात, असें एका ग्रंथकर्त्यानें म्हटलें आहे, तें या वेळेस पूर्णपणें लागू पडत आहे. द्वैत म्हणजे दोन. नवरा व बायको दोन आहेत म्हणून तेथें अद्वैत होणें अशक्य आहे, असें एखादा गणितशास्त्री म्हणूं शकेल; पण मर्मज्ञ त्याला हंसेल व त्याचें हंसें बरोबर आहे असें कोणीही सांगेल. 'न प्रेत्य संज्ञा अस्ति' याचा अर्थ प्रेमैक्याला विरुद्ध नाहीं, व प्रेमाला लागणाऱ्या पूर्वीच्या द्वैतावस्थेलाही विरुद्ध नाहीं. अक्षरशः अर्थ घेतला तर फार हानि होते. 'मला कांहीं सुचत नाहीं, जेवणखाण कांहीं नको,' असें एखाद्या माणसानें म्हटलें तर त्यानें तोंडांत कांहींही पदार्थ टाकूं नये, असा अर्थ घ्यावयाचा कीं काय? द्वैत आहे म्हणूनच अद्वैताची जाणीव व किंमत; नाहीं तर अद्वैतवाद व शून्यवाद यांमध्यें फरक काय राहिला? प्रेमाला द्वैताची जरूर आहे व तें द्वैतच अद्वैत-रूप होतें. प्रणयकलह जितक्या जोराचा तितकाच प्रणयाचाही जोर वाढल्यामुळें शेवटीं प्रेमाचें अद्वैत ही अवस्था व ब्रह्मावस्था यांत कांहीं भेद नाहीं. अव्यभिचारिणी भक्ति अत्यंत प्रेमळपणाशिवाय होणें अशक्य आहे; व अव्यभिचारिणी भक्ति मोक्षाचें एक अवश्य साधन आहे. आतां येवढें म्हणतां येईल कीं, प्रेमाची पहिली पायरी वरच्या पायऱ्यांस साधन आहे. पण साध्यावस्था प्राप्त झाल्यावर साधनीभूत पायऱ्या व साध्य यांचें अद्वैत बनतें. शरीर व आत्मा यांचें द्वैत तर उघड आहे.

पण ‘ शरीरमाद्यं खलु धर्मसाधनं ’ या न्यायानें शरीर हें आत्म्याचें निवळ साधन झाल्यावर आत्मा व शरीर यांचें अद्वैत झालें, असें तुम्ही म्हणाल कीं नाहीं ? शरीरें सुटल्यावर द्वैतावस्था किंवा अद्वैतावस्था कशी होईल, याविषयीं विचार करण्याची जरूर नाहीं; कारण कितीही विचार केला तरी तेथें गप्पच बसावें लागणार. पण शरीर आहे तोंपर्यंत शरीरें व आत्मे यांचें भिन्नत्व असूनही पूर्ण अद्वैत कसें साधतें, याची कल्पना मीं सांगितलेल्या साधनसाध्यासंबंधानें बरीच व्यक्त होते. राष्ट्राचें ऐक्यसुद्धां सर्वांच्या हितैक्यामुळें अद्वैतरूपाचेंच आहे व तेथें देखील ऐक्याची यांत्रिक किंवा भौतिक कल्पना करून चालावयाचें नाहीं. सर्व विश्वाचें ऐक्य देखील आपाततः दिसणारी द्वैतावस्था घेऊनच ज्ञानानें तिचें अद्वैतांत रूपांतर झाल्यानेंच सिद्ध होणार. जें ‘ द्वैत ’ असें अज्ञानी माणसास भासतें तें द्वैत खरोखरी द्वैतरूप नाहीं, हेंच ज्ञान मोक्षाला कारण आहे. कारण मोक्ष म्हणजे पुरी निर्भयता; व ही पुरी निर्भयता जग, ईश्वर व जीव यांचें द्वैत कायम राहिलें असतां कशी मिळणार ? ब्रह्मज्ञानानें जग, ईश्वर व आपण यांचें हित एकच आहे, जग व ईश्वर हीं कांहीं वाघोबा नाहींत कीं ते आपणांस खाऊन टाकतील, ही खात्री होणें म्हणजेच मोक्ष मिळणें. त्याप्रमाणेंच प्रेमी मनुष्य व प्रेमविषयीभूत मनुष्य यांचें पूर्ण हितैक्य म्हणजेच अद्वैतावस्था. इतकेंच नव्हे तर त्या दोघांच्या स्वभावांत व मानसिक आणि शारीरिक रचनेंत व शक्तींत जितका भिन्नपणा असेल तितका दोघांच्या हितैक्याला वर्धक असल्यामुळें पुन्या द्वैतांत पुरें अद्वैत स्पष्ट होत आहे. कदाचित् असें देखील म्हणतां येईल कीं, मरणपश्चात् होणाऱ्या मुक्तावस्थेचें प्रेमाचें द्वैताद्वैत हें एक उपलक्षण किंवा खूणच आहे. तुम्ही म्हणाल कीं, हें रामानुजाचें विशिष्टाद्वैतच झालें, हा सिद्धांत शांकरमताचा नाहीं. पण माझें मत असें आहे कीं, चारी आचार्यांचा सिद्धान्त एकच आहे. पण सिद्धान्ताची एक एक बाजू एकाएकानें उचलली. यामुळें खरें म्हटलें म्हणजे चारी आचार्यांचे सिद्धान्त एके ठिकाणीं केल्यानंतरच पूर्ण वेदान्तसिद्धान्त हातीं येईल. पण हा विषय येथें काढण्याचें कारण नाहीं; पुढें मागें या विषयावर स्वतंत्रच विचार करूं. पण द्वैतावस्थेशिवाय अद्वैतावस्था पूर्ण नाहीं व शक्यही नाहीं. तेव्हां एकंदर अवस्थेस द्वैत म्हणावयाचें किंवा अद्वैत म्हणावयाचें हेंच भांडण उरलें. यात्र भांडणामुळें चार आचार्यांचे चार सिद्धांत झाले. पण चौघांचें प्रमेय व म्हणणें एकच. तेव्हां अद्वैतसिद्धांत प्रेमाची द्वैतावस्था पोटांत घेऊनच अद्वैताप्रत जातो, हें

वेदान्तमत अगदीं वेडगळपणाचें मानणें म्हणजे स्वतःचाच वेडगळपणा सिद्ध करणें आहे.

**३३. शांकितः**—आम्ही आपला वेडगळपणा अगदीं शरण येऊन पदरांत घेतों. अतिवादानें विषय हातीं लागावयाचा नाहीं. उलट पुष्कळ जानव्यांच्या पदरांप्रमाणें गुंतागुंतीनें सर्वच गोंधळ उडावयाचा. याच उद्देशानें मी श्रावणीच्या दिवशीं दोनच जानवीं घालतों व पांच पांच जानव्यांच्या गुंतागुंतींत गुंतलेल्या लोकांची कींव करीत बसतों. अस्तु; प्रेमाप्रमाणेंच नीतिशास्त्राचा विषयही अत्यंत महत्वाचा आहे व त्यांतही द्वैताद्वैताचें हें भांडण आहे. तेव्हां आतां तिकडे मोर्चा फिरवूं.

# वेदान्त व नीतिशास्त्र.

३४. पहिल्या प्रथम नीतिशास्त्राचीं गृहीत कृत्यें व प्रत्यक्ष प्रमाणें लक्षांत घेतलीं पाहिजेत. त्यांतील पहिलें गृहीत कृत्य म्हटलें म्हणजे ' मनुष्य हा कोणतीही क्रिया आपल्या स्वेच्छेनें करूं शकतो, ' हें होय. अबुद्धिपुरःसर क्रिया आपल्या हातून हजारों घडतात, त्यांचा नीतिशास्त्राशीं कांहीं संबंध नाहीं. बुद्धिपुरःसर अगदीं पूर्ण स्वेच्छेनें ज्या क्रिया घडतात त्यांनाच नैतिक किंमत आहे. दुसरें गृहीत कृत्य असें कीं, क्रियांना स्वतःसिद्ध अशी योग्यता मुळींच नाहीं; म्हणजे अमुक क्रिया चांगली किंवा वाईट हें म्हणणेंच नीतिशास्त्राला पसंत नाहीं. त्या क्रियेचा हेतु किंवा ती क्रिया ज्या बुद्धीनें केलेली असेल ती बुद्धि यांचा चांगलेपणा किंवा वाईटपणा नीतिशास्त्र ओळखतें. हेतु चांगला असेल तर तज्जन्य क्रिया चांगली; हेतु वाईट असेल तर ती क्रिया वाईट. Morality is essentially a matter of motives, हें जर्मन तत्त्ववेत्ता कँट यानें जें म्हटलें आहे त्याचा अर्थ नैतिक किंमत हेतूंना आहे, क्रियांना नाहीं असाच आहे. तिसरें गृहीत कृत्य असें कीं, नैतिक क्रिया घडण्यास दोन तीन हेतूंचें भांडण झालें पाहिजे. शाळेंत जातांना वाटेंत गारुड्याचा खेळ चाललेला एखाद्या मुलानें पाहिला तर त्याचे मनांत खेळ पहावा हा एक हेतु उत्पन्न होतो, व शाळेंत जाऊन धडा शिकावा अशा कर्तव्याची जाणीवही त्याच वेळेस उत्पन्न होते. या दोन बुद्धींचें भांडण होतें. अशा वेळीं सुखाकडे जाणें किंवा कर्तव्याकडे जाणें हें मुलाच्या ताब्यांत असतें, असें नीतिशास्त्र गृहीत धरतें. सुखाला लुब्ध होऊन खेळ पहाण्यास उभा राहिला तर तें कृत्य त्यानें स्वेच्छेनें केलें असें नीतिशास्त्र म्हणणार, व म्हणून या अनीतीबद्दल दोष देणार; व कर्तव्यास जागून शाळेंत गेला तर तेंही कृत्य मुलानें स्वेच्छेनेंच केलें असें म्हणून नीतिशास्त्र त्यास शाबासकी देणार. या दोनही क्रियेंत मनुष्य हा स्वतंत्र कर्ता आहे, व दोन हेतूंचें भांडण झालें तर त्याचा निकाल देणें मनुष्याच्या स्वतःच्या इच्छाशक्तिरूपी न्यायाधिशाच्या हातीं आहे, असें नीतिशास्त्र गृहीत धरितें. आतां चवथें गृहीत कृत्य असें कीं, सुखेच्छा हा हेतु कर्तव्येच्छेपेक्षां कमी नीतीचा कां ठरतो,

याचें कारण सांगतां येत नाहीं. तुम्हीं वेदान्ती पटकन् म्हणाल कीं सुखेच्छा बंधनास कारण आहे व धर्मेच्छा मोक्षास कारण आहे; परंतु जोंपर्यंत बंधन व मोक्ष यांच्या व्याख्या तुम्हीं सांगितल्या नाहींत तोंपर्यंत वरील प्रश्न नीट सुटला असें म्हणतां यावयाचें नाहीं. पहिलें म्हणजे सुखार्थीपणाचें कृत्य मनुष्यास अपूर्ण म्हणजे लंगडा करितें व दुसरें पूर्ण करितें हेंही म्हणणें वरच्याइतकेंच समाधानकारक आहे. कारण शब्दांचा फक्त बदल झाला, बाकी मुग्धत्व कायमचेंच. तेव्हां नीतिशास्त्र या पुढल्या प्रश्नाचें उत्तर उच्च तत्त्वज्ञानावर लोटून असें गृहीत धरितें कीं, हेतु–हेतूंमधील उच्चनीच भाव सर्व मनुष्यजातीस–निदान तिच्या शुद्धावस्थेंत–मान्य आहे. पांचवें गृहीत कृत्य असें कीं, नीति व अनीति यांना विश्वरचनेंत जागा पाहिजे. अर्थात विश्वरचनेंत नीतिमान् मनुष्यास उच्चपद व अनीतिमान् मनुष्यास खालची जागा मिळते अशी व्यवस्था करणारा न्यायाधीश व मॅजिस्ट्रेट पाहिजे. ‘ सत्यानृते अवपश्यन् जनानां ’ या ऋग्वेदांतील वचनांत सांगितल्याप्रमाणें सर्व माणसाच्या अंतःकरणांतील हेतु जाणण्यास समर्थ व त्यांचें बक्षीस देण्यासही समर्थ, असा सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् परमेश्वरच ही व्यवस्था करूं शकेल. म्हणून नीतिशास्त्र अशा ईश्वराचेंही अस्तित्व गृहीतकृत्याप्रमाणेंच मानितें.

३५. हें गृहीत-कृत्य–पंचक झालें. आतां प्रत्यक्ष प्रमाणें सांगितलीं पाहिजेत. सर्वांचें सारांशभूत प्रत्यक्ष प्रमाण एकच सांगतों म्हणजे विस्तार होणार नाहीं. जगाच्या आदीपासून आतांपर्यंत मनुष्यजात दुसऱ्याच्या वर्तनावर टीका करीत आहे. ही टीका मनुष्य हा स्वतंत्र कर्ता आहे हें मानिल्याशिवाय करितांच येणें शक्य नाहीं. मनुष्य जर सर्वस्वी परतंत्र असेल तर त्याच्या कृत्यांवर टीका करणें मूर्खपणाचें आहे. भरतापाच्या वायूंत भलतेंच बडबडणाऱ्या किंवा भलत्याच क्रिया करणाऱ्या माणसाला कोणीही नैतिक दृष्ट्या दोष देत नाहीं, हें प्रत्यक्ष प्रमाण सिद्धच आहे. तेव्हां मनुष्य खरोखरीच परतंत्र असेल, तर टीका करणारी सर्व मनुष्यजात मूर्ख आहे असें म्हणावें लागेल, व हें म्हणणें कबूल करणें म्हणजे पूर्ण निराशावाद अथवा नैतिक शून्यवादच ग्रहण करण्यासारखें आहे; ह्मणून सर्व मनुष्यजातीस मूर्ख ठरविण्यापेक्षां मनुष्यप्राणी हा पुष्कळ क्रियांचा स्वतंत्र कर्ता आहे असें नीतिशास्त्र प्रत्यक्ष प्रमाणासारखेंच सिद्ध मानितें. आतां हें उघड आहे कीं, अद्वैती वेदान्त द्वैती नीतिशास्त्राला मुळींच मानणार नाहीं. जेथें तत्त्वमसि या वाक्यानें जीव व ईश्वर यांचें ऐक्य झालें तेथें क्रिया, क्रियेचा कर्ता व त्या क्रियेच्या नैतिक गुणां-

प्रमाणें त्याचें फळ देणारा ईश्वर इतके भिन्न पदार्थ कसे टिकणार ? तेव्हां वेदान्त आणि नीतिशास्त्र यांचा संबंध काय ? हा प्रश्न साहजिक उत्पन्न होतो, याविषयीं तुमचें म्हणणें काय आहे, हें जाणण्याची माझी इच्छा आहे.

३६. **वेदान्तीः**--तुम्ही काढिलात हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. कदाचित् तुम्हीं–आह्मांसारख्या अल्पबुद्धीच्या लोकांस तो कायमचा सुटण्याचा संभवच नाहीं. प्लेटो कँट ह्यांसारखे जेथें थकले तेथें आपला काय पाड ? पण प्रश्नांची बीजभूत तत्त्वें स्पष्ट करून घेणें आपलें काम आहे. जोडा बोचतो आहे तरी कोठें, या इंग्रजी म्हणीप्रमाणें 'प्रश्न नडतो आहे कोठें,' हें आपण पाहूं या. अगोदर वेदान्ताची पूर्णावस्था व खालील पायऱ्या यांचा भेद आपण विसरतां कामा नये. म्हणून वेदान्तग्रंथामध्यें परा विद्या व अपरा विद्या यांचा भेद पुनः पुनः वर्णन केला आहे. जोंपर्यंत पुरी ब्राह्मी स्थिती प्राप्त झाली नाहीं तोंपर्यंत मनुष्य अपरा विद्येंतच असतो व त्या अपरा विद्येंतच तुमचें नीतिशास्त्र येतें. तरी पण या अपरा विद्येंतील द्वैतांतदेखील अद्वैताची छाया तुम्हांला दृष्टीस पडली पाहिजे. निव्वळ द्वैतावर उभारलेलें शास्त्र या दुनियेंत टिकणेंच शक्य नाहीं. इतकी प्रस्तावना करून तुमच्या गृहीतकृत्यांकडे वळतों. मनुष्य हा क्रियेचा स्वतंत्र कर्ता आहे. त्यास इच्छास्वातंत्र्य व तदनुरोधानें क्रियास्वातंत्र्य आहे, असें मानिल्याशिवाय 'आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो निदिध्यासितव्यः' असा उपदेश कोणता मनुष्य करील ? उपदेश ज्याला करावयाचा तो स्वेच्छेनें उपदिष्ट वस्तु जर करूं किंवा पाळूं शकत नाहीं तर उपदेश करणारा मूर्खच असला पाहिजे. जर्मन तत्त्ववेत्ता कँट याचें एक महावाक्य प्रसिद्ध आहे. 'Ought' implies 'Can,' अमुक तूं करावें असें म्हटल्यावरोबर तें करण्याची तुला शक्ति आहे, हें गृहीतच धरिलें पाहिजे. मला आकाशांत उडण्याची शक्तीच जर नाहीं तर 'तूं आकाशांत ऊड' अशी आज्ञा ब्रह्मदेवानें केली म्हणून काय झालें ! तो मूर्खच ठरणार. 'तत्त्वमसि' हें महावाक्यही कांहींसें आज्ञारूपच आहे. तूं व ब्रह्म यांमधील भेद तुला दिसतो आहे तो काढून टाक, अशा आज्ञार्थींच हें वाक्य योजिलें आहे. मनुष्य जर सर्वस्वी परतंत्र असेल तर हा आज्ञार्थ मूर्खपणाचा ठरेल. तेव्हां जीवाचें स्वातंत्र्य वेदान्तशास्त्र मानितें इतकेंच नव्हे तर त्याच्यावरच त्याची मदार आहे, असें कबूल केल्यावांचून गत्यंतर नाहीं. दुसरें गृहीतकृत्य हेतूंच्या नैतिक किमतीचें. आत्म्याची अत्यंत शुद्धावस्था म्हणजेच ब्राह्मी स्थिति असें मीं पूर्वीं म्हटलेंच आहे. ही शुद्धावस्था

म्हणजे नीतिदृष्ट्याच घेतली पाहिजे; नाहीं तर भौतिकदृष्टीचा आरोप पुनः प्राप्त होणार. नीतिदृष्ट्या शुद्ध आत्मा म्हणजेच परमात्मपदास पोंचलेला आत्मा; व नीतिदृष्ट्या शुद्ध आत्मा म्हणजेच जीवास्थितींतील द्वैतानें पोळलेला आत्मा. पण फरक पूर्णापूर्णतेंत आहे. हेतूंची शुद्धाशुद्धता वेदान्तशास्त्रास कबूल असलीच पाहिजे. हेतूंच्या भांडणांचें गृहीतकृत्य ब्राह्मी स्थितीच्या पूर्वीचें आहे व तें भांडण नाहींसें व्हावें हाच वेदान्तशास्त्रोपदेशाचा हेतु आहे. इतकेंच कीं, नीतिशास्त्र हें भांडण कायमचें आहे असें मानितें; वेदान्त यापुढें जातो व प्रतिपादितो कीं, हें भांडण दिवसेंदिवस कमी कमी होत जाणें म्हणजेच सिद्धावस्थेच्या मार्गास लागणें होय; पूर्ण सिद्धावस्थेंत धर्म व सुख, काम व मोक्ष यांचा विरोध रहात नाहीं. ' जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः ' ही तक्रार जीवावस्थेंतील होय. ती तपानें, ज्ञानानें व इतर सर्व साधनांनीं शेवटीं बंद पडणें म्हणजेच पूर्णावस्था. कर्तव्य व सुख यांचा विरोध नाहींसा होतो म्हणजे कर्तव्य हें डोक्यावर लादलेलें ओझें असें जें प्रत्येक जीवास वाटत असतें तसें सिद्धास वाटत नाहीं. त्याला अहोरात्र कर्तव्य करणें हेंच सुखावह वाटतें. तेव्हां जीवावस्थेंतील भांडण म्हणजेच मुमुक्षुत्व; नाहीं तर जीव हा पशू-सारखा बद्धच होय. सुख व कर्तव्य यांतील भांडण सुरू झालें कीं तो मोक्षाची शिडी चढावयास लागलाच. मग या शिडीची ही पहिली पायरी वेदान्ताला अवश्यच आहे हें उघड होत नाहीं काय? तुमचें चवथें गृहीतकृत्य हेतूंच्या नैतिक किंमतींची कारणमीमांसा अशक्य आहे असें सांगतें. सुखापेक्षां कर्तव्य कां अधिक, तर कारण सांगतां येत नाहीं, पण अधिक आहे, असें नीतिशास्त्र मानितें. पण हें गृहीतकृत्य नीतिशास्त्राचें मुळींच नाहीं. उलटें नीति व नीतिशास्त्र या भेदाचें अज्ञान मात्र हें गृहीतकृत्य प्रगट करीत आहे. नीतिशास्त्र अमुक गोष्ट करा, म्हणून सांगत नाहीं. हें कोणतेंही सामान्य धर्मशास्त्र करूं शकेल. पण नीतिशास्त्राचें हें मुख्य काम आहे कीं, अमुक कृत्य चांगलें कां व अमुक कृत्य वाईट कां, याची कारणमीमांसा द्यावयाची. युरोपमध्यें असे नीतिशास्त्रवेत्ते झाले आहेत कीं त्यांनीं नीतीचा पाया सुखावरच रचिला आहे. जें सुखकारक तें नीतिदृष्ट्या चांगलें, जें दुःखकारक तें नीतिदृष्ट्या वाईट. या शास्त्रवेत्त्यांच्या ग्रंथांस नीतिशास्त्रावरील ग्रंथ समजतात. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता जॉन स्टुअर्ट मिल्ल यानेंही ' जनहितवाद ' ( Utilitarianism ) नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्या ग्रंथांत त्यानें नीति व अनीति यांचा भेद बहुजनहितावर अवलंबून आहे असें प्रतिपादिलें आहे. जी

गोष्ट वहुजनसमाजास सुखकारक ती नीतिदृष्ट्या चांगली व दुःखकारक ती वाईट. हा ग्रंथ नीतिशास्त्रांतच गणिला पाहिजे. तेव्हां अमुक एक गोष्ट चांगली कां, याची कारणमीमांसा सांगणें हेंच नीतिशास्त्राचें मूळ काम आहे, व या दृष्टीनें वेदान्त या तत्त्वज्ञानास अनुसरणारें असें एक नीतिशास्त्र अस्तित्वांत आहे इतकेंच नव्हे तर तें वेदान्ताच्या प्रस्थानत्रयींत गोंविलें आहे. बादरायणाचीं ब्रह्मसूत्रें, उपनिषदें व भगवद्गीता या तीन ग्रंथांस प्रस्थानत्रयी म्हणतात. पहिलीं दोन प्रस्थानें सृष्टि, जीव व शिव यांचा अन्तःसंबंध कसा आहे या प्रश्नाविषयीं चर्चा करितात, म्हणून त्यांस इंग्रजींतील Metaphysics या शास्त्राची उपमा दिली तर चालेल; व भगवद्गीता हा नीतिशास्त्रावरील ग्रंथ आहे. त्यास 'Ethics' असेंच म्हटलें पाहिजे. गीतेमध्यें 'कार्याकार्यविचारणा' हा शब्द अक्षरशः Ethics म्हणजे नीतिशास्त्र याचेंच लक्षण देतो. हें कार्य कां व हें अकार्य कां, ही विचारणा या शास्त्रांत केली आहे म्हणून त्यास वेदान्ताचें तिसरें प्रस्थान किंवा नीतिशास्त्र म्हटलें आहे. ही कारणमीमांसा तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें बंध-मोक्षाच्या कल्पनेवरच वसविलेली आहे. पण बंध व मोक्ष यांचीं लक्षणें तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें अस्पष्ट नाहींत; अगदीं स्पष्ट आहेत. सृष्टींत जीव व शिव म्हणजे ब्रह्म यांचें भांडण मिटणें म्हणजे मोक्ष, व यांच्या लढाईत सांपडून त्रिविध तापांनीं पोळणें म्हणजे बंध ही व्याख्या प्रस्थानत्रयीच्या बाहेरची आहे काय? ही व्याख्या स्पष्ट नाहीं काय? व या व्याख्येवर नीतिशास्त्राचा पाया रचिला तर तें नीतिशास्त्र अगदीं वेडगळपणाचें ठरेल काय? ज्या कृत्यामुळें जीव-शिव-सृष्टि यांची लढाई बंद होईल व आत्म्यास परम शांति व आनंद मिळेल तें कृत्य नीतिदृष्ट्या चांगलें व जें कृत्य ही लढाई बंद करूं शकणार नाहीं उलट वृद्धिंगत करील, तें कृत्य वाईट. ही कारणमीमांसा नीतिशास्त्राचीच आहे. तेव्हां तुमचें हें कृत्य खोटें व त्याज्य आहे. तुमचें शेवटचें गृहीतकृत्य ईश्वरास कर्मफलदातृत्व देऊन त्या आवश्यक कार्यामुळें त्याचें अस्तित्व गृहीत धरिल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें प्रतिपादितें, तें वेदान्तास मान्य आहे. बृहदारण्यक-उपनिषदांत 'रातिर्दातुः परायणं तिष्ठमानस्य तद्विदः' या वाक्यांत दाता म्हणजे सत्कृत्य करणारा; त्याचा ब्रह्मरूपी ईश्वर हा 'राति' म्हणजे मित्र आहे व ब्रह्म-ज्ञान झालेला मनुष्य याच्यापुढें जाऊन ब्रह्मास आपलें परायण म्हणजे उच्चतम रूप असें मानितो, असें सांगितलें आहे. पण इतर नीतिशास्त्रांत व वेदान्तानुसारी नीतिशास्त्रांत फरक येवढाच कीं, कर्मफलदाता आपल्याहून कोणी

निराळा आहे असें इतर नीतिशास्त्रें मानितात व तेथेंच थांबतात. पण या द्वैतानें ईश्वर हा छडीमास्तर बनतो व त्याला एक प्रकारचें बाह्यत्व व परकीयत्व येतें. वेदान्ताचें नीतिशास्त्र हें या कर्मफलदात्या ईश्वरास जीवाचेंच परायण उच्चतम रूप मानितें; म्हणजे कर्मांचें फल बाहेरून कोणी देत नाहीं, तर कर्मांचें फल मिळालेंच पाहिजे, हा कायदा आपल्याच आत्म्याला त्याच्या उच्चतम स्थितींत पटेल असा आहे. तो कायदा कोणी तरी सोट्या मास्तरानें केलेला नाहीं. ही कर्मफलदात्या ईश्वराची कल्पना किती जिव्हाळ्याची आहे हें तुमच्या लक्षांत येईलच; म्हणजे ईश्वराचे कायदे हे जीवाच्या परिपक्व दशेंत त्यानेंच स्वतः केले आहेत असें त्यास भासलें म्हणजे ते कायदे कधींही दुःखदायक न वाटतां ईश्वराज्ञा व सुख यांचें अद्वैत होतें. द्वैतामधून शेवटीं अद्वैत कसें निघतें हें यावरून स्पष्ट होतें. जिला इंग्रजींत discipline म्हणतात ती शिस्त तरी मूळ द्वैतांतच उत्पन्न होते. गुरूची शिस्त शिष्यास प्रथम भीतिजनक व दुःखदायक वाटते. पण जसें जसें ज्ञान होईल तशी तशी ती शिस्त त्याची त्यासच आवडूं लागते व शेवटीं 'ज्ञानान्मोक्षः' या न्यायानें तीच शिस्त गुरु नसतांही तो आपली आपल्यावरच मोठ्या हौसेनें लादून घेतो. ही तरी ब्राह्मी स्थितीच नव्हे काय? शिक्षकाच्या ऐवजीं शिष्य किंवा ईश्वर व शिष्याच्या ऐवजीं जीव असें म्हटलें म्हणजे हें कोष्टक बरोबर जुळेल तेव्हां तुमचीं सर्व गृहीतकृत्यें वेदान्ताला अनुकूलच आहेत असें कबूल करा. तुमचें प्रत्यक्ष प्रमाण लोकसमूहाच्या स्वाभाविक स्तुतिनिंदा-प्रवृत्तीवर बसविलेलें आहे, तें एका अर्थी बरोबर आहे. दुसऱ्या अर्थी खोटें आहे. खोटें आहे याचें कारण लोकसमूहाची स्तुति-निंदा बहुतेक अशीं कृत्यांच्या बाह्य परिणामावर अवलंबून असते. मनुष्यांच्या अंतर्गत हेतूंचें त्यांना ज्ञानही शक्य नसतें व येवढी खटपटही सामान्य जनसमूह करीत नाहीं. तेव्हां नीतिदृष्ट्या या स्तुति—निंदेची कांहीं किंमत नाहीं, हें तुमचींच गृहीतकृत्यें तुम्हांला सांगतील. आमचें पुराण संपलें; श्रोत्यांस प्रश्न विचारण्यास हरकत नाहीं.

३७. **शंकितः**—आतांपर्यंत तुम्हीं स्वतः वाक्यें काढून त्यांवर प्रतिपादन करीत होतां, आतां या नीतिशास्त्रासंबंधीं मला एक वाक्य आठवत आहे, तें मी तुम्हांस सांगतों व त्यावरून सुचलेली शंकाही पुढें मांडितों. '**तं साधु कर्म कारयति यमेष उन्निनीषते। तं असाधु कर्म कारयति यमेष अधो निनीषते।**' याचा अर्थः—ईश्वराच्या मनांत ज्याला उच्च पदवीस न्यावयाचें

आहे त्याच्याकडून तो चांगलीं कृत्यें करवितो व ज्याला अधोगतीस न्यावयाचें आहे त्याजकडून तो वाईट कर्मे करवितो! आतां मी सांगितलेल्या गृहीतकृत्यांपैकीं अत्यंत महत्वाचें जें गृहीत कृत्य कीं मनुष्य हा स्वतंत्र कर्ता आहे, त्याला या वरील उपनिषद्वाक्यानें बाध येत नाहीं काय? कर्ता करविता जर ईश्वर आहे तर चांगल्या कृत्याचें श्रेयही आम्हांकडे नाहीं व वाईट कृत्याचा दोषही आम्हांकडे नाहीं. आम्ही आपलीं त्याच्या हातचीं निव्वळ बाहुलीं आहोंत असें मानिलें पाहिजे. मग कर्त्याचें स्वातंत्र्य कोठें राहिलें? तें राहिलें नाहीं कीं नीति-शास्त्रच नाहींसें झालें! तुम्हीं तर अजूनपर्यंत असें प्रतिपादन करीत आहां कीं, वेदान्ताचें नीतिशास्त्र शक्य आहे इतकेंच नव्हे तर तो वेदांताचा पाया आहे, व उपनिषदें हीं वेदान्तशास्त्राचे मूळ झरे आहेत व त्या झऱ्यांतीलच हा एक पेला मीं तुमच्यापुढें ठेविला आहे. तो जर विषारी म्हणून सिद्ध झाला तर सर्व झराच विषारी ठरणार नाहीं काय? शिवाय साधारण जनसमूहाच्या नेहमींच्या बोलण्यांत देखील 'ईश्वर कर्ता करविता आहे. त्याचे आज्ञेशिवाय पानही हालत नाहीं. तर मग मनुष्य काय करणार?' अशा तऱ्हेचीं वाक्यें येतात तींही वरील उपनिषद्वाक्याशीं समानार्थक आहेत. लोकसमूहाच्या या हाडींमासीं खिळलेल्या समजामुळें आपल्या राष्ट्राचें नुकसान केवढें झालें आहे याची तुम्हांला कल्पना आहे काय? लोकसमूह तरी किती आंधळा पहा! लोकांच्या वर्तनावर यथेच्छ टीका करतांना, मनुष्य हा आपल्या वर्तनाबद्दल जबाबदार आहे असें गृहीत धरावयाचें व त्याच तोंडानें ईश्वर हा कर्ता करविता आहे असें म्हणावयाचें! या दोन गोष्टींमधील परस्पर-विरोध त्यांच्या केव्हांही लक्षांत येऊं नये ही आश्चर्याची गोष्ट नाहीं काय? पण लोक पडले 'अबोधोपहताः' म्हणजे अज्ञान. पण ज्ञानाची मात्रा देऊन भवरोगांतून मुक्त करण्याचा मक्ता ज्यांनीं घेतला आहे असे वेदान्तग्रंथ तर त्रिकालज्ञ ऋषींनीं केले आहेतना? त्यांच्या तोंडांतून अशीं परस्परविरुद्ध वाक्यें कशीं निघतात याचें आश्चर्य वाटतें. 'आत्मा वा अरे द्रष्टव्यः' या वाक्यांत आत्मानात्मविचार करण्याची प्रत्येक जीवास आज्ञा केली आहे, म्हणजे आत्मा पाहणें न पाहणें माझ्या हातीं आहे; व दुसरीकडे 'ईश्वर कर्ता करविता आहे' असें वाक्य सांपडतें! तेव्हां हें गौडबंगाल आहे तरी काय? अशी शंका येणें साहजिक आहे. अशीं वाक्यें नेमकीं काढल्या-बद्दल आम्हांला तुम्हीं 'काकदृष्टी' म्हणणारच. पण तिकडे लक्ष देऊन चालणार कसें? आपल्याला भूक लागली आहे तर भीक मागण्याची लाज धरून कसें

चालेल? व भीक घालणाऱ्याचे शिव्यांस तरी भिऊन कसें चालेल? आम्हांला भीक घाला, कारण भूक फार लागली आहे. शिव्या दिल्यात तरी सोसण्यास तयार आहों.

**३८. वेदान्तीः**—अहो, तुम्हांला शिव्या कोण द्यावयास बसलें आहे? तुम्हीं शंका काढणें हा तुमचा हक्क आहे, त्यांत भीक कसली? हक्काची भीक किंवा भिकेचे हक्क मागून कोणाकडून काय मिळणार? हक्क बजावण्याचें तुमचें सामर्थ्य असून भीक कां मागतां? आम्ही वेदान्ती सदांचे भिक्षेकरी ठरलेलेच आहोंत. अस्तु; तुम्हीं काढिलेलें वेदांतवाक्य व त्याचा अर्थ हीं बरोबर आहेत व तुमची शंकाही बरोबर आहे. पण तुह्मीं मला अगदीं निरुत्तर करून टाकिलें, अशी आपली भावना असेल तर मात्र आपण चुकत आहां. वेदांतशास्त्र हें 'शास्त्र' आहे हें लक्षांत ठेवा. तें अनादिकालापासून तुमच्यासारख्या शंकितांचे धक्के खाऊन खाऊनच इतकें बळकट झालें आहे कीं, त्यांत परस्परविरोध हा दोष दाखविणें जरा मुष्किलीचेंच आहे. आपाततः विरोध दिसणें व शंका येणें हें साहजिकच आहे. वेदान्तासारख्या मोठ्या इमारतीची कोन्याकोपऱ्यासुद्धां माहिती करून घेणारा इसम पहिल्यांदां बावरून जावा हें साहजिक आहे. अर्जुन बावरून गेला मग आपली कथा काय? प्रस्तावनेंतच पुष्कळ वेळ दवडिला तर तुमच्या मनांत भलतीच शंका उत्पन्न होईल! मनुष्य हा अगदीं मर्यादित शक्तीचा प्राणी आहे; हा सिद्धांत वेदांताला अगदीं कबूल आहे. यापासून त्याच्या मर्यादेच्या बाहेर वावरणारा व त्याला मर्यादित करणारा आत्मा सर्वथैव श्रेष्ठ अतएव सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् असलाच पाहिजे हें पूर्वींच सिद्ध केलें आहे. पण यावरून मनुष्याचें इच्छास्वातंत्र्य, कर्तृत्व, तज्जन्य जबाबदारी यांना बाध येतो असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. तुम्ही जें उपनिषद्वाक्य पुढें आणिलें आहे त्याचा संदर्भ असा आहे कीं, मनुष्य इच्छा चांगली करितो; पण कार्य सिद्धीस जात नाहीं. अर्जुनाला हा स्वतःचा पंगूपणा चांगला दिसला. माझी इच्छा नसतांनाही माझ्या हातून वाईट कार्य काय म्हणून व्हावें? इतका पंगू मी कां? तर आपली नुसती इच्छा असून उपयोगाची नाहीं. त्या इच्छेला दृढनिश्चयाचें स्वरूप येऊन तिच्या अंगीं कार्यक्षमता येण्याला तिला आपल्यासारख्या पंगू जीवांच्या दोरीपेक्षां पुष्कळ जास्त जोराचा साखळदंड जोडला पाहिजे. तो ईश्वरशक्तीचा होय. पण हा साखळदंड मिळविणें मात्र आपल्याच इच्छेवर अवलंबून आहे. याच बलवत्तर इच्छेला अव्यभिचारिणी भक्ति म्हणतात.

' If wishes were horses beggars would ride ' ही इंग्रजींतील म्हण येथें चांगली लागू पडते. नुसत्या इच्छेनें जर घोडे मिळते तर सर्व भिकारी घोड्यावर बसले असते. भिकाऱ्यास जशी घोड्याची इच्छा करण्यास फारशी खटपट नको आहे, तसेंच भवसागरांतून पार पडण्याची नुसती इच्छा करण्यास कांहींच खर्च येत नाहीं. तेव्हां इच्छा कार्यक्षम होण्यास जे उपाय योजिले पाहिजेत त्यांपैकीं अत्यंत महत्वाचा उपाय तुम्हीं दाखविलेल्या श्लोकांत सांगितला आहे. जगरूपी घराचा मालक ईश्वर; त्याच्या स्वाधीन सर्व गोष्टी, आणि त्या घरांत रहावयाचें व वावरावयाचें आहे तुह्मांला. तेव्हां मूळ मालकाशीं धिंगामस्ती करून कसें चालेल ? जेव्हां मनुष्य मी यंव करीन त्यंव करीन अशा गमजा करीत असतो, तेव्हां हा दुरभिमान त्याला ईश्वराशीं धिंगामस्तीच करावयास लावतो. तर उपनिषद् म्हणतें कीं जोंपर्यंत घर तुझ्या ताब्यांत आलें नाहीं तोंपर्यंत मालकांशीं नीट वाग. मालक असा पक्का वस्ताद आहे कीं, बळजबरीनें किंवा हमरीतुमरीनें एक वीटभर जागा देखील त्याच्या हातून तुला मिळवयाची नाहीं. बरें, नीट जुळतें घेऊन वागलास तर मालक इतका उदार आहे कीं, स्वतःची लंगोटी देखील वेळ पडली तर देईल ! ह्मणजे जोंपर्यंत जीवत्व आहे तोंपर्यंत पंगुत्व आहे; ह्मणजे जीवत्वदशेंत केलेल्या सर्व इच्छा पंगूच झाल्या. या पंगुत्वाचा नाश करून त्याला दृढनिश्चयाचें स्वरूप येण्याला त्याला ईश्वरभक्तीची–वैराग्याची–अभ्यासाची ( नांव कांहीही द्या ) तरफ ( lever ) पाहिजे; नाहीं तर हा संसाराचा धोंडा उचलणें शक्य नाहीं. ही तरफ किंवा ' लीव्हर ' मिळविण्यास इतर मालकांसारखी खुशामत करणें नको.. तर तुमचेंच शरीर, मन स्वच्छ आरशासारखें करा कीं, त्यांत ईश्वरी किरण आपोआप प्रविष्ट होऊन निराळाच प्रकाश पडेल. या ईश्वरी प्रकाशाच्या बळाशिवाय आपल्या इच्छा अगदीं पंगू होत. पण हें बळ मिळविणें किंवा न मिळविणें हें आपल्याच हातीं आहे. अभिमान, अहंकार, आढ्यता यांचें ओझें अवघें गुंडाळून ठेविलें पाहिजे. उचलावयाचें कांहीं नाहीं; फक्त सोडून द्यावयाचें आहे. पण हें काम केल्याशिवाय मालकाची मर्जी तुमच्यावर बसावयाची नाहीं. मग त्याच्या मर्जीस येईल त्याला तो माडी देईल व दुसऱ्यास तळघर देईल. वरून पहाणारास मालकाची मर्जी म्हणजे आपलें एक अन्यायाचेंच यंत्र आहे असें वाटेल. पण खोल विचार करणारास तें न्यायाचें, सुरळीत व प्रत्येकास मिळण्यासारखें आहे, असें दिसल्यावांचून रहाणार नाहीं. सोळाव्या शतकांत ल्यूथरनें व्यक्ति किंवा जीव यास स्वतंत्रता दिली असें

इतिहासकार मोठ्या ऐटीनें सांगत असतात. पण व्यक्तीचें किंवा जीवाचें ईश्वरभक्ती शिवाय पंगुत्व किती आहे, याची कल्पना लूथरला खास होती. ती या इतिहास-कारांस होती कीं नाहीं याची शंका आहे. सारांश, प्रत्येकास ईश्वरभक्ति करून त्याचें बळ मिळविण्याची स्वतंत्रता आहे व तो तें जर न मिळवील तर त्याची जबाबदारी त्याच्या डोक्यावर. ह्मणजे मर्यादा असून स्वतंत्रता असते व स्वातंत्र्या-नेंच जीवास अमर्यादपणा कसा येतो हें या उपपत्तीवरून उघड होत आहे. ‘ नर करणी करेगा तो नरका नारायण हो जायगा ’ याचा अर्थ तरी हाच कीं नुसती दुरभिमानाची इच्छाशक्ति अगदीं पंगू होय व तिची करणीही पंगूपणाचीच होय. तिनें नारायण जर मिळाला असता तर प्रत्येक हिंदी मनुष्यास आजच स्वराज्य मिळालें असतें. पण तें मिळत नाहीं याचें कारण परावलंबी लोक ईश्वर कर्ता कर-विता आहे, तेव्हां आपणांस करणें काहीं उरलेंच नाहीं या खोट्या विचाराला बळी पडलेले व स्वावलंबी इसम दुरभिमानानें अंध झालेले, हें होय. ‘ परि तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ ’ या रामदासी श्रुतीचें तात्पर्य तरी हेंच आहे. तूं पंगू आहेस पण तुला खांद्यावर घेणारा महासमर्थ आहे. त्याच्या खांद्यावर स्वतःला बसवून घेणें हें मात्र तुझ्या अकलेवर व चिकाटीवर आहे. ईश्वर खालीं न्यावयास लागला कीं खालीं नेतो व वर न्यावयास लागला कीं वर नेतो; याचा अर्थ प्रयत्न नको असें नाहीं, तर दुरभिमानाचा,–परापरबल पाहिल्याशिवाय अंध उत्साहानें घरावरून उडी टाकण्याचा–असा मूर्खपणाचा प्रयत्न–इच्छा कितीही चांगली असली तरी–व्यर्थ आहे. जितका नम्र होशील व ‘ करी मस्तक ठेंगणा । लागे संतांच्या चरणा ’ या न्यायानें संतचरणावर विश्वास ठेवून सर्व कार्यें अहंकार वर्ज्य करून ईश्वरचरणीं अर्पण करशील तितका ईश्वराचा आधार तुला जास्त मिळेल व सर्व जगाच्या मालकाच्या अनंत चिजा व शक्ति तुझ्याच होतील. तुझी शक्ति मर्यादित आहे, हें ईश्वरास माहीत आहे. पण मर्यादित शक्तीचा उपयोग घमेंडीनें फुकट जातो हें तूं विसरतोस. ही घमेंड काढून टाक. म्हणजे ईश्वरास तुला उच्च पदवीस नेण्याची इच्छा होईल; घमेंड धर ह्मणजे ईश्वर खालीं नेईल. यांत जीवाच्या स्वतंत्रतेला कोठें बाध आला ? ईश्वराला आपलासा करून घेण्याची संधि व शक्ति असतां तसें जो न करील त्याला काय ईश्वरानें मोफत वर न्यावें ? तेव्हां ईश्वराची इच्छाही आपलेच इच्छेवर अवलंबून आहे, पण घमेंड व दुरभिमान हीं वाटेंतलीं मोठीं विघ्नें आहेत, असें सांगण्याचा उपनिषत्कारांचा हेतु

आहे. श्लोकाचा एकंदर संदर्भ पाहिला असतां या विधानाची सत्यता कोणासही दिसून येईल. यांत जीवाच्या स्वतंत्रतेला बाध येत नाहीं, इतकेंच नव्हे तर ईश्वरी सत्तेचा उपयोग करणें जीवाच्या हातीं आहे, हेंच या श्लोकाचें तात्पर्य आहे. तेव्हां उपनिषत्कार ऋषी अंध नव्हते व लोकसमूहही तुह्मी समजतां तितका अंध नाहीं. लोक ज्या वेळस टीका करतात तेव्हां मनुष्याच्या हातीं असलेल्या कृतीबद्दलच टीका करितात; व कर्ता करविता ईश्वर आहे असें जें ह्मणतात तें अपघात वगैरे मानवी शक्तीच्या बाहेरील गोष्टी घडतात तेव्हां म्हणतात. त्यांचें अंधत्व येवढेंच कीं, ते जेव्हां कांहीं म्हणतात तेव्हां त्याचें तत्वज्ञान त्यांस स्पष्ट माहीत नसतें; पण कृति बरोबर होत असते. ‘ अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ’ यांत सांगितलेले उपाय तरी अभिमानत्याग व चिकाटी यांचेच दर्शक आहेत. तेव्हां गीताकारांनीं ‘ मद्याजी मां नमस्कुरु ’ इत्यादि श्लोकांत ‘ माझी खुशामत कर ’ असें सांगितलें आहे असें न मानितां ‘ अभिमान टाक व मला स्मरून माझें कार्य कर. मग तुझी शक्ति मर्यादित असली तरी हरकत नाहीं. तुझें तूं काम केलेंस. बाकीचें माझ्याकडे. ’ असाच त्या श्लोकाचा अर्थ घेतला पाहिजे.



# उपसंहार.

३९. वेदान्ती व शंकित यांचा संवाद पुष्कळ वाढवितां येईल व विस्तार केल्यास या विषयावर जास्त प्रकाशही पडेल. परंतु केसरीच्या घरीं वेदान्ती व शंकित यांसारखे किंबहुना अधिक योग्यतेचे पाहुणे यावयाचे असल्यामुळें या लेखांत वाचकांचा निरोप घेण्याचा विचार केला आहे.

४०. एकंदर संवादाचा सारांश थोडक्यांत सांगणें अवश्य आहे. वेदान्तावर भौतिक शास्त्री, कवि व नीतिशास्त्री या तिघांची वक्रदृष्टि असल्यामुळें, या तिघांच्याही दृष्टीनें वेदान्तमतास बाध येत नाहीं असें दाखविणें भाग पडलें. भौतिक शास्त्रांची इंद्रियप्रत्यक्षावर सगळी मदार. तेव्हां इंद्रियें हीं मन, आत्मा व शरीर यांच्या आरोग्यावर अवलंबून आहेत असें दाखवून सृष्टि व जीवात्मा यांचें आत्मैक्य झाल्याशिवाय खरें ज्ञान होणेंच शक्य नाहीं, व याव्यतिरिक्त झालेलें ज्ञान सर्वथैव मिथ्या नसलें तरी अपूर्ण खास आहे असें दाखविलें. कवीचें सर्वस्व प्रेमांत. तें प्रेम आत्मैक्य झाल्याविना खरें नव्हे, भाडोत्री आहे व होणारच. खरें प्रेम हें वेदान्ताला विरुद्ध नाहीं, इतकेंच नव्हे तर तें खऱ्या मुक्तीला अवश्यही आहे; कारण आत्मैक्य म्हणजेच मुक्ति व आत्मैक्य म्हणजेच खरें प्रेम. खऱ्या प्रेमाचा उत्कर्ष आत्मैक्याला कारणही आहे व आत्मैक्य झालें म्हणजे खऱ्या प्रेमाचा उत्कर्षही वाढतो, असें दाखवून कवीचीही समजूत घातली. नीतिशास्त्रवेत्ते यांचा दरबार जरा कडक द्वैतीपणाचा व शिस्तीचा असल्यामुळें त्या दरबारांत वेदान्ताला लेडाशीं एकदम बसविणें जरा कठीण वाटलें. पण तेथेंही नीतिशास्त्राचीं सर्व गृहीतकृत्यें व प्रमेयें वेदान्ताला अनुकूल कशीं आहेत तें दाखवून नीतिशास्त्राची सर्व शिडी द्वैतांत उभी करून अद्वैताच्या माडीवर टेंकली व येथून तेथून अद्वैताशिवाय द्वैतच होऊं शकत नाहीं, व द्वैताशिवाय अद्वैताला किंमतच नाहीं, असें दाखविलें. एक महत्वाचा दरबार राहिला आहे. तो दरबार तर अखिल विश्वांत महत्त्वाचा आहे. सर्व जगांतील उत्क्रान्त्या, व चळवळी या दरबाराच्या छायेखालीं

चालल्या आहेत. अशा दरबारांत वेदान्ताला एखाद्या भिक्षुकाचीही किंमत मिळणार नाहीं असें वरवर वाटणें साहजिक आहे. अशा या अधिराज्ञी राजनीति महाराणीचे दरबारांत वेदान्ताला आम्हीं तर लोडाशींच वसविणार. कसें तें थोडक्यांत दाखवूं.

४१. ' मालती–माधव ' नाटकांत राजनीतीची एक प्रकारें अत्युत्कृष्ट व्याख्या दिलेली आहे.

**जनं विद्वान् एकः सकलमभिसंधाय कपटैः**
**तटस्थः स्वान् अर्थान् घटयति च मौनं च भजते ।**

विद्वान् ह्मणजे शहाणा मनुष्य एकटा असून सर्व लोकांस आपल्या मुत्सद्दीपणाच्या जाळ्यांत पकडून आपलें कार्य साधतो व तटस्थपणें मौन धरून आनंदांत राहतो ! ही व्याख्या ज्या पात्राला लागू केलेली आहे तें कामंदकीचें पात्र नायक–नायिकांपेक्षांही उदात्त आहे. कामंदकी ही संन्याशीण होती. तिला ' इहामुत्र–फलभोगविरागाचें ' सर्टिफिकिट मिळालें होतें. नित्यानित्य–वस्तुविवेक तर अंगीं चांगलाच मुरला होता. शमदमादि षट्साधनसंपत्ति अगणित होती व मुमुक्षुत्व तर नुसतें बोलत होतें. या साधनचतुष्ट्यांत कामन्दकी अगदीं परिपूर्ण होती हें कोणीही कबूल करील. तिनें कपट करून सर्व लोकांस फसवून मालती–माधवाचें लग्न लावून देऊन स्वकार्य साधिलें व आपण तटस्थ राहून आनंदांत रममाण झाली, असें सात्विक करुणरसाचा झरा जो भवभूति तो म्हणतो. तेव्हां भवभूतीपासून तों कामंदकीपर्यंत सर्वच भोंदूंची सांथ असें ह्मटलें पाहिजे, किंवा भवभूतीच्या करुणरसाच्या व विवर्तवादाच्या कक्षेंत उदात्त मुत्सद्दीपणाला जागा होती, असें तरी कबूल केलें पाहिजे. कदाचित् असेंही म्हणतां येईल कीं, कामन्दकीसारख्या संन्यासवृत्तीच्या मनुष्यालाच खरा मुत्सद्दीपणा शोभतो. एरव्हीं ' कातर्यं केवला नीतिःशौर्यं श्वापदचेष्टितं ' या कालिदासोक्तींत वर्णन केल्याप्रमाणें मुत्सद्दीपण हें कातर्य म्हणजे भ्याडपणाच आहे. निव्वळ पोटाच्या खळीसाठीं लुच्चेगिरी करून सत्ता व पैसा यांच्यावर चैन करणारे हरीचे लाल थोडे नाहींत. त्यांना वेदांतकक्षेंत प्रवेशच नाहीं. पण साधारण खासगी वर्तनांत अत्यंत शुद्ध असून केवळ समाजसेवेकरितांच राजनीतीच्या वक्रमार्गाचा अवलंब करणाऱ्यांना देखील एका प्रकारच्या अहंकाराचा विटाळ झाल्यामुळें सोंवळे मुत्सद्दी ह्मणतां येणार नाहीं. श्रीकृष्णाला पूर्ण अवतार ह्मटलें

आहे, हेंही विसरतां कामा नये. महाभारतांत सर्वांच्या शेंडीला गांठी मारून अर्जुनाला युद्धास प्रवृत्त करून, अठरा दिवस रक्ताच्या नद्या वाहविलेल्या व हाडांचे पर्वत रचलेले पाहून देखील पुनः ' न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ' अशी वल्गना करण्यास हा तयारच ! तेव्हां कामंदकीपेक्षांही असा पूर्णावतार ह्मणवून घेणाराला हें कपट अगदीं शोभत नाहीं, अशी शंका येणें साहजिक आहे. तेव्हां संन्यास, संपत्ति व राजनीति यांचें षडाष्टक मोडून काढून त्यांची छत्तीस गुणांची मैत्री जुळविणारा ज्योतिषी आपणास मिळाल्याशिवाय समाधान होणें नाहीं. हें समाधान गीताशास्त्रच करूं शकत आहे. भोळसट व दुष्ट या दोन प्रकारच्या आत्म्याशीं राजनीतीचा संबंध आहे. या दोघांपासून समाजास हानि न होऊं देतां सद्गुण व सुफल यांचें मालती–माधवांसारखें लग्न लावणें हेंच काम कामन्दकीसारख्याचें आहे, व तें काम विटाळ न लागतां करण्याचा अधिकार वेदान्त-शिडीच्या सहाय्यानें वरतीं माडीवर जाऊन पोंचलेल्या सिद्धांसच आहे. इतरांनीं हीं कामें केलीं आहेत व करावींही; परंतु ' राज्यांतीं नरक ' या न्यायानें थोडासा विटाळ त्यांना लागणारच. हिंदुस्थानच्या एकंदर राजकीय इतिहासांत योगेश्वर कृष्ण व धनुर्धर पार्थ यांच्या एकामागून एक ज्या जोड्या लागलेल्या दिसतात त्याचें इंगित हेंच होय. राजनीति कपटमय आहे व नसेल तर ती राजनीतीच नव्हे, हें प्रमेय अगदीं आंतल्या खिशांत प्रत्येकानें बाळगून ठेवावें. हें कपट सोमलासारखें आहे. चांगल्या वैद्यानें दिलें असेल तर तें औषध; नाहीं तर जहाल विष ! म्हणून या सोमलाचा प्रयोग करते वेळीं कृष्णपरमात्मा, रामदास इत्यादि निपुण वैद्यांची जरूर आहे. ' येरा गबाळां ' नीं या कामांत पडूं नये, हें चांगलें. जेथें नेहमींच्या नीतीच्या वाटा पार पुसून गेलेल्या दिसतात, तेथें कांट्यांतून मार्ग काढणारा मनुष्य पुऱ्या माहितीचा लागतो. वेदान्तराजनीति सोमलाप्रमाणें औषधी बनलेली असते व एरव्हींची राजनीति लुच्चेगिरींत मोडते. मुद्राराक्षसांतील चाणक्याची राजनीति आपाततः काळीकाभिन्न दिसते. पण त्याचा प्रतिस्पर्धी जो 'राक्षस' नांवांचा नंदाचा परमभक्त मंत्री, त्याच्याविषयीं चाणक्याचें वर्तन पाहिलें किंवा ब्राह्मण कःपदार्थ असें मानणाऱ्या नंदांना जिंकून ब्राह्मणांना राजनीति व सत्ता गाजवितां येते व मनांत आणल्यावर त्यांना राज्यही हाकतां येतें; तेव्हां ब्राह्मणांना यःकश्चित् कोणीही समजूं नये, असा पक्का इषारा देऊन राक्षसास चंद्रगुप्ताचें मंत्रीपद देऊन स्वतः ' ममापि च क्षपयतु नीललोहितः । पुनर्भवं परि -

गतशक्तिरात्मभूः ॥ " अशा प्रकारची प्रार्थना करीत गंगातीरीं तप करीत वसतांना आपण त्यांस पाहिलें, ह्मणजे चाणक्याची काळी नीतीसुद्धां वेदांतमतानें शुभ्र दिसूं लागते. चाणक्याचें वर्तन पूर्वीपासूनच निःस्पृहपणाचें दाखवून त्याजकडून सर्व राजकीय क्रांति रक्तपाताशिवाय घडवून आणण्यांत नाटककारानें मोठी कला साधिली आहे. मुद्राराक्षस या सर्व नाटकाचें रहस्य एका वाक्यांत सांगावयाचें म्हटलें तर असें सांगतां येईल कीं, मनुष्यसमाज व त्यांचें जीवित यांची प्रगति सरळ रेषेंत नाहीं; आगगाडीच्या रस्त्याप्रमाणें नागमोडी रस्त्याची आहे. पण ही राजनीतिरूपी नागमोड शेवटीं समाजहितरूपी टर्मिनसलाच पोंचली पाहिजे. तिचें पर्यवसान व्यक्ति किंवा व्यक्तींचा कंपू यांचीच सत्ता वाढविण्यांत न होतां एकंदर समाजाची आगगाडी थेट उच्च ध्येयापर्यंत नेण्यांत झालें पाहिजे. या सर्व गोष्टी समजून उमजून चाणक्याप्रमाणें किंवा कामंदकीप्रमाणें राजकीय उलाढाली करण्याचें सामर्थ्य वेदांतमतांतील सिद्धाशिवाय कोणाला साधणार ? या सिद्धकोटींत देखील दोन प्रकारचीं कामें आहेत. एक केवळ ग्रंथलेखनानें, वक्तृत्वानें वगैरे नीतीची उच्च हवा लोकांत उत्पन्न करणें; ह्मणजे आपोआपच लोकांत स्वाभिमान उत्पन्न होऊन, अन्यायाची सात्विक परंतु तीक्ष्ण चीड उत्पन्न होऊन अन्यायावर रचलेली जुलमाची इमारत ढांसळून पडण्यास प्रारंभ होतो. हें सिद्धकोटीचें काम ज्ञानेश्वर-एकनाथांनीं केलें. दुसरा प्रकार याहून उच्च दर्जाचा आहे. कारण त्यांत शेतखान्यांत शिरून स्वच्छ व निष्कलंक बाहेर पडलें पाहिजे. राजकीय वातावरण आहे तसेंच घ्यावयाचें. पण त्याचा उपयोग करून व शेवटीं धुवून साफ करून समाजास निराळें वळण लावावयाचें; हें काम रामदासांनीं केलें. दोनही कोटी उच्च दर्जाच्या आहेत; पण दुसऱ्या प्रकारास छाती व बुद्धिमत्ता जास्त लागते. कारण विटाळ होऊन नीतिदृष्ट्या अधोगतीस जाण्याचा या दुसऱ्या प्रकारांत जास्त संभव आहे. पहिला प्रकार काढ्याच्या औषधासारखा आहे. सावकाश परंतु खरी सुधारणा होत होत राष्ट्रीय प्रकृति पुष्कळ वेळानें ताळ्यावर येते. दुसऱ्या प्रकरणांत जालिम भाग जास्त आहे. दोनही प्रकार अवश्य आहेत. पण त्यांचा केव्हां व कसा उपयोग होतो, हें ठरविण्याचें काम ऐतिहासिक तत्त्ववेत्त्यांचें आहे. इतक्या खोल पाण्यांत शिरण्याची माझी शक्ति नाहीं व मला सवडही नाहीं.

४२. आतां या वेदांततत्त्वज्ञानाची युरोपियन तत्त्वज्ञानाशीं तुलना करावयाची हा विषयही अत्यंत महत्वाचा आहे. पण त्याचा विस्तारपूर्वक विचार कोणी तरी

ग्रंथकारानेंच केला पाहिजे. तत्त्वज्ञानाचेंही एक नवें शास्त्र बनूं पहात आहे. या शास्त्रांत तत्त्वज्ञानाचा भौतिक व मानसशास्त्रांशीं कोणता संबंध आहे, व एकंदर विश्वाचा समष्टिरूपानें आढावा कसा काढावयाचा व एकंदर विश्वाची नैतिक किंमत काय, अशा तऱ्हेचे प्रश्न येतात. पहिल्या प्रथम प्रत्येक शास्त्राला तत्वज्ञान आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. शास्त्राच्या नियमांचें नुसतें शोधन व त्याचें वर्णन हा भाग अगदींच खालच्या पायरीचा आहे. याच्या वरची पायरी त्या नियमांचें एकीकरण हें त्याच्या तत्वज्ञानाचें काम आहे. याच दृष्टीनें कित्येक लोक शास्त्रांचें वर्गीकरण करून त्यांचे दोन भाग कल्पितातः ( १ ) नुसतीं नियमवर्णनें करणारीं शास्त्रें; ( २ ) त्या नियमांची परमार्थाच्या किंवा ध्येयाच्या दृष्टीनें किंमत करणारीं शास्त्रें भौतिकशास्त्रांस हे लोक निव्वळ वर्णनपर शास्त्रांतच लोटितात. परंतु उच्च तर्कशास्त्र हें नुसतें नियम बांधून रहात नाहीं, तर खऱ्या तर्काची परमावधीची बाजू कोणती व अपूर्ण तर्काची या परमावधीच्या तर्काच्या दृष्टीनें अपूर्णता कशी काढावयाची हेंही तें सांगतें. तसेंच नीतिशास्त्र हें चालू असलेला नीतिव्यवहार व नीतीची परमावधि यांमधील अंतर घेऊन मनुष्याच्या मनाची नीतिदृष्ट्या किती उंची असली पाहिजे, या प्रश्नाची चर्चा मुख्यत्वानें करितें. या दुसऱ्या प्रकारास ‘ ध्येयशास्त्रें ’ ( Normative Sciences ) म्हणतात व पहिल्या प्रकारास वर्णनपर ( Descriptive Sciences ) म्हणतात. पण या दोनही प्रकारच्या सर्व शास्त्रांचें एकीकरण Metaphysics किंवा ब्रह्मविद्या हीच करूं शकते. या दृष्टीनें वेदान्तशास्त्र हें ( Metaphyics ) किंवा एकीकरणशास्त्र आहे. ही विद्या खालील सर्व शास्त्रांचें नियम घेऊन त्यांजपासून अखिल विश्वाचें सार काढिते व प्रत्येक शास्त्रास त्याची मर्यादा घालून देते. सर्व विश्वाचें प्रतिबिंब मनांत उठवून देणारी विद्या हीच होय. ही विद्या नुसत्या बुद्धीच्या प्रभावानें साध्य करण्याची खटपट युरोपांत आजपर्यंत चालली होती. परंतु स्पेन्सरचा अज्ञेयवाद व बर्गसनचा प्रतिभावाद Intuitionism यांनी हल्लींच्या तत्वज्ञांचे डोळ्यांत चांगलेंच अंजन घातलें आहे. शंकराचार्य व सर्व आस्तिकदर्शनकार यांमध्यें या विषयीं मोठी गंमतीची एकवाक्यता आहे. ‘ ज्ञानान्मोक्षः ’ हें वाक्य सर्वांना मान्य आहे. पण हें मोक्ष देणारें ज्ञान ‘निव्वळ बुद्धीनें दिलेलें ’ ज्ञान नव्हे, हेंही सर्वांना मान्य आहे. फक्त हें ज्ञान मिळविण्याच्या साधनाविषयीं मतभेद आहे. शंकराचार्यांची या पूर्णप्रतिभेवर ( intuition ) सर्व मदार आहे. ही पूर्णप्रतिभा सांख्ययोग्यांस एकांतवासांत मिळते व कर्मयोग्यांस

संसारांतील नियत कर्मांच्या अनुष्ठानानें मिळते. पण या दोघांचा विरोध नाहीं. कर्मयोगी पूर्ण झाला म्हणजे सांख्ययोगांत शिरतो. पूर्व जन्मांतील पूर्ण झालेला कर्मयोगी या जन्मीं अक्कलकोटच्या स्वामीसारखा सांख्ययोगी बनून येतो. मिळून या दोन योगांना एका शिडीच्या पायऱ्या मानाव्या व गीताशास्त्राचा असाच मानस दिसत आहे असें मला वाटतें. निष्कामता, भक्ति व वैराग्य हीं तीन या तत्वज्ञानाचीं प्राणभूत अंगें आहेत. पण वैराग्य याचा अर्थ जनसमूहाच्या दृष्टीनें वेदान्त मुळींच घेत नाहीं, हें पक्कें लक्षांत ठेवावें. वरच्या पायरीकरितां खालची पायरी सोडावयाची. वरची पायरी पुरी हातीं आल्याशिवाय खालची कितीही सदोष असली तरी सोडावयाची नाहीं. खोट्या ब्रह्मचाऱ्यापेक्षां धर्मविवाह करणाराची योग्यता जास्त; व्यभिचार करणाऱ्या विधवेपेक्षां धर्म्य पुनर्विवाहित विधवा वेदान्तदृष्टीनें खास जास्त योग्यतेची धरलीच पाहिजे. पण खऱ्या पातिव्रत्यानें व परोपकारानें नैष्कर्म्यसिद्धि पावलेली विधवा या सर्वाहून श्रेष्ठ. देशाभिमानाचा व्यापार करण्यापेक्षां न्यायानें सरकारी नोकरी करून ' यत्स्वल्पमपि तद्बहु ' या दृष्टीनें लोककल्याणकारी पुरुष खास जास्त योग्यतेचा. पण त्यालाच महर्षि करून सतीचें वाण घेणाऱ्या व देवरूप पावलेल्या देशभक्तांस जागाच न ठेवणें हें मात्र वेदान्तदृष्टीनें अन्यायाचें आहे. मुख्य गोष्ट एवढीच ध्यानांत ठेवावयाची कीं, वेदान्ताचा सर्व भर व्यक्तीवर आहे. या व्यक्तीचें मन जितकें चोख असेल तितका त्याचा त्या त्या मार्गांतील प्रवेश सोपा व उज्ज्वल होईल. प्रतिष्ठेची हांव, दंभ, लोभ, लोकनिंदा इत्यादिकांचा त्या व्यक्तीस विटाळही उपयोगाचा नाहीं. मग स्वपरिस्थितीप्रमाणें त्याचें वर्तन, पोषाख व इतर किरकोळ गोष्टी यांची चाड वेदान्ताला मुळींच नाहीं. वेदान्ताचा आरंभ कुटुंबांत होतो, व अंत ' वसुधैव कुटुंबकम् ' या भावनेंत होतो. साधारण मनुष्यानें अधिकारपरत्वें पायरीपायरीनेंच गेलें पाहिजे. अधिकार हा शब्द वेदान्तांत ॐकारापेक्षाही जास्त महत्वाचा आहे. हल्लींच्या देशस्थितींत या ॐकाराच्या जपाची जास्त जरूर आहे; कारण शेणामेणाचे पंख लावलेल्या कित्येक पुढाऱ्यांची जी वर गेल्यावर थोडक्यांत अधःपतनाची गोलांटी होऊन जिवंतपणींच नरकवासांत उडी पडली, ती या ॐकाराचा जप झाला असता तर पडली नसती. ज्याला ज्याला कांहीं म्हणून उच्च ध्येय आहे, तो तो या वेदान्तसरोवरांत पोहण्यास अधिकारी आहे. पाण्याची खोली व पोहण्याची मजल ज्याची त्यानेंच ध्यावी. पण हा वेदान्त निराशावादी खास नाहीं.

' नहि कल्याणकृत्कश्चित् दुर्गतिं तात गच्छति ' हा वेदान्ताच्या आशीर्वादाचा नगारा सर्वांना ऐकूं जात आहे.

शेवटीं अनुभवाच्या दृष्टीनें या लेखकाचा अधिकार या विषयांत शून्य आहे असें वाचकांस बजावून केवळ बुद्धिशिक्षणानें व पुस्तकी अध्ययनानें मिळविलेल्या तुटपुंजा ज्ञानानें झालेल्या संस्काराचेंच हें फळ आहे असें निक्षून सांगण्याची परवानगी मागतों. व ज्या महाशय ग्रंथकारांच्या व संतसज्जनांच्या संगतीनें ही लेखमाला लिहिण्याची स्फूर्ति झाली त्या सर्वांस साष्टांग वंदन करून महाराष्ट्रवाचकवृंदरूपी नारायणास ही माला अर्पण करितों.

# पुरवणी.

## आधुनिक सुशिक्षिताच्या वेदांतासंबंधी

# आधुनिक जिज्ञासूच्या शंका.

( लेखक—श्री. वामन मल्हार जोशी. एम्. ए. )

सुमारें तीन चार महिन्यांपूर्वी केसरींतून प्रसिद्ध झालेला ' अर्वाचीन सुशिक्षिताचा वेदांत ' वाचल्यापासून कांहीं लोकांची वेदांताविषयींची थोडीशी कल्पना बदलली आहे ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. कांहीं दिवसांपूर्वी बऱ्याच आंग्लविद्याविभूषितांचा वेदांताविषयीं प्रतिकूल ग्रह होता व त्यांपैकीं कांहींजण अर्धवट विनोदबुद्धीनें म्हणत असत कीं, " काय वेदान्त ना ? वेदान्त म्हणजे वेडांत–शिष्टसंमत वेडाचा कळस; वेदान्त म्हणजे जें सत्य तें मिथ्या व जें मिथ्या तें सत्य, असें भासविण्याची शास्त्रीय कला; आणि ' वेदान्ती ' म्हणजे एक प्रकारचा संभावित व विद्वान् गारुडी; तो ' जीवशिवादि ' गोट्या घेऊन व ' माये ' ची पुंगी वाजवून आणि ' सापेक्ष सत्य, ' ' उपाधि, ' ' मृगजल ' इत्यादि मंतरथंतरवजा शब्द उच्चारून बुद्धिचापल्यानें दोन गोट्यांच्या ठिकाणीं एक गोटी आहे असें दाखवितो ! फार काय, बोलतां बोलतां डोळ्यांत धूळ टाकून लहानशी गोटीच नव्हे तर सारें दृश्य जगही तो नाहींसें करून दाखवितो व स्वतःचें अस्तित्वच मिथ्या आहे, असा विलक्षण भ्रम प्रेक्षकांच्या मनांत उत्पन्न करतो ! " इंग्रजी शिकलेल्या थोड्याशा लोकांचाच असा गैरसमज होता असें नाहीं. सामान्य लोकांच्याही भाषणांत ' ब्रह्म ह्मणजे ब्रह्मघोटाळा ' अशा अर्थाचीं वाक्यें होतीं. एवढें मात्र खरें कीं त्यांना वेदांताबद्दल एक प्रकारचा आदरही वाटत होता. ' What is un-understood is admired ' या अर्थाच्या लॅटिन भाषेंतील म्हणीचें मर्म ज्यांना कळलें असेल किंवा एखाद्या गोष्टीविषयींचें अज्ञान हेंही

वेळेस तीविषयीं आदर उत्पन्न करण्यास कारण होतें, हा मानसशास्त्रांतील नियम ज्यांना विचारानंतर पटला असेल, त्यांना या गोष्टीचें आश्चर्य वाटणार नाहीं. असो; सांगण्याचा मूळ मुद्दा हा कीं, वेदांताबद्दल पूर्वी कांहीं लोकांची जी वृत्ति होती, त्या वृत्तींत ' आधुनिक सुशिक्षित वेदांती ' गुरूनें कांहीं अंशानें तरी फरक केला आहे, असें मला वाटतें. शंकिताशीं वेदांती गुरूचें जें संभाषण झालें त्यांत सुशिक्षित लोकांना समजेल व कांहीं अंशानें पटेल अशा प्रकारचें वेदांतविवेचन झालेलें आहे व त्यांचें हें संवादात्मक तात्विक विवेचन प्रसिद्ध केल्याबद्दल लेखकाचे आभार मानणें उचित आहे.

' पुराणांतलीं वांगीं पुराणांत ' हें तत्व हरदास-पुराणिक-भटभिक्षुकादि लोकांसंबंधानेंच खरें आहे असें नव्हे, तर इतर सर्वसाधारण लोकांसंबंधानेंही खरें आहे. आपल्या देशांत धर्म व तत्वज्ञान एकीकडे आणि व्यवहार व अनुभव दुसरीकडे, अशा प्रकारची फारकत झालेली दिसते,-किंबहुना तीं परस्परविरोधी आहेत असें भासतें. धर्मामध्यें व व्यवहारामध्यें ऐक्य नाहीं किंवा सख्य नाहीं. तत्त्वज्ञानाचें व अनुभवाचें तसेंच. पण उच्च व उत्कट प्रेम नसूनही कांहीं जोडपीं-विशेषतः हिंदु जोडपीं-जशीं एके ठिकाणीं नांदतात, तशा प्रकारेंच धर्मामध्यें व व्यवहारामध्यें किंवा तत्त्वज्ञानामध्यें व अनुभवामध्यें ऐक्य किंवा सुसंगति नसतांही तीं बाह्यतः तरी गुण्यागोविंदानें नांदतात. बायकोनें स्वैंपाकघर संभाळावें व मुलांची जोपासना करावी आणि नवऱ्यानें बाहेरचें पहावें व पैसे मिळवून आणावे, अशा प्रकारची प्रांतवार अधिकारविभागणी वरील दोन जोड्यांमधील तत्त्वांमध्यें दिसून येते. म्हणजे, धर्मचर्चा चालली असतां व्यवहारानें मध्यें तोंड घालूं नये व व्यवहार चालला असतां धर्माधर्माच्या विचारांनीं मूग गिळून स्वस्थ बसावें ! तसेंच ब्रह्मविषयक किंवा ईश्वरविषयक ऊहापोह चालला असतां आधिभौतिक अनुभवाकडे कोणीं लक्ष देऊं नये आणि या अनुभवाचा विचार चालला असतां धर्माला, ब्रह्माला व ईश्वरालाही एका बाजूस गुंडाळून ठेवणारीं अनुमानें खुशाल काढावींत ! अशी ही अधिकारविभागणी सोईची व सुखाची खचित आहे; पण ती टिकाऊ किंवा समाधानकारक मात्र नाहीं; आणि ती अखेर अहितकारकच होते, व तसें आपल्याइकडे झालेंही. धर्माचा प्रान्त कमी होत जातां जातां शेवटीं देवघरें किंवा देवळें एवढी आकुंचितच जहागीर त्याला मिळाल्यामुळें, व बायका आणि मुलें हींच त्याची स्वामिनिष्ठ प्रजा राहिल्यामुळें, धर्म बलहीन व

निःसत्व झाला व तो रोडावला. व्यवहारांतून देवाला गचांडी देऊन घालवून दिल्यामुळें तो संतापला व त्यानें व्यवहार औद्धत्यपूर्ण, निर्घृण, पापात्मक व दुःखमय होईल असा शाप दिला. व्यवहारानें त्याचा सूड उगविण्याकरितांच कीं काय, धर्मचर्चा अर्थहीन केली–‘ अर्थ ’ शब्दाच्या दोनही अर्थांनीं ‘ अर्थहीन ’ केली–व त्यामुळें आपल्या धर्मचर्चेंत कोरडें वाक्पांडित्य व शाब्दिक कोट्या यांशिवाय दुसरें विशेष कांहीं मिळेनासें झालें. अर्थात् अशा नीरस, निष्फळ व निरुपयोगी धर्मचर्चेची मानमान्यताही कमी झाली. देवाला नुसता नमस्कार केला व धार्मिक पुराणकीर्तनादिकांत माना डोलवल्या म्हणजे देवाच्या व धर्माच्या ऋणांतून मुक्त झालों अशी लोकांची साहजिक भावना उत्पन्न झाल्यावर वर्तनांत वगैरे ईश्वराची सत्ता दिसेनाशी झाली, यांत आश्चर्य नाहीं. यामुळें व्यवहाराचेंही अखेर नुकसानच झालें. धर्म सोडल्यामुळें व्यवहार सात्विक आनंदाला मुकला, त्याचें तेज पळालें व त्याची हिंमत खचली. धर्माच्या अभावीं स्नेह भाडोत्री झाला, प्रेम मोलें विकूं लागलें, आणि साहाय्यबुद्धि मावळून ‘ चढाओढ ’ ही दिमाखानें व निलाजरेपणें बाजारांत वावरूं लागली. एकंदरींत काय, तर धर्म आणि तत्त्वज्ञान यांची व व्यवहार आणि अनुभव यांची अंतस्थ फारकत झाली असल्यामुळें त्यांनीं बाहेर जरी उघड घटस्फोट केला नसला तरी त्या उभयतांची हानि झालेली आहे व तीं सत्वहीन, रसहीन, तेजोहीन व बलहीन झालीं आहेत. धर्मभावनेचा व तत्त्वजिज्ञासेचा आत्मा सुभाषिताच्या आत्म्याप्रमाणें ‘ जीर्ण ’ झाला आहे, किंबहुना मृतप्राय झाला आहे; परंतु त्याचें शरीर मात्र शब्दालंकारांनीं व अर्थालंकारांनींही मढविलें जात आहे. व्यवहाराचें हृदयही कुजलें आहे, परंतु त्याचा बाहेरचा संभावितपणा मात्र कायम राहिला आहे. अशा स्थितींत धर्माला चेतना आणणारा व व्यवहाराला निकोप करणारा कोणी आधुनिक धन्वन्तरी पाहिजे आहे; तो केव्हां येईल तो खरा !

तोंपर्यंत विद्यमान वैद्यांची मात्रा चालते का पहावें. जुना वेदांत चांगला असेल व भवरोग हरण करण्यांत त्याचा पूर्वीं उपयोग झाला असेल. पण हल्लींची परिस्थिति बदलेली आहे व हल्लींचे भवरोगही किंचित् निराळ्या प्रकारचे आहेत. आधुनिक सुशिक्षितांना विशाल जगताकडे, त्यांतील प्रचण्ड आधिभौतिक शक्तींकडे व त्यांतील विलक्षण व्यवहाराकडे पाहून जी भवभीति वाटते, किंवा ज्या शंका त्यांच्या आत्म्यास तळमळ लावतात व संतप्त करितात, त्यांचें स्वरूप पूर्वींपेक्षां

तत्त्वतः जरी भिन्न नसलें तरी या रोगाच्या भावना कांहीं अंशानें तरी निराळ्या आहेत. यावर औषध द्यावयाचें तें या सर्व गोष्टीचा विचार करूनच दिलें पाहिजे. 'आधुनिक सुशिक्षित वेदांत्या'नें अशा प्रकारचा विचार करून पूर्वींच्या आर्यौ-षधींचीच जी नवीन पद्धतीनें सशास्त्र मात्रा तयार केली आहे, तिचा कांहीं लोकांस उपयोग झाला आहे; परंतु सर्वांनाच ती लागू पडेल असें मात्र नाहीं.

उपरिनिर्दिष्ट वेदांतविषयक संवादांत 'शंकिता'नें मार्मिक शंका विचारल्या व त्या जोरदार रीतीनें व स्पष्टपणें मांडल्या; आणि वेदांत्यानेंही त्यांवर चांगलीं सणसणीत, वक्तृत्वपूर्ण व विद्वत्तेनें थवथबलेलीं उत्तरें दिलीं. पण त्यांनीं 'शंकिता'चें किंवा दुसऱ्या कोणाचें पूर्ण समाधान झालें असेल अशी खात्री वाटत नाहीं. शंकित व वेदांती यांचा संवाद ऐकून माझें तर समाधान झालें नाहीं. म्हणून मित्रत्वाच्या नात्यानें मीं आपल्या शंका 'शंकितास' कळविल्या; त्यानें याच विषयासंबंधीं दुसऱ्या एका माझ्यासारख्याच जिज्ञासू मित्राशीं झालेला संवाद मला सविस्तर सांगितला. तो संवाद वाचकांना मनोरंजक व बोधप्रद होईल असें वाटत असल्या-मुळें तो खालीं देत आहें. त्यांत थोडाबहुत जो रस असेल तो ग्रहण करून वाच-कांनीं चोथा टाकून द्यावा अशी विनंति आहे.

**शंकितः**—कां बुवा, समाधान कां झालें नाहीं ?

**जिज्ञासुः**—कां म्हणजे ? तुझ्या वेदान्ती मित्राचें विवेचन येथून तेथून चुकीचें आहे. अनुभवाच्या आणि युक्तिवादाच्या आधारानें वादविवाद करण्याचें त्यानें तुला प्रथम वचन दिलें. पण पुढें पुढें अनुभवाचीं व युक्तिवादाचीं घोडीं मागें पडलीं व वेदान्ती गुरूंची विद्वत्ता कधीं श्रद्धेच्या तर कधीं कल्पनेच्या घोडीवर बसून भरधांव पळत सुटली.

**शंकितः**—तुझी ही लाक्षणिक भाषा आतां पुरे झाली. कोणत्या विवक्षित गोष्टींत त्यांची चूक झाली हें मला सांग. खरें सांगूं का ? मी आपणाला मोठा बुद्धिमान् समजत होतों व त्यांच्याशीं मीं बराच वेळ मोठ्या ऐटीनें वादविवादही केला व त्यांची थोडीशी थट्टामस्करीही करून घेतली. पण त्यांचें गंगौघासारखें दिव्य वक्तृत्व ऐकून व त्यांची ती सात्विक, भव्य व तेजस्वी मुद्रा पाहून कांहीं वे......

**जिज्ञासुः**—मी समजलों काय म्हणणार आहेस तें. माझ्याविषयीं म्हणशील तर मी त्या गंगौघांत डोक्यावरून स्नान करूनही पुनः कोरडा गोटा तो गोटाच राहिलों !

**शंकितः**—'गोटा' म्हणण्यापेक्षां समुद्रांतल्या पाण्यांतला 'शंख' म्हण पाहिजे तर ! नाहीं तर, नेहमीं कांहीं तरी शंका काढण्याची व विघातात्मक आसुरी टीका करण्याची तुला संवय असल्यामुळें तुला 'शंकासुर'च म्हटलेलें बरें. बाकी मीही या कामांत तुझाच भाऊ आहें म्हणा ! बरें, पण तुझ्या काय काय शंका आहेत त्या सांग पाहूं. आपण दोघेजण त्यांबद्दल आधीं वाद करूं आणि मग पुनः आपल्या वेदान्ती गुरूंकडे वादाला जाऊं.

**जिज्ञासुः**—पहिली शंका अशी कीं 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' या सूत्रांतील 'मिथ्या' शब्दाचा अर्थ आपल्या आधुनिक वेदांत्यांनीं जो केला तो बरोबर आहे काय ? जगद्विषयक आपलें ज्ञान 'अपूर्ण' असतें, तें 'संस्कारार्ह' असतें, चुकीचें असतें व त्यायोगानें आपण प्रत्येकजण आपआपल्या काल्पनिक जगांत वावरत असतों, हें त्यांचें म्हणणें मला कबूल आहे; व ज्या मनुष्याला परिपूर्ण ज्ञान झालें आहे व जो स्थितप्रज्ञ पदवीला पोंचला आहे, तो जगताकडे ज्या समतोल, खोल व विशाल दृष्टीनें पाहील त्याप्रमाणें आपण अल्पज्ञ लोक पहात नाहीं व आपल्या कोत्या दृष्टीला दिसणारें जग पूर्णज्ञान झालेल्या माणसाच्या दृष्टीनें 'मिथ्या' आहे. हेंही मला कबूल आहे. तुझे वेदांती मित्र म्हणतात कीं, आपलें ज्ञान 'मिथ्या' आहे, याचा अर्थ तें कोतें किंवा अपूर्ण किंवा संस्कारार्ह आहे. पण मी असें विचारतों कीं 'अपूर्ण' या अर्थानें 'मिथ्या' हा शब्द वापरून लोकांचा गैरसमज, उत्पन्न करण्याची शंकराचार्यांना काय जरूर होती ? ते एवढे विद्वान् होते, वाद-विवादकुशल होते, शब्दार्थांमधील सूक्ष्म भेद दाखवून देण्यांत त्यांचा हातखंडा होता. असें असतां त्यांनीं 'सामान्य जनांचें ज्ञान अपूर्ण आहे' असे सरळ शब्द न घालतां 'जग हें मिथ्या–मिथ्या–' असा भ्रामक घोष कां केला ? काव्यामध्यें 'अर्थमनर्थं भावय नित्यं' असे शब्द वापरले, तर मी त्यांवर तर्कशास्त्राच्या दृष्टीनें टीका करणार नाहीं. तर्कामध्यें 'अर्थ' म्हणजे 'अनर्थ' असें कधीं होणार नाहीं, पण काव्यामध्यें तें शक्य आहे. पण जेथें शब्दार्थांचा कीस निघतो, अशा तात्त्विक वादांत तर्कशास्त्राला व भाषाशास्त्राला झुगारून देऊन 'मिथ्या' हा शब्द 'अपूर्ण' किंवा 'संस्कारार्ह' या अर्थीं शंकराचार्यांसारख्या वाक्प्रभुत्व असलेल्या वादकुशल

पंडितांनींही वापरावा व तोच शब्द इतर सुसंस्कृत वेदान्ती पंडितांनीं उचलावा हें आश्चर्य नाहीं काय ?

**शंकितः**—मला देखील ही शंका आली होती. पण मी त्यांच्याशीं वाद करतांना या मुद्याविषयीं आग्रह धरला नाहीं; कारण आपणाला विवक्षित शब्दांशीं किंवा विवक्षित तत्त्ववेत्त्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. अमुक तत्त्व खरें कीं खोटें, हाच आपला मुख्य प्रश्न आहे. तें कोणत्या शब्दांनीं व्यक्त केलें आहे, या गौण प्रश्नाकडे विशेष लक्ष देण्याचें आपणास प्रयोजन नाहीं. अरे, व्यवहारांत कोरड्या शब्दांवर भिस्त न ठेवतां 'तत्त्वमसी 'कडे लक्ष देणें जसें जरूर असतें, तसेंच सत्यशोधनांतही शब्दांपेक्षां तत्त्वाकडेच अधिक लक्ष देणें जरूर आहे.

**जिज्ञासुः**—अगदीं खरें आहे; पण मला जी शंका आतां प्रथम सुचली ती तुझ्याशीं एकदम बोलून टाकली एवढेंच. अमुक तात्त्विक ग्रंथांतील अमुक शब्दाचा अमुक अर्थ अशा प्रकारच्या शाब्दिक चर्चेला मी किती कंटाळलेला आहें, हें तुला ठाऊक आहेच; आणि माझा आपल्या इकडील पंडितांवर व आपल्या या आधुनिक वेदांती गुरूंवर जो आरोप आहे तो हाच कीं, हे लोक कोणत्याही तत्वाची सत्यासत्यता अनुभवाच्या व युक्तिवादाच्या मापानें न जोखतां 'अमुक ग्रंथांत अमुक म्हटलें आहे व अमका ग्रंथकार अमुक म्हणतो ' अशा प्रकारच्या चर्चेंतच ते आपलें पांडित्य व वक्तृत्व खर्च करतात !

**शंकितः**—या सामान्य विधानांनीं मी फसेन असें कां तुला वाटतें ? कोणतें विवक्षित तत्त्व, कोणत्या वेळीं, कोणत्या स्थळीं......

**जिज्ञासुः**—बरें तर घे मग. फांद्या तोडण्यापेक्षां 'मूले कुठार ' घातलेली बरी. आपल्या वेदांती गुरूंनीं 'ब्रह्मज्ञाना 'ची जी व्याख्या केली आहे तिच्यावरून असें दिसतें कीं, त्यांनीं 'ब्रह्म ' हें 'निर्गुण ' 'निराकार ' असतें, ही कल्पना सोडून दिली आहे. निदान पूर्वीच्या अर्थानें हे शब्द आपले वेदांती वापरीत नाहींत. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' या सूत्राचा आधुनिक वेदांत्यानें सांप्रदायिक अथवा प्रचलित अर्थ सोडून असा अर्थ केला कीं ('कटिंग ' वरूनच मी तुला वाचूनच दाखवितों. ) " कोत्या दृष्टीनें उत्पन्न केलेलें जग बुडबुड्याच्या जगाइतकेंच खोटें व अनार्थावह आहे. साधनचतुष्टयसंपन्न मुमुक्षु या इंद्रियसुखदृष्टीच्या कल्पनासृष्टिमय जगाला मिथ्या समजतो व जगताचें सर्वांगसंपूर्ण ज्ञान करून घेण्याचा तो प्रयत्न

करतो. ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' या वाक्याचें तात्पर्य इतकेंच कीं, ब्रह्मवेत्त्या पुरुषाचें ज्ञानविषयीभूत जगत् तें खरें जगत् व सामान्य सुखाभिलाषी सांसारिकाचें जगत् तें खोटें जगत्. अखिल विश्वाचें-त्यामधील सर्व द्रव्यांचें, त्यांच्या गुणधर्मांचें प्रेरणाचें, प्रवृत्तींचें व हेतूंचें परिपूर्ण व यथावत् ज्ञान ज्याला झालें, सर्व गोष्टींचा कार्यकारणभाव ज्याला करतलामलकवत् विशद झाला, सर्व गोष्टींचें उद्दिष्ट कार्य ( function or purpose ) ज्याला कळलें, निश्चित श्रेय कशांत आहे, हें ज्याला समजलें व उमजलें आणि सर्व गोष्टींची कमी अधिक श्रेयस्करता ज्याच्या मनांत पूर्ण बिंबून गेली त्यालाच खरें जग कळलें व त्याचेंच जग ' ईशावास्यमिदं सर्वम् ' या न्यायानें खरें ठरतें. इतरांचें ज्ञान अपूर्ण अतएव मिथ्या व त्यांचें ज्ञानविषयभूत जगत्‌ही मिथ्याच ! " आतां यावर माझें म्हणणें असें:-ब्रह्मज्ञान ह्मणजे जगताचें सर्वांगपरिपूर्ण ज्ञान; यावरून ब्रह्म ( किंवा इंग्रजींतील The Absolute ), याचा अर्थ ' सृष्टींतील यच्चयावत् सर्व संबंध ' (the totality of relations). असा अर्थ होतो. या वक्तृत्वपूर्ण वाक्यांतील ब्रह्मज्ञानाची कल्पना प्रचलित निर्गुण ब्रह्माच्या निर्गुण अथवा निष्फल कल्पनेहून भिन्न आहे व अधिक चांगली आहे, यांत शंका नाहीं. 'ध्येय' या दृष्टीनें तर ती फारच उत्तम आहे. जग हें आपणांस एक मोठें गूढ आहे असें वाटतें; त्याच्यांत व्यवस्था किंवा सुसंगति आपणांस दिसत नाहीं; जग कोणीकडे चाललें आहे हें समजत नाहीं; जन्म-जरा-मृत्यु इत्यादिकांचा अर्थ कळत नाहीं; प्लेग, कॉलरा, भूकंप, जलप्रलय इत्यादिकांचा उद्देश काय असावा याची चांगलीशी कल्पना करवत नाहीं; पाप, अन्याय, दुःख, कुरूपता इत्यादि गोष्टी ईश्वरास कशा खपतात याचा उलगडा होत नाहीं. पण ब्रह्मवेत्त्या पुरुषाला पूर्ण ज्ञान झालें असल्यामुळें त्याला या शंकाच रहात नाहींत, आणि सृष्टींतील सर्व गोष्टींचा कार्यकारणभाव व त्यांचें उद्दिष्ट कार्य त्याला समजून चुकलें असल्यामुळें प्रत्येक गोष्ट झालीच पाहिजे व ती जशी असावयास पाहिजे तशीच आहे, असें त्याला वाटतें. संशयविषय किंवा दुःखविषय अगर इच्छाविषयही कांहीं नसल्यामुळें तो आनंदलहरींत पोहत असतो. सामान्य जनांस सृष्टिदेवतेचें एकांगी व अत्यल्प ज्ञान असल्यामुळें ती चंचल, किंवा निर्दय, अगर भेसुर अथवा विद्रूप आहे असें वाटतें आणि तिचें व त्यांचें तादात्म्य होऊं शकत नाहीं. ती आपणांस परकी, चमत्कारिक व केव्हां केव्हां शत्रुतुल्य भासते. तिच्या व्यवहारांत गैरव्यवस्था, अन्याय, चंचलता, निर्घृणता इत्यादि दृष्टोत्पत्तीस येतात. थोडक्यांत

सांगावयाचें म्हणजे तिचें आपलें सख्य किंवा तादात्म्य अगर ऐक्य होऊं शकत नाहीं. व्यवहाराच्या सोप्या भाषेंत हेंच बोलवयाचें म्हणजे तिचें व आपलें मन जुळत नाहीं. ती जें करील तें आपणांस सर्वदां पटत नाहीं. आपणांस जें पाहिजे असतें तें तिच्यापासून मिळत नाहीं व जें व्हावें तें होत नाहीं. पण ब्रह्मवेत्त्या पुरुषाला जग हें आत्मस्वरूप वाटतें. तें त्याच्या बुद्धीला सुनियमबद्ध व सुसंगत दिसतें; त्याच्या नीतिदृष्टीला बाधक किंवा तिच्याशीं विसंगत असें त्याला जगांत कांहीं दिसत नाहीं; भावनेच्या ( Emotion ) दृष्टीनेंही त्याला जग हें अक्राळ-विक्राळ, भेसुर, भयाण किंवा विद्रूप नसून तें सर्वांगसुंदर, मनोरम व आनंद-परिपूर्ण आहे, असें वाटतें.

**शंकितः**—आपल्या वेदान्ती मित्राचा तूं आपल्या शब्दांत इतका वेळ अनुवादच केलास ! तुझी टीका काय आहे यावर ?

**जिज्ञासुः**—आस्ते आस्ते टीकाही येईलच. ब्रह्मज्ञानाची वरील कल्पना 'ध्येय' या दृष्टीनें फार उत्तम आहे, ती उत्साहजनक आहे व पुष्कळ संसारसंतप्त किंवा भवभयसंत्रस्त झालेल्या लोकांना या कल्पनेमुळें समाधान झालेलें आहे, हें आपणांला कबूल केलें पाहिजे. पण ब्रह्मज्ञानाची वरील कल्पना ही केवळ ' कल्पना ' आहे. तें ' ध्येय ' आहे; पण हें ध्येय कधींकाळीं सिद्ध झालें किंवा सिद्ध होईल, अशी खात्री कोण देणार ?

**शंकितः**—उपनिषत्कालीन मुनींना किंवा ऋषींना अथवा आधुनिक योग्यांना किंवा साधूंना हें ब्रह्मज्ञान झालें आहे, असें आपले आधुनिक वेदान्ती म्हणतील व इंद्रियदमन व योगाचा अभ्यास केल्यास व 'गुरुकृपा' झाल्यास तुला किंवा मला-सुद्धां हें ज्ञान प्राप्त होईल, असें ते सांगतील. हें कदाचित् खरें असेल, कदाचित् नसेल. पण तो माझा मुद्दाच नाहीं. युक्तिवादानें वेदान्ततत्त्वज्ञानाची महती सिद्ध करून देऊं, अशी त्यांची प्रतिज्ञा होती. जग हें Rational Whole आहे; म्हणजे त्याचें मर्म किंवा तत्त्व आपणांस समजण्यासारखें व पटण्यासारखें आहे; जगाचा आत्मा व आपला आत्मा एकच आहे; हें युक्तिवादानें सिद्ध करून देतां येईल काय ? येत नसल्यास सृष्टिदेवतेचें गूढ कळत नाहीं असें म्हणावें. पण हें कबूल करणें म्हणजे सृष्टीचा आत्मा व आपला आत्मा म्हणजे परमात्मा व जीवात्मा हे भिन्न आहेत–त्यांच्या मध्यें द्वैत आहे–हें कबूल करण्यासारखें आहे. सध्यांच्या स्थितींत ' द्वैत ' आहे हें वेदान्ती कबूल करतातच मुळीं. पण साधनचतुष्ट्यानें पूत

झालेल्या व श्रवण–मनन–निदिध्यास करून अखेर ब्रह्मपदास चढलेल्या मनुष्याला जग हें आपलेंच स्वरूप आहे असें वाटेल, असें त्यांचें म्हणणें आहे.

**जिज्ञासुः**—कबूल. पण अनुभवाचा आधार घेऊन युक्तिवादानें हें सिद्ध करतां येईल काय ? जगाच्या इतिहासाकडे पहा. ज्ञान हें क्रमाक्रमानें वृद्धिंगत होत आहे; पण जगाचें कोडें अद्यापि उलगडलें आहे, असें नाहीं. सृष्टींतील गूढतत्त्वें आपण वरींच शोधून काढलीं आहेत. पण जितकीं नवीन तत्त्वें काढलीं आहेत, तेवढेच किंवा तेवढ्याहून अधिक नवीन प्रश्न उत्पन्न झाले आहेत. एकंदर काय, तर डोंगरावर जसजसें वर जावें तसतसा सृष्टीचा जसा जास्त विस्तार दिसूं लागतो, पण त्याबरोबरच दृष्टिपथाची अंतिम मर्यादाही जास्त लांब होत जाते व सर्व जग दृष्टीच्या आटोक्यांत आणण्याची आशा अशक्य कोटींतील ठरते; त्याचप्रमाणेंच ज्ञानक्षेत्र जरी वाढत चाललें असलें तरी जिज्ञासेचें क्षेत्रही त्याबरोबर वाढत जात आहे; म्हणजे पूर्णज्ञान कधीं होईल किंवा नाहीं अशी खात्री नाहीं. बरें, होईल असें धरिलें, तरी तें कालगत्या पुढें मागें होईल तेव्हां होईल. आजकाल किंवा या पिढीमध्यें किंवा शतकामध्यें होईल असें नाहीं. तें या युगाच्या अंतीं झालें तर आपलें नशीब. पण वेदांती म्हणणार, जगाच्या आरंभापासून हें ब्रह्मज्ञान आहे व तें या कालींही प्राप्त करून घेणें शक्य आहे. आम्हांला जें जगाच्या अंतीं होईल असें वाटतें, तें वेदांत्यांना जगाच्या आरंभापासून आहे, असें वाटतें. हें कदाचित् खरें असेल. पण युक्तिवादानें याची सत्यता कोण सिद्ध करूं शकेल ? आधुनिक आधिभौतिक शास्त्रांनीं पुष्कळ शोध लावून सृष्टीचें अंतरंग बरेंच ताडलें आहे. पण अद्यापि कितीक तरी शोध लागावयाचे राहिले आहेत. तेव्हां बुद्धिदृष्ट्या सृष्टीचें गूढ किंवा सृष्टीचें ह्द्गत आपणास कळलें आहे, असें ह्मणतां यावयाचें नाहीं. बरें नीतिदृष्ट्या जगाकडे पाहिलें तरीसुद्धां असेंच. जगांत किती पाप भरलेलें आहे, किती दुःख आहे, किती सज्जनांचा छळ होत आहे व दुर्जनांचा विजय होत आहे, जीवनकलहांत आत्मसंरक्षणाकरितां उच्चतम सात्विक वृत्तीला, प्रेमाला, औदार्याला व नीतीलाही कसें गुंडाळून ठेवावें लागत आहे, या गोष्टींचा जो विचार करील, तो या असल्या दुःखमय, पापपूर्ण व कलहात्मक सृष्टीचा व आपला आत्मा हे एकच आहेत, असें ह्मणणार नाहीं. अनुभवाच्या आधारें बोलावयाचें असल्यास सृष्टीचा व आपला आत्मा यांचें तादात्म्य आहे, असें ह्मणतां यावयाचें नाहीं. पुढें मागें...

**शंकित**:—वेदान्त्यांची बाजू घेऊन मी आतां तुझ्याशीं बोलतों. मानवजातीच्या बाल्यावस्थेंत सृष्टिनियमांचें लोकांना फारसें ज्ञान नव्हतें, म्हणून त्यांना ती चंचल व भीतिप्रद वाटत असे. श्वापदयुक्त अरण्यें, अफाट समुद्र, अत्युत्तुंग पर्वत, वादळें, विजा, मेघांचा गडगडाट, भयंकर सर्प इत्यादि गोष्टी पाहून मानवजातीची अगदीं प्राचीन काळीं लहान मुलाप्रमाणें अवस्था झाली असल्यास नवल काय ? वादळें केव्हां होतात व कां होतात हें त्यांना कळत नव्हतें; विजा, मेघांचा गडगडाट, प्रचण्ड पूर, इत्यादिकांत नियम वगैरे कांहीं न दिसल्यामुळें सृष्टिदेवता लहरी आहे, निर्दय आहे, रागीट आहे, असें त्यांना साहजिकपणें वाटलें. 'सृष्टिदेवता' ही कल्पना वास्तविकपणें त्या वेळीं नसेलच. सृष्टि ही समष्टिरूप एक देवता नसून तिच्यांत वायुदेवता, जलदेवता, समुद्रदेवता, इत्यादि अनेक देवता आहेत व त्यांची प्रार्थना करून त्यांना खुष केल्याशिवाय आपली धडगत नाहीं असें त्यांना वाटत होतें. 'सृष्टिदेवता' ही एकत्वदर्शक कल्पना मागाहूनची आहे. परंतु कालांतरानें मानवजातीचें ज्ञान जसजसें वाढत गेलें व त्यांना सृष्टीचे नियम कळूं लागले तसतशी सृष्टीच्या चांचल्याची किंवा लहरीपणाची किंवा अनित्यतेची किंवा प्रार्थनाप्रियतेची त्यांची कल्पना मागें पडत चालली व सृष्टि चालविणारा एक कोणी तरी सर्वशक्तिमान् सर्वज्ञ नियन्ता आहे, अशी त्यांची खात्री झाली. आधुनिक काळीं ही एवढीच कल्पना काय ती बऱ्याच अंशानें अवशिष्ट राहिली आहे. पण अलीकडे या कल्पनेलाही पुष्कळ शास्त्रज्ञांनीं अर्धचंद्र दिला आहे व 'सृष्टिनियम' एवढ्या कल्पनेवर त्यांचें काम भागत आहे. सृष्टीचा नियम म्हटला म्हणजे तो कोणाच्या बापालाही बदलतां यावयाचा नाहीं, अशी लोकांची अलीकडे खात्री होत चालली आहे. सृष्टींत सुव्यवस्था होत चालली आहे, सृष्टीचे सर्व व्यवहार नियमबद्ध आहेत; सृष्टीचे सर्व नियम नित्य व अनुल्लंघनीय आहेत, याबद्दल आज कोणाला फारशी शंका नाहीं. याचा अर्थ काय, तर सृष्टीचें मन चंचल नाहीं, तिला आपल्याप्रमाणेंच सुव्यवस्था व नियमितता प्रिय आहे; ती आपलें वचन कधीं मोडीत नाहीं; ती आपण आंखून घेतलेला क्रम कधीं सोडीत नाहीं; कारणाशिवाय ती कोणतीही गोष्ट करीत नाहीं; ती ज्ञानी मनुष्यास कधीं फसवीत नाहीं, तर त्याला मदत करते; त्याच्या गाड्या ओढते, त्याचें पीठ दळते, त्याचीं लांकडें कापते, कपडे शिवते, किंबहुना ज्या कामाला तिला लावावें तें काम ती बिनबोभाट व इमानानें करते; तिचे नियम

किंवा तिचा क्रम हे अगदीं स्पष्ट किंवा उत्तान नाहींत पण ते आपणांस परिश्रमानें कळण्यासारखे आहेत; अपवादात्मक दिसणाऱ्या गोष्टींतही नियमबद्धता आहे, व हें आपणांस अनुभवांवरून कळलें आहे:-भावार्थ काय तर सृष्टीचें मर्म-तिचा आत्मा-तिचें हृद्गत-आपणांस कळण्यासारखें आहे; तें कांहीं अंशानें कळलें आहे व दिवसेंदिवस अधिक कळत जात आहे. या अनुभवावरून तिचा अंतरात्मा व आपला अंतरात्मा यांमधील द्वैत कायमचें नाहीं, असें गृहीत धरल्यास वावगें काय ? वावगें कांहींच नाहीं, इतकेंच नव्हे तर तुमचीं सर्व आधिभौतिक शास्त्रें हें तत्त्व गृहीत धरून चाललीं आहेत. सृष्टींतील सर्व व्यवहारांचें गूढ आपणास कळण्यासारखें आहे, इतकेंच नव्हे तर प्रयोगशाळेमध्यें महाभूतांनाही वाटल्यांत कोंडून आणि त्यांना आंच लावून त्यांचें विंग बळजबरीनें त्यांच्याकडून वदवितां येण्यासारखें आहे; सृष्टींतील व्यवहार पाहून जीं सशास्त्र अनुमानें आपण बांधूं तीं कधींही चुकावयाचीं नाहींत, अशा प्रकारच्या दृढ श्रद्धेनें शास्त्रज्ञ लोक शोध करण्याचा प्रयत्न करीत आहेत नाहीं का ? फार काय, आपण आपलें मन मोठें चंचल व दुर्निग्रह समजतों, पण अलीकडचे मानसशास्त्रज्ञ मनालाही नियमबद्ध करण्याच्या मार्गाला लागले आहेत. हें कशाच्या जोरावर ? तर सृष्टींतील यच्चयावत् सर्व गोष्टी आपणांस कळण्यासारख्या आहेत, त्या सर्व सकारण आहेत, त्यांत लहरीपणा मुळींच नाहीं, सर्व व्यवहार सुव्यवस्थित आहेत, या भावनेच्याच जोरावर. वेदान्ती भाषेंत हेंच बोलावयाचें म्हणजे सृष्टीचा व आपला आत्मा एक आहे; परमात्म्याचें पूर्ण ज्ञान जीवात्म्याला होण्यासारखें आहे; त्यांच्यांत द्वैततासूचक असा अनुल्लंघनीय पडदा नाहीं, असें आधिभौतिक शास्त्रज्ञ गृहीत धरतात व या भावनेनेंच त्यांचे प्रयत्न चालले असतात. जडसृष्टीपासून जीवसृष्टी उत्पन्न करून देण्याची किंवा मानसिक गोष्टींनाही नियमांच्या दाव्यांत घालण्याची जी महत्वाकांक्षा आधुनिक शास्त्रज्ञांना आहे, ती या अशा प्रकारच्या श्रद्धेमुळेंच. पण त्यांना कोण दोष देतो ? वेदान्ती गरीब पडले, त्यांचा कोणी वाली उरला नाहीं, तेव्हां त्यांच्यावर गांवांतल्या कुत्र्यानेंही भुंकावें. स्पेन्सर म्हणतो Science is systematised or unified knowledge,-म्हणजे अनेक गोष्टी एका नियमसूत्रांत ग्रथित करणें हें शास्त्राचें काम आहे. अशा नियमांची पुनः सुसंगत एकवाक्यता करणें हें तत्वज्ञानाचें काम आहे. अशी एकवाक्यता करतां येईल, असें युरोपीय तत्त्ववेत्त्यांचें गृहीतकृत्य आहे. आणि खरोखर पाहूं गेलें असतां अशी

एकवाक्यता करतां येईल अशी ज्याला आशा नसेल, त्याची तत्त्वजिज्ञासा व त्यांचें तत्वशोधन मर्यादितच राहील. कारण जेथें जेथें त्याला सुसंगति लावतां येणार नाहीं, तेथें तेथें हात टेंकून स्वस्थ बसण्याकडे व " येथें समंजस उपपत्ति लागत नाहीं." असें बोलून टाकून मोकळे होण्याकडे त्यांचीं प्रवृत्ति होईल. अशा उदास, व आलस्यात्मक प्रवृत्तीनें तत्वज्ञानाची प्रगति होणें शक्य नाहीं. तेव्हां सर्व जगाची उपपत्ति बरोबर लावतां येईल व सर्व गोष्टींची सुसंगति लावतां येईल, हें प्रत्येक तत्वजिज्ञासूनें गृहीत धरलेंच पाहिजे. हीच गोष्ट वेदान्तांत गृहीत धरणें दोषास्पद कसें होतें, हें मला समजत नाहीं.

**जिज्ञासुः**—गृहीत धरणें निराळें आणि अशी संगति किंवा एकवाक्यता आजामितीला लावतां येणें शक्य आहे, इतकेंच नव्हे तर मानव जातीच्या बाल्यावस्थेंत व अल्पज्ञानावस्थेंत ती ऋषींनीं किंवा मुनींनीं लावली, हें म्हणणें निराळें; आणि शिवाय ही गोष्ट युक्तिवादानें सिद्ध करून देणें, हें त्याहूनही निराळें ! शास्त्र म्हणजे unified or systematised knowledge हें स्पेन्सरचें म्हणणें बरोबर आहे. पण ही पूर्णतेप्रत पावलेल्या शास्त्राची व्याख्या आहे. आजचीं सर्व शास्त्रें सर्वांगपरिपूर्ण झालीं आहेत असें कोणी आधुनिक शास्त्रज्ञ म्हणत नाहींत. स्पेन्सरची व्याख्या हें ध्येय आहे. तिकडचीं सर्व शास्त्रें या ध्येयाप्रत जाण्याचा प्रयत्न करीत आहेत, गेलेलीं नाहींत. तिकडचें तत्वज्ञानही इतर शास्त्राप्रमाणें वर्धिष्णु-विकास पावणारें—आहे. तें वेदान्ताप्रमाणें वठलेलें नाहीं.

**शंकितः**—वेदान्ताचा दोष दाखवायला गेलास पण त्याची तूं आतां ही स्तुतिच केलीस, असें मला वाटतें. वेदांताचा विकास होणें आतां शक्य नाहीं, हें वेदान्ती कबूल करतील. पण याचें कारण असें कीं, ते शास्त्र पूर्णतेप्रत गेलेलें आहे. 'वठलेलें आहे' असें निंदात्मक शब्द घालण्याचा तुम्हांला काय अधिकार ?

**जिज्ञासुः**—वेदान्त पूर्णतेप्रत गेलेला असल्यास त्यानें आमच्या सर्व शंकांचें निवारण केले पाहिजे. पण आजकाल तर अनुभवाच्या व युक्तिवादाच्या आधारें जगांतील सर्व प्रश्नांचीं समर्पक उत्तरें कोणीही देऊं शकत नाहीं. योगी लोक कदाचित् देऊं शकतील. पण या वादांत योग्यांना आपण बहिष्कार घातला आहे. युक्तिवादानें जगाचें कोडें सुटणें अशक्य आहे. जगांतील गोष्टींचा कार्यकारणभाव कोणी समजून दिल्यास मनुष्याचें बरेंच समाधान होतें हें खरें, पण शंका राहतातच. कारण, 'कारणाचें कारण काय ?' हा प्रश्न अनंत आहे.

**शंकितः**—नीतिदृष्ट्या तरीं जगांतील प्रत्येक व्यवहार समर्थनीय व समंजस आहे का? सृष्टीची नीतिविषयक दृष्टि आणि आपली दृष्टि या एकच आहेत का? नीतिदृष्ट्या जगताचा आत्मा व आपला आत्मा यांच्यांत कांहीं ऐक्य आहे का? सर्व जग हें जर ब्रह्मस्वरूप असेल, किंवा तें सर्वशक्तिमान्, सर्वज्ञ, प्रेममय, सदय, ईश्वरानें निर्माण केलेलें असेल तर जग हें निर्दोष आहे, असें मानलेंच पाहिजे; नाहीं तर 'ब्रह्मा' मध्यें व्यंग आहे किंवा ईश्वर सदोष आहे, हें कबूल करण्याची आपत्ति प्राप्त होईल. सर्व जग ब्रह्मस्वरूप आहे, किंवा परमेश्वर सर्व अणुरेणूंत भरलेला आहे, त्याच्या आज्ञेशिवाय काडीही हालत नाहीं, हें बोलतांना ऐकतांना चांगलें आहे. पण त्याचा अर्थ काय होतो, याचा विचार केल्यास मन गोंधळून जाईल. खांवामध्येंही ईश्वर आहे, हें तत्व नारसिंहावताराच्या सुंदर व बोधप्रद गोष्टीवरून आपण काढतों. पण त्या वेळेस या तत्वाचा काय अर्थ होणें शक्य आहे, याचा आपण सहसा विचार करीत नाहीं. स्तंभ हा ईश्वरस्वरूप आहे, कबूल. बरें, वेश्या ही देखील ईश्वरस्वरूपच का? प्रत्येक अणुरेणूमध्यें ईश्वर भरलेला आहे; उत्तम. बरें, प्लेगच्या जंतूंत किंवा फिरंगीरोगाच्या जंतूंत ईश्वर आहे किंवा नाहीं? सर्व जग ब्रह्मस्वरूप आहे; ठीक आहे. दारची घाणही ब्रह्मस्वरूपच का? कर्ता-करविता ईश्वर आहे; उत्तम. दुष्काळांत माणसें अन्नान्न करून मरतात, हें ईश्वरच करतो काय? जगांतील सर्व व्यवहार म्हणजे ईश्वराची लीला आहे; कबूल. हिंदुस्थानांतील तीस कोटि लोक दास्यांत आहेत, ही गोष्ट आनंदानें पाहणारा व लीला करणारा ईश्वरच काय?

**जिज्ञासुः**—वेदान्ताचा तूं हा नुसता फार्स केलास. हा उपहास 'फार्स' या दृष्टीनें चांगला असेल; पण त्याच्यांत वेदान्त्यांच्या मनाला लागणारें असें कांहीं नाहीं. कारण वेदान्ती मुळीं कबूलच करतात कीं, संकुचित दृष्टीच्या मनुष्याला या गोष्टीचें रहस्य कळावयाचें नाहीं. सामान्य लोकांना वेदान्त हा कळण्यासारखा नाहींच मुळीं. 'सामान्य' कशाला? मोठा शास्त्रज्ञ जरी झाला तरी त्याच्या दृष्टीचें क्षेत्रही ईश्वराच्या दृष्टिक्षेत्राच्या मानानें किती तरी अल्प आहे. तेव्हां ईश्वराच्या विशाल, खोल व सूक्ष्म दृष्टीला जें चांगलें दिसते, तें एखाद्या शास्त्रज्ञाच्या एकांगी, अल्प व आकुंचित दृष्टीला वाईट दिसतें, यांत नवल काय? एका चितार्‍यानें मोठ्या पडद्यावर एका सरोवराचें व त्यावरील कमलांचें, हंसांचें वगैरे सुंदर चित्र रंगविलें. त्या सरोवरावरून कृष्ण मेघमाला चालली आहे, असें त्यानें त्या चित्रांत

दाखविलें होतें. तो पडदा भुईवर पसरून ठेवला असतां व त्यावरील मध्यवर्ती चित्रावर झांकण ठेवलें असतां, माझ्यासारखा एक अडाणी मनुष्य तेथें गेला. त्याला अर्थात् मेघमालेचाच तेवढा भाग दिसला, आणि तो म्हणाला, ‘ या कापडावर ही अशी शाई कोणी फांसली आहे ? हा उपद्याप कोणीं केला ? ’ ही खरी गोष्ट झाली. आतां एका गोष्टीची कल्पना करण्यास तुला सांगतों. एखाद्या युवतीच्या कपोलावर बारीक तीळ आहे असें समज. तिळामुळें तिची सौंदर्यहानि न होतां तिचें मुख अधिकच खुलतें अशी कल्पना कर आणि एखादा लहान सूक्ष्म जंतु–सूक्ष्मदर्शक यंत्रांतून दिसेल न दिसेल इतका सूक्ष्म जंतु–त्या कपोलतिलकाच्या स्थानीं जाऊन बसला आहे, आणि त्याला विचार करण्याची शक्ति आहे असें समज. या सूक्ष्मतम जंतूच्या अल्पतम दृष्टीला त्या युवतीचें मुख तिळासारखें काळें आहे, असें नाहीं का वाटणार ? आणि त्याचा एखादा दूरदर्शी–किंवा वेदान्ती–मित्र त्याला जर म्हणाला कीं, ‘ गड्या, हा तीळ काळा असेल, पण त्यानें सर्व मुखाला शोभा आणली आहे; ’ तर तो पहिला सूक्ष्म जंतु आपल्या वेदान्ती मित्राला हंसेल व म्हणेल, तिचें सर्व तोंड काजळासारखें काळेंकुट्ट आहे आणि हें ‘ दृष्टात् अदृष्टसिद्धिः ’ या न्यायानें माझें अनुमान आहे; आणि या अशा तोंडाला या तिळानें काय शोभा येणार आहे, तेंही मला कळण्यासारखें आहे ! ’ असो, असे मला अनेक दाखले देतां येतील. सगळ्याचा भावार्थ हाच कीं, आपली पृथ्वी ही विराट्स्वरूपी ईश्वराच्या मानानें तिळाएवढीसुद्धां होणार नाहीं असें असतां या अत्यल्प भागांत सूक्ष्मतम जंतूंप्रमाणें वावरणारे आपण आपल्या अल्पज्ञ बुद्धीच्या दृष्टीनें विराट्स्वरूपाचें अनुमान करतों व आपणांस दिसणाऱ्या अत्यंत क्षुल्लक गोष्टी-वरून त्याची किंमत ठरवितों हें आपलें धाडस नाहीं का ? जगांत आपणांस दुःख, अन्याय, पाप, घाण इत्यादि गोष्टी दिसत आहेत, हें कबूल. पण त्या गोष्टी निर्माण करण्यांत किंवा होऊं देण्यांत ईश्वराचा उच्चतम हेतु असेल हें आपण विसरूं नये.

**जिज्ञासुः**—दुःख, अन्याय, पाप, कुरूपता, इत्यादि गोष्टींचें अस्तित्व सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् जगच्चालकाला चालतें, यावरून या अनिष्ट भासणाऱ्या गोष्टींचें कांहीं तरी उच्चतर कार्य ‘ असेल ’ हें मला कबूल आहे; पण तें ‘ आहेच ’ असें मात्र म्हणण्यास मी तयार नाहीं. वेदान्त म्हणतो ‘ जग हें ब्रह्मस्वरूप आहे, उत्तम आहे, निर्दोष आहे. ’ कोणत्या दृष्टीनें वेदान्ताला हें दिसतें, हें दाखले न देतां

आणि अनुभवाला धरून जर कोणीं सांगितलें तर आम्हांला उपयोग आहे. नाहीं तर चालूं द्या जगांत चालला आहे तसला शाब्दिक कोट्यांचा आणि काल्पनिक उपमांचा आमच्यावर भडिमार! बाकी असा भडिमार करणाऱ्यांचें तोंड मात्र दुखूं लागेल; पण माझा मुद्दा कांहीं मी सोडावयाचा नाहीं.

**शंकितः**—युक्तिवादानेंही मला तुझें कांहीं अंशानें समाधान करतां येईल. जगांतील दुःख, पाप, वैषम्य, नैर्घृण्य, इत्यादि गोष्टी ईश्वराला कशा खपतात, ही आपली शंका आहे. मी आतां या जगांत सज्जनांना दुःख कां व्हावें व दुर्जनांना सुख कां मिळावें, या एवढ्या मर्यादित प्रश्नाचाच विचार करतों आणि तुला असें दाखवून देतों कीं, जसजसें आपलें ज्ञान वाढत जातें व नीतिमत्ता सुधारते, तसतसा हा प्रश्न सुटत जातो व शेवटीं तर 'सज्जनांना दुःख होणें अवश्य व इष्ट आहे' असें म्हणण्यापर्यंत आपली तयारी होते. मी लहान असतांना मला वाटत होतें कीं, ईश्वर हा तुकारामादिकांना दारिद्र्यांत ठेवतो व दुष्ट राजांना ऐश्वर्य देतो, तेव्हां तो मोठा अन्यायी आहे. पण पुढें पुढें मला असें समजूं लागलें कीं, श्रीमंती मिळाली म्हणजे सुख होतेंच असें नाहीं. श्रीमन्त माणसांची प्रकृति बहुधा नाजूक—म्हणजे वाईट—असते. त्यांना रात्रीं चांगली झोंप येत नाहीं; त्यांना खऱ्या मैत्रीचें किंवा प्रेमाचें सुख बहुधा लाभत नाहीं; एकमेकांमध्यें त्यांची स्पर्धा असते; पैशाशिवाय त्यांना कांहीं सुचत नाहीं; त्यांची पोरें बहुधा बावळट पण उद्धट असतात; व पुढें पुढें बापालाही विचारीनाशीं होतात; राजे लोकांना तर स्वपुत्रांच्याही हातून कधीं कधीं मरण येतें! 'Uneasy lies the head that wears a crown' या तत्त्वांतील मर्म कळल्यापासून सज्जनांच्या दुःस्थितींत व दुर्जनांच्या ऐषआरामांत जें मला महदंतर दिसत होतें, तें कांहीं अंशानें कमी झालें. पुढें पुढें गरिबी म्हणजे सर्वतोपरी वाईट नव्हे हें तत्त्व मला थोडें थोडें समजूं लागलें. गरीबांची प्रकृति परिश्रमामुळें चांगली राहते, त्यांच्या सर्व मानसिक शक्ति विकास पावतात, त्यांना प्रेमाची, औदार्याची व भूतदयेची किंमत समजते, ते अल्पसंतुष्ट असतात, व ईश्वराला विसरत नाहींत, इत्यादि गोष्टी समजूं लागल्यावर सज्जनांच्या व दुर्जनांच्या स्थितींतील महदंतराचें कोडें बऱ्याच अंशानें उलगडलें. तरी अशी शंका राहिली कीं सज्जनांचा योगक्षेम ईश्वरानें वास्तविक कां चालवूं नये? श्रीमंती नको, पण दैन्य त्याहून नको. या शंकेनें बरेच दिवस त्रास दिला. पण पुढें पुढें असा विचार मनांत आला कीं, सज्जन मनुष्याला सुख मिळावें, हें तरी

काय म्हणून ? सुख मिळेल या आशेनें का सज्जन सदाचरण करीत असतो ? अमुक एक गोष्ट चांगली–न्यायाची–नीतीची आहे, म्हणून ती करावयाची, का ती सुखदायक आहे म्हणून करावयाची ? 'नीति' ही 'नीति' म्हणून आदरणीय का सुखदायक म्हणून ? परिणाम कांहींही होवो, सन्मार्ग कांहीं मी सोडणार नाहीं, अशा भावनेनें जो मनुष्य सन्मार्गानें चालेल, तोच खरा नीतिमान्; सन्मार्गानें चाललें असतां सुख मिळेल या आशेनें जो सदाचरण करतो तो एक प्रकारचा सुखाभिलाषीच होय; हें तत्त्व कळूं लागल्यावर 'सज्जनांना ईश्वर ऐहिक सुख देत नाहीं' यांत मला फारसें वावगें दिसेनासें झालें. ऐहिक सुख मिळेल, हें सज्जनांना कोणीं वचन दिलें होतें ? आणि त्या आशेनें केलेलें सत्कृत्य दामदुप्पट करण्याच्या आशेनें सावकारानें दिलेल्या कर्जाच्याच योग्यतेचें नव्हे काय ? परोपकार किंवा सदाचार सहेतुक असेल तर तो खरा नव्हे. अहेतुक असेल, तर मग ऐहिक सुख मिळालें नाहीं, ही तक्रार कां ? आणि पुनः असें कीं, सत्कर्माचें बक्षीस सुख असें कोणी वचन दिलें आहे ?

**जिज्ञासुः**—'तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् !' भगवंताचेंच हें 'वचन' आहेना ?

**शंकितः**—त्यांचेंच आहे. पण त्याचा अर्थ तूं करतोस त्याहून निराळा आहे. निदान मी तरी निराळा अर्थ करतों. आणि आपण आतां केवळ युक्तिवादानें वादविवाद करीत असल्यामुळें जुनीपुराणीं शास्त्रें काय म्हणतात हें पाहण्याचें आपणांस प्रयोजनही नाहीं. असो 'सदाचार सोडला नाहीं तरी दुःख झालें' अशी तक्रार करणें सज्जनांना उचित नव्हे व तसा त्यांना अधिकारही नाहीं, हें कळूं लागलें तरी माझें पूर्ण समाधान होईना. असें वाटावें कीं, जगांत जर कोणाला सुख देणें इष्ट असेल तर तें सज्जनांनाच देणें इष्ट होय. मग ईश्वर त्यांचाच उलट छळ कां बरें करतो ? परंतु विचारांतीं व अनुभवांतीं मला असें कळूं लागलें कीं, साधु पुरुषांचा छळ होणें अनेक दृष्टीनें इष्ट आहे. एक तर छळांतून व जाचांतून तावून सुलाखून ते बाहेर पडले म्हणजे त्यांची खरी योग्यता लोकांना कळूं लागते. दुसरें असें कीं, सौजन्य हें सुखकारक म्हणून चांगलें, असें वस्तुस्थिति नसून तें आपल्या सदसद्विवेकबुद्धीला चांगलें दिसतें म्हणून चांगलें; हें तत्त्व या उदाहरणावरून लोकांच्या मनांत चांगलें ठसतें. अशा प्रकारच्या विचारांनीं माझें बरेंच समाधान

झालें; तरी अशी एक शंका राहिलीच कीं, लोकांना सज्जन मनुष्याची पारख करतां यावी किंवा सौजन्य हा एक सुखाचा मार्ग आहे असा लोकांचा भ्रम होऊं नये, म्हणून साधूंना बिचाऱ्यांना काय म्हणून ईश्वरानें यमयातना भोगायाला लावाव्यात ? साधुसंतांना दुःख दिल्याशिवाय वरील तत्त्वें लोकांना शिकविण्याचा दुसरा मार्ग सांपडणें ईश्वराला अशक्य होतें का ? या शंकेनें बरेच दिवस मला अडविलें. पुढें असा अनुभव आला कीं आरामांत फार दिवस काढले तर नीतिमत्तेची धार बोथट होऊं लागते. इंद्रियदमनाचे किंवा स्वार्थत्यागाचे प्रसंगच येईनासे झाले म्हणजे इंद्रियदमन किंवा स्वार्थत्याग करण्याची शक्तिच कमी होत जाते–निदान ती आपणांमध्यें अद्यापि कायम आहे अशी खात्री देतां येत नाहीं. ' तसा मोठा मोहकारक कठीण प्रसंग आला असता तर आपल्या हातूनही तसा दोष कदाचित् घडला असता ' असें कित्येक सज्जन माणसांच्या तोंडूनही आपण ऐकतों. पापकर्म करण्यास प्रवृत्त करणारी व मनाची चलविचल उडवून देणारी वेळ आली म्हणजे हे लोक पाप करतीलच असें नाहीं; त्यांची नीतिमत्ता बरीच उच्च दर्जाची असते; पण तसल्या प्रसंगांचा फारसा ताजा अनुभव नसल्यामुळें आपल्या हातून इंद्रियदमन होईलच अशी त्यांना खात्री नसते. ही खात्री येण्यास त्यांचें सत्व पाहणारे अनेक प्रसंग त्यांच्यावर आले पाहिजेत. अशा अनेक दिव्यांतून अनेकदां ते बाहेर पडले म्हणजे त्यांचा त्यांना आत्मप्रत्यय येतो. हा आत्मप्रत्यय ज्याला आला तोच खरा नीतिमान् मनुष्य. या दृष्टीनें जेव्हां मी पाहूं लागलों तेव्हां सत्त्व पाहणाऱ्या प्रसंगांची–दुःखाची, हालअपेष्टांची, छळाची वगैरे इष्टताच नव्हे तर आवश्यकता माझ्या ध्यानांत आली व मी ईश्वराला कांहीं दिवस दोष देईनासा झालों.

**जिज्ञासुः**––माझी यावर शंका एवढीच कीं, तुकारामासारख्यांचें सत्त्व पाहिलें तर जगाचा व तूं म्हणतोस त्याप्रमाणें त्यांचाही फायदा होईल. पण अज्ञान-अडाणी लोकांना दारिद्र्य–दुःख भोगावयास लावून व पोटाची खळगी भरण्याकरितां त्यांना पाप करण्यास लावून ईश्वरानें जगाचें कोणतें मोठें हित केलें आहे? सामान्य माणसावर बिकट प्रसंग जोंपर्यंत आले नाहींत, तोंपर्यंत त्यांची नीतिमत्ता टिकते. अशा अर्धवट लोकांवर दारिद्र्यादि कठीण प्रसंग आणल्यास ते चौर्यादि पापें करण्यास प्रवृत्त होतात व हा क्रम चालू राहिल्यास पुढें पुढें तर ते निगरगट्टपणें व निलाजरेपणें पापें करूं लागतात. त्यांच्या पापाचरणाचा बोजा त्यांचें सत्त्व पाहणाऱ्यावर नाहीं काय ? बरें, या असल्या लोकांची गोष्ट सोडून दे. भीक मागून व साधल्यास चोऱ्या

करून पोट भरणाऱ्या गरीब बायकांच्या पोरांची नीतिमत्ता पुढें चांगली होणें शक्य आहे कां ? पण त्यांना जर ईश्वरानें अशा आईबापांच्या संगतींत ठेवलें नसतें व त्यांना जन्मतः भीक मागण्याचें व चोरी करण्याचें बाळकडू पाजलें नसतें, तर त्यांची नीतिमत्ता कदाचित् विघडली नसती. वाईट परिस्थितींत ईश्वरानें जन्मास घातल्या-मुळें हजारों मुलें विघडत आहेत, हें ज्याला ठाऊक आहे तो ' ईश्वराला नीतिमत्तेची विशेष पर्वा आहे ' असें विधान कधींही करणार नाहीं.

**शंकितः**—तुझी शंका बरोबर आहे. पण याच्यावर असें म्हणतां येईल कीं, असलीं उदाहरणें अपवादात्मक आहेत. एकंदरीनें पाहतां जगांत न्याय, सुख, सदाचार वगैरे यथास्थित आहेत. अपवादात्मक गोष्टींचें स्तोम माजविण्यांत अर्थ नाहीं. जग जर पुष्कळ अंशानें वाईट असतें, तर जगांत ' वाईट गोष्टी कां आहेत ?' हा प्रश्नच न येतां. त्याऐवजीं ' जगांत अपवादादाखल ज्या चांगल्या गोष्टी दिसत आहेत, त्यांची उपपत्ति कशी लावावयाची ? ' असा प्रश्न लोकांना पडला असता. म्हणजे Problem of evil जाऊन त्याऐवजीं Problem of good आला असता. बाबू रवींद्रनाथ टागोर यांनीं एका मासिकांत याच प्रश्नासंबंधानें लेख लिहिला आहे. त्यांत त्यांनीं सुंदर व नवीन नवीन दाखले देऊन असें दाखविलें आहे कीं, जग एकंदरींत बरेंच चांगलें आहे. वरवर पाहणाऱ्याला तें वाईट दिसतें; सूक्ष्म दृष्टीनें पाहणाऱ्याला प्रत्येक वाईट गोष्टींतही ईश्वराचा कांहीं तरी हेतु असेल, हें तत्त्व कळूं लागतें.

**जिज्ञासुः**—जगांत येथून तेथून दुःख भरलेलें आहे असें मी म्हणत नाहीं. पण सुखाचा पूर लोटला आहे असेंही नाहीं. कांहीं सुख व कांहीं दुःख, पुष्कळ सुख व थोडें दुःख असें म्हण पाहिजे तर. दुःख अधिक असतें, तर प्रत्येकानें आत्महत्या केली असती. पण जें थोडेंसें दुःख आहे तें तरी कां म्हणून ? व हें दुःख सज्जनांच्या वांट्यास यावें, हें तरी काय म्हणून ?

**शंकितः**—यावर वेदान्ती असें म्हणतील कीं, त्यांचें पूर्वकर्म त्यांना या जन्मांत दुःख भोगावयास लावतें. सज्जन जें दुःख भोगतो, तें पूर्वजन्मांतील पापकर्माबद्दल शासन म्हणून भोगतो; व दुर्जन ऐश्वर्य भोगतो, तें पूर्वजन्मार्जित पुण्याईचें फळ म्हणून भोगतो, अशी वेदान्त्यांनीं उपपत्ति लावली आहे. ' कर्मा ' च्या उपपत्तीविषयीं—

**जिज्ञासु:**—"कर्माची उपपत्ति!" वा काय भाषा आहे पण! मराठी भाषेचें नशीब, झालें! तिचें 'कर्म' ओढवलें आहे, दुसरें कोणाचें नाहीं. असो; कर्मवादासंबंधानें मला एवढेंच म्हणावयाचें आहे कीं, पूर्वजन्मीं एखाद्यानें जें पाप केलें असेल, त्याबद्दल शासन म्हणून जर त्याला ईश्वर दुःख देत असेल, तर पूर्वजन्मींच्या पापाचें स्मरण त्या मनुष्याला असणें इष्ट आहे. 'अपराध कोणता' हें त्याला ठाऊक नसतां त्याला शिक्षा देण्यांत हेतु कोणता? शिक्षा देण्यांत नीतिदृष्ट्या हेतु दोन असतात, (१) एक असा कीं, गुन्हेगाराची नीतिमत्ता सुधारावी व त्यानें तसला अपराध पुनः करूं नये; व (२) दुसरा असा कीं, त्याला शासन झालेलें पाहून दुसऱ्या लोकांनीं धडा घ्यावा व त्या शासनाच्या भीतीनें त्यांच्या पापप्रवृत्तीस आळा बसावा. परंतु अपराध काय आहे हें न सांगतां एखाद्याला जर न्यायाधीश फटके मारूं लागला, तर त्या माणसाची नीतिमत्ता सुधारेल का? किंवा लोकांना तरी कांहीं धडा घेतां येईल का? शिक्षा करण्यांत असलेला पहिला हेतु सफल होण्यास 'अपराध कोणता' याची गुन्हेगारास जाणीव पाहिजे व दुसरा हेतु सफल होण्यास इतरांनाही त्यासंबंधाची जाणीव पाहिजे. पण पूर्वीच्या जन्मीं कोणतें पाप केलें हें ज्ञान नसतां या जन्मीं शासन करण्यांत नीतिदृष्ट्या काय समंजसपणा आहे? आतां तिसऱ्या एका हेतूनें कांहीं लोक आपल्या शत्रूला शिक्षा देतात, हें खरें आहे. तो हेतु म्हणजे 'सूड.' ज्यानें आपणाला दुःख दिलें त्याला आपण दुःख द्यावयाचें, या भावनेनें कांहीं लोक अपकाराची फेड अपकारानेंच करतात. पण अशी क्षुद्र भावना ईश्वराविषयीं कल्पिली, तर ईश्वराचें न्यायित्व व परमकारुणिकत्व कोठें राहिलें?

**शंकित:**—यावर वेदान्ती असें उत्तर देतील कीं, पूर्वी कोणतें पाप केलें होतें याची जरी मनुष्याला स्पष्टपणें जाणीव नसली, तरी कोणत्या प्रकारचें किंवा जातीचें आपण पूर्वजन्मीं पाप केलें असावें याची कल्पना करणें शक्य आहे. एखाद्याचा मुलगा लहानपणींच मेला तर तो दुःखानें एखादे वेळेस असें म्हणतो कीं, 'देवा, मी कोणाचें तरी पूर्वजन्मीं मूल मारलें होतें म्हणून मला तूं हें शासन केलेंस!' एखाद्याचें घर जळालें म्हणजे कांहीं लोक म्हणतात कीं, "पूर्वी यानें कोणाचें नुकसान केलें असलें पाहिजे!" यावरून एवढेंच मला दाखवायाचें कीं, आदल्या जन्मीं कोणतें पाप केलें होतें हें जरी नक्की ठाऊक नसलें, तरी त्याची कल्पना करून आपलें समाधान करून घेणें शक्य आहे व तसें कांहीं लोक करून घेतातही.

**जिज्ञासुः**—समाधान करून घेण्याची ही पद्धत इतकी बालिश आहे कीं, बुद्धिमान् मनुष्याचें या पद्धतीनें समाधान खरोखर कधीं झालें आहे असें मला वाटत नाहीं. हिंदु किंवा हिंदी लोक वरील प्रकारचीं वाक्यें कधीं कधीं उच्चारतात, ही गोष्ट मला कबूल आहे. पण त्यांवरून एवढेंच सिद्ध होतें कीं, 'कर्मवाद' आपल्या लोकांच्या हाडींमासीं पूर्णपणें खिळला आहे. व युक्तिवादानें जेथें आपलें समाधान होत नाहीं, तेथें कर्मवाद आणून आपण आपलें कसें तरी समाधान करून घेण्याचा प्रयत्न करतों.

**शंकितः**—दुसऱ्या एका दृष्टीनें तुझें समाधान करण्याचा मी प्रयत्न करून पाहतों. जन्मांन्तरींचें पापपुण्य आपणांस समजत नसतां त्याबद्दल शासन किंवा बक्षीस देणें समंजसपणाचें आहे काय असा तुझा वेदान्त्यांना प्रश्न आहे. यावर वेदान्त्यांच्या वतीनें मला एवढेंच म्हणतां येईल कीं, ईश्वर सज्जनांना त्यांच्या जन्मान्तरींच्या पापकर्माबद्दल जें दुःख देतो तें शासन म्हणून नव्हे तर तें त्या कर्मांचें नियतफल म्हणून. विस्तवांत हात घातला म्हणजे हात भाजतो. यांत जसा 'शासना'चा वगैरे हेतु नसतो, तसेंच पापकर्माबद्दल पुढें त्याचीं फळें भोगावयास लावणें यांतही 'शासना'चा कांहीं संबंध नाहीं. 'जसें कर्म तसें फळ' हा नियम इतर सृष्टिनियमांप्रमाणेंच त्रिकालाबाधित आहे; आणि या नियमानुसारच दुर्जन आपल्या पूर्वपुण्याईचें फळ म्हणून ऐश्वर्योपभोग घेतो व सज्जन पूर्वजन्माच्या पापकर्माबद्दल रडत बसतो. ईश्वरानें एकदां जे नियम घालून दिले आहेत त्यांत तो कोणाकरितां कधींही बदल करीत नाहीं. सज्जन मनुष्यानें विस्तवांत हात घातला तरी तो भाजणारच; तो सज्जन आहे म्हणून ठरलेला नियम ईश्वर बदलील कीं काय? उलटपक्षीं, दुर्जनानें साखर खाल्ली म्हणून ती त्याला कडू लागावयाची नाहीं. दुर्जनानें आदल्या जन्मीं जर पुष्कळ पुण्याई कमवून ठेविली तर त्याला त्या पुण्याईचें फळ मिळावयाचेंच. या दृष्टीनें पाहिलें म्हणजे मला तर कर्माची Theory समंजसपणाची दिसते.

**जिज्ञासुः**—पण आधीं 'पूर्वजन्म' असतो, हें तरी खरें आहे का? हें जर सिद्ध करतां आलें नाहीं तर सर्वच इमारत ढांसळेल! मनुष्य मेल्यानंतरही त्याचा आत्मा जिवंत असूं शकतो, असें अलीकडचे बरेच शास्त्रज्ञ म्हणूं लागले आहेत, हें मला ठाऊक आहे. सर ऑलिव्हर लॉज, डब्ल्यू टी. स्टेड, सर आल्फ्रेड रसेल वालेस, वुइल्यम जेम्स, डॉ. मायर्स, डॉ. हॉड्गसन इत्यादि आधुनिक शास्त्रज्ञांना 'मृत्यूनंतरही आत्मा जिवंत असतो' हें तत्त्व मान्य झालें आहे. पण तें इतर सृष्टिनियमां-

प्रमाणें निःसंशय कोटींतलें अद्यापि झालेलें नाहीं. बरें झालें आहे असें समज; तरी काय ? मीं पूर्वजन्मीं पापकर्म केलें म्हणून त्याचें फळ मला या जन्मांत भोगावें लागतें, हा इतर सृष्टिनियमांप्रमाणेंच कार्यकारणभावाचा बरोबर व्यवहार झाला, हें मी कबूल करतों. पण मी पाप करीन हें ईश्वराला ठाऊक होतें कीं नाहीं ? ठाऊक जर होतें, तर त्यानें मला पाप करूं कसें दिलें ? पापाबद्दल मला पुढें मोठें दुःख भोगावें लागतें, हें सर्वज्ञ ईश्वराला ठाऊक असतां त्यानें मला पाप कसें करूं दिलें ? त्याला माझी दया कां नाहीं आली ?

**शंकितः**—पाप करणें किंवा न करणें हें ईश्वरानें तुमच्या स्वाधीन ठेवलें आहे. त्यानें तुम्हांला एकदां सांगून ठेवलें आहे कीं, " बाबांनो, सन्मार्गानें चाललेत तर हें अमुक फळ मिळेल; बरें, वाईट मार्ग तुम्हीं स्वीकारलात, तर त्याचें हें दुसऱ्या एका प्रकारचें फळ मिळेल. कोणता मार्ग स्वीकारावयाचा, हें मी पूर्णपणें तुमच्या इच्छेवर सोंपवीत आहें, ही गोष्ट ध्यानांत धरा. कारण तुम्ही जें कांहीं आचरण कराल त्याबद्दल मी तुम्हांला जबाबदार धरीन आणि त्याप्रमाणें बरें वाईट फळ देईन. मागाहून कोणत्याही प्रकारची तक्रार चालावयाची नाहीं, हें तुम्हांला आतां मी बजावून सांगत आहें. तेव्हां संभाळून वागा.' अशा रीतीनें ईश्वरानें लोकांना इच्छास्वातंत्र्य देऊन ठेवलें असल्यामुळें लोकांच्या पापाची किंवा पुण्याची ईश्वरावर जबाबदारी नाहीं. ईश्वर त्रिकालज्ञ असल्यामुळें अमुक मनुष्य अमुक काळीं अमुक पाप करणार आहे हें जरी त्याला ठाऊक असलें, तरी त्या पापाचें कर्तृत्व त्या मनुष्याकडेच राहणार. ईश्वराचें सर्वज्ञत्व, सर्वशक्तिमत्व, हीं मनुष्याच्या कर्तृत्वाशीं-त्याच्या इच्छास्वातंत्र्याशीं—विसंगत नाहींत; कारण अमुक एक गोष्ट होणार आहे हें मला ठाऊक असलें म्हणजे ती **मी करतों** असें नाहीं; किंवा ती न होऊं देण्याची माझ्या अंगांत शक्ति असली तरीही त्या गोष्टीचें कर्तृत्व माझ्याकडे येत नाहीं. ती गोष्ट होऊं देण्याची जबाबदारी मात्र माझ्याकडे येईल, हें कबूल करणें अर्थात् भाग आहे. या दृष्टीनें पहातां जगांतील दुःखाची व पापाचीही जबाबदारी ईश्वरावर अप्रत्यक्षपणें येते. उदाहरणार्थ, आधिव्याधींनीं गांजलेला असा एखादा महारोगी आंधळा-पांगळा मनुष्य 'मला असें कां गांजतोस' अशी ईश्वराजवळ तक्रार करीत आहे व हुजत घालीत आहे असें समज. ईश्वर त्याला म्हणेल कीं, 'तूं पापें केलींस त्याचें फळ तुला भोगावें लागत आहे.' महारोगी त्याला म्हणेल कीं, 'या जगांत आल्यापासूनच मी असा आंधळा व पांगळा आहें, आणि हा

रोग मला उपजल्यापासून झाला आहे, तेव्हां हें माझ्या पापाचें फळ, असें कसें म्हणतां येईल ? ' ईश्वर म्हणेल कीं, 'तूं पूर्वजन्मीं पापें केलीं आहेस.' पण यावर तो उत्तर देईल कीं, 'केलीं असतील पापें; पण तूंच कां मला तशी बुद्धि दिलीस?' ईश्वर म्हणेल, 'नाहीं, मीं तुला पूर्ण स्वातंत्र्य दिलें होतें.' "बरें," तो महारोगी पुनः म्हणेल 'माझ्या पापाची मी जबाबदारी घेतों. पण मला ज्या वेळेस तूं जन्मास घातलेंस त्या वेळेस मी पापें करीन हें तुला ठाऊक होतें ना ? आणि या पापांचें फळ म्हणून मला हा घाणेरडा रोग होईल आणि हीं दुःखें भोगावीं लागतील, हें तुला ठाऊक होतें ना ? मग पाप करण्याचें स्वातंत्र्य मला देण्यांत तुझी चुकी नाहीं कां झाली ? पापाचें कर्तृत्व माझ्याकडे आहे व त्याचें योग्य तें फळ मला भोगावयास लावणें हें बरोबर आहे. पण इच्छास्वातंत्र्याचा मी दुरुपयोग करणार आहें हें तुला आगाऊ ठाऊक असतां तूं मला हें घातुक इच्छास्वातंत्र्य कशाला दिलेंस ?" यावर ईश्वर कदाचित् असें उत्तर देईल कीं, 'भल्या गृहस्था, तुझ्या अगदीं पहिल्या जन्मीं तुला उत्पन्न केल्याबरोबर तुला मीं बजावून सांगितलें होतें कीं, 'सन्मार्गानें चाललास, तर अमुक फळ मिळेल; व वाईट मार्ग स्वीकारलास, तर हें दुसऱ्या प्रकारचें फळ मिळेल. हें पक्कें ध्यानांत धरून तुला ज्या मार्गानें जावावयाचें त्या मार्गानें जा. मागाहून तक्रार चालावयाची नाहीं.' त्या वेळेस तूं या अटी कबूल केल्यास, आणि आतां तूंच माझ्यावर उलटतोस ?' यावर महारोगी पुनः म्हणेल कीं, 'मला किती जरी बजावून सांगितलें तरी मी इच्छास्वातंत्र्याचा दुरुपयोग करीन व त्याबद्दल मला महद्दुःख भोगावें लागेल, हें ठाऊक असतां तूं मला उत्पन्न तरी कां केलेंस ?' यावर ईश्वर काय उत्तर देईल हें आधुनिक वेदांत्यांना विचारलें पाहिजे.

**जिज्ञासुः**—तूं सुद्धां आतां वेदान्त्यांवर उलटलास म्हणावयाचा! आपल्या आधुनिक वेदान्त्यांना बाकी ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल खरोखरच शंका दिसत नाहीं. कारण "ईश्वराचें अस्तित्व गृहीत धरल्याशिवाय नीतिशास्त्रांचें चालावयाचें नाहीं" असें त्यांनीं एकदां म्हटलें होतें.

**शंकितः**—अरे! त्यांनीं नाहीं, मीच तें म्हटलें होतें.

**जिज्ञासुः**—तूं काय नि ते काय, 'अद्वैत' वेदान्ताच्या दृष्टीनें एकच! जीव आणि शिव यांमध्यें जसा भेद नाहीं, तसा तुझ्यामध्यें व तुझ्या वेदान्ती गुरूमध्यें

भेद नाहीं. बरें, मी तुला खरोखर असें विचारतों कीं, ईश्वराचें आस्तित्व धरल्याशिवाय नीतिशास्त्राचें कां चालावयाचें नाहीं? दुर्जनांचा नियन्ता व सज्जनांचा सखा असा कोणी ईश्वर गृहीत धरल्याशिवाय नीति अशक्य आहे असें कां तुला वाटतें?

**शंकितः**—त्या आपल्या ' आधुनिक वेदान्त्यां' ना याचें उत्तर सहज देतां येईल. कारण त्यांची व ईश्वराची वरीच जानपछान आहे असें दिसतें.

**जिज्ञासुः**—कशावरून? त्यांची कांहीं तरी थट्टा करण्याचा तुझा विचार आहे, असें तुझ्या चेहऱ्यावरून दिसतें.

**शंकितः**—ईश्वराचें सर्वज्ञत्व व सर्वशक्तिमत्व आणि आपलें स्वतंत्रकर्तृत्व किंवा इच्छास्वातंत्र्य ' यांची एकवाक्यता लावून देतांना ते म्हणाले कीं, " अभिमानानें वागेल, त्याला ईश्वर वठणीवर आणील; पण नम्रतेनें वागणाऱ्या आपल्या सद्भक्ताला ईश्वर आपली लंगोटीसुद्धां देईल. " ईश्वर काय नेसतो, हें ज्याला ठाऊक आहे, त्याचा व ईश्वराचा वराच परिचय असला पाहिजे. असो. ईश्वराचा वाद आतां नको; त्याचा आतां वीट आला आहे. ईश्वर जर रोज रोज घरीं आला तर त्याच्यासुद्धां संगतीचा कंटाळा येईल, असें ' वेदान्ती 'च एकदां म्हणाले होते, तें अगदीं खरें आहे. प्रत्यक्ष ईश्वराची ही गोष्ट; मग ईश्वरावद्दलच्या वादाला मी कंटाळलों असलों, तर त्यांत काय नवल? ' आधुनिक वेदान्त्यांच्या' वेदान्तावर दुसऱ्या कांहीं शंका असतील त्या काढ पाहिजे तर; पण आतां पाल्हाळ मात्र लावूं नको.

**जिज्ञासुः**—अगदीं सूत्रात्मक भाषा वापरतों. ' ब्रह्म ' याची व्याख्या काय? ब्रह्मज्ञानाचें विवरण करतांना त्याचा अर्थ हळूहळू कसा बदलला गेला, हें तुला मी एका वाक्यांत दाखवितों. ब्रह्म म्हणजे जगाचें मूलतत्त्व–त्याचें खरें स्वरूप–त्याचें मर्म–त्याचें हृद्गत त्याचा आत्मा–जगदात्मा–परमात्मा–परमेश्वर! या सर्व अर्थांची एकवाक्यता लावून देतां येणार नाहीं, असें नाहीं. कारण ते असें म्हणतील कीं, या जगाचें आदितत्त्व चिदात्मक–ज्ञानात्मक आहे. म्हणून त्या तत्त्वाला ' आत्मा ' म्हणण्यास हरकत नाहीं; व हा आत्मा सर्वांत श्रेष्ठ आहे म्हणून त्याला परमात्मा म्हणणेंही योग्यच आहे; व तो सर्वशक्तिमान् आहे म्हणून त्याला ' परमेश्वर ' असेंही म्हणण्यास हरकत नाहीं. वेदांती लोक अशीच सुसंगति लावून देतात कीं काय ही माझी शंका आहे. आणखीं......

**शंकितः**—तुझ्या या शाब्दिक शंका नकोत मला.

**जिज्ञासुः**—तुला आतां वादविवाद आटपावयाचा आहे असें दिसतें. तेव्हां मीही आतां आटोपतें घेतों. माझी मुख्य शंका ही होती कीं, ब्रह्मज्ञान म्हणजे सर्व विश्वाच्या खऱ्या स्वरूपतत्त्वाचें ज्ञान. ही वेदांत्यांची व्याख्या जर खरी असेल, तर हें ब्रह्मज्ञान आपणांस युक्तिवादानें होणें शक्य आहे काय? नीतिदृष्ट्या जगाच्या व्यवहाराकडे पाहिलें, तर आपलें मुळींच समाधान होत नाहीं. बरें, बौद्धिक दृष्ट्या जरी पाहिलें तरी जगाचें कोडें उलगडत नाहीं; कारण आधुनिक शास्त्रांनीं जरी सृष्टीचीं बरींच गूढ तत्त्वें हुडकून काढलीं असलीं तरी अद्यापि कितीक तरी गोष्टी गूढ आहेत. शिवाय, जीं मूलभूत तत्त्वें किंवा कारणें आधुनिक शास्त्रें गृहीत धरतात, त्यांचीं कारणें काय, हा प्रश्न राहतोच. अमुक एका द्रव्याचें कारण अणु, अणूचें कारण परमाणु, त्याचें कारण इलेक्ट्राणु ( Electron ), त्याचें कारण दुसरें कांहीं तरी, असे जरी शोध लागले तरी 'त्याचें पुनः कारण काय' हा प्रश्न राहणारच. म्हणजे काय तर हा प्रश्न बौद्धिक दृष्टीनें सुटावयाचा नाहीं. आणि आपले आधुनिक वेदान्ती तर युक्तिवादानें वेदान्ततत्वज्ञान सर्वांत समाधानकारक आहे, असें सिद्ध करून देणार होते. बरें, कोणतीही शंका राहिली नाहीं अशा प्रकारचें सर्व जगाचें यथातथ्य ज्ञान होणें शक्य आहे, हें जरी गृहीत धरलें तरी तें कदाचित् हजारों वर्षांनीं झालें तर होईल. पण वेदान्ती म्हणतात, तें कोणत्याही काळीं शक्य आहे. नीतिदृष्ट्या जग जसें असावेसें आपणांस वाटतें तसें आज खास नाहीं. तीस कोटि हिंदी लोक पारतंत्र्यांत आहेत, ही एकच गोष्ट जरी घेतली तरी या जगांत नीतिदृष्ट्या बरेंच वैगुण्य आहे–तें जसें असावयास पाहिजे तसें नाहीं–हें कबूल करावें लागेल. आम्ही आधुनिक लोक म्हणतों कीं, जगांत पुष्कळ दोष आहेत आणि ते दोष काढून टाकण्याचा आम्हीं यथामति व यथाशक्ति प्रयत्न करतों. अगदीं क्षुल्लक गोष्ट घ्या. बुद्धिमत्ता व नीतिमत्ता चांगली आहे, अशा कित्येक मुलांना शिक्षण मिळणें अलीकडे अशक्य झालें आहे. ही गोष्ट जगाचें निर्दोषत्व व ईश्वराचें परमकारुणिकत्वच सिद्ध करते काय? अशा एक का दोन, हजारों लाखों गोष्टी आम्हांला जगांत वैषम्य, पाप, दुःख, अन्याय, जुलूम, इत्यादि गोष्टीचें अस्तित्व दाखवितात. पण वेदान्ती म्हणणार कीं, हे दोष आपल्या संकुचित दृष्टीलाच दोष भासतात; उच्चतम व सूक्ष्मतम दृष्टीनें पाहिलें, तर त्या दोघांचीही आवश्यकता आपणांस दिसून येईल व ईश्वराच्या दूरदृष्टीचें आश्चर्य वाटेल. आपले वेदान्तीच असें म्हणतात असें नाहीं. युरोपांतील व अमेरिकेंतील

पुष्कळ तत्त्ववेत्तेही असेंच म्हणतात. उदाहरणार्थ, प्रोफेसर रॉईस आपल्या एका ग्रंथांत म्हणतात कीं आपल्या बुद्धीला इहलोकांत जें वैगुण्य दिसतें तें ब्रह्मवेत्त्या दृष्टीला पूर्णतेचें एक आवश्यक अंगच आहे, असें वाटतें. The very presence of evil in the temporal order is the condition of the perfection of the eternal order.' तसेंच प्रोफेसर एफ. एच. ब्रॅडले आपल्या Appearance and Reality या ग्रंथांत एके ठिकाणीं म्हणतात कीं, "जगांत जितकी विविधता व विसंगतता असेल तितकें चांगलें. कारण या गोष्टींनीं ब्रह्मस्वरूपी विश्वाची गुणाढ्यता अधिकच ठरते." ('The Absolute is the richer for every discord and for all diversity which it embraces.') ब्रॅडलेचा भावार्थ असा कीं, एकच सूर ओढीत बसण्यापेक्षां विविध सुरांचा सुंदर मिलाफ करून दिल्यानें जसें गायन अधिक चांगलें ठरतें, किंवा एकरंगी गालिच्यापेक्षां अनेकरंगी गालिचा जसा अधिक खुलतो, तसेंच जगाचेंही आहे. या तत्त्ववेत्त्यांच्या उदाहरणांवरून मला एवढेंच दाखवावयाचें होतें कीं, जग हें सर्वांगसुंदर आहे, ही कल्पना पाश्चात्य तत्त्वज्ञानांतही आहे, आणि ही कल्पना ज्याच्या मनांत दृढ झाली तो मनुष्य, लोक कांहींही ह्मणोत किंवा कितीही वैगुण्य-दर्शक किंवा दोषसूचक उदाहरणें दाखवोत, आपलें ह्मणणें कांहीं सोडावयाचा नाहीं. तुम्हीं जो दोष किंवा जें व्यंग दाखवाल, तेंच मुळीं पूर्णतेच्या दृष्टीनें आवश्यक आहे, असें तो ह्मणेल; आणि यापुढें मात्र कोणालाही हात टेकावेच लागणार! त्यांचा यांत कांहीं दोष नाहीं. या लोकांचें हृदय बहुधा अति कोमल असतें व हे अति सात्विक किंवा धार्मिक वृत्तीचे असतात; 'जग हें ईश्वरहीन--अनियंतृक आहे,' ही कल्पना त्यांच्या सात्विक व कोमल वृत्तीला असह्य होते व म्हणूनच त्यांना ती अग्राह्य वाटते; व मग ते त्या कल्पनेच्या समर्थनार्थ आपल्या बुद्ध्यनुसार कांहीं तरीं कोट्या काढतात व लोकांना नव्हे–तर स्वतःलाच फसवून घेतात. आपल्या मनोवृत्तीचा आपल्या मनांवर किती परिणाम होतो याचा ज्याला अनुभव आहे, त्याला वरील कारणमीमांसेंत थोडेंसें तरी तथ्य आहे हें कबूल करावें लागेल.

**शंकितः**—वुइल्यम जेम्सच्या Pragmatism नांवाच्या ग्रंथांतलें हें विवेचन आहे, हें मला जरी तूं सांगितलें नाहींस तरी मीं ओळखलें आहे. असो; एकंदरींत वेदान्ताविरुद्ध तुझें एवढेंच म्हणणें कीं, जग हें बुद्धिदृष्ट्या व नीतिदृष्ट्या मोठें कोडे आहे, हें प्रांजलपणें ते कबूल करीत नाहींत.

**जिज्ञासुः**—हें तर नाहींच कबूल करीत. उलट ब्रह्मवेत्त्या पुरुषाला जग हें उत्तम काव्यग्रंथासारखें विशदार्थ व मधुरार्थ वाटतें, असें ते ह्मणतात. 'ध्येय' ह्मणून ही कल्पना मला उपयुक्त वाटते पण ती यथातथ्य नाहीं–निदान 'आहेच' असें सिद्ध करतां येत नाहीं. पुढेंमागें युगाच्या अंतीं कदाचित् जगाचा अर्थ कळला तर कळेल, अशी आधुनिक लोकांची कल्पना आहे. पण वेदान्त्यांना जगाच्या आरंभापासून पूर्णज्ञान-ब्रह्मज्ञान आहे असें वाटतें.

**शंकितः**—असें त्यांनीं कधीं ह्मटलें ?

**जिज्ञासुः**—म्हणायला कशाला पाहिजे? ब्रह्म हें 'चिदात्मक' आहे व नित्य आहे असें ते म्हणतातना? या ज्ञानस्वरूप ब्रह्माला आत्मज्ञान असलेंच पाहिजे. ब्रह्माचें आत्मज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान दुसरें काय ?

**शंकितः**—ही कांहीं तरी तुझी कोटी आहे.

**जिज्ञासुः**—कांहीं म्हण. आधुनिक वेदान्त्यांमध्यें व आम्हां अज्ञेयवादी लोकांमध्यें जो फरक आहे, तो 'सच्चिदानंद' या शब्दाच्या आधारें मला थोडक्यांत दाखवितां येईल. त्यांना 'ब्रह्मज्ञान' हें 'सत्' म्हणजे सदैव अस्तित्वांत असलेलें–सनातन आहे असें वाटतें. आम्हांला 'कल्पनात्मक भविष्यकालीन ध्येय, याच दृष्टीनें हें खरें व उपयुक्त वाटतें. ब्रम्ह म्हणजे मूल जगत्तत्त्व हें जड नव्हे तर तें चिदात्मक...ज्ञानस्वरूप आहे असें त्यांना वाटतें. तें जड आहे असें आम्हीं म्हणत नाहीं, पण तें ज्ञानस्वरूप आहे असेंही आह्मांला खात्रीनें म्हणतां येत नाहीं. 'ब्रह्म' हें आनंदमय आहे, असें ते ह्मणतात. आह्मीं जगांतील विविध व्यवहाराकडे सूक्ष्मदृष्टीनें पाहिलें ह्मणजे आह्मांला आनंद, न होतां उलट एक प्रकारचें असमाधान मात्र होतें. जग हें सर्वांगसुंदर आहे, असें ब्रह्मवेत्त्या लोकांना स्पष्टपणें दिसतें व ह्मणूनच त्यांना नित्य आनंद होतो, असें वेदान्त्याचें ह्मणणें. आंह्मांला जग हें कांहीं अंशानें तरी सदोष दिसतें व त्यांतील वैगुण्य नष्ट झालेलें पाहिल्याशिवाय आह्मांला समाधान होणें शक्य नसल्यामुळें तें काढून टाकण्याचा आपल्या अल्प मतीप्रमाणें व शक्तीप्रमाणें प्रयत्न करणें, हें आमचें कर्तव्य आहे, असें आम्हांस वाटतें. ( तसा प्रयत्न आह्मीं करतोंच, असें मात्र नव्हें. ) सारांश काय, तर ब्रह्मज्ञान हें 'सत्' कसें; 'ब्रह्म' हें 'चित्' कसें व आनंदात्मक कसें, हें आम्हांला कळत नाहीं.

व तें युक्तिवादानें–योगाभ्यासानें नव्हे–कसें सिद्ध करून दाखवितां येईल, याचीही कल्पना होत नाहीं.

**शंकितः**—नाहीं होत तर स्वस्थ बसा !

**जिज्ञासुः**—आटोपलेंच आमचें. बरें मित्रा, आपल्या 'आधुनिक वेदान्त्यां'कडे या शंका विचारण्याकरितां गेलें पाहिजे. पाहूं या त्यावर काय म्हणतात ते.

---

REFBK-0005435

समाप्त.